म. ग्रं. सं. ठाणे
विषय इतिहास
ग्रं नं 205
1229

ग्र-खंड पहिला



RFFBK-0001956

किंमत ३ रुपये

[illegible]

१०५६

॥ श्रीविद्यागद्वता प्रसन्न. ॥

ज्ञानमित्र पुस्तकमाला, पुष्प चोविसावें.

सचित्र

# रशियांतील बोल्शेविझम !

## खण्ड पहिला

REFBK-0001956

लेखक,

डॉ. लक्ष्मण नारायण जोशी.

प्राणायाम–शिक्षक, जलतत्व–चिकित्सा–शिक्षक, रशियाचा राहू !
टेलीपथी–इंस्ट्रक्टर, मेस्मेरिझम–इंस्ट्रक्टर, महिला–जीवन,
चव्हाणी समशेर ! वगैरे पुस्तकांचे कर्ते.

प्रकाशक व मुद्रक,

नारायण बळवंत चव्हाण. पुणे

प्रथमावृत्ति. ] सन १९२१ [ किं. दिड रुपाया.

( All Rights reserved by the publisher.)

# रशियांतील बोल्शेव्हिझम्!

## खण्ड दुसरा.

या **दुसऱ्या** खंडात— बोल्शेव्हिझम हें एक अरिष्ट आहे! बोल्शेव्हिझम हें अरिष्ट नव्हे! लेनिनची भेट, चिचेरिन याशीं संभाषण, बोल्शेव्हिझम्ची उद्यम व्यवस्था, बोल्शेव्हिझम् आणि भूभाग, सोव्हिएट सरकार आणि मजूर-वर्ग, व्यापारी संघाची चळवळ, खाद्य वस्तूंवरील ताबा, रशियाची जीवनाडी, शिक्षण आणि कला, मुलकी खातें, जनतेचें आरोग्य, सोव्हिएट-राज्यसत्ता, सत्ताधिकार शिक्षणसंस्था, कामकऱ्यांचें आरोग्य, बोल्शेव्हिझम आणि हिंदुस्तान, उपसंहार. येणेंप्रमाणें या दुसऱ्या खण्डात एकंदर अठरा काण्डें वरील मथळ्यांखालीं येणार असून त्यांत बोल्शेव्हिजमचा खरा इतिहास—एकतर्फी नव्हे—गोवलेला असल्यामुळें तो **हृदयस्पर्शी** व **चित्ताकर्षक** झाला आहे. ऐकिव माहितीनें लिहिणें एकतर्फी! लिहिणें व काबीळ झालेल्या नजरेनें लिहिणें यांपेक्षां प्रत्यक्ष घडत असलेला प्रकार पाहून तो निःपक्षपातानें लिहिणेंच उच्च दर्जाचें असतें आणि हीच गोष्ट प्रकृत पुस्तकाची आहे इतकें सांगितलें म्हणजे या ग्रंथाचा आत्मा कसा आहे त्याची साक्ष पटेल!

हें पुस्तक पुणें, पेठ शनिवार, घ. नं.° ४८३ येथें नारायण बळवंत पटवर्धन यांनी आपल्या **हरिहर** नामक छापखान्यांत छापून ज्ञानमित्र कचेरी, शनिवार पेठ, पुणें शहर येथें प्रसिद्ध केलें.

॥ ॐ नमः श्रीरामचन्द्राय ॥

# आर्यमहौषधालय मु. पो. आंजर्ले.

कोंकणप्रांतांतील अगदीं ताज्या व शुद्ध वनस्पतींचीं जगत्प्रसिद्ध रामबाण औषधें.

# कंदर्पमंजरी पाक.

या अपूर्व पाकांत मौक्तिक भस्म, प्रवाल, लोह, माक्षिक, कस्तूरी, अंबर इ. अत्युच्च गुणकारक पदर्थ असून शिवाय बदाम, पिस्ते, अक्रोड, चारोळी, केशर, वेलची, पंजाबी सालंमिश्री, सफेदमुसळी, जायपत्री, गोखरू, शतावरी, भास्कंद, वंशलोचन वगैरे आणखी ८० उपयुक्त वनस्पती घातल्या आहेत. असें असून पाक अमीरउमरावांपासून तों गरीबापर्यंत सर्वांसही घेतां यावा, म्हणून किंमत माफक ठेविली आहे. यानें पथ्यावांचून गुण येतो. कोणत्याही कारणांनीं होणारा व कशाही प्रकारचा शुक्रस्राव, नपुंसकत्व, मूळव्याधी, रक्तदूषणजन्य त्वग्रोग, स्त्रियांचीं धुपणी व गर्भाशयस्थ दोष, हे विकार त्यांच्या एकंदर उपद्रवांसह या पाकानें तत्काल बरे होऊन धातुवृद्धि होते आणि शरीर कणखर व तेजस्वी बनतें. २० तोळे डबा २ रु. एकदम ३ डबे ५ रु. पडतील.

## थंडगार नेत्रांजन.

यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच वगैरे डोळ्यांचे एकंदर विकार तावडतोब बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार होते. ड. किं. १॥ रु.

## परम्यावर अपूर्व मिश्रण.

हें कसलाहि नवा किंवा जुना परमा यांच्या सर्व विकारासह अगदीं जलद बरा करण्याच्या कामीं रामबाण आहे. बाटली १ रुपया.

**सूचना**—वरील औषधें वगैरे माल पूर्ण खात्रीचा असल्यामुळें आज चाळीस वर्षांत त्यांचा लक्षावधि लोकांस अप्रतिम उपयोग झाला असून, त्यांचा नेहमीं फारच खप होत आहे. अनुभवानंतर खात्री पटेलच. औषधें माहितीचे खर्चासह रोखीनें अगर व्ही० पी० नें पाठवूं. प्याकिंग व टपालखर्च वेगळा. घाऊक घेणारांस कमिशन भरपूर. सर्व औषधांच्या आणि आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक फुकट देऊं. आमचीं औषधें वगैरे माल मागविणें तो खालील बिनचूक पत्त्यावर मागवावा.

**कृष्णशास्त्री बिवलकर, वैद्य.**

मु. पो. आंजर्लें, ता. दापोली, जि. रत्नागिरी.

# ज्ञानमित्र पुस्तकमाला.

**ज्ञानमित्र पुस्तकमाला:**—महाराष्ट्रांतील सुशिक्षित, अल्प शिक्षित व पुढारी बंधुभगिनींना रुचतील, पचतील आणि परिणामी हितकारक होईल असें '**ज्ञानामृत**' पाजून वाचकाना आपल्या खऱ्या खऱ्या कर्तव्याची ओळख पटवून देणारी शास्त्रीय, औद्योगिक विषयावर छोटीं छोटीं पण **सप्रयोग** व **सचित्र** पुस्तकें आणि प्रगमशील व प्रगतिकारक विचारांच्या रहस्यपूर्ण **ऐतिहासिक** व **सामाजिक** चटकदार **कादंबऱ्या**, जगांतील थोर विभूतींचीं **चरित्रें** प्रकाशित करण्याची सदर मालेची **प्रतिज्ञा** आहे

ज्ञानमित्र पुस्तकमालेंतील

## संग्राह्य पुस्तकांची नवी खास यादी.

—१९२०—

**मालेचे नियमः**—(१) फक्त चार आणे प्रवेश-फी भरणाऱ्यास ग्राहक समजलें जातें. कायमच्या आश्रयदात्यांस केव्हांहि नांव दाखल करता येतें. (२) ग्राहक झाल्यानतर पुढें प्रसिद्ध होणारें प्रत्येक पुस्तक घेतलेंच पाहिजे. मागील पुस्तकें घातल्यास घ्यावीत. (३) प्रत्येक अडीच तीन महिन्यांनीं एक किंवा दोन पुस्तकें ग्राहकांकडे १८४ आणेपर्यंतच्या व्ही. पी. नें रवाना होतात. (४) कायमच्या ग्राहकास टपाल व्ही. पी. व प्याकिंग खर्च आकारून पुस्तकें **पाऊण पट** किंमतींत देऊं. प्रो. **ज्ञानमित्र** शनवार पेठ, पुणें शहर.

**मनोरंजक कादंबऱ्या—**

**आंध्र सरकारानें बक्षिसासाठीं मंजूर केलेलीं दोन पुस्तकें.**

**शूर शिपाई** (सचित्र)–**श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधि** बी. ए. यांच्या **रसभरित** लेखणीतून उतरलेली क्षात्रतेजाची जोत प्रदीप्त करणारी **अत्यंत चटकदार** पण **सुबोध छोटी सचित्र कादंबरी जरूर वाचावी!** कथानक चित्ताकर्षक. किं. ८४

**वंगसूर्यास्त**—म्हणजेच—**अघोर राज्यतृष्णा**:— फंद-फितुरीच्या निंद्य कृत्यानें बंगालचें '**स्वराज्य**' कसें धुळीस मिळालें, याचें **करुणाजनक** व **हृदयंगम शब्दचित्र** या **ऐतिहासिक** कादंबरींत रेखाटण्याचा प्रयत्न केला असून, तो **मनोरम** भाषाशैली व **बहारीच्या** संविधानकामुळें विशेषच परिणामकारक झाला आहे. किं. १ रु.

**युद्धांतील अघोर कर्म-कथा**:—मूर्तिमंत **देशाभिमान** व खरा **स्वार्थत्याग** जागृत करून खऱ्या क्षात्रतेजाची ओळख पटवून हृदयाला **पाझर** फोडणाऱ्या विलक्षण व **करुणाजनक** कथा जर कोठें असतील तर त्या ह्याच पुस्तकांत आहेत आणि त्या सुद्धां कल्पित नव्हेत तर **ऐतिहासिक!** आपल्या पोटच्या गोळ्याचें स्वहस्तें **परिमार्जन** करून समरांगणावर जाणाऱ्या **देशभक्तवीरांचे अभूतपूर्व** प्रसंग ह्यांतच पहावयास मिळतील! गेल्या महायुद्धांतील आश्चर्यानें थक्क करून सोडणारे अद्वितीय निवडक "**समर-चमत्कार!**" यांतच आढळतील. किं. ८१२

**परमेश्वरी संकेत**:—द्रव्यलोभी व परस्त्र्यभिलाषी माणसांच्या दुर्वर्तनामुळें एका सच्छील जहागिरदाराचें कुटुंबारव कसा प्राणात प्रसंग गुदरला व त्यांतून तें कसें मुक्त झालें, याचें करुण व अद्भुत रसानें ओथंबलेलें हृदयंगम चित्र यांतच पहावयास मिळेल ! उच्च व उदात्त पतिपत्नीप्रेमाची ओळख हीच कादंबरी करून देईल ! ! भाषासौष्ठव, कल्पनारम्यत्व व विचारवैचित्र्य ह्यामुळें ही नवलकथा इतकी चित्ताकर्षक झाली आहे कीं, वाचकाची जिज्ञासा शेवटपर्यंत कायम रहाते. ( प्रकरणें ११ ) किं. ८५

**राष्ट्रोन्नति केव्हां होईल** ( सचित्र ):—भारतीय तरुणांना जागृत करून हिंदमातेची सेवा करण्यास प्रवृत्त करणारी, देशोद्धार आणि राष्ट्रसेवा कशी करावी याचें दिग्दर्शन करणारी, लोकसेवेचें बीजारोपण करणारी, अत्यंत चटकदार पण मराठी वाङ्मयावर प्रभुत्व गाजविणारी ही देदीप्यमान सचित्र कादंबरी अवश्य मागवा ! किं. ६८

**एकरूपी सौंदर्यकलस**:—यांत कमल-कमलिनीची संकट परंपरा, कमलिनीचें चंद्रकेतुवरील अढळ प्रेम, सुशीलता, धीरता, आणि लीलावतीचा विलक्षण करारीपणा, अनुपम पातिपत्नीप्रेम इत्यादि गुणांचें फारच सुंदर शब्दचित्र ह्या कथानकांत रेखाटलें असल्यामुळें ही रोम्यांटिक कादंबरी अत्यंत मनोरंजक व शिक्षा-प्रद झाली आहे. शेवटचीं प्रकरणें वाचतां वाचतां वाचकाची वृत्ति तन्मय होऊन जाते. किं. ६

**हतभागी इंदु:**—कथानकाच्या हृदयंगमपणामुळें प्रत्येक **तरुण**-बंधुभगिनींच्या मनाला **चटका** लागून सोडणारी व समाजांत **खळबळ** उडविणारी सामाजिक स्वतंत्र कादंबरी. [( प्रकरणें २१ ) किं. ०५

**विनोद लहरी:**—हें तुमच्या दुःखी व श्रमलेल्या मनाला **गुदगुल्या** करून पोट धरधरून हंसविणाऱ्या हजारों **हास्य-रसभरित विनोदपर निवडक** चुटक्यांचें पुस्तक आजच मागवून **बहुश्रुत** व्हा! **आनंदसागरांत** लोळा! व्यवहारचतुर आणि **विनोदी** व्हा! एकदां वाचा. किं. ०१२

**चितोडची वीर अरुण:**—असा कोणता हिन्दु आहे कीं, ज्याच्या अंतःकरणाला चितोडच्या वीर स्त्रीपुरुषाबद्दल आदर उत्पन्न होणार नाहीं! असा कोणता इतिहास प्रेमी आहे कीं, ज्यानें चितोडच्या वीरांगनांची मुक्तकंठानें स्तुति केली नाहीं? असा कोणता वाचक आहे कीं, चितोडच्या रणसंग्रामाची हकीगत वाचीत असतां त्याचें हृदय द्रवणार नाहीं? ह्या इतिहासिक कादंबरींत चितोडच्या स्त्रीयाच्या शौर्याचें इतक्या बहारीचें वर्णन केलें आहे कीं, पुरुषांचेच काय पण स्त्रियांचेही बाहू स्फुरण पावूं लागतील! पातिव्रत्याच्या उज्ज्वल कीर्तीची जाणीव उत्पन्न होईल!! किं. ०१२

**तीन कृष्ण कृत्यें:**—**अद्भूत** रसानें ओथंबलेल्या विचार वैचित्र्याच्या लाटा उसळविणाऱ्या, नीतितत्त्वाचा प्रकाश पाडणाऱ्या **अत्यंत चटकदार** व **रहस्यपूर्ण** अशा **सुबोध** तीन गुप्त पोलिसांच्या चातुर्याच्या हृदयंगम नवलकथा एकवार वाचाच! किं. ०१२

**मधुर मीलनः**—एका चित्तवेधक बंगाली कादंबरीच्या आधारें लिहिलेली रम्य-काव्यमय *Romantic*-रोमँटिक-कादंबरी संसार-तापानीं खिन्न झालेल्या मनाला प्रफुल्लीत करून व चटका लावून सोडणारें हें मधुर मीलन आहे. पहिल्यापासून तो शेवटपर्यंत वाचनाची उत्कंठा सारखी कायम रहातें, अंतीं झालेल्या नायकनायिकेच्या मधुर-मीलनाचा चटकदार व आनंदपूर्ण प्रसंग वाचताच वाचकांच्या मनांत सहवेदना उत्पन्न होऊन त्यांचे मन प्रफुल्लीत होईल. किं. ८६

**चित्राङ्गदाः**—वंग-साहित्य-सम्राट् डॉ. सर रवीन्द्रनाथ टॅगोर ह्याच्या मूळच्या उदात्त व व्यर्थी कृतीची ही मराठी प्रतिकृति आहे. हिच्यापासून वेदान्त्यांनीं वेदान्त घ्यावा आणि प्रणयी जनानी प्रणयाची बहार लुटावी, असें हें वरील विद्वद्रत्नाच्या अगाध बुद्धिसामर्थ्यांतील एक अद्भुत रत्न आहे. नाटक म्हटलें तर नाटक आणि काव्य म्हटलें तर काव्य, अशी या रत्नाची अजब चौरंगी चमक आहे. वेदान्त, प्रणय, नाटक आणि काव्य ह्या चारी गोष्टी प्रकृत पुस्तकांतून आवडी-प्रमाणें सहज वेंचून घेतां येतात. भाषा अत्यंत चटकदार. किं. ८८

**प्रणय-भंगः**—मनानें वरलेल्या पत्नीची प्राप्ती न झाल्यामुळें पुरुष कसा वेडा होऊन जातो व मनानें वरलेला पती न मिळाल्यामुळें स्त्रीयाचें आयुष्य कसें विरह दुःखात जातें याचे अत्यंत हृदय विदारक चित्र ही चटकदार कादंबरी वाचित असतां डोळ्यापुढें उभे राहून वाचकांना तन्मय करून सोडील ! किं. ८४

**सुवर्णयुगः**—ह्या नवरसप्रधान कादंबरीतील आदर्श-नायिका **उत्पलसुंदरी** हिच्यावर आलेले विलक्षण व हृदयद्रावक प्रसंग, तिचें निर्मल प्रेम, लोकोत्तर दृढ निश्चय, भयंकर हृदययातना, तिचा झालेला छळ, तसेंच नायक **पुष्पमित्र** याचें असामान्य मनोधैर्य, कर्तव्य-जागृति, **चंड्याचें** चातुर्य व प्रसंगावधान असे अनेक **बहारीचे** व **चित्ताकर्षक** प्रसंग वाचकाचें हृदय खळबळून सोडतील! हे अनुकरणीय व अलौकिक गुण अवलोकन करून हा काल "**कलियुगांतील**" नसून **सुवर्णयुगांतील** आहे असें वाचकांस वाटेल! अशी सुबोध व मनोवेधक कादंबरी वाचकांनी एकवार अवश्य वाचावी, अशी आमची शिफारस आहे. किं. १ रु.

## चरित्रात्मक पुस्तकें—

**विवेकानंदजीवन** अर्थात् **बंगालचे रामदासः**—**पौर्वात्य** व **पाश्चिमात्य** लोकावर ज्यांनीं आपल्या सुविचारांची छाप बसवून सारें जग **दुमदुमून** सोडलें व साता समुद्रांपलीकडे **वैदिकधर्माचा झेंडा** उभारला, त्या श्रीमद्विवेकानंद स्वामींचें **भावोद्दीपक सुपरिणामकारक** असें हें **दिव्य चरित्र** असून त्यांच्या **भक्ति राज-ज्ञान-योग** व इतर **व्याख्यानें** ह्यांतील निवडक **उपदेशामृताचाही** समावेश केला असल्यामुळें हें पुस्तक अत्यंत **सुबोध** व **संग्राह्य** झालें आहे. किं. ८१२

**जर्मनीचे महत्त्वाकांक्षी कैसर:**—ज्यानीं केवळ महत्त्वाकांक्षेचे जोरावर महायुद्धाची कळ काढून सर्व राष्ट्रांना रणांगणावर ओढून कोट्यावधि लोकास यमसदनास पाठविलें, त्या अद्वितीय व्यक्तीचें काव्यापेक्षां '**रसाळ**' कादंबरीपेक्षा '**चित्ताकर्षक**' व निबंधापेक्षां '**सुबोध**' असें सरस वाणीनें रंगविलेलें रहस्यपूर्ण '**कैसरचें मनश्चित्र**' अवश्य वाचा. म्हणजे त्याचें **वर्तन**, त्यांचा **कावेबाजपणा**, त्यांचा **हट्टी स्वभाव**, त्याचा **कुरा**, ह्याचें मूर्तिमंत चित्र तुमच्या डोळ्यांपुढें उभें राहील. सोबत **कैसर, कैसरीण** व **राजकन्या** यांचे सुंदर **फोटो** दिले आहेत. आजच मागवा. किं. ०१२

**महात्मा गांधी**—प्रत्येक भारतीय तरुणांच्या अंतःकरणावर **सत्याग्रहाचा** नवा प्रकाश पाडून उज्ज्वल **देशभक्ति**, अनुपम **स्वार्थत्याग**, विलक्षण **करारीपणा** व **विश्वप्रेम** जागृत करणारें **आदरणीय**, त्याहून विशेष **अनुकरणीय** असें जोरदार भाषेत लिहिलेलें **दिव्य** पण सचित्र **चरित्र** वाचून **सत्याग्रहाचें** हृद्गत समजून घेण्याची हीच वेळ आहे. अभिप्राय **उत्तम.** किं. ०४.

**माझें गुरुस्थान.**—**श्रीमद्विवेकानंदांच्या** खास **अमृतमय** लेखणींतून उतरलेल्या व निस्सीम गुरुभक्तीनें ओथंबलेल्या एका इंग्रजी सर्वोत्कृष्ट ग्रंथाचा **मधुर, कोमल** व **प्रसादयुक्त वाणीनें** रंगविलेला **श्रीरामकृष्णपरमहंसांचें** सुंदर **फोटोसह रहस्यपूर्ण** व **तेजस्वी** अनुवाद वाचून परमार्थाची **गुरुकिल्ली** झटपट हस्तगत करून घ्या !! किं. ०६

**रशियाचा राहू**—अथवा—**बोल्शेविझमचें भूत !** (सचित्र) 'पाप करा म्हणजे मोक्ष मिळेल' या एकाच महामंत्रानें ज्या राहूनें रशियाच्या **झार** व **झरीना** यांना ग्रहण लावून स्वार्थासाठीं अंतःपुरात घुसून ज्यानें सर्व रशिया कांहीं काल आपल्या हातांतील मलिन सूत्रानें चाळविला त्या **रासपुतानच्या** भयंकर धाडसी नीच कृत्यांतूनच बोल्शेव्हिक पक्षाची कशी अचानकपणें व गुप्त तऱ्हेनें उत्पत्ति झाली आणि झारशाही रसातळाला जाण्याच्या आधींच तो **रशियाचा राहू** कसा अघोरपणानें यमसदनीं पोंचवला गेला याचें हृदयंगम परंतु अद्भुत, भयानक, करुणा आणि रौद्र या रसांनीं मिश्रित झालेलें चित्र वाचकवृंदाच्या डोळ्यापुढें उभे राहून सद्यःस्थिति कशी उत्पन्न झाली आहे त्याचें भूत कालीन चित्र स्पष्ट दिसणार आहे ! किं ०१२

## मानसशास्त्राची पुस्तकें—

**पर्सनल म्याग्नेटिझम्**--**वैयक्तिक आकर्षण**—ज्या अद्वितीय मानसिक शक्तीच्या जोरावर जर्मनीचे **कैसर** उठले ! ज्या अदृश्य शक्तीमुळें **क्रामवेल** इंग्लंडचा राजा झाला ! ती अद्भुत शक्ति अंगीं आणून **आत्मोन्नति** करून घेणें असल्यास ह्या पुस्तकाचें **अध्ययन** करा ! जगावर आपलें प्रभुत्व गाजवा ! ! किं. ०८

**मानसशास्त्र**—यांत मनाचे **धर्म**, त्याची **व्याप्ति**, त्यांच्यापासून घडणारीं **महत्कार्यें**, मनाची **अद्भूत शक्ति** इ० गोष्टींचें **सुलभ**, **मुद्देसूद** व **अनुभवपूर्ण** विवेचन केलें आहे. किं. ०४

**मेस्मेरिझम इंट्रक्टर- मोहिनी- विद्या शिक्षक**:-- ह्या अमूल्य पुस्तकाचे सहाय्यानें घर बसल्या **मेस्ममेरिझमचे, हिप्नाटिझमचे, थाटरीडिंगचे प्रयोग, कृति, उपपत्ति, चमत्कार** करतां येतील, अशीच **निवडक व सचित्र** माहिती यांत दिली आहे. ह्या विद्येच्या प्रातीनें मनुष्यालाच काय, पण पशुपक्ष्यालाहि वश करून आश्चर्यानें थक्क करून सोडणारीं कार्यें सहज करून घेतां येतील! औषधावांचून असाध्य रोग बरे करितां येण्याजोगी **गुप्त** पण **खरी** माहिती दिली असल्यामुळें **अल्पावधींत भांडवला**शिवाय धदा करून **मुबलक पैसे** मिळवा! किं. १८४

**टेलिपॅथी इंस्ट्रक्टर** (सचित्र)—ह्या गुप्त विद्येच्या सहाय्यानें दुसऱ्याच्या मनांत चाललेले विचार आपल्याला कसें समजून घेता येतात व आपल्या मनातील गुप्त विचार—मौनव्रतानें—तिसऱ्यास समजू न देतां दुसऱ्यास कसें समजावून देतां येतात, दुर्बिणीच्या मार्फत परस्परसंदेश कसे पाठवितां येतात, मेंटल फोटोग्राफी म्हणजे स्मरणांतर्गत छायाचित्र कसें डोळ्यापुढें उभें करतां येईल, वाग्सिद्धीच्या सामर्थ्यानें म्हणाल ते करूं शकाल! मागाल ते मिळवूं शकाल! अनेक चमत्कारिक प्रयोग व तत्संबंधांची प्रयोग करण्यास योग्य अशी **सचित्र सप्रयोग** व स्वतंत्र माहिती ह्या पुस्तकांत सविस्तरपणें दिलेली आहे. मराठीत अगदीं हा नवा ग्रंथ. किं. ८१२

**ब्रह्मयोगविद्या** (सचित्र):—ज्या ब्रह्मानंदांतून कल्पवृक्षादिकांची उत्पत्ति झाली तोच ब्रह्मानंद कसा प्राप्त करून घ्यावा हें या पुस्तकांत सरळ व सोप्या मार्गानें सांगितलें आहे. हें शास्त्र संसार करूनही संसारापासून अलिप्त कसें रहावें व शान्तिसुखाचा परमानंद कसा प्राप्त करून घ्यावा याचा गुप्त मार्ग दाखविणारा झगझगीत आरसाच आहे. ब्रह्मयोग विद्येंत जीं जीं अंगें व उपांगें मुख्यत्वेंकरून असतात तीं सर्व या पुस्तकांत थोडक्यांत विशद केलीं असल्यामुळें स्वदेशाच्या स्वातंत्र्याच्या खट-पटींत पडूं इच्छिणारांस हें पुस्तक म्हणजे एक प्रकारचा अद्भुत व गुप्त असा राजमार्गच झालेला आहे. या पुस्तकाच्या वाचनानें व त्यांत सांगितल्याप्रमाणें कर्म केल्यानें जन्मताच स्वतंत्र असलेला माणून आपल्या देशालाही स्वतंत्र करूं शकेल असें या विद्येंत प्रचंड सामर्थ्य आहे ही आमची लुप्त झालेली पुरातन विद्या फायदेशीर होईल. (छापत आहे.) किं. १ रु.

## औद्योगिक पुस्तकें—

**सचित्र गिलीट**:—बॅटरी तयार करणें, बॅटरीनें व इतर अनेक **सोप्या** पद्धतीनें वाटेल त्या वस्तूवर **चांदी सोन्याचें** गिलीट चढविणें व गिलिटाच्या **इलेक्ट्रोप्लेटिंग** पावडर्स इ० **घरचे घरीं** तयार करण्याची **सप्रमाण, सप्रयोग सचित्र** निबंधक गुप्त माहिती यांतच दिली आहे. (दुसरी अवृत्ति छापत आहे.) किं. ८८

**धंदे-शिक्षक**—म्हणजे—**इंडस्ट्रियल-इंस्टक्टर**:—श्रीमतापासून गरिबापर्यंत नित्य व्यवहारात लागणारे अनेक **सर्वोपयोगी** जिन्नस घरच्या घरीं तयार करून **अल्प** श्रमात व **थोड्या** भांडवलांत ५–१० रुपये **रोज प्राप्ति** करून घेतां येण्याजोगी **कलाहुन्नराची** गुप्त व **खरी माहिती देणारा** व **धंदा कसा करावा याची सप्रमाण माहिती देणारा "धंदे-शिक्षक"** आजच मागवून **पैसा** मिळवा! **उद्योगी व्हा!! धंदे शिका!!! सुधारून वाढविलेली आवृत्ति** दुसरी सपत आली. किं. ०८

**बुट-पॉलिश-इंट्रक्टर**—बुट, पट्टे, क्याग्ज, वाद्या वगैरे कातड्याच्या वस्तूला लावण्याचे घट्ट व पातळ, काळी, निळी, हिरवी, पिंवळी पांढरा अनेक रंगाची व अनेक तऱ्हेचीं पॉलिशेस घरच्याघरीं १–२ रुपयाच्या भांडवलात व अल्प श्रमांत तयार करण्याची सप्रमाण व सप्रयोग गुप्त माहिती मागवून धंदा करा! पैसा मिळवा!! किं. ०८

## निबंधात्मक पुस्तकें—

श्री. **गायकवाड सरकारां**कडून बक्षिसासाठीं मंजूर झालेलें.

**ब्रम्हचर्याश्रमः**—यांत **ब्रम्हचर्य** म्हणजे काय? तें **कसें** पाळावें, त्यासून **फायदे व परिणाम** इ० अनेक गोष्टींचें, विद्यार्थी, त्यांचें पालक व शिक्षक ह्यांचे **हृत्पटलावर प्रकाश** पाडून पुढील **आयुष्यक्रम सुखावह** करण्याविषयी सुपरिणाम घडविणारें **दिव्य शब्दचित्र** स्पष्ट व मधुर भाषेंत रेखाटलें आहे. विद्यार्थ्यांनीं जरूर वाचावें. किं. ०४

**आत्मरहस्य**—सुप्रसिद्ध पाश्चात्य पंडित **मि. जेम्स एलनच्या** ( From Passion to Peace ) लोकमान्य पुस्तकाच्या आधारें लिहिलें असून ह्याच्या वचनानें विषयवासनारूपी नरककुण्डांत गटांगळ्या खाणारा मनुष्यहि **मोक्षमार्गाला** लागेल ! जगावर आपलें **प्रभुत्व** गाजवील ! पतिताहून पतित मनुष्यालाहि **शांतिसुखाचा लाभ** व **नवजीवन** प्राप्त होईल ! मूर्खाहून मूर्ख मनुष्य **बुद्धिमान्** होईल ! निर्बलाहून निर्बल मनुष्य **बलवान्** होईल ! इतकेंच काय पण निर्धनातून निर्धन मनुष्यहि **धनवान्** होईल ! किं. ८६

**प्राकृत हंसगीताः**—भगवान् श्रीकृष्णांनीं हंसरूपानें **आत्मोन्नतीसाठीं** जो उत्कृष्ट उपदेश केला तो ह्या चिमुकल्या पुस्तकांत कालोचानपद्धतीनें व सुलभ भाषेत निवेदन केला आहे. किं. ८१॥

( ८२ ची तिकिटें पाठवा. )

## शास्त्रीय पुस्तकें—

**क्रोमोपॅथी-इंस्ट्रक्टर-वर्णजल-चिकित्सा-शिक्षकः**—ज्या सूर्यपुटी जलाच्या प्रभावानें आज अमेरिकेसारख्या सुधारलेल्या देशांतसुद्धां नानातऱ्हेचीं औषधें घेऊन कटाळलेले हजारों असाध्य रोगी रोगमुक्त होत आहेत, त्या अपूर्व विद्येची **सचित्र** व **सप्रयोग** माहिती ह्यांत दिली असून **ही गुप्त** पण अगदीं **सोपी** विद्या प्रत्येक स्त्रीपुरुषानें अवश्य शिकून कधीं न संपणारा व हटकून गुण देणारा दिव्यौषधींचा दवाखाना उघडा ! रोगग्रस्तांना **नवजीवन** प्राप्त करून द्या ! ! **पैसा** कीर्ति मिळवा ! ! ! सुधारून वाढविलेली नवी आवृत्ति. किं.८१२

**लंघन चिकित्सा शिक्षक-म्हणजेच-फास्टिंग इंस्ट्रक्टरः**— ज्या **लंघन**शास्त्रावर अमेरिकेसारख्या सुधारलेल्या देशांत अनेक रुग्णालयें निघून लाखों लोक प्रत्यहीं **रोगमुक्त** होत आहेत, त्या **लंघनशास्त्राची** ही **सविस्तर गुप्त माहिती** यांत दिली आहे. याचे सहाय्यानें साथीसारखें भयंकर रोग सहज बरे करतां येतील ! तरुणांना **नवजीवन** प्राप्त होईल ! ! **पैसा** व **कीर्ति** मिळेल. किं. ८१२

**जलतत्वचिकित्स शिक्षक** अथवा **वाटर मेरिट इंस्ट्रक्टर**— केवळ स्वच्छ पाणी व स्वच्छ हवा यानीं हवे ते रोग कसे बरे करतां येतात याची अत्यंत गूढ व गुप्त माहिती या पुस्तकावरून शिका व स्वताच्या कुटुंबाचें रक्षण करून द्रव्यव्यय वाचवा ! वेदकालापासून सद्यःकालापर्यंत पाण्याची महति काय आहे व त्यापासून केवढाले अलभ्य लाभ सहज करून घेतां येतात, हें या पुस्तकाच्या वाचनानें मनोभूमीवर ठळकपणें उमटणार आहे. प्रस्तुत शास्त्र जरी अत्यंत विस्तृत आहे, तरी तें—उपनिषग्रथनांतून जशी गीता निघाली—तद्वत्—या छोट्या पुस्तकाच्या रूपानें अवतीर्ण झालें आहे. याचा लाभ सर्व घेतील अशी आशा आहे. (छापत आहे.) किं. १ रु.

## स्त्रियांकरिता निवडक पुस्तकें—

**सासुरवासाचा पश्चात्ताप**—खाष्ट सासुच्या सासुरवासाचें **हृदयद्रावक** व अत्यत चटकदार **काव्यमय शब्दचित्र** प्रत्येक आर्यभगिनीनें जरूर वाचावें. किं. ८१

**भाऊबिजेची ओंवाळणी**:—बंधुप्रेमानें चित्तवृत्ति उंचबळविणाऱ्या व खऱ्या बंधुप्रेमाची ओळख पटवून देणाऱ्या **बोधपर गोष्टी, रसाळ कविता, अंतःस्फूर्तीनें** ओतप्रोत भरलेले **निबंध** इतरा **सुरसमय** व **तेजस्वी** निवडक लेख आर्यभगिनींच्या **हृत्पटलावर उच्च नीतितत्त्वांचा दिव्य प्रकाश** पाडतील ! म्हणून आपल्या लाडक्या भगिनीला भेट पाठवा. किं. ०८

**माहेरची देणगी**.—सुशिक्षित बालिकाना पाठ करण्यायोग्य निरनिराळ्या चालींवर म्हणतां येण्याजोगीं अत्यंत **चटकदार** व **बोधप्रद** अशीं निवडक आठ पद्यें. किं. ०१ ( ०१॥ चीं तिकीटें पाठवा.)

**स्कूल-ड्रिल** ( व्यायामपद्धती ):—ह्या पुस्तकांत हल्लीं प्रत्येक शाळेंत चालू असलेल्या ड्रिलसंबंधानें **क्रमवार** व **सविस्तर** माहिती दिली असल्यामुळें प्रत्येक शाळा-मास्तरांस ह्या पुस्तकाचा विशेष उपयोग होणार आहे. किं. ०२

## लौकरच छापून प्रसिद्ध होणारीं पुस्तकें—

१ **सचित्र गृहिणीकर्तव्य !** किं. ०१२

२ **चव्हाणी समशेर !** इतिहासिक कादंबरी. ०१२

३ **सतीपरीक्षा**. सामाजिक नवलकथा. ०८

ह्याशिवाय सर्व तऱ्हेचे **ग्रंथ, पोथ्या, चरित्रें, नाटकें, कादंबऱ्या, शालोपयोगी** पुस्तकें, आमचेकडे मिळतील.

किंमतीशिवाय **टपाल** व प्याकिंग **खर्च** वेगळा पडेल.

प्रो. **ज्ञानमित्र**, शनवार पेठ ४८३, पुणें-सिटी.

## जगद्विख्यात वंगीयसाहित्यसम्राट्, कविराज सर रवीन्द्रनाथ टागोर, के. टी. डॉक्टर ऑफ लिट्रेचर यांच्या खास परवानगीनें मराठींत प्रसिद्ध होणारी




भारतवर्षाला भूषणीभूत झालेले वंगमहाकविवर सर **रवीन्द्रनाथ टागोर** यांची असाधारण व अलौकिक विद्वत्ता, योग्यता, अपूर्व कवित्वशक्ति, अगाध देशभक्ति, सर्व विषयात दिसणारी उज्वल प्रतिभा यांविषयीं ज्यांची जगभर ख्याति होऊन, ज्यांना बहुमानाचें **नोबल प्राईज** " मिळून ज्यांची सर्वतोमुखीं स्तुति ऐकूं येते त्या सर रवीन्द्रनाथांच्या बंगाली **शांतिनिकेतनाचा** हा मराठी स्फूर्तिदायक अनुवाद आहे. निसर्गाशीं तन्मय झालेल्या एका निसर्ग—उपासकाची ही कृति आहे. यांत वेदान्तासारख्या गहन विषयांचें व्यावहारिक दृष्टीनें सुलभ व रसभरित काव्यमय विवेचन करून त्याचें श्रेष्ठत्वाचा ठसा वाचकांचे हृत्पटलावर बठवून आपण सध्यांच्या जीवनकलहात कसें वागलें असतां आपल्याला प्रपंचांत राहूनसुद्धां परमार्थ कसा साधतां येईल, त्याचें फारच मार्मिक व सुंदेसूत विवेचन केलें असून ठिकठिकाणीं अनेक प्रचलित प्रश्नांवर अगदीं नवा प्रकाश पाडला आहे. यांतील प्रत्येक भाग वाचतां वाचतां शुष्क अंतःकरणांतसुद्धां आत्मप्रकाशाची

पवित्र मन्दाकिनी प्रवाहित होऊं लागते. शुद्ध व सात्त्विक प्रेमाच्या विचाराचा अखंड वाहणारा झरा आहे. तो प्रत्येकाला हिंमतवान् व कार्यक्षम करील. शान्तिनिकेतन उद्योन्मुख भारतभूमींतील प्रत्येक व्यक्तिला आत्मत्वाची--आपलेपणाची--ओळख पटवुन देऊन राष्ट्रीय जागृति उत्पन्न करणारी ही राष्ट्रीय संजिवनी आहे, म्हणून प्रत्येक महाराष्ट्रभाषाप्रेमी, देशप्रेमी व धर्मनिष्ठ अशा वाचकांनीं या अखंड शांतिसुखाचा लाभ करून घ्यावा

## शांतिनिकेतन--प्रकाशनाची योजना.

सं रवींन्द्रनाथांच्या अनुकरणीय चरित्रासह बारा भागांत हा ग्रंथ पुरा करण्यांत येईल. रायल सोळा पेजी साईजच्या सुमारें च्दोनशें पृष्ठाचा एक भाग दर दोन महिन्यानीं प्रसिद्ध होणार असून प्रत्येक भागाची किंमत एक रुपया ठेवण्यात येईल. या महिनाअखेर आठ आणे प्रवेशफी भरून नांवें नोंदविणारास कायमचे ग्राहक समजून प्रत्येक भाग बारा आणे व्ही. पी. नें ८१४ स पडेल. प्रवेशफी केव्हांही परत मिळणार नाहीं. पहिला भाग सवलतीची किंमत ८१२ प्रवेश फी ८८ व व्ही. पी. पोस्टेज चार्ज ८१ एकूण १८६ चे व्ही. पी. नें भाग तयार होताच पाठवूं. पहिल्या भागांत रवींद्रनाथाचे सुंदर प्रकाश लेखासह रसाळ चरित्र व शान्तिनिकेतनचा हृदयवेधक भाग येणार असून, पुढें प्रत्येक भागांत **स्वराज्य-होमरूल** वरील आणि बंगाल्यात जागृति उत्पन्न करणारे अत्यंत तेजोमय निवडक लेख आणि प्रकाशलेख देऊन प्रत्येक भाग अधिकाधिक **सुबोध, रसाळ, चित्ताकर्षक,** व **सचित्र** करण्याचा संकल्प आहे, म्हणून **आजच** नांव नोंदवा.

**प्रो. शान्तिनिकेतनमाला,** शनवार पेठ, ४८३ **पुणें-सिटी.**

Harihar Press Poona

मारून लूटफाट केली आणि झारशाहीसह तिच्या नौकरशाहीला क्रूरपणानें रसातळाला नेऊन पोंचविली, इतकेंच नव्हे तर स्त्रीवर्गासंबंधानेंही जीं किळसवाणीं वर्णनें आजपर्यंत प्रसिद्ध झालेलीं वाचण्यांत आलीं तीं सर्व विधानें अगदींच निराधार व द्वेष उत्पन्न करणारीं होतीं, असें हें पुस्तक वाचल्यावर वाचकांना वाटल्यास आश्चर्य तें कोणचें ? बोल्शेव्हिकांनीं सध्यां जो सर्वत्र सर्वव्यापी असा उद्योग सध्यां आरंभिला आहे त्यांच तात्पर्य असें आहे कीं, सर्व मानवांचे हक्क समान दर्जाचे असावेत आणि त्यांच्यात श्रेष्ठ व कनिष्ठ हा भेदभाव न राहतां, प्रे. वुइल्सनचें Self Determination चें तत्व तेंच प्रत्येक देशाला लागू करून जगताची पारतंत्र्यांतून सुटका करावी. या गोष्टीला—सध्याचे अधिकारलोलुप व परक्यांवर मनगटाच्या जोरानें राज्य करीत असलेले मिजाशी लोक फारच भेदरून गेले आहेत. फ्रेंच सरकार जरी बोल्शेव्हिझमचीं तत्वें मान्य करण्यास तयार नाहीं, तरी ब्रिटिश सरकार त्या राजसत्तेशीं दळणवळण करण्यास आतां तयार आहे.

क्रांती घडवून आणिल्यानंतर रशियन जनतेच्या पुढाऱ्यांनीं तेथें शांतता, सुख व समता या गोष्टी घडवून आणण्यास व जनतेची स्थिति सुधारण्यास ज्या गोष्टी केल्या त्यांच्याबद्दलच्या बरेवाईटपणासंबंधानें आम्ही आपलें मत देण्याचा या पुस्तकांत कोठेंच प्रयत्न केला नसून तसें करणेंही इष्ट नाहीं. कारण, त्या सत्तेचा परिणाम काय होणार

आहे; तो अद्यापी जगाला समजलेला नसल्यामुळें, त्या बाबतींत कोणा-लाही कोणत्याच तऱ्हेचें मत देतां येणें शक्य नाहीं. मात्र या पुस्तकांत बोल्शेविझम संबंधानें जी कांहीं विश्वासनीय व ऐतिहासिक दृष्टीनें मह-त्वाची ठरलेली माहिती मराठी वाचकापुढें मांडण्याचा प्रयत्न केला आहे त्याचा ते प्रेमानें स्विकार करून पुढील कार्यास पूर्ण उत्तेजन देतील अशी आशा आहे.

आतां वाचकांची शेवटीं इतकीच विनति करायची कीं, सदर पुस्तक घाईनें छापून प्रसिद्ध करणें भाग पडल्यामुळें या पुस्तकांत जीं कांहीं दोषस्थळें राहून गेलीं आहेत त्याबद्दल क्षमा करावी. दुसऱ्या आवृत्तींत काळजीपूर्वक दुरुस्ती करूं इतकें अभिवचन देऊन ही प्रस्ता-वना पुरी करतो. कारण, सदर पुस्तकांत एकच विषय असल्यामुळें त्याचें अधिक विवेचन प्रस्तावनेंत करणें नलगे.

मुंबई. ता. १।१।२१ } पुस्तकर्ता. लक्ष्मण नारायण जोशी.

सचित्र

# रशियांतील बोल्शेव्हिजम् !

## काण्ड पहिलें.

### पूर्वपीठिका.

जगाच्या इतिहासात मानवांतील प्रत्येक जातीच्या लोकांनीं कालपरत्वें कोणची ना कोणची तरी सर्वव्यापी अशी कामगिरी सृष्टयुत्पत्तीपासून बजाविलेली आहे असें इतिहास सांगतो आहे. यावरून हें सिद्ध होतें कीं, कोणच्या प्रकारची कृति कोणची मानवी जात केव्हां कशा प्रकारें घडवून आणील याचें भाकित कथन करणें अशक्य आहे. सध:-कालीं जो रूशिक अथवा रशिया देश अखिल जगताला पवित्र आणि मुक्तिप्रद असा एक संदेश सांगून राहिला आहे; तोच देश एके काळीं जंगली रानटी व डोंगराळ स्थितींत होता व हीच स्थिति कांहीं शतकांपूर्वी सर्व युरोप खंडाचीही होती.

## काण्ड पहिलें.

स्लाव जातीचे लोक दक्षिण रशियातील व्हिश्चुला व नीपर या नद्यांच्या काठीं केव्हा व कसे वस्ती करून राहिले त्याच्या इतिहासाचा अद्यापी शोध लागलेला नाहीं. हे स्लाव जातीचे लोक—लॅटिन, केल्टस् व जर्मन् लोकांप्रमाणेंच गौरवर्णाचे होते त्यांचा चेहरा मोहरा जरी मध्य एशियांतील तार्तर लोकांशीं सदृश नव्हता तरी, इतिहाससंशोधकानीं असें निश्चित केलें आहे कीं, युरोपातील सर्व जातीचे लोक मूळचे मध्य एशियांतलेच होते. स्लाव लोकांची वस्ति दक्षिण रशियांत इ. सनाच्या आठव्या शतकांत झाली असावी असा इतिहाससंशोधकांचा अदमास आहे. त्यांनीं कीव्ह नगरी आपल्या राज्याची राजधानी बाराव्या शतकांत स्थापिली. कीव्ह शहर हें राजनैतिक गोष्टींचें केंद्रस्थान असें त्यावेळीं युरोपांत मानलें जात असे. कलाकुशलता, सुधारणा व राजशासन यामध्यें दक्षिण रशिया कोणत्याही प्रकारें इंग्लंड व फ्रान्स यांपेक्षां कमी प्रतीचा नव्हता. मध्य एशियांतील तार्तर लोकांनीं जर रशियाचें आक्रमण केलें नसतें, तर रशियाही इतर युरोपीय राष्ट्रांच्या मागें सुधारणांत कमी दर्जाचा ठरला नसता हें खास.

उत्तर रशियावर मंगोली लोकांच्या वारंवार स्वाऱ्या तेराव्या शतकापासून सोळाव्या शतकापर्यंत होत होत्या व त्या तीनशें वर्षांच्या अवधींत दक्षिण रशिया तर त्यांनीं पूर्णपणें पादाक्रांत करून आपल्या ताब्यांत ठेविला होता. नंतर स्लाव लोक त्यांच्या जुलमी कारकीर्दीला त्रासून उत्तर रशियांत जाऊन वस्ती करूं लागले. कांहीं काळानें

## रशियांतील बोल्शेव्हिझम् !

मंगोली लोकांची राजसत्ता संपुष्टांत आल्याकारणानेंच स्लाव लोकांची वस्ती सर्व रशियाभर होऊन स्वाभाविकपणेंच त्याचें दक्षिण व उत्तर रशिया असे दोन भाग झाले. उत्तरेकडील रशियन हे ग्रेट रशियन्स व दक्षिणेकडील रशियन्स हे लिटल रशियन्स या नावानें तेव्हांपासून प्रसिद्धीस आले.

ग्रेट रशियन्स हे अधिक बुद्धिवान असून, त्यांनीं आपला विस्तार पश्चिम, उत्तर व पूर्व रशियांत केला. पूर्वेकडून होणाऱ्या शत्रूच्या स्वाऱ्यांशीं ते उत्तम तऱ्हेनें टकरा देऊं लागले. मंगोली व तार्तर या दोन्ही जातींच्या स्वाऱ्यापासून रशियन लोकांनीच सर्व युरोपांत आपला बचाव केला होता. सोळाव्या शतकाच्या अखेरीस रशियन लोक पूर्णपणें स्वातंत्र्योपभोग भोगूं लागून, तार्तर व मंगोली लोक याचे पूर्व युरोपांतून अखेरनें पाऊल हललें गेलें.

रशियन लोकांनीं ही जी क्रांति घडवून आणिली त्याकडे इतिहासकारानीं यावें तितकें लक्ष दिलें नसल्यानें त्याचा इतिहास खुलासेवार उपलब्ध झालेला नाहीं. इंग्रजासारख्या ऐट मारणाऱ्या इतिहास संशोधकांनीं त्याच्या इतिहासाकडे पूर्ण कानाडोळा केलेला आहे. इंग्रज जातीचा प्रसिद्ध लेखक जो **डब्ल्यु. टी स्टेड** ह्यानें या बाबतींत एके ठिकाणीं असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, " रशियन मानव जातीनें केलेली मानवी राष्ट्रीय सेवा व प्राप्त करून घेतलेलें स्वातंत्र्य या बाबतींत त्या जातीला जे कष्ट सोसावे लागले आहेत त्याबद्दलची त्यांची महती गाण्यांत इंग्रज लेखकांनीं आपला आदर व्यक्त न करण्याचें जें व्रत पतकरिलें आहे तें अगदीं अश्लाघ्य होय. "

## काण्ड पहिलें.

रशियन लोकांनीं सोळाव्या शतकांत मॉस्को येथें जरी एक विशाल स्वराज्याच्या राजधानीची संस्थापना केली होती, तरी त्यांना त्या शतकभर सभोंवारच्या शत्रूंशीं झगडावें लागलें. त्यावेळीं पोलंड मध्येंही रशियन लोकांनीं स्वतंत्र राज्यस्थापना केली होती व ते लोक स्वराज्य कायम राखण्यासाठीं मोठ्या शौर्यानें त्यांचेवर येणाऱ्या शत्रूंच्या स्वाऱ्यांशीं सामने देऊन स्वराज्यरक्षण करीत होते. '**इवान दि टेरिबल**' या नांवाच्या पहिल्या राजानें इ. स. १५४५ मध्यें स्वतः '**झार**' या पदवीनें विभूषित करून घेतलें.

'**इवान दि टेरिबल**' हा रशियाचा फार मोठा जबरदस्त राजा होऊन गेला. याच्याच कारकीर्दींत यानें सैन्याला मूर्त स्वरूप दिलें.

याच्या नंतर '**पिटर दि ग्रेट**' च्या राजशासनपद्धतीचा काळ विशेषेंकरून उल्लेख करण्यासारखा झाला. राजशासनपद्धतींत यानें बऱ्याच चांगल्या सुधारणा केल्या. त्या वेळीं युरोपांतील इतर राष्ट्रांचा विकास झालेला होता. जर्मनीचें राज्य त्या वेळीं सर्व राष्ट्रांत बरेंच फैलावलेलें होतें. त्याच वेळीं स्पेन, इंग्लंड वगैरे राष्ट्रांतूनही नवीन शासनपद्धतीचा प्रसार होत होता. अशा त्या सर्व शासनपद्धतींचें सूक्ष्मावलोकन करून पीटरनें आपल्या राज्यांत त्याचा विकास केला. रशियाच्या संरक्षणार्थ त्यानें प्रचंड सैन्याची उभारणी केली. त्या सैन्याच्या उभारणींत त्यानें एक उत्तम प्रकारची रीति सुरू केली व रशियासारख्या विशाल देशांत ती त्याची पद्धति पूर्णपणें सफलही झाली.

त्यानें आपल्या प्रजेला रशियांतील ओसाड पडलेल्या जमीनी वांटून देऊन त्या लावगडीस आणिल्या आणि जमिनीची वांटणी ज्यांनीं घेतली त्यांच्याकडून त्यानें वचनें घेऊन त्यांची प्रचंड सेना उभारली. अशा तऱ्हेनें बिनखर्ची सैन्य उभरण्यासाठीं पीटरनें जरी ही युक्ति केली होती तरी पुढें त्या युक्तीचा परिणाम असा झाला कीं, तें एक अत्याचाराचें स्थायिक राज्यच युरोपांत होऊन बसलें ! हे जमीनदार सैनिक कोणच्याही प्रकारचें लष्करी शिक्षण प्राप्त करून घेत नसत व सबंद वर्षाच्या बारा महिन्यांतील काहीं थोडेसे दिवस आपल्या वचनबद्धतेची साक्ष पटविण्यासाठीं आपल्या राजाच्या राजधानींत जात असत. जेव्हां जेव्हां युद्धाची वेळ उद्भवे तेव्हां त्या वचनबद्ध जमीनदार सैनिकाना आमंत्रण जाई व तशा प्रकारें त्या राजकीय सैन्याच्या टोळधाडी आपल्या राजाच्या झेंड्याखालीं स्वदेशशत्रूंशीं लढत. युद्ध वगैरे जेव्हां कांहीं काम नसे अशा वेळीं हें जमीनदार सैन्य आपल्या कुळांकडून शेतांचें उत्पन्न वसूल करी. यांत आश्चर्याची अशी एक गोष्ट होती कीं, पोलंडांतल्या रहिवाशांची जमीनदारी उक्रेनियांत असे व उक्रेनियातल्या रहिवाशांची सैबेरियात असे. याचा परिणाम असा होयी कीं, दरवर्षी जमीनदार लोक आपल्या जमिनीकडे फक्त एक वेळ जात असत व अत्यन्त परिमित वेळांत आपल्या शेतांची उग्रणी करून परत स्वदेशीं जात. हे जमीनदार सैनिक आपल्या लष्करी मदानें धुंद झालेले असून, शिवाय परस्थ असल्यामुळें आपापल्या शेतकरी कुळांशीं मोठ्या



औ.T 209

दंडेलीनें व मगरूरीनें वागत. हेंच अत्याचाराचें मूर्त स्वरूप शेतकऱ्यांच्या चिरकालीन अशान्ततेचें मूळ कारण होऊन बसलें. असा प्रकार शेंकडों वर्षें सुरू होता.

दुसऱ्या कॅथेराइनच्या वेळीं प्रजेच्या दुःखाकडे थोडें थोडें लक्ष्य देण्यात येऊं लागलें. तिनें जरी प्रजादुःखनिवारणार्थ नवी अशी कांहीं विशेषशी गोष्ट अमलांत आणली नाहीं तरी तिनें आपल्या बुद्धिमत्तेनें थोडेसें चांगलें काम केलें. फ्रान्स व इंग्लंड यांच्या राज्य-शासनपद्धतिला अनुसरून तिनें स्थानिक स्वराज्याचा आपल्या राज्यात प्रसार केला. जिल्ह्याजिल्ह्यांतून शासनपद्धतीचें शिक्षण देणारीं मंडळें जरी स्थपन करण्यांत आलीं, तरी त्यापासून प्रजेला विशेषसा फायदा झाला नाहीं. त्या मंडळांतून अर्धे सरकारी सैनिक जमीनदारलोक असत. त्यामळें त्यांच्याकडून शेतकरी वर्गाला अधिकच पीडा होऊं लागली. त्या सैनिक जमीनदारांना राज्याशसनांत मताधिकार मिळा-ल्यामुळें ते अधिकच उन्मत्त होऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांशीं फटकून वागूं लागल्यामुळे शेतकऱ्यांचे हाल कुत्रे खाईनासा झाला. या योगें प्रजेचें दुसरें एक असें अनाहित झालें कीं, प्रजेला समक्ष आपलीं दुःखें नी राजाला अथवा राणिला सांगतां येण्याला अवसर मिळत असे तोहि आतां नाहींसा झाला. त्यानंतर अठ्याहत्तर निरनिराळे प्रांत करून त्यांचीं शासनपद्धति ठरविण्यांत आली. प्रारंभीं चाळीस प्रांत करून त्यांवर गव्हर्नरांच्या नेमणुका करण्यांत आल्या होत्या. गव्हर्नरांच्या मदतीला

## कांड पहिलें.

एकेक कौन्सिलही देण्यांत आलें होतें, पण त्या कौन्सिलांतील प्रतिनिधि हे प्रजाप्रतिनिधि निवडले जात नसत. जिल्ह्याचें शासन करणारा ' इन्स्पेंव्हंक ' म्हणजे ' पोलिस सुपरिंटेंडन्ट ' हा जेन्स्की नेकन्लेव्ही ' म्हणजे ' डिस्ट्रिक्ट बोर्ड ' च्या द्वारेंच कामाची बजावणी करीत असे.

झारचें जरी उपदेशक मंडळ ( Council ) असे तरी त्याची झारच्या पुढें कांहींच मातब्बरी चालत नसे. झार हा स्वछंदानें रशियन प्रजेवर आपला अमल निरकुंशपणें चालवीत असे

इ. स. १८६४ मध्यें दुसऱ्या अलेक्झॅन्डर झारनें आपल्या राज्यात पंचायति पद्धत सुरू केली. पंचायतींतून शेतकरी वर्गांतील ही प्रतिनिधींची निवडणूक होत असे. जिल्ह्याच्या पंचायतीच्या द्वारें प्रांतिक पंचायती बनल्या. याप्रमाणें सार्वदेशिक पंचायतीचा जरी जन्म झाला, तरी ह्या सर्व श्रेष्ठ पंचायतीची सुनवणी झारनें कधींच केली नाहीं. याचें तात्पर्य इतकेंच कीं, अधिकारी वर्ग जें काही स्वयंसिधरतेनें बेलगामी कृत्य करीत असत, त्याच्या विरुद्ध जाण्यास मार्ग नव्हता पण त्याची अखेर अशी झाली की, जगातील इतर अधिकाऱ्याप्रमाणेंच रशियन अधिकारी वर्गाला त्या पंचायतीच्या द्वारेंच अत्यंत निर्दयतेनें अधिकारास प्राणास मुकावें लागलें.

# काण्ड दुसरें.

## रशियाची स्वार्थनीति.

रशियाच्या इतिहासाच्या प्रारंभ त्याच्या शेतकऱ्यांच्या स्थिती-पासून होतो. जगांतील कोणत्याही देशांतील शेतकरी वर्ग म्हणजे सृष्टीचा अन्नदाता होय असें म्हणण्यास हरकत नाहीं. आरंभीं आरंभीं हा वर्ग चांगल्या सुस्थितींत होता; परंतु ज्यावेळीं आर्थिक स्वार्थनीतीनें जगताला ग्रहण लावण्यास सुरुवात केली त्या वेळेपासून प्रथम शेतकऱ्यांच्या छळाचा प्रारंभ झाला. ते म्हणजे केवळ गुलाम असें मानले जाऊं लागले व त्यांच्यावर सर्वस्वी आर्थिक जुलमाचा अग्निवर्षाव होऊं लागला. ही स्थिती रशियन शेतकऱ्यांची फारच दया येण्यासारखी बनून आले.

रशियन शेतकरी कोट्यावधि असून, तीं ही माणसासारखी हाडां-मांसाचीच माणसें होतीं व आहेतही. तीं इतर भल्या माणसांप्रमाणेंच भलीं माणसें होतीं, त्यांचा करुणाजनक इतिहास जगाला असें सांगतो आहे कीं, त्यांच्यावर अधिकार चालवणाऱ्यांच्या अंगीं माणुस-कीचा गंध नसल्यामुळें अधिकारी वर्ग त्यांचे केसांनी गळे कापीत असे. त्या शेतकरी वर्गाला जन्मापासून मरेपर्यंत एक रात्रही सुखाची

झोंप आली नाहीं अधिकाऱ्याच्या लहरी तब्येतीवर त्यांचा जीवनक्रम सुरू होता. स्वतः राबून दुसऱ्याच्या पोटाची भरती करायची व आपण अकेबगाळ राहून हाल अपेष्टा भोगायच्या हेंच त्यांच्या दैवी आलें होतें. त्यांच्यावर जे अधिकार चालवील असत ते जात्या क्रूर, हलकट, भिकारी, अधिकाराचा दुरुपयोग करणारे, उन्मत्त विलासी व अहंमन्यतेनें फुगलेले असत. ते बिचारे गरीब शेतकरी आपल्या शास्त्याच्या पुढें दीनतेनें व नम्रपणें श्रद्धापूर्वक आपली मस्तकें नमवीत असत, पण त्यांच्या त्या चांगुलपणाचा मोबदला त्यांना अपमानास्पद अशा लत्ताप्रहारांत मिळत असे. शेतकरी गुलाम बनले होते. झारनें स्वतः त्यांना गुलामांच्या पदवीवर आरूढ केलें होतें व त्यांच्या मानेवरून जमीनदार सैनिकांनीं जुलमाचीं जुवाडें ठेविलीं होतीं. याप्रमाणें त्या शेतकरी वर्गानें शेंकडों वर्षेंपर्यंत अपमानास्पद रक्ताश्रें गिळून काळ कंठला. त्यांना वाचा होती पण उच्चारण्याची शक्ति नव्हती! ते बोलले असते पण त्यांची तोंडें जनावराप्रमाणें मुस्कटदाबीनें बंद करण्यांत आलीं! त्यांच्या करुणाजनक दीनवाणीकडे हरामखोर अधिकाऱ्यांनीं कधींच लक्ष दिलें नाहीं. ते म्हणजे केवळ विकत घेतलेले गुलामच होते. त्यांच्या धनयाच्या नजरेंत त्यांची जनावरापेक्षां अधिक किंमत नव्हती! राजनैतिक पराजयानें त्यांची अशी स्थिति झालेली नसून, केवळ आर्थिक स्वार्थनीतीमुळें हे शेतकरी अशा स्थितींत लोळूं लागले होते. ते सरकारी कायद्याच्या बंधनांत आधींच अडकविले गेले होते. रशियन शेतकरी म्हणजे केवळ

घरादारवांचून भटकत फिरणारे नागरिक होते. आणि त्यांना घरें-दारें करून रहाण्याची सक्त मनाई असल्यामुळेंच गुलामगिरीचा पेहराव घेणें प्राप्त झालें होतें.

एकदां पीटर दि ग्रेटला युरोपीय सामर्थ्यांशीं सामना देण्यासाठीं एका प्रचंड सेनेची आवश्यकता प्राप्त झाली, म्हणून त्यानें सैन्य उभारण्याची एक युक्ति काढली. सैन्यांत भर्ती होणारामध्यें त्यानें जमीन वांटून देण्याची सुरवात केली व त्यामुळें साठ लाख जमिनदार बनले गेले. हे जमीनदार सैनिकत्वाच्या मदानें अधीकच क्रूर बनले. त्या जमीनदारांच्या जालाचा प्रसार सर्व रशियाभर पसरला गेला इस्थोनियाचा जमीनदार लिथोमियांतल्या जमीनीचा मालक असे. याचा परिणाम असा झाला कीं, वर्षांतून एकदांच मिळणाऱ्या रजेंत ते जमीनदार आपल्या जमीनीकडे जात असत व चोवीस तासांसारख्या अत्यंत अल्पावधीत ते आपल्या शेतकरी कुळांकडून आपलें उत्पन्न जुलूम जबरदस्तीनें पदरात पाडून घेऊन परत जात. ही वसूलबाकीची वसुली करण्याची पद्धत अत्यंत हृदयविदारक असे. अत्याचारी झारचा कायदा शेतकऱ्यांनीं एका जमीनदाराला सोडून दुसऱ्याच्या नोकरींत जाण्यास प्रतिबंधक असल्यामुळें, प्रथम ज्याची सेवा पतकरली त्याच्याच सेवेंत अखेंर पर्यंत शेतकऱ्यांना राहावें लागत असल्यामुळें त्यांना लोमहर्षण अत्याचार सहन करणें भाग पडत असे.

## काण्ड दुसरें.

अशी स्थिति असण्याचें एक कारण होतें. झारनें स्वराज्यरक्षणार्थ जे जमीनदार सैनिक तयार केले होते त्यांना तो पगार देत नसे व म्हणूनच त्यानें त्या सैनिकास राजसेवेबद्दल जमीन वांटून दिली होती. ३,५०,९६,५८७ इतक्या एकर जमीनीवर या क्रूर जमीनदार सैनिकांचा निरंकुश अमल चालत असे. गरीब बिचाऱ्या शेतकऱ्यांची करुणाजनक कहाणी प्रथम झार ऐकतच नसे व ऐकलीच तरी तो काय करणार होता ! शेतकऱ्यांच्या विनंती अर्जांकडे त्यानें लक्ष देऊन जर शेतकऱ्याची एका जमीनदाराकडून दुसऱ्या जमीनदाराकडे अदलाबदल करण्याची व्यवस्था करण्याचें मनांत आणिलें असतें, तर देशावर आर्थिक संकटाची आपत्ति कोसळली असती. यास्तव त्या बाबतींत झार अगदीं गप्प चुप्प बसत असे.

पण याचा परिणाम अखेरीस इ. स. १८६१ मध्यें जमीनदार सैनिकांची इतिश्री होण्याची पाळी आली व पगारी लष्कर ठेवण्यांत आलें. याप्रमाणें परम्परागत चालत आलेल्या जमीनदार सैनिकांचें आसन ढळलें. शेतकऱ्यांच्या गुलामगिरीचें बंधन ढिलें झालें. ज्या जमीनी दुसऱ्याच्या म्हणून शेतकरी लोक नांगरीत असत त्या त्यांना देण्यांत आल्या. आठ एकरांपासून अकरा एकरापर्यंत जमीन एक दोन शेतकऱ्यांना देण्यांत आली. जमीनदार सैनिकांपासून काढून घेतलेल्या या जमीनीची ठराविक किंमत त्यांस सरकारांतून दिली जाऊन, शेतकऱ्यांना दिलेल्या त्या जमीनींच्या किंमतीची रकम शेतकऱ्यांनी हप्ते-

वर्षांनीं एकुणपन्नास वर्षांत फेडावी असें ठरलें. इतकेंच नव्हे तर जमी-नींची मशागत व लागवड करण्यासाठीं शेतकऱ्यांना सहा टक्के व्याजानें सरकारांतून रकमाही देण्यांत आल्या. म्हणजे, रशियन सरकारनें या बाबतींत स्वतःच बँकरचें काम केलें. १९०७ पर्यंत शेतकऱ्यांना जेवढी रकम फेडतां आली तेवढी त्यांनीं फेडली व शिलक रकम शेत-कऱ्यांना सूट म्हणून सरकारांतून देण्यात आली. ही गोष्ट रशियन सरकारनें आपल्या शेतकऱ्यांच्या बाबतींत प्रशंसनीय केली हें अगदीं खरें; तरी पण या गोष्टीनें शेतकरी संतुष्ट झाले नाहींत. शेंचाळीस वर्षेंपर्यंत त्यांच्यापासून जें द्रव्य अनियंत्रितपणें उकळण्यांत आलें होतें त्यामुळें ते असंतुष्ट होते.

यानंतर जमीन वांटणीच्या कायद्यांत एक विलक्षण प्रकारचा फरक करण्यांत आला. ज्या घरांत जितके पुरुष शेती करण्याच्या लायकीचे होते तितक्यांची गणती केली जाऊन बारा वर्षे पर्यंत भूमी-वर त्यांचा ताबा मानावा असें ठरविण्यांत आलें. अशा प्रकारें '**भौमिक साम्यवाद**' (Communism) स्वरूपाची वांटणी करण्यात आली. इंग्लंडचे **प्रॉ. मॉ. बेरिङ्** यांनीं आपल्या '**मेन स्प्रिंग्ज ऑफ रशिया**' नामक पुस्तकांत याबाबतीबद्दल असें म्हटलें आहे कीं,—

" याप्रमाणें बटवारा झाल्यावर एका जमीनदाराच्या अधिपत्या-खालीं राहणाऱ्या मजूरदार शेतकरी वर्गांत स्वतंत्रपणें बारा वर्षांच्या करा-रानें भूमिविभाजन करण्यांत आलें. वस्तीच्या गांवांतील तीन चतुर्थांश

मतें पडल्यावांचून पुन्हा जमीनीची वांटणी करण्यांत येऊं नये; असें ठरविण्यांत आलें. या बारा वर्षांच्या अवधींत भूम्याधिपति जर मरण पावला व त्याला वारस नसला तर ती जमीन सरकार जमा व्हावी, व्यक्तिगत संपत्ति मानली जाऊं नये. ”

नुसत्या सुपीक जमीनीची याप्रमाणें वाटणी करण्यांत आली असें नाही, तर सकस व निकस अशा दोन्ही प्रकारच्या जमीनींची एकत्रितपणें वाटणी केली गेली. ही वांटणी दोन्ही प्रकारच्या जमीनीची सारख्या प्रमाणांत केली गेली होती. तक्रारी फार झाल्यामुळें, ज्याच्या नांवावर जमीन असेल तो बारा वर्षांत मेल्यास ती जमीन त्याच्या घराण्यांत राहून बारा वर्षांनीं पुन्हा सर्व जमीनीची वांटणी करण्यांत यावी असा कायद्यांत नवा फेरबदल करण्यांत आला.

हा नियम १८६१ पासून १९०४ पर्यंत अमलांत होता. १८९० साली तिसऱ्या आलेक्झान्डरच्या कारकीर्दींत या नियमला एक नवी पुस्ति जोडण्यांत आली. ‘ वांटणी झालेल्या जमीनीपेक्षां इतर जमीन शेतकऱ्यांनीं विकत घेऊं नये ’ अशी ती दुरुस्ती होती. इतक्या अवधींत शेतकीची म्हणण्यासारखी उन्नति झालेली नसल्याकारणानें ही कायद्यांतली दुरुस्ती आपल्या भूमिवृद्धीला विघातक आहे अशी शेतकऱ्यांची सर्वांची समजूत झाली व त्यामुळें शेतकरी वर्ग जरी कमी होऊं लागला होता तरी कायद्यांत दुरुस्ति करण्यांत आली नाही.

# रशियांतील बोल्शेव्हिझम् !

रशियाला इ. स. १९०४ मध्यें सर्वव्यापी अशा एका राजनैतिक अशान्तीशीं झगडा करण्याचा समय प्राप्त झाला. ही अशान्ति एक शतकभर धुमसत होती. इचे कारण पुढें विस्तृतपणें सांगण्यांत येणार आहे. तें ह्याप्रसंगीं संक्षेपानें येथें इतकेंच दिग्दर्शित करतों कीं, जनता राजनैतिक अंमल जरी चाहत होती तरी तिनें प्रातिनिधिक शासनपद्ध-तींची जी अनेकवार मागणी केली होती ती प्रत्येक वेळीं निष्फळ होत गेली होती. पोलिसाचे अत्याचार व निरंकुश राजशासन ह्यानी प्रजा अगदीं हवालदील झाली होती. नागरिकजीवन अत्यंत संकुचित व पराधीन झालें होतें. यांतच 'आम्हांला अधीक जमीन खेरदी करू द्या' या शेत-करी वर्गाच्या मागणीच्या फेंटाळणीच्या असंतोषाची भर पडली होती

ह्या धुमसून पेट घेण्याच्या मार्गाला लागलेल्या १९०४ च्या असन्तोषानें १९११ साली आपल्या ज्वाला प्रगट केल्या. १,१०,१११ शेतऱ्याना कैदी करण्यांत आलें. ४११ इसमांना देहान्त शासनाच्या शिक्षा दिल्या गेल्या व ९०१ लोकांना सैबेरियांत बंदिवासांत ठेवण्यात आले अशा स्थितीतही अवसर मिळतांच शेतकऱ्यांनीं जमीनदारांचीं घरें दारें जळून शेती उध्वस्त केली व गुरें ढोरें जंगलांत पिटाळून लावलीं. अशाप्रकारचे अनेक तऱ्हेचे अत्याचार करून शेतकरी पुन्हां विजयी झाले. जमीनदार लोकांना आपापल्या जमीनीं पैकीं कांहीं जमीनी विकणें भाग पडलें. याप्रमाणें शेतकऱ्यांना जमीनींची बरीच प्राप्ति झाली. शेंकडा पंचवीस टक्के जमीन जमीनदारांच्या हातांतून गेली.

## काण्ड दुसरें.

इ. स. १९१० मध्यें पुन्हां एक अशाच प्रकारचें परिवर्तन घडून आलें. त्या सालीं सरकारांतून जो एक नवा कायदा करण्यांत आला त्याच्यायोगें शेतकऱ्याची जमीनीवरची मालकी सरकाराला वाटेल तेव्हां काढून घेता येणें शक्य होऊन सरकारकडून मिळणाऱ्या बारा वर्षांच्या कराराच्या जमीनीही त्या कायद्यानें हव्या तेव्हां सरकार जमा करतां येऊं लागल्या व त्या योगें शेतकरीवर्ग पुन्हां मजूरवर्ग ठरला.

या नवीन कायद्यांत जरी हा वरील गुढार्थ होता तरी कायद्याची लेखी भाषा फारच रसाळ, डौलदार व मोहक होती. एखाद्या उत्तमोत्तम कायद्याच्या अंमलबजावणीसाठीं स्वेच्छाचारी अधिकारी जेव्हां अधिष्ठीत होतात; तेव्हां प्रजेची खात्रीनेंच हानी होते इतकें जाणण्याइतका त्या वेळचा शेतकरीवर्ग सज्ञान झालेला होता. रशियन अधिकाऱ्यांनीं या नव्या कायद्याच्या जोरावर एका नवीन विषारी वल्लीची उत्पत्ति केली रशियन सरकारनें जो बारा वर्षांचा कायदा केला होता म्हणून मागें सांगितलें आहे तो वास्तविक दूरदृष्टी-चाच होता व त्यापासून राजाचें नुकसान न होता शेतकऱ्यानाही कायद्या बाहेर पडण्यास अवसर नव्हता. पण १९०४ सालीं जेव्हां भौमिक साम्यवादाचा वास रशियन सरकारला आला तेव्हां तें चरकलें व व्यक्तिगत संपत्तीचा कायदा त्याचमुळें अमलात आला. त्यामुळें अधिकारी वर्गाला अशी आशा उत्पन्न झाली कीं, त्या कायद्यामुळें शेतकरीवर्गांत अधिक भरती होईल. ही त्यांची समजूत अनाठायीं

नव्हती. तसें कांहीं अंशी झालें खरें. गरीब शेतकरी लोकांजवळ द्रव्यभाव असल्यमुळें जमीनीची खरेदी करून तिची मशागत करण्यास लागणार द्रव्यसंचय त्याच्यांपाशीं बऱ्याच काळानें जमण्यासारखा असल्यामुळें व्यक्तिगत संपात्तिरूपाच्या जमीनीची खरेदी करणारे शेतकरी फारच अल्पप्रमाणांत पुढे आले. सरकारी बँकांनीं जरी शेतकरीवर्गाला मदत करण्याची सोय केली होती, तरी तेवढ्यावर जमीनीच्या खरेदीला लागणारी रक्कम अपुरी होती.

या प्रमाणें रशियन शेतकऱ्यांच्या जीवनकलहांतील मुख्य मुख्य मुद्दे होते. राजनैतिक क्षेत्रात रशियन शेतकऱ्यांची स्थिति कशी होती तें जरी आम्ही पुढें स्पष्ट करणार आहोंत तरी एथें येगदेंच सांगून ठेवतों कीं, रशियन शेतकरी वर्ग व राजनैतिक व्यक्ती यांचा अर्थाअर्थी संबंध नव्हता. रशियन शेतकरी म्हणजे आर्थिक व्यक्ती मानिली जात असून, त्या वर्गाचें चरित्र केवळ आर्थिक महत्वाच्या पायावर उभारलेलें होतें. जगातच्या आर्थिक क्षेत्रांत शेतकरी वर्गच खरा मुख्य असून, त्याच्यापासून अर्थप्राप्तीचा रस्ता सुगम होत असल्या कारणानेंच त्यानें सध्यां रशियांत विजयप्राप्ति करून घेतली आहे.

रशियन शेतकरी वर्ग अगदीं भोळाभाबडा व सरळ स्वभाचा आहे हें येथें सांगून ठेवण्यास विसरतां कामा नये. त्यांची मनें इतकीं मोठीं आहेत कीं, त्यावरून ऐतिहासिक दीनतचें प्रत्यक्ष दर्शन होतें, त्यांचा ईश्वरावर पूर्ण विश्वास असून प्रत्येक गोष्टींत ते ईश्वरावरच भरवसा ठेऊन चालतात.

देवावर भरवंसा न ठेवणाऱ्यांना ते पशुतुल्य मूढ समजतात. झारशाहींत अत्याचार घडत असतांहीं त्याच्या जुलमीकारकीर्दींत व्यवहार चालवून ते त्याला व्यक्तिगत असा ईश्वरास मात्र मान देणारे राजभक्त होते! परंतु जेव्हा जेव्हां आर्थिक गोष्टीकडे त्यांची नजर वळे, तेव्हां तेव्हां ते अधिकारी वर्गाचें शत्रुत्व संपादन करीत. हे शेतकरी जगतांत कोणच्या स्थानीं आरूढ होऊं शकतात तें पुढील इतिहासावरून समजेल.

# काण्ड तिसरें.

## जुन्या जमीनदारीची अखेर !

सिव्हिल सर्व्हिस व सैनिक सेवा या दोन गोष्टींत झारनें जेव्हां प्रथम आपल्या प्रजेला पदव्या आणि जमीनी याची खैरात केली त्यावेळेपासूनचा रशियाच्या जमीनदार लोकांचा इतिहास मोठा विलक्षण आहे. पदव्या, जमीन आणि कांहीं स्थायिक अधिकार यांवरच रशियन जमीनदार सेनेची उभारणी झालेली होती. त्यांच्याशिवाय इतरही कांहीं जरी स्वतंत्र जमीनदार होते, तरी रशियन जमीनदार व शेतकरी याचें जेथें जेथें वर्णन आलें आहे तेथें तेथें सरकारी मदत असलेले जमीनदार व त्यांचीं कुळें जीं—शेतकरी कष्टाळू लोक—त्यांचाच या पुस्तकांत इतिहास गोंवलेला आहे. रशियन जमीन्दार हे युरोपांतले फार पुरातनचे वहिवाटदार आहेत व अद्यापीही त्यांचे वंशज हयात आहेत. रशियन राज्यक्रांतीनंतर सध्यां त्यांची काय अवस्था झाली आहे हें मात्र अद्यापी बाहेर आलेलें नाहीं.

जमीनदारांच्यापेक्षां श्रेष्ठ वर्गातले लोकही पूर्वकाळीं तेथें होते. त्याना जहागीरी असत व त्यांची राजधानी कीव्ह नगरींत असे. झारनें जेव्हां आपली राजधानी मास्को नगरींत नेली त्यावेळीं वरील जहागीर-

# रशियांतील बोल्शेव्हिजम् !

द्राराचा संबंध कीव्हहून मास्कोशीं जडला. मास्को येथे राजधानीची स्थापना झाल्यावर या सर्व जहागीरदाराच्या जहागिरींचा अंतर्भाव सरकारी प्रांतांत करण्यांत आला. याप्रमाणें जहागिरी जरी खालसा करण्यात आल्या तरी त्या जहागीरदाराची **प्रिन्स** ही पदवी वंशपरंपरागत ठेवण्यात आली होती व अद्यापीही ती कायम आहे. जहागिरी गेल्यानंतर ते जहागिरदार लोक पूर्ण स्वतंत्र झाले व त्यानीं सार्वजनिक चळवळींतही भाग घेण्याचा क्रम सुरू केला.

या **प्रिन्स** या पदवीशिवाय आणखी दोन पदव्या प्रचारात होत्या. त्या '**ग्रॉफ**' व '**बॅरन**' ह्या होत. या पदव्या ही कांहीं खानदानीच्या गृहस्थांना वंशपरंपरागत देण्यांत आल्या होत्या. '**ग्रॉफ**' म्हणजे '**काउन्ट**' ही पदवी समजावी. रशियन भाषेंत या अर्थाचे पर्याय शब्द नसल्याकारणानें हे दोन्ही शब्द जर्मन भाषेंतून घेतलेले होते. या पदव्या खुद्द **झार**नें आपल्या देशस्थास दिलेल्या असून, अन्य देशांतून तेथें गेलेल्या प्रवाशी वंशालाही त्यांची त्यानीं खैरात केलेली होती.

रशियांत अद्यापी जे त्या वेळच्या जहागीरदारींचे वंशज हयात आहेत त्यांच्या मागें अजून—**बरियाटिन्स्की, डलगोरुन्की, ऑब्लेन्स्की गॉर्चकॉव्ह, रबॉवन्स्की, गलिट्सिन्, टॉवस्कॉय** वगैरे पदव्या लावल्या जातात. रशियन राज्यक्रांतिकारकात अशा तऱ्हांच्या पदवीधरांचीं नांवें वाचण्यास सापडतात. जहागीदारांच्या

## काण्ड तिसरें.

वंशजांस या पदव्यांनीं अलंकृत करण्याचें कारण असें आहे कीं, रशियन गार्हस्थ्यांत समानाधिकार ( Democracy ) नेहमी रहावी. ही एक प्रकारची शुष्क लांचलुचपत स्त्रीपुरुषांना देण्यांत आलेली आहे.

रशियन कायद्यांत स्त्रीला आपल्या पैत्रिक संपत्तीचा चौदावा हिस्सा मिळावा असें कलम असल्यामुळें पति जिवंत असतांही पत्नि त्यामुळें पुर्ण स्वातंत्र्यानें वागूं शकते. हा स्त्री स्वातंत्र्याचा अधिकार फ्रान्सातील स्त्रियांना नाहीं.

जहागिरदार, जमीनदार, काउन्ट, बॅरन व इतर पदवीधर वगैरे सर्वांचें स्वरूप जमीनदार या नात्याचेंच असल्याकारणानें त्या सर्वांचा रशियन सरकारशीं कोणत्याना कोणत्या तरी तऱ्हेचा संबंध राहिलेला होता. रशियन जमीनदार या शब्दांची व्याख्या पुढील प्रमाणेंही होऊं शकतात:—

( १ ) रशियन जमीनदार सरकारी नौकर असतो.

( २ ) कोणीही मनुष्य सरकारी नौकर होऊं शकतो; पण त्यानें सिव्हिल सर्व्हिस किंवा फौजी परीक्षेंत उत्तीर्ण झाले पाहिजे.

( ३ ) सरकारी सरदारीची पदवी प्राप्त झाल्यावर परंपरागत अशा कांहीं अधिकारांची प्राप्ति होते.

**झारला** जेव्हां, सैनिकांची अवश्यकता भासली त्या त्या वेळीं या जहागीरदारांची सृष्टी निर्माण करण्यांत आली, हें मागें सांगितलेंच आहे. आतां ही जमीनदारी कशी निष्पन्न झाली तें पाहूं.

इंग्लंडांत **नॉर्मन** लोकांनीं विजयप्राप्ति करून जेव्हां राज्याधिकार चालवण्याची सुरुवात केली होती अशा त्या वेळीं, **तार्तर** लोकांच्या प्राबल्या पूर्वी रशियांत कोणीही सर्वश्रेष्ठ असा सम्राट आस्तित्वांत नव्हता, तेथें लहान लहान प्रदेशांचे जहागीदार अनेक होते व त्यांना ' **प्रिन्स** ' ही संज्ञा असे. त्यांच्या सैन्यांत वेतनभोगी सैनिकांच्या जागीं '**अनुयायी सैनिक**' असत. त्यांना जमीनजुमला अस्थायी जागेवर मिळत असें. असें होतें तरी, त्या अनुयायी सैनिकांची इच्छा झाल्यास एका **प्रिन्स**चा आश्रय सोडून मनमानेल त्याचा आश्रय धरण्यास त्यांस मुभा होती. याचा परिणाम असा होत असे कीं, तें अनुयायी सैनिक आपल्या स्वातंत्र्याच्या बलावर प्रतापी व शिरजोर **प्रिन्स**च्या आश्रयाला खुषीनें जाऊन राहत ! कीव्हच्या प्रबल राजानें ( **प्रिन्स** ) आपल्याला **झार** हें उपपद धारण केलें होतें व त्यामुळें सर्व जहागीरदारांचें संरक्षण करण्याचें काम त्याच्यावरच पडलेलें होतें. **झारनें** आपली राजधानी मास्को शहरीं नेल्यानंतर त्याला उत्तर रशियांतल्या जमीनीचा जेव्हां मोठा भूभाग प्राप्त झाला तेव्हां त्यानें आपल्या अनुयायी सैनिकांमध्यें जमीनीची वांटणी करून देण्याची सुरुवात केली. या व्यवस्थेनें इतर जहागिरीचे तुकडे पडले जाऊन त्या **झार**च्या पक्षांत

पडू लागल्या. याप्रमाणें झारनें मोठ्या कौशल्याच्या स्वार्थी कर्तबगारीनें हलके हलके जुन्या जहागीरदारांच्या जहागिरी गुप्तपणें मोठ्या खुबीनें अतस्थरीतीनें नामशेष करून, अस्थायी स्वरूपाच्या जमीनींची वांटणी केली व सरकारी नौकरीची प्राणप्रतिष्ठा केली.

त्या वेळच्या त्या भोळ्या जहागीरदाराच्या लक्षांत हा झारचा कावा न आल्यामुळें ते त्याचे अंकित नौकर बनले गेले व त्यांच्याकडून राज्यसीमाचें अशाप्रकारें संरक्षण करण्याचें काम होऊं लागलें, सैन्यासाठी माणसें मिळूं लागलीं व झार हा आपल्या बुद्धिकौशल्याच्या प्रभावानें सर्वांचा मालक बनला

हें सर्व वातावरण सोळाव्या शतकात बदललें गेलें ज्याला परंपरागत जहागीरदार राहायचे असेल त्यानें आजन्म झारची नौकरी बजावली पाहिजे अशी एक नवी दुरुस्ती जुन्या कायद्यात करण्यांत आली. यामुळें असें झालें कीं, झारची नोकरी जोंपर्यंत करण्याची धमक अंगांत असेल तोंपर्यंतच अस्थायी जमीनीची जमीनदारी कब्जांत राहूं लागली. रशियात ही एक गोष्ट विशेष आहे कीं, कोणताही गड, किल्ला, जहागीर अथवा स्थल यांची नांवें कोणच्याही जमीनदारांच्या नांवनें उपलब्ध होत नाहीत. सर्वांचा स्वामी एक काय तो झार !

या स्थित्यंतरानंतर पुन्हां जमीनदारांच्या स्थितींत एक नवा बदल झाला. सरकारी नोकरी करीत असलेल्या जमीनदारानें आपल्या अस्थायी जमीनदारीला स्थायिक बनविण्यासाठीं आपल्या नोकरीवर कायम

राहिलें पाहिजे असा एक नवा नियम करण्यांत आला. या नियमानुसार जमीनदारांनीं स्वतः नोकरी करण्यास नालायक झाल्या बरोबर आपल्या संततीस झारचे नोकर बनवून आपली जमीनदारी कायम करण्याचें सुरू केले. या पद्धतीनें सरकारला नोकरांची दुर्भिक्षता न पडतां पर्यायानें आयते गुलाम नोकर घरबसल्या मिळू लागले. याप्रमाणें जमीनदारांनीं आपली जमीनदारी स्थाइक स्वरूपाची निर्माण करून ठेवली.

याप्रमाणें १५४७ पर्यंत ईव्हन दि टेरिबालच्या कारकीर्दी-पर्यंत सरकारी नोकरी करणाऱ्या ह्या जमीनदारांचे संघ बनले गेले व हळू हळू ते व्यक्तिगत रुपानें एका विशीष्ठ व्यक्तिचे संरक्षक बनले. यांत इतकेंच झालें कीं, जमीन दाराच्याकडे वंशपरंपरागत जहागीरदारी ठेवण्याची जोखीम झारवर पडली गेली या गोष्टींत ईवन दि टेरिब-लच्या असें अहितकारक अनुभवाला आलें कीं, रशियन जमीनदार हा एक मोठा श्रेष्ट पुरूष गणला जाऊन त्याचे अनुभवी पुत्रही त्याच्या त्या श्रेष्ठत्वाच्या पायरीवर आरूढ करावे लागत, ही हानीकारक गोष्ट लक्षांत येतांच ईवन झारनें ती पद्धत एकदम बंद करून त्या पद्धतींचें महत्व काढून टाकलें. त्यानंतर ' पीटर दि ग्रेट ' यानें जमीन-दारांना जे ' बॉयर ' म्हणत असत त्याचाही संक्षेप उडवला.

याप्रमाणें सर्वसाधारण जनतेंत श्रेष्ठतेनें मिळणारे जमीनदार लोक राजकीय दृष्टीनें एक प्रकारचे मामुली सरकारी नोकर गणले जाऊन त्याची जमीनदारी मात्र त्यांच्या स्वाधीन राहिली.

अशा स्थितींत सरकारी नोकरीसाठीं **पीटर दि ग्रेटनें** एक परीक्षाही निर्माण केली. त्या परीक्षेत जो जशा प्रकारच्या दर्जाचा उत्तीर्ण होईल त्याला तशाप्रकारच्या उच्च, मध्यम व नीच दर्जाच्या नोकऱ्या देण्यात येऊं लागल्या. विश्वविद्यालयांतील उच्च पदव्यांच्या परीक्षात उत्तीर्ण होण्यासाठीं विद्यार्थ्यांना रस्ता मोकळा ठेवण्यांत आला होता. एखाद्या रेल्वेंतील नोकरालाही आपल्या बुद्धिबलाच्या जोरावर स्वतःची उन्नति करून घेऊन अर्थसचिव किंवा प्रधानमंत्री होता येईल इतकें राजद्वार उघडलें गेलें.

**पीटर दि ग्रेटच्या** मागून रशियाच्या सिंहासनावर आलेल्या **झरांनीं** जरी जमीनदारांच्या अनिवार्य नौकरीचें बंधन तोडून टाकलें होतें, तरी द्वितीय **कॅथेराइननें** जमीनदाराच्या बाबतींत काकुळती दाखवून स्थानिक शासनव्यवस्थेच्या दृष्टीनें जमीनदारांना–सरकार व जनता याच्या मधल्या शक्तीचा दुवा बनविला गेला व पुढें तोच दुवा अधिकारी तंत्राचें एक मुख्य अंग होऊन रशियन राज्यक्रांतीलाही मुख्यत्वें कारणीभूत झाला.

स्थानिक न्यायाधीश व फौजदारी खटल्यांचे निवाडे करणारे म्याजिस्ट्रेट्स जमीनदार लोकांतूनच निवडून येऊं लागले. सर्व तऱ्हेचे प्रांतिक अधिकारी या जमीनदारांतूनच जागा भरूं लागल्यामुळें साधारण जनतेला कोणच्याही तऱ्हेचा अधिकार मिळेनासा झाला. गव्हर्नरापासून तों थेट जमादारापर्यंत या जमीनदारांनीच सर्व जागा आडवल्यामुळें

राज्यांत बेबंदशाही सुरू झाली. अशा त्या अधिकाऱ्यांच्या नेमणुकीच्या बाबतींत जनतेची कोणच्याही प्रकारें संमती घेतली जात नसे. असा हा घोर अन्याय सिंहासनाधीशाकडून घडूं लागला. याचा परिणाम असा झाला कीं, अधिकारीवर्ग व जनता यांच्यामध्यें सलोखा राहण्यच्या ऐवजीं नोकरशाहीच्या उन्मत्तपणाच्या वर्तनानें जनता व अधिकारी याच्यांत चुरस उत्पन्न झाली ! जमीनदारांनीं सरकारी अधिकाराच्या नोकऱ्या पतकरल्यामुळें त्यांच्या जमीनीच्या बहुलाला त्यांना स्वतः जाणें मुष्कील झाल्यामुळें तें काम त्यांना आपल्या नोकरावर सोंपविणे भाग पडूं लागले व ते नौकर शेतकऱ्यांशीं अति निष्ठुरतेनें वागण्यांत धन्यता मानू लागले. याप्रमाणें जमीनदारांचें काम मोठें बिकट होऊन बसलें. नौकरी सोडावी तर अधिकार जातो व जमीनदारीचा त्याग करावा तर खावें काय ? अशा पेंचांत ते पडले. दोन्ही कामें सभाळणें त्यांना दुःसाध्य झालें.

या प्रमाणें जमीनदारांच्या नौकरांकडून होणाऱ्या कठोर वर्तनाच्या हालअपेक्षा व अधिकारी वर्गानें केलेल्या निष्ठुरतेच्या आणि अत्याचारी कायद्याना त्रासून शेतकरी वर्गानें अखेरीस १८५८ मध्यें एकदम रशियन जनतेच्या वातावरणांत हलकल्लोळ करून सोडला !

तें वातावरण शांत करण्यासाठीं शेतकरी वर्गांत सरकारकडून जमीनीची वांटणी करून देण्यांत आली. ही वांटणी बारा वर्षांच्या कराराची असे. जमीनदारांची जमीन याप्रमाणें विक्रीकरून सरकारी

ठराविक किंमत देणारास मिळूं लागली. तरीपण या पद्धतीनेंही शेतकऱ्यांचें आर्थिक संकट टळूं शकलें नाहीं. त्याना अधिक जमीनीची अवश्यकता होती, पण आपल्या हातची जमीन दवडणें हा जमीनदाराचा आर्थिक प्रश्न होता व त्याबाबतीत सरकारी नियमानुसार सरकारचें कर्ज फेडण्यास शेतकरी असमर्थ होते. शिवाय जमीनदारांची संख्या पुष्कळ होती. सरकारी अधिकारी जे अत्याचारी जमीनदार त्यांची अर्थपोटी सेवा करून गुलामगिरींत निरंतर शेतकऱ्याना काळ कंठावा लागत असे. दक्षिण रशियात तर या गरीब शेतकऱ्याना गुलाम संज्ञेनेंच सर्वत्र प्रसिद्धपणें संबोधिलें जात असे.

सरकारी कायद्यानें जरी शेतकऱ्याना बारा वर्षांच्या करारानें जमीन वाटण्यात येऊं लागली होती, तरी त्यावर त्यांचा निर्वाह होत नसे व नवीन जमीन खरेदी करण्याचा अधिकार कायद्यानें फक्त जमीनदारांनाच असे यामुळें शेतकरी अगदी हताश होऊन गेले. इ. स. १८६१ मध्यें हें कायद्याचें बंधन तोडून टाकण्यात आलें!

वाटेल त्याला जमीन खरेदी करण्याचा मार्ग वरील कायद्यानें खुला झाल्यामुळें अर्धे अधिक जमीनदार लुप्त झाले. आतां जे नवीन जमीनदार बनले ते मिश्र श्रेणींतले होते. या संमिश्रित जनतेंत व्यापारी लोकही होते. त्यांनी केवळ व्यापारी दृष्टीनेंच आपला पैका जमीनी खरेदी करण्यांत ओतला होता. असे लोक स्वतंत्रपणें जरी जमीनी खरेदी करीत होते तरी गरीब व कष्टाळू शेतकरी वर्गापाशीं द्रव्याभाव

असल्यामुळें, एक मालक जाऊन दुसरा आला अशी त्यांची पूर्व स्थितीच कायम राहिली व त्याच्यावर १८६१ च्या कायद्यानें नव्या जमीन-दारांचें स्वामित्व प्रस्थापित झालें. हीच स्थिति पुढें चार वर्षें सुरू होती. या अवधींत शेतकरी जरी जमीनदार बनले नाहींत, तरी त्यांचे नवे मालक जुन्या धन्याप्रमाणें खाष्ट नसल्याकारणनें त्यांना ते गुलामाप्रमाणें वागवीत नसत. दुःखांत एवढेंच काय तें सुख त्यांना मिळालें

इ. सन १९०५ मध्यें शेतकरी लोकाना बारा वर्षांच्या करारानें जमीनी देण्याचा जो कायदा होता तो रद्द करण्यात येऊन त्या जमीनी शेतकरी लोकाना कायमच्या मालकीच्या करून देण्यांत आल्या. नवीन कर्ज देण्याचें बंद केलें जाऊन पूर्वींच्या बाकी कर्जाची सूट देण्यांत आली.

याप्रमाणें रशियन राज्यक्रांतीच्यापूर्वी रशियांतल्या वाटेलत्या प्रजेला हवी तेवढी जमीन खरेदी विक्री करण्याचा मार्ग खुला होऊन सर्वत्र स्थिरस्थावर जरी झालें होतें, तरी राज्यक्रांतीनंतर या जमीन-दाराच्या बाबतींत 'बोल्शेविक' सरकारनें काय व्यवस्था केली आहे ह्याचा खुलासा कळण्यास अद्यापी मार्ग उपलब्ध झालेला नाहीं, याचें कारण 'बोल्शेविक' सत्ताच अद्यापि स्थिरस्थावरावस्थेंत निर्माण झाल्याचें समजण्यास आम्हांस मार्ग नाहीं.

# काण्ड चौथें.

## रशियाची राज्यनीति.

मागील दोन काण्डावरून रशियाच्या राज्यक्रांतीचा आरंभ कोठून झाला व तिचें बीज कोठें रुजलें गेलें हें आता वाचकाच्या ध्यानांत आलेंच असेल. क्रांति मग ती कशाची व कोणची कां असेना क्षणार्धांत कधींच होऊ शकत नाहीं. ती घडून यायला कांहीं काळ लोटावा लागतो. तिचा उद्भव—सुदूरवर्ति घटना आणि तिचा क्रम यांनींच होत असतो. घटना जेव्हां एका विस्फोटक केंद्रात जाऊन पोंचते तेव्हां ज्वालामुखीच्या स्फोटाप्रमाणें तिच्या क्रांतीचा अनर्वाच्य व कल्पनातीत असा लाव्हा रस भपक्यावर सैरावैरा पसरूं लागून त्यांत रशियासारखी—दुष्ट, क्रूर, स्वार्थी, मदांध आणि नीच राष्ट्रांची जुनी राजसत्ता नामशेष होऊन जाते असें इतिहास सांगतो आहे. रशियाच्या राज्यक्रांतीच्या पूर्वीचा इतिहास सांगण्याचा आमचा हाच उद्देश आहे. कीं, जेव्हां कोणच्या राष्ट्रांत राज्यक्रांति जन्माला येते तेव्हां तिच्या कारण परंपरेचा प्रारंभ कसा व कोठें होतो हें आम्हांला दाखवून देण्यासाठीं रशियाची पूर्व पीठिका व तदनंतरची स्थिति मागील तीन काण्डांत सांगावी लागली आहे. रशियांमध्यें जी राज्यक्रांती झाली तिला

# रशियांतील बोल्शेव्हिजम् !

रशियन शेतकरी किती कारणीभूत झाले, रशियन जमीनदारांनीं काय केलें, अधिकाऱ्यांची दंडेली प्रजेला कितपत भोंवली, झारनें काय उत्पात केले, रशियन व्यापाऱ्यांनीं काय केलें व देशव्यापी अशांती व शामुळें जन्माला आली. या गोष्टींचें स्पष्टीकरण पुढें जरी योग्य स्थळीं येणार आहे, तरी क्रांती घडून येण्यास हीं जीं मुख्य अंगें कारणीभूत झालीं त्यांचा येथें नुसता सध्यां निर्देश करून ठेवीत आहों. अशा प्रकारच्या महत्वपूर्ण आणि विषमय कारणांच्या ज्वालामुखीचा जो स्फोट रशियांत झाला त्याच्या 'बोल्शेविझम' रूपी लाव्हारसानें आज सर्व जगाचा थरकांप करून सोडला आहे हें अगदीं सत्य आहे.

रशियन राज्यक्रान्तीचा उगम—मुख्यत्वें गरीब शेतकऱ्यांच्या आर्थिक असंतुष्टतेत आणि अधिकाऱ्यांच्या अधिकारमदान्धतेंतून झालेला आहे. लोकसत्ता स्थापित करून गरीबांचा परामर्ष घेण्यास उद्धत झालेली अशा प्रकारची ही क्रांति आजपर्यंतच्या इतिहासांत अगदीं पहिलीच असून—यापुढें भूमंडळावरील ज्या ज्या राष्ट्रांतून भवितव्यतेनें कोणच्या ना कोणच्या तरी कारणांनी क्रात्या कधीं काळीं घडून येतील त्याची ही दुष्टांचा नाश करणारी व गरीबांची पालनवाली अशी आद्य माताच म्हटली जाईल यांत संशय नाहीं !

रशियाच्या इतिहासावरून असें समजतें कीं, झारनें ज्यावेळीं युरोपीय राज्यनीतीच्या तत्वांवर रशियांत राज्यशासनपद्धति सुरू केली तेव्हांपासून १९०५ पर्यंत रशियांत घोर निरंकुश असा राजशासनाचा

## काण्ड चौथें.

-अत्ताराज सर्वत्र चौफेर धांवत होता. झारची इतकी शक्ति होती कीं, ती इच्छामात्रेंकरून काय हवें तें करूं शकत असे. पहिल्या **अलेक् झॅन्डरनें** सर्वांच्या आधीं जरी एका व्यवस्थापक कौन्सिलची स्थापना केली होती, तरी त्याला केवळ ती एक प्रकारची परामर्षदांची समिति होती, हेंच म्हणणें शोभेल कारण ह्या कौन्सिलच्या स्थापने नंतर झारनें जेव्हां जेव्हा जें जें काहीं करण्याचें मनांत आणलें व केलें त्यापुढें त्या समितीचें काडीमात्रही कधीच काहीं चाललें नाहीं. **पीटर दि ग्रेटनेंही** एक **सीनेट** अथवा **कार्यकारी मंडळ** स्थापिलें होतें; पण त्याचें इतकेंच पहाण्याचें काम होतें कीं, राजशासनपद्धतीचें पालन यथासांग होतें आहे किंवा नाहीं आणि झारच्या आज्ञा पूर्णपणें अमलात येतात किंवा कसें.

झारनें आपल्या हातीं अशी कर्तुं अकर्तुं अन्यथाकर्तुम् शक्ति ठेविली होती कीं, तो वाटेल तेव्हां वाटेल तसे हुकूम सोडीत असे व कोणच्याही मंत्र्यानें त्याच्या इच्छे बाहेर जर काहीं सल्ला दिला तर तो त्याला एकदम बरतर्फ करीत असे मंत्र्याची नेमणूक झारच्या इच्छेवर असे. मंत्र्यांकडून तो कायदे करवी, पण ते त्याच्या स्वतःच्या मान्यतेचे असत. झारनें योजिलेली व्यवस्था मंत्रीलोक '**कौन्सिल ऑफ एम्पायर**' च्या रूपानें प्रजेंत प्रगट करीत व त्याबद्दल जो वादविवाद होत असे तो तें मंत्रिमंडळ झारच्या कानावर घालीतच नंतर झारच्या इच्छेवरहकूम कायदा पसार होत असे. याप्रमाणें रशियात इ. सन १९०५ पर्यंत प्रत्येक कायद्याचा जन्म होत असे.

# रशियांतील बोल्शेव्हिझम् !

प्रजेनें आपल्या हातीं अधिकार देण्याबद्दल झारकडे निकराची मागणी केली तेव्हां फारच थोड्या वेळेपुरते कांहीं अल्पाधिकार झारनें प्रजेला सन १९०५ मध्यें दिले होते, ते अधिकार ज्या सिद्धांतावर न्याय्य रूपानें रशियन प्रजेंत प्रगट झाले होते ते सिद्धान्त जर बाजूल ठेवून त्यांवर नव्याच कायद्यांची त्या वेळीं उभारणी झाली नसती, तर बारा वर्षांच्या अवधींत त्यानंतर जी रशियांत एकदम राज्यक्रांति घडून आली ती खात्रीनें आली नसती; परंतु झारचा मूर्खपणा आणि निरंकुश राज्यशकट हाकण्याची हांव त्यानीं जे गुण उधळले त्यांमुळें सन १९०५ मध्यें त्यानें प्रजेस दिलेल्या सुधारणा केवळ मामुली स्वरूपाच्याच होऊन बसल्या ते जे सुधारणांचे कायदे झारनें प्रजेला अर्पण केले होते त्याबद्दल त्यनें कधीं शपथही घेतली नव्हती व अमुक राजनीतिप्रमाणें मी ते कायदे प्रजेसबधानें पाळीन असें त्यानें प्रजेला वचनही दिलें नव्हतें. शिवाय कोणच्याही अधिकाऱ्यांशीं त्याचें ह्याबाबतींत पुढें खलबतही झालें नव्हते. तेव्हा अशा वस्तुस्थितींत त्या कायद्याची काय किंमत असणार ते दिसतच आहे !

त्या सुधारणेच्या कायद्यात प्रजेचें व्यक्तिस्वातंत्र्य व ' ड्युमा ' नांवाची प्रजेची प्रतिनिधिक सभा या गोष्टी जरी व्यक्त झालेल्या होत्या तरी त्या दोन्ही गोष्टी प्रजेपासून वाटेल तेव्हां हरण करून घेण्याचा हक्क झारनें आपल्याकडे ठेवून घेतला होता. ड्युमा सभा अधिकारांत राहून तिच्या सूचनांचा विचार करणें हें कौन्सिल ऑफ एम्पायरच्या

मार्फत झारच्या इच्छेवर पूर्णपणें अवलंबून असे. प्रजेच्या संमतिवाचून कोणचाही नवा कायदा केला जाणार नाहीं असें ही त्या नव्या सुधारणांच्या बिलांत म्हटलेले होतें, पण तें सर्व व्यर्थ होतें.

**ड्यूमा** म्हणजे जी प्रतिनिधिक सभा तिची कोणत्याही नव्या स्वरूपानें स्थापना केली गेली होती अशांतलें कांहींच नव्हतें. इ. सन १५५० मध्यें ही अशाच सभेची पूर्वी स्थपना झालेली होती; पण अधिकारीवर्ग, शेतकरी, सावकारलोक व जमीनदार यांच्या अंतस्थ कलहामुळें ती बंद पडून राहिली होती. याचें आणखीही एक विशेष कारण असें होतें कीं, शेतकरी वर्ग पूर्णपणें जमीनदारांच्या जे ताब्यांत लाचार गुलामांप्रमाणें गेले होते. त्यांतून त्यांची नव्या कायद्याप्रमाणें सुटका झाल्यामुळें त्यांस जी जमीनदारांच्या बरोबरीच्या हक्कांची प्राप्ति झाली ती पाहून जमीनदारांची मस्तकें खवळलीं व शिवाय क्याथराईनच्या मनांत जमीनदाराचा दर्जा वरचढ ठेवण्याची इच्छा होती त्यामुळें ती राष्ट्रीय प्रतिनिधिक सभा भरणें अशक्य झालें होतें.

इ. सन १९०५ मधल्या **ड्यूमा** सभेची स्थिति निराळ्या तऱ्हेची होती. प्रजेच्या संमतीवांचून कोणचाही नवा कायदा करण्यांत येणार नाहीं असें जरी त्या नव्या दिल्या जाणाऱ्या सुधारणांच्या कायद्यात म्हटलें होतें, तरी त्या बाबतीत पुढें असा खुलासा करण्यांत आला कीं, " **सर्वांवर झारचा ताबा राहून कौन्सिल ऑफ एम्पायरच्या संमतीनें ड्युमाच्या सूचनांचा विचार केला**

जाईल. " या वाक्यानें अधिकारी व प्रजाप्रतिनिधी यांच्यामध्यें तेढ उत्पन्न झाली. झारचें प्रभुत्व लोकसत्तेच्या तत्वास विघातक होतें व त्यांतही आणखी मध्येंच कौन्सिलच्या पडद्यानें भर पाडिली होती. याचा अर्थ असा कीं, ड्यूमा ही एक नामधारी सभा असून झारला हवें तें कृत्य करून प्रजेची फसवणूक करण्याचें एक यंत्रच बनविलेलें होतें.

असें असूनही—ड्यूमा किंवा कौन्सिल या दोहोंची उचलबांगडी वाटेल तेव्हां करता येण्यासारखा अधिकार झारनें आपल्या हातीं ठेविला होता. झार ही निरंकुश शक्ति असल्यामुळें त्यानें स्वहस्तें लिहून दिलेला कायदा कौन्सिलनें व ड्यूमानें जर मनाला नाहीं, तर त्या दोहोंनाही तो मन मानेल तेव्हां रसातळाला पोंचवीत असे. ड्यूमा व कौन्सिल या दोहोंतील सभापति, उपसभापति व इतर सद्गृहस्थ यांच्या नेमणुकी झार स्वेच्छेनें निवड करून करीत असे. त्यामुळें अधिकारीवर्गापुढें त्या दोहोंच कांहींच चालत नसे. ज्या ज्या म्हणून देशांमध्यें राज्याधिकार सर्वस्वी एकाच व्यक्तिच्या ठायीं केंद्रीभूत झालेला दृष्टीस पडतो तेथें तेथें अशीच स्थिति आढळून येते यांत कोठेंसें नवल आहे असें नाहीं.

या शिवाय झारनें आपल्या हातांत आणखी बऱ्याच प्रकारच्या मुख्य सूत्रांचें अधिकार आपल्या ताब्यांत ठेवलेले होते. कोणत्याही कायद्याचा अन्तिम निर्णय करणें, स्वतःच्या स्वतन्त्र आज्ञा स्वेच्छेनें प्रसिद्ध करणें, स्वेच्छेनें जरूरीच्या वेळीं स्वतंत्र कायदा पुकारणें युद्धप्रसंगीं

लागेल तेवढें कर्ज काढून कितीही मोठा खर्च असला तरी तो मंजूर करणें, पराराष्ट्राशीं संधी अथवा युद्ध करणे, मंत्रीमंडळ हवें तेव्हां मोडून नव्याची योजना करणें वगैरे वगैरे हे ते अधिकार होत. परराष्ट्रीय सर्व तऱ्हेच्या गोष्टी झारच्याच हातांत असून सैन्य आणि द्रव्यकोश यांचाही ताबा निरंकुशपणें त्याच्याच हातात होता.

**कौन्सिल ऑफ एम्पायर—**

इंग्लंडमध्यें ज्याप्रमाणे **हौस ऑफ लॉर्डस** व **हौस ऑफ कॉमन्स** या दोन सभा आहेत त्याचप्रमाणें राशियात **कौन्सिल ऑफ एम्पायर** व **ड्यूमा** या दोन सभा होत्या इंग्लंडमध्यें **हौस ऑफ कॉमन्स**मध्यें पास झालेलें बिल **हौस ऑफ लार्डस** मध्यें जाऊन त्यावर सिंहासनाधिष्ठात्याची जरीनें सही झाली म्हणजे तें बिल राज्यांत प्रसार करण्याची जशी वहिवाट आहे तशीच राशियांत जरी व्यवस्था होती तरी त्यांत जरा फरक होता **ड्यूमा** सभेंत पास झालेली गोष्ट **कौन्सिल ऑफ एम्पायर**च्या मध्यें पास झाल्यावर ती झारच्या मंजुरीकरितां—इंग्लंडच्या राज्याच्या सहिशिक्याप्रमाणें जात असे; पण दोन्हीं सभांत पास झालेल्या कायद्यावर इंग्लंडच्या राजानें सही केलीच पाहिजे हा जसा इंग्लंडात कायदा आहे तशी मात्र झारची स्थिति नव्हती. तो आपल्या इच्छेनुसार सही करी अथवा दोन्ही सभांनी पास केलेली गोष्ट फेटाळूनही लावी व त्याच्या दोन्ही सभांनी जर त्याच्या मर्जीविरुद्ध एखादी गोष्ट पास केली तर तो त्या दोन्ही सभा स्वेच्छेनें विलयासही नेयी !

**ड्यूमा व सीनेट—**

आतांपर्यंत जो मागें इतिहास सांगितला त्यावरून वाचकाच्या पूर्ण लक्षांत आलेंच् असेल कीं, **कौन्सिल ऑफ एम्पायर, ड्यूमा सीनेट** वगैरे ज्या गोष्टी राशियन राज्यपद्धतींत निर्माण करण्यांत आलेल्या होत्या त्या केवळ कोणच्या तरी गोष्टींनीं कालक्षेप करून प्रजेला गुलकावण्या दाखविण्यासाठीं भपकेदार नाटकेंच होतीं व सर्व शक्ति कायती एक **झार** ही होती ! इतकें लक्षांत आल्यावर मग तशा त्या राष्ट्राचा विस्तृतपणें इतिहास वाचण्याचा वाचकास कंटाळा आणण्यांत मतलब नसल्यामुळें तो सर्व इतिहास देण्याचें सोडून ‘शितावरून भाताची परीक्षा कळते’ या न्यायानें येथें संपवितों व दुसऱ्या काण्डाकडे वळतों.

# काण्ड पांचवें.

## राज्यकीय असंतोष.

रशियाची राज्यशासनपद्धति फारच कठोर आणि असहनीय होती. हिंदुस्थान व आफ्रिका यांव्यतिरिक्त सर्व जगभर ज्या वेळीं लोकसत्तेचा विजय झाला होता, अशा त्या वेळीं रशियाची जनता पराकाष्ठेच्या स्वेच्छाचारी शास्त्याच्या हातांतलीं गुलाम बनली होती १९०५ मध्यें जनतेच्या सुधारणेच्या कायद्याची अधिकारमदानें फेटाळणी झाल्यामुळें असंतोषाचें बीज प्रजाजनांत रुजण्यास खरी सुरुवात झाली होती. झारनें आपल्या वचनाचें प्रतिपालन केलें नाहीं. प्रधानमंत्री स्टॉलिपिन यानें सुधारणेच्या कायद्याची रचना करून त्यांत ड्यूमा व तिचे अधिकार यांची योजना केली होती. या नव्या सुधारणेच्या कायद्यानें रशियन नागरिकाला नागरिकत्वाचे पूर्ण अधिकार मिळणार होते, पण तसें कांहीं झालें नाहीं. राज्यकारभारांतील निष्ठुरता यत्किंचितही कमी केली गेली नाहीं. वर्तमानपत्रें अधिकारतंत्राच्या विरुद्ध रेसभरही तोंड उघडूं शकत नव्हतीं. सार्वजनिक सभा, राजनैतिकसभा व समित्या स्थापन करणें असंभव झालें होते. रशियन नागरिकाचें जीवन सर्वस्वी जखडून टाकलें गेलें होतें. शासनपद्धति व अंमलबजावणी यांबद्दलचे अधिकार अत्यंत

संकुचित होते. रशियन झारशाहीची राज्यशासनपद्धति इतकी गुंतागुंतीची व स्वैर झालेली होती कीं, तिचें यथार्थज्ञान करून घेणें हें फारच बिकट काम होऊन बसलें होतें. अशा स्थितींत प्रजेच्या तोंडावर सुधारणेचा म्हणून जो कायदा भपकेदार शब्दांत फेंकून दिला गेला होता तो केवळ फसवणुकीचा एक शब्दजाल होता ! लोकसत्ताविकास या शब्दजालावर ड्यूमा सभेची स्थापना ढोंगानें करण्यांत आली होती. नागरिकत्वाच्या हक्कदारीच्या भपक्यावर मतदारीच्या हक्कांचा पोंकळ सुळसुळाट करून सोडला होता; परंतु प्रेस एक्ट बंद करून ड्यूमाला स्वातंत्र्याचा लवलेशही देण्यांत आलेला नव्हता. झार व त्याचें सीनेट यांनीं लोकसत्तेचा खून पाडीत राहण्याचेंच मत स्वीकारलेलें होतें. प्रजेच्या असंतोषाचें हें पहिलें कारण असून, आतां यापुढचें आणखी कोणचें होतें तें यथातथ्य पाहू.

राजशासित देशांत मानवी प्रजाजनांचे काय हक्क असतात त्याचा खुलासा करण्याबद्दल रशियन प्रजा दीड शतकपर्यंत झारला एकसारखी चिकाटीनें विचारण्याचा जोर करून राहिली होती, पण त्याचें सामोपचाराचें कोणचेंही उत्तर मिळण्याच्या ऐवजीं दडपशाहीचा अंमल मात्र दिवसें दिवस आधिकाधिक वाढत चालला होता. अखेरीस १९०५ मध्यें प्रजेच्या मागणीकडे सरकारचें लक्ष्य गेलें व त्याचें फळ प्रजेच्या हातांत काय मिळालें तर ड्यूमा सभा व मताधिकार ! म्हणजे काय हवेचा बुडबुडा. अशा स्थितींत झारनें दोन वेळ ड्यूमा उधळून लावून

निरंगांदा जरी एक बिल झारनें पास केलें होतें तरी त्यांत प्रजेला व्यक्तिस्वातंत्र्याची उणीव ठेवली असल्यामुळें ड्यूमानें तें बिल अंगीकारलें नाहीं यांत नवल नाहीं.

इ. सन १९१४ मध्यें अशाच प्रकारचें एक बिल झारनें जरी पुन्हां पास केलें होतें, तरी त्यांत प्रजेला न्यायाच्या दृष्टीनें कोणचाच अधिकार ठेवलेला नव्हता. अधिकारीवर्ग प्रजेशीं अत्यंत जुलमानें वागत होता; तरी ड्यूमा व कायदे यांचा ती मुळींच प्रतिकार करीत नव्हती! एकंदरींत काय कीं, प्रजास्वातंत्र्याचा लवलेशही प्रजेला न मिळूं देण्याचा रशियन राजमंडळानें जणूं काय विडाच उचलला होता विदेशी व विधर्मी राज्याधिकारी ज्याप्रमाणें परकीय जित देशांवर अधिकार गाजवितात त्याप्रमाणें रशियन राज्याधिकारी आपल्याच देशबांधवांवर अधिकार गाजवीत होते व स्वजनांना परकीयांप्रमाणें विरोधी लेखून त्यांच्या जागण्यांत आपला नाश आहे असें समजत होते. अशा प्रकारचा कट्टुतर विरोध स्वकीय अधिकारी मंडळ व स्वकीय प्रजाजन यांच्यामध्यें असणें हें अत्यंत घातुक होय. अशा तऱ्हेच्या कट्टुतर स्थितीचा परिणाम एकदाच नव्हे तर अनेकदां असा घडला कीं, प्रजेला झारच्या अरेरावी शक्तीच्या विरुद्ध निष्क्रिय व सक्रिय अशा स्थितींत उभें राहावें लागलें! पण झारनें आपल्या निरंकुश व घोरतर पाशाच्या जोरावर क्रूर उपायांनीं असंतोषाच्या त्या अराजकतेला पार दाबून टाकण्याचा प्रयत्न केला, तरी तो असंतोष न दबतां अधिकच बळावला. १९०५ मध्यें

## रशियांतील बोल्शेविझम् !

जेव्हां हजारों स्त्रीपुरुषें रशियाच्या झारच्या राजवाड्याकडे सुधारणेच्या कायद्याची मागणी करण्यासाठीं झुंडीच्या झुंड्या करून लोटू लागलीं व धरणें धरून बसलीं तेव्हां अत्याचारी झारनें फौजेला हुकूम देऊन एकदम मानवी कत्तलखाना सुरू केला ! विदेशीय राज्यछत्राखालीं असणाऱ्यांनाहीं जर हा प्रकार सहन होणें असंभवनीय आहे, तर सजातीय व स्वदेशीय राजसत्तेनें केलली ही विटंबना कोण सहन करील ? आधींच असंतोषाचा वडवाग्नि पेटला होता व त्यांत झारनें नरदेहाच्या आहुती देण्याचा सपाटा सुरू केला होता. वडवाग्नीचें रूप दिवसेंदिवस वाढत जाऊन अखेरीस जनतेनें आपल्या प्रबल वेगानें एके दिवशीं त्या वडवानलाच्या ज्वालानीं सर्व रशिक देश एकदम भडकवून सोडला !

एखादी मौल्यवान चीज ज्याप्रमाणें अगदी जपून ठेविली जाते तद्वत् रशियातले कायदे अगदी साधारण वस्तूप्रमाणें असतांही फार जपून त्यांचा उपयोग केला जात असे व मनगटाच्या कायद्यावरच बहुतेक राज्ययंत्रांची भिरकी फिरत असे. अधिकार चालवण्याचा जेव्हां प्रसंग येई तेव्हां तो विशेष प्रकारानें उपयोगांत आणिला जात असे व आज्ञा आणि कायदा यांची जोडी तदुपयोगांत योजिली जात असे. अशा तऱ्हेचे अस्थायी प्रबन्ध, खरें बोलायचें तर सैन्यविषयक कायद्यांचीच रूपांतरें असत यांत संशय नाहीं.

जे विशेष म्हणून कायदे केले गेले होते ते दोन तऱ्हाचे होते. ( १ ) राजशासनसंरक्षक कायदा व ( २ ) प्रसंगसंरक्षक कायदा.

## काण्ड पांचवें.

### राजसंरक्षक कायदा—

हे दोन्ही कायदे अंतरराष्ट्रीय मंड्याच्या द्वारें वजाविले जात असत. अंतरराष्ट्रीय मंड्याला मंत्रिमंडळापुढें प्रथम '**अमुक ठिकाणची स्थिति फार नाजुक झाली आहे आणि म्हणून अमुक कायद्याची अंमलबजावणी करणें जरूर आहे.**' असें सांगावें लागत असें. अशा कांहीं प्रसंगीं झारचीही संमती घ्यावी लागत असे.

राजसंरक्षक कायदा झारच्या संमतीनें जेव्हां कोठें लागू केला जात असे तेव्हां जिल्ह्याचे अधिकारी, गव्हर्नर व गव्हर्नर जनरल यांना असा अधिकार प्राप्त होत असे कीं, सरकारी हुकुमांचें उल्लंघन जर कोणी केलें तर त्याच्यापासून साडेसातशें रुबलांचा जातमुचलका व्यक्तिपाहून घ्यावा अथवा तीन महिने पर्यंतची साधी अथवा रुकमजुरीची शिक्षा द्यावी. याशिवाय आणखी असा अधिकार त्यांना दिला जात असे कीं, जर योग्य वाटेल तर, सार्वजनिक असो अथवा खाजगत असो कोणच्याही तऱ्हांच्या सभा भरविणें बंद करावें, व्यापार बंद पाडावा आणि कोणाही मनुष्याला अमुक ठिकाणीं जाण्याची अथवा येण्याची बंदी करावी.

लष्करी कायदा व हा कायदा यांत फारसें अंतर नव्हतें. अधिकारी वर्गानें प्रसंगीं केवढालेही जरी अत्याचार केले तरी ते सर्व कायदा या एका नांवाखालीं दडपून नेले जात असत व तो न्यायच मानला जाई.

### प्रसंगसंरक्षक कायदा—

मागील कायद्यापेक्षां या कायद्याच्या लाभानें अधिकारीवर्ग विशेष उन्मत्त बनून निरंकुश सत्तेचा उपयोग प्रजाजनांवर करीत असे.

त्यातल्यात्यांत पोलिसचें प्राबल्य या कायद्यानें फारच वाढे. अशा प्रसंगीं भरल्या जाणाऱ्या कांहीं खटल्याचे निवाडे सर्वसाधारण कोर्टांकडून काढून लष्करी कोर्टांत लष्करी कायद्यांप्रमाणें चालविले जाण्याचीही फर्मानें कधीं कधीं सुटत असत ! वर्तमानपत्रें व मासिकें याची छपाई बंद केली जाऊन त्यांची आवकजावक ही संपुष्टात आणली जात असे. शाळा व कॉलेजेंही एक महिनाभर हा कायदा बंद करूं शके अशा प्रकारचा हा विचित्र कायदा सर्व रशियांतल्या कोणच्याना कोणच्या तरी जिल्ह्या-वर वर्षांतून कांहीं काळ तरी आपली अंमलबजावणी करून आपल्या सजीवावस्थेची साक्ष पटवी ! यापेक्षां अधिकारी वर्गाच्या कठोर वर्तनाचें आणखी मोठें असें उदाहरण काय द्यावें ? रशियन राज्यकारभाराचें तंत्र असा इतिहास प्रगट करतें कीं, हा कायदा एकदां कां एका ठिकाणीं लागू केला म्हणजे मग तेथें अशांतीचें बीजही उरलें नसलें तरी महिनो-गणती तो आपला अंमल बेहोषपणानें सुरूच ठेवीत असे व प्रजापीडन हेंच आपलें कर्तव्य समजे ! इतकेंच नव्हे, तर स्वच्छंदी अधिकारी—जेथें या कायद्याची बिलकुल अवश्यकताही नाहीं अशा स्थळींही या काय-द्याला एखाद्या तमाशाप्रमाणें लागू करून आपली रक्तपातादी अन्यायाची हौस फेडून घेत असत !

**धार्मिक पराधीनता—**

कोणाचेंही धार्मिक स्वातंत्र्य छिनविलें जाणार नाहीं असें रशि-यांत जरी तोंडानें प्रपादिलें जात असे, तरी तेथें वास्तविक स्थिति तशी

नव्हती धार्मिक पराधीनतेच्या श्रृंखलांनीं प्रजा अगदीं जखडबंद करून टाकलेली होती. देशांतील जोग्यांचे मठ अराजक समजून नेहेमी उध्वस्त केले जात असत. इतकेंच नव्हे तर सार्वजनिक प्रार्थनामंदिरेंही अधिकाऱ्यांच्या लहरीनें बंद केलीं जात असत ! प्रधानमंत्री **स्टॉलियन**नें सेंट-पीटर्सबर्गमध्यें एक चर्च बांधण्याची आज्ञा दिली असता, अंतरराष्ट्रीय-मंत्री **मॅकलॉकॉव** यानें आपल्या अधिकारांत तें बांधून तयार झालेलें चर्च पाडवून टाकिलें. धार्मिक इमारती अधिकाऱ्यांच्या क्रूर दृष्टींतून कधीच सुटत नसत. रशियन सरकार जुन्या पुराण्या धर्ममताचे पोशिंदे असल्यामुळें केव्हां कोणी जर नवीन धर्मपंथाचा प्रसार करण्याची योजना केली तर तावडतोब बंदी केली जात असे. मुक्तीफौजेच्या सभासदांनांही रशियांत प्रवेश करण्याची बंदी असे. अशा तऱ्हेच्या अनावश्यक धर्म-बंधनांनीं रशियन प्रजा जखडली गेली होती. मानवी हृदय धर्माघातानें वायाळ होत असतें; ही कल्पनाही रशियन अधिकाऱ्यांच्या ध्यानीं मनीं नव्हती. अधिकारी वर्गाच्या या क्रूर कृत्यामुळें राजनैतिक क्षेत्रातही अस-न्तोषाचा प्रादुर्भाव झाला होता.

## नियतकालिकांचें पारतंत्र्य—

वास्तविक पाहिलें असता वर्तमानपत्रें, मासिकें वगैरेंनीं अल्पाव-धींत या जगांत विस्तृत स्वरूपाचा ज्ञानप्रकाश पाडला असून नवी जागृति उत्पन्न केली आहे. मागसलेल्या राष्ट्रांत सजीवन उत्पन्न करून त्याना सुधारणेच्या मार्गांत प्रगतीपर व्हायला लावणारीं वृत्तपत्रेंच आध

सुरु होत. अशा तऱ्हेच्या सच्छील वस्तूंशीं शत्रुत्व करणारें सरकार खरो-खरीच भाग्यहीन होय! अशीं सरकारें लवकरच लयाला जातात. कारण सर्वसाधारण जनतेपर्यंत पोंचविण्याचा संदेश जें पत्र करूं शकतें तें बंद पाडल्यावर त्याच्या ऐवजीं गुप्त संदेशांचा सरकारविरुद्ध सुळसुळाट सुरू होऊन गुप्त कटासारख्या गोष्टी त्यातून निपजत होतात व मग असा एक दिवस उजाडतो कीं, जनता प्रक्षुब्ध होऊन एकविचारानें सरकारी अधिकाराला एखाद्या मृत्तिकाघटाप्रमाणें चक्काचूर करून टाकते. रशियन सरकार पुराणमतवादी असल्यामुळें त्याला अशी भीति होती कीं, त्या राज्यांत जर नव्या मन्वंतराची लाट उसळली तर निरंकुशता कायम न राहतां, शासित व शास्ते यांच्यांत नेहमींचा विरोधी भाव असल्यामुळें भलतेंच अरिष्ट कोसळायचें. याचसाठीं आपली प्रजा नेहमीं अशिक्षित राहून गुलामाप्रमाणें तिच्याकडून आपले व्यवहार करून घेण्याची धडपड रशियन सरकार नेहमीं करीत असे!

इ. सन १९०५ च्या पूर्वीं रशियन नियतकालिकांची स्थिति अत्यन्त करुणास्पद होती! त्यांना सरकारी शासनपद्धतींत चकार शब्दही लिहिण्याची सक्त मनाई असे. जर कोणाकडून यत्किंचित कांहीं बरें वाईट लिहिलें गेलें तर ताबडतोब कडक शिक्षा दिली जाई. सर्व वृत्तपत्रांवर सेन्सॉरचा कडक पहारा असे. ते नेहमीं सर्व देशभर फिरत असत. ज्यावेळीं त्यांचा पहरा ज्या वृत्तपत्राच्या कारखान्यावर जाई त्यावेळीं त्या पत्रांतील मजकुराची कातरफाड होऊन तशा स्थितींतच तें सर्वत्र

वांटलें व विकलें जात असे. रशियन नियतकालिकांना बिलकुल स्वातंत्र्य नसल्यामुळेंच सेन्सॉरकडून त्याचें पूर्वनिरीक्षण होऊन तीं प्रसिद्ध केलीं जात असत इतका तो बंदोबस्त कडक होता.

यःकश्चित चूक अथवा क्षुल्लक अपराधाबद्दलही ७५० रूबलची दंड भरपाई वृत्तपत्राच्या मालकाकडून करून घेतली जाई! त्या बाबतींत सरकारला कोणाही तऱ्हेची क्षुल्लक गोष्ट अक्षम्य अपराधाची वाटे! प्रसंगरक्षक कायद्याखालीं हवें तें पत्र हवें तें तेव्हां जप्त केलें जात असे, बंद करण्यांत येई अथवा त्याचें प्रकाशन कांही काल थांबविण्याचा हुकूम होत असे!

या बाबतींत अधिकारीवर्गाची दृष्टी तेल घालून रात्रंदिवस पहारा करण्यांत अगदीं चूर झालेली असे. मोठमोठ्या शहरांतून उच्च-वर्गासाठीं प्रसिद्ध होणाऱ्या नियतकालिकांना या कायद्यापासून जरी स्वल्प त्रास होत असे, तरी अज्ञानी जनतेच्या सेवेस वाहिलेल्या प्रांतिक वृत्तपत्रांतील मजकूर अगदीं बारकाईनें सेन्सॉरकडून शोधला जाऊन त्यांच्या मालकांची ते एक प्रकारची शिकारच करीत असत. खेड्यापाड्यांतून हीं पत्रें विस्तार पावण्यानें आपल्या अधिकारावर गदा येण्याच्या संशयपिशाच्यानें सरकारला घेरलें असल्यामुळेंच त्यांनीं हा इतका कडक निर्बंध ठेविला होता.

या बाबतींत सरकारकडून कसकशा गोष्टी होत असत याचें उदाहरण हवें असल्यास तें त्यांच्या आंकड्यांसह एकाच महिन्याच्या अवधींत कसें घडून आलें होतें तें पुढें नमूद केलें आहे.

## रशियांतील बोल्शेविझम् !

( १ ) सहा संपादकांना कैदी करण्यांत आले.
( २ ) सहा संपादकांना कोर्टांत सजा सांगण्यांत आल्या होत्या.
( ३ ) सत्तावीस वृत्तपत्रें जप्त करण्यांत आलीं.
( ४ ) सहा हस्तपत्रकें जप्त केलीं.
( ५ ) तीन समाचार–पत्रें छापण्याची मनाई झाली.
( ६ ) बेचाळीस वर्तमान पत्रांवर खटले करण्यांत आले होते.

याप्रमाणें एका महिन्यांत सरकारला या वर्तमानपत्रांच्या बाबतींत कमींतकमी १९९२५ रुब्जलांची किफायत मिळाली. वर्तमानपत्रावर होणाऱ्या खटल्यांतून विष्पन्न होणाऱ्या रकमेची आदा जरी कमीशी दिसली तरी एका पत्रावर खटला झाला कीं, तें बंद पडलेंच म्हणून समजावें व दुसऱ्याचा जन्म लगेच झाला असें मनावें. अशा प्रकारची विकट परिस्थिति रशियन प्रजेला प्राप्त झाली होती. त्यातल्या त्यांत एक विशेष चमत्काराची अशी गोष्ट आणखी या परिस्थितीत घडून येत असे कीं, एखादा वृत्तपत्रकार सरकारनें कैद केल्यावर ती बातमी जर कोणी छापली व कैदी समजा की सोडण्यांत आला आणि ती बातमी तें वृतपत्र छापण्यास विसरलें तर त्या अपराधाबद्दल त्याच्या मालकाला ७५० रुब्जलांची दंडभरपाई करावी लागत असे !

**सार्वजनिक सभाबंदी—**

रशियात केव्हांही व कोणत्याही ठिकाणी कोणत्याही बाबतीतली सार्वजनिक सभा भरवायची असल्यास तिला स्थानिक अधिकाऱ्याचा हुकुम काढावा लागत असे. हुकुम घेतांना सभेचा उद्देश, कार्य-क्रमाचा विषय वगैरे गोष्टींची माहिती अधिकाऱ्याला समजावून द्यावी लागत असे. अशा स्थितीत् अधिकाऱ्याची जर लहर लागली तर बरें आणि फिरली कीं सभा भरणें बंद्. सभा भरविण्याचा जरी अधिकार मिळाला, तरी पोलीस अधिकाऱ्याची पुन्हा पायधरणी करावी लागत असे ती निराळीच. अशा वेळीं पोलीसच्या दूताची जर समजूत झाली की, ही सभा सरकारच्या विरुद्ध भाषणें करते आहे, तर तो जागच्या जागींच आपल्या अधिकारांत मोडून टाकण्यास ते कमी करीत नसे.

हें पोलिसच्या अधिकारातलें काम म्हणजे त्यांचा एक प्रकारचा मौजेचा खेळच होऊन बसलें होतें, यामुळें राष्ट्रीय जनतेचें फार नुकसान होत असे. इ. सन १९०९ पासून १९१४ पर्यंतच्या काळांत ही पोलीसशाही इतकी उन्मत्त व उच्छृंखळ झाली होती कीं, सार्वजनिक सभा हा एक शब्द मात्र काय तो जनतेच्या तोंडून ऐकण्यास अवशिष्ट राहिला होता! क्रौर्याची सीमा एथपर्यंत गेली होती कीं, कौन्सिलच्या सभासदांच्या निवडणुकी प्रीत्यर्थ भरणाऱ्या सभा ह्या हातांवरच्या बोटां इतक्यासुद्धां झालेल्या दृष्टीस पडत नसत. कॅन्सर्ट प्रोग्रामसुद्धां पोलीसाच्या हुकमावाचून केले जात नसत.

## रशियांतील बोल्शेव्हिजम् !

सभेच्या अधिवेशनास ज्याप्रमाणें अत्यंत कठीण अवस्था प्राप्त झाली होती त्याच प्रमाणें त्या पेक्षाही एक कडी वरच अशी स्थिति सार्वजनिक हितसंरक्षक अशी एखादी संस्था स्थापन करण्याच्या बाब-तींत झाली होती. याचा तात्पर्यार्थ असा कीं, रशियन अधिकारी वर्गानें—जनतेला बोलण्याची, ऐकण्याची, लिहिण्याची, वाचण्याची एकत्र जमण्याची, विचार करून वादविवाद करण्याची वगैरे गोष्टींची इतकी जखडबंदी केली होती व अन्यायपूर्वक आणि कठोर कायद्यांनीं जनतेवर आपला इतका निरंकुश अधिकार चालविला होता कीं, **स्वा-तंत्र्य** हा शब्द, शब्दकोशांत अस्तित्वांत रहाण्यास लाजूं लागला होता !

याप्रमाणें या प्रकरणांत रशियन प्रजेच्या असंतोषाचे मुख्य दोन मुद्दे होते. **ड्यूमाला** कोणच्याही स्वरूपाचे योग्य अधिकार दिले गेले नव्हते, हा एक मुद्दा व दुसरा लहान मोठ्या सर्व अधिकाऱ्यांनी नागरिक प्रजेचें स्वातंत्र्य आपल्या मुठींत ठेवून कायद्याच्या नांवाखर प्रजेला सर्व-बाजूंनी जखडबंद करून टाकली होती नागरिकत्वाचे हक्क द्यावचे होते पण ते कधींच देण्यात आले नाहींत व जुन्यापुराण्या राजशासनपद्धतीची कास सोडण्याचें व्रत पुराणमतवादी **झारशाहीनें** झुगारून दिलें नाहीं. यामुळें स्वातंत्र्य व सुधारणा यांच्या रस्त्यांत जो अधिकारी वर्गाचा व राजशासनाचा बांध पडला होता तो उलथून पाडण्यासाठी एकसमयावच्छेदेंकरूनच पुढें संपूर्ण जनतेच्या ऐक्यप्रक्षोभाची एकदम एक प्रचंड ऊर्मी उसळली व तिनें पहिल्याच धडाडीच्या धक्याबरोबर स्वेच्छाचारी आणि अत्याचारी **झारशाहीला** नामशेष करून टाकली.

---

# काण्ड सहावें.

## मजुरांचा असंतोष.

आपण स्वमतानें नेमलेल्या अधिकारी वर्गाच्या राजकीय वर्तनांत व आपल्या स्वतःच्या अधिकारांत प्रजाजनांपैकीं कोणीही कोणत्याही प्रकारची ढवळाढवळ करण्याची लालसा धरूं नये अशी जी झारची इच्छा तिचेंच अनुकरण त्याचा अधिकारीवर्ग नेहमी करीत असे हें येथवरच्या मागील इतिहासावरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. सरकारी व्यवहारावर टीका करण्याची इच्छा धरणारे व टीका करण्याचा प्रयत्न करणारे तद्वत सर्व राजद्रोही व क्रांतिकारक समजले जात. रशियन सरकार पुराण शासनप्रिय असल्यामुळें त्याच शासनपद्धतीचें संरक्षण करण्यासाठीं ज्या ज्या युक्त्या करणें त्यांना सयुक्तिक दिसे त्या त्या ते बलपूर्वक अमलांत आणीत. नवीन सुधारणेच्या मन्वंतरांतील चळवळीनें आपला देश बराच अंतस्थपणें व्यापला असल्याचा सुगावा झार व त्याच्या अधिकारी मंडळीला लागला असल्यामुळें त्यांनी गुप्त पोलीसांच्या खात्याचें एक चमत्कारिक जाळें निर्माण केलें होतें. जगांतल्या इतर कोणत्याही राष्ट्रांत रशियांतल्या इतके गुप्त पोलीस त्या वेळीं सांपडले नसते. त्या खात्याच्या मानानें त्याचा खर्चही अग-

हवन असल्यामुळें तो भागण्यासाठी—जेथें जराशी अशांती दिसेल अशा स्थळीं मुद्दामच राजद्रोह उत्पन्न करण्यांत येऊन त्या कामांतील लोकांकडून दंड व कर जबरदस्तीनें वसूल करण्यांत येई व तो सर्व पैका गुप्त पोलीसच्या खर्चखात्यांस जमा करण्यात येत असे. हे गुप्त पोलीस इतके हरामखोर होते की, ते स्वतःच अराजकतेची व्याख्यानें देणारे व्याख्याते बनून सर्वत्र संचार करीत असत व आपलें अनुयायित्व पत्करण्यासाठीं जनतेला प्रोत्साहन देऊन उत्साही करण्यात धन्यता मानीत असत. या लोकांनीं केव्हा केव्हां तर साधारण आपाआपसांतला विरोध व भांडणमारामाऱ्या यांना अराजकतेचें स्वरूप देऊन लोकांना झारच्या पुढें बंडखोर म्हणून खेंचून नेण्यासारख्या नीच गोष्टीही केल्याचें स्पष्ट दाखले आहेत. अशा स्थितींत रशियन भूमी निरपराधी व गरीब अशा शेंकडो रशियनांच्या रक्तानें माखली जात असे व दयामाया याचा दशदिशास लोप होत असे. हें सर्व रशियाच्या झारची सत्ता अढळ राखण्यासाठीच घडवून आणण्यात येत असे.

अखेरीस जेव्हां सर्व साधारण जनतेला या वरील गोष्टी घडून येण्याचें कारण—त्यांच्यात गुप्तपणें संचार करीत असलेले गुप्त पोलीस आहेत असें अढळून आलें व त्यावर सर्व साधारण असा आपला बचाव करून घेण्यास कांहीं साधन नाहीं अशाबद्दल जेव्हा त्यांची खात्री झाली तेव्हां स्वभावतःच प्रत्येक माणूस स्वतंत्रपणें आपला बचाव करून घेण्याच्या उद्योगास प्रवृत्त झाला यात आश्चर्य तें कसलें ? केव्हां व

## काण्ड सहावें.

कोणासंबंधानें ते गुप्त पोलीस लबाडीची खोटी बातमी सरकारात कळवून कोणावर केव्हा—हद्दपारीची, आजन्म कैदेची, काळ्यापाण्याची अथवा फाशीची सजा आणतील याचें ताळतंत्रच उरलें नव्हते. अशी स्थिति ज्या कोणच्या देशात उत्पन्न होते तेथें असंतोष कधींही दाबून टाकतां येणें कोणच्याही उपायानें शक्य नसतें. हीच गोष्ट रशियाची झाली. लोकांनीं आपली शिरकमलें हातावर घेऊन आपल्या बचावाचे उपाय मोठ्या तत्परतेनें आणि कठोरपणानें करण्याचे काम सुरू केले.

वर सांगितलेल्या गुप्त पोलिसांच्या विषमय कृतींनेच—उकरेनिया, पोलंड, कॉकेशस, बाल्टिक प्रांत व फिन्लंड यांमध्यें प्रथमत. असतोषाच्या बीजांना मुळें फुटली व तेथे क्रांतिकारक गोष्टींचा फैलाव झाला. नंतर हळूं हळूं भयंकर आणि गुप्त अशा राजक्रांतिकारकाचे कट स्थापित होऊन राजशकटास खडकांत गाडून टाकण्याचे उपाय योजण्याच्या युक्त्या अमलांत करून आणाऱ्या त्याच्या प्रयोगांची सुरूवात मोठ्या तत्परतेनें होऊं लागली.

अशा क्रांतिकारकात रशियन मजूरवर्गाचीही भर पडली. कारण तो वर्ग आपल्या मालकांच्या वर्तणुकीसंबंधानें असंतुष्ट झालेला होता. क्रांतिकारक पक्षाला जर मजूर वर्गाची जोड मिळाली नसती, तर आज रशियात बोल्शेव्हिकांनीं तेथील—गिरण्या, फयाक्टऱ्या, करखाने वगैरे ज्या गोष्टी राजकीय मालकीच्या करून टाकल्या आहेत त्या त्यांना कधींच करतां आल्या नसल्यास, मजूर वर्ग असंतोषी आहे असें पहातांच क्रांतिकारकांनी त्याला रशियन राज्यनीतीचें स्पष्ट चित्र आपल्या मार्गा-

क. क्र. १५५२

# रशियांतील बोल्शेव्हिजम् !

ज्ञान दाखवून आपल्या पक्षांत त्यांना सामील करून घेतलें. येथें सामा-जिक व आर्थिक तत्वावर जरी सध्यां क्रांतिकारकांचा प्रभाव पडलेला दिसतो आहे तरी क्रांतीचें आद्यकारण रशियन राजनीतींतली कटुता हेंच होय यांत संशय नाहीं.

झारच्या अत्याचारी व स्वैर कीं, जिला ताळतंत्र नाहीं—अशा राज-नीतीला त्याची प्रजा अत्यंत कंटाळून गेलेली होती. तिचें दुःख तिच्या पोटांत मावेनासें झालें होतें. युद्ध सुरू झाल्यामुळें देशांत दुष्काळ पडून अर्धं पोटीं ही राहण्याची सोय उरली नसल्यामुळें प्रजेचे अत्यंत हाल होत होते. युरोपांत त्यावेळीं युद्धामुळें सर्वत्र अदाधुंदी माजल्यामुळें मजूर वर्गाकडून हाडींबाहेर कष्ट करून घेतले जात असतांही त्यांना उपास-मार काढावी लागूं लागली होती.

रशियाच्या लोकवस्तींत शेंकडा पंच्यायशीं वस्ती शेतकऱ्यांची असून त्यांतीलच कांहीं लोक मजुरीवर आणि कांहीं लोक सैन्यांत आपली भरती करून घेऊन उदर निर्वाह करणारे आहेत. अशा या शेत-कऱ्यांच्याच दोन शाखा असल्यामुळें, झारच्या अत्याचारी राज्यकार-भाराला त्रस्त होऊन जिवावर उदार झालेले शेतकरी जेव्हां कंबरा बांधून झारशाही पालथी घालण्यास सज्ज झाले तेव्हां त्यांना त्यांच्या त्या दोन शाखा सहजींच अनायासें येऊन मिळाल्या यांत आश्चर्य तें कसलें ! शेतकऱ्यांच्या या दोन्ही शाखांनीं राज्यक्रांती करण्याच्या कामीं शेत-करी वर्गाला कोणच्या तऱ्हेची व कशी मदत केली हें वाचकांना पुढें वाचावयाला सांपडणार आहे.

## काण्ड सहावें.

### असंतोषाचें पहिलें कारण—

रशियांत मजूरवर्गानें राज्यक्रांतीच्या कामीं जें कृत्य केलें तसें पूर्वी कधीं केल्याचा इतिहास उपलब्ध नाहीं. मजुरवर्गांत असन्तोष पसरला असल्याकारणानेंच त्यांनीं क्रान्तीच्या प्रारंभींच आपल्या मालकांपासून गिरण्या, कारखाने वगैरेंचे ताबे हिसकावून घेऊन मालकास बंदींत ठेवले होते हें सांगणें नकोच.

रशिया जर्मनीशीं अव्याहत युद्ध करीत राहिल्यानें, शेतकरी वर्गाची सैन्यभरती झाल्यानें शेतकीच्या कामांत खंड पडला व त्यामुळें असंख्य प्राणहत्या होऊन रशियन जनता भुकेनें मरूं लागली! आगगाड्या सैन्याची वाहतुक करण्याच्या कामांत गुंतल्यामुळें एके ठिकाणची अन्नसामुग्री दुसऱ्या ठिकाणीं पोंचवण्याची मारामार होऊं लागली. यामुळें रशियाच्या राज्यकारभारासंबंधानें मजूर वर्गांत असन्तोष उत्पन्न झाला. हातावर काम करून पोट भरणाऱ्या लोकांत असन्तोष उत्पन्न होण्याचें हें एक राज्यकारभारांतील न्यूनतेचें कारण होय.

### असंतोषाचें दुसरें कारण—

युद्ध सुरू झाल्यामुळें अनेक कारखान्यांतील अनेक चतुर कारागीर लोक युद्धविषयक वस्तु तयार करण्याच्या कारखान्यांतून नौकऱ्या करण्यास नेले गेल्यामुळें साधारण फ्यॅक्टऱ्या, कारखाने वगैरे मजुरांचीं पोटें भरणारे धंदे बंद पडले व त्यायोगें मजूरवर्ग बेकार होऊन अन्ना-

वाचून भटकूं लागला. या स्थितीचीही असन्तोषांत भर पडली. गरीब लोक अशा तऱ्हेनें भुकेकंगाल झाल्यामुळें रशियन कायदे व राज्यशासन-पद्धति अनुपयुक्त ठरून सर्वत्र अशांतता जोरानें पसरूं लागली.

याप्रमाणें झारच्या निरंकुश शासनपद्धतीची व्यवहारिक क्रूरता, मजूरवर्गाच्या मनांत बिंबली गेल्यामुळें फारच थोड्या परिश्रमांच्या उद्योगानें क्रान्तिकारक लोकांना ते लोक सहजीं जाऊन मिळाले. हें असंतोषाचें दुसरें कारण होय.

## सैनिकांचा असंतोष—

शेतकरी वर्गांतूनच सैनिकांची भरती झालेली असल्यामुळें ते शेताचें काम करीत असतां त्यांना सरकारी अधिकाऱ्यांच्या अत्याचारांचा जो पूर्वी अनुभव मिळालेला होता त्यांतच आतां त्यापेक्षांही कडक अशा लष्करी कायद्याच्या पायबंदाचा जो अनुभव मिळूं लागला होता त्याची भर पडली होती लष्करी उच्चाधिकारी त्यांनां नेहमीं पायपोसांप्रमाणें वागवीत असत. कांहीं कामानिमित्त बड्या लष्करी अंमलदाराकडे जाण्याचा प्रसंग आला असतां, गुलामांप्रमाणें दूर उभें राहून मस्तकावर हात ( सलामी ) ठेवून किती वेळ तशाच खड्या स्थितींत उभें राहिलें तरी त्या अधिकाऱ्याचें त्या बिचाऱ्यांकडे लक्ष्यही जात नसे ! ते आपल्याच तोऱ्यांत गुंग असत. अशा तऱ्हेचे अनेक कडक कायदे असल्यामुळें लष्करी लोकांत असंतोष उत्पन्न झाला होता. हा असंतोष युद्धाच्यावेळीं आणखी दोन कारणांनीं अधिक वाढला गेला. एक लष्कर

भरतीची जबरदस्ती व दुसरें युद्धोपयोगी दारुगोळा वगैरे सामानाचा तुटवडा पडला असतांही युद्ध जारीनें सुरू ठेवून असंख्य प्राणहत्या विनाकारण घडवून आणण्याचें अप्रयोजन. अशीही आणखी दोन असंतोषाचीं अधिक कारणें होतीं.

रशियन सैनिक प्राणभयानें लढण्यास कच खाणारे जरी नव्हते तरी योग्य शिक्षणाच्या व योग्य शस्त्रास्त्राच्या अभावीं लढून जर्मनीसारख्या सुशिक्षित सैनिकांकडून जी दररोज असंख्य प्राणहत्या होत होती आणि जेथें पराक्रमी शत्रुपुढें विजयप्राप्ती होणें असंभवनीय आहे अशी खात्री झाली होती तेथें व्यर्थ लढत राहण्याची त्यांची खुषी नसणें, हें स्वाभिकच होतें! या गोष्टीचें ज्ञान त्याना पूर्वीच रूस्सो-जपानी युद्धांत प्राप्त झालेलें असल्यामुळें, युरोपियन महायुद्धांत जारीनें युद्ध करीत राहून रशियाला विजयप्राप्ति मिळणें अशक्य असल्याबद्दची त्यांना खात्री पटलेली होती. अशा प्रसंगीं व अशा स्थितीत झार आपल्या फक्त इभ्रतीसाठीं लाखों रशियनाचा बळी रणकुंडात प्रत्यही व्यर्थ देतो आहे या दृढ भावनेनें सैनिकांत असंतोषाचा प्रसार झपाट्यानें होत जाणें पूर्णपणें संभवनीय होतें व तसें झालेंही!

## अराजकतेचें केंद्रस्थान—

छांदिष्ट, लहरी, स्वेच्छाचारी, स्वार्थी, अनियंत्रित व अत्याचारी राज्यपद्धतींतून प्रजेंत जो असंतोष उत्पन्न होतो त्याच्यापासून अराजकता अथवा राजद्रोह जन्माला येऊन त्याची कडू फळें राजासकट

त्यांच्या अधिकारी वर्गाला कशी चालावी लागतात याचें विसाव्या शत-कांतील रशियाच्या झारशाहीचें उत्तम उदाहरण होय. अशान्तीतून अराजकता कशी उत्पन्न झाली हें मागें सांगितलेंच आहे. आतां अराजकांनीं पुढें काय केलें तें पाहूं. ज्या देशांत राजमंडळाकडून राजनीतीचें सीमोल्लंघन झाल्यामुळें पराकाष्ठेचे अत्याचार राजाधिकाऱ्यांकडून केले जातात अशा देशांतील निरंकुश सत्तेच्या अधिकारी मंडळीच्या सशस्त्र गराड्यांत राहूनही स्वातंत्र्यप्राप्त्यर्थ निःशस्त्र प्रजाजन कोण कोणच्या उपायांची योजना करू शकतात तें आतां पाहूं.

इ. सन १८६१ नंतर रशियांत अराजक संस्थांची मांडणी गुप्तपणें होऊं लागली होती. अशा संस्थांकडून समयविशेषीं जनतेच्या इच्छा व्यक्त करण्यासाठीं मोठाले धाडसाचे प्रयत्न करण्यांत जरी कसूर झाली नाहीं, तरी पण त्यांचा विरोधी पक्ष बलवान व ते कमजोर असल्यामुळे यावा तसा जय त्यांना कधींच आला नाहीं. तरी पण शास्त्याचे अत्याचार ज्या मानानें वाढत चालले होते त्याच मानानें अराजकांचें संख्याबळही वाढत होतें ! हें बळ वाढता वाढतां १९०५ मध्यें सर्व रशियाभर त्या अराजकतेचा प्रसार झाला. या बाबतींत एका अमेरिकन लेखकाचें असें म्हणणें आहे कीं, 'क्रांतीच्या पूर्वीं प्रजासत्ताक राज्यस्थापनेची रशियाच्या जनतेची इच्छा नव्हती. परिमित राज्यसत्ता असावी एवढीच तिची इच्छा होती.' पण हें त्याचें म्हणणें सत्याची कास धरून होतें असें आमच्यानें म्हणवत नाहीं. कांहीं असलें तरी ह्या अराजक संस्थां

## काण्ड सहावें.

रशिया देशाच्या प्रत्येक विशिष्ट भागांत मोठ्या गुप्तपणें व चातुर्यानें आपला व्यवहार चोखपणें करीत होत्या यांत मात्र संशय नाहीं. सध्यां ज्याला पेट्रोग्रॅड म्हणतात त्या राजधानीच्या पूर्वीच्या सेन्टपीटर्सबर्ग शहरींच खुद्द या संस्थेचा जो जोमदार कारभार गुप्तपणें सुरू होता त्याची गंधवार्ताही गुप्त पोलीसला लागली नाहीं. यावरून त्यांच्या कर्तबगारीची योग्य कल्पना वाचकांना होईलच. गुप्त पोलीसाना धाब्यावर बसवून या अराजक संस्थांनीं स्वदेशीय स्वजनांच्या स्वातंत्र्यासाठीं आपली शिरकमलें तळहातावर घेऊन जसे अचाट धाडसाचे प्रयत्न केले तसे आजपर्यंतच्या कोणच्याही देशांतील लोकांनीं केल्याचे ऐकिवांत किंवा इतिहासांत नाहींत! हजारों युवयुवतींनीं स्वातंत्र्यासाठीं आपल्या प्राणांचें बलिदान केलें, हजारोंनीं सैबेरियासारख्या दुष्ट मुलखांतील हद्दपारीच्या काळेपाण्याच्या शिक्षा सहन केल्या व हजारोंनीं द्वीपांतराच्या सजा आनंदानें स्वीकारल्या. १९०५ ते १९१४ या नऊ वर्षांत रशियांतील अराजकांचा वृक्ष फारच खोल गेलेल्या मुळांचा असा सर्व देशभर आपल्या पालवीची छाया पसरणारा दृढमूल बनला गेला. प्रारंभी **प्रिन्स क्युरो पॅट्किन व मॅडव्लॅडवेस्की** यांनीं आपले जीव तृणवत् मानून या कार्याची प्रगती केली व कांहीं प्रसंगीं मोठाल्या कडक शिक्षाही सहन केल्या. हीच गोष्ट समानवादी मांशिये **लेनिनचीही** अनेकदां झाली होती व **ट्रॉट्स्की** वगैरे जी वरील तिन्ही माणसांच्याच योग्यतेची इतर तदनुयायी माणसें त्यांनींही स्वदेशसेवेसारख्या पवित्र कार्यांतील जें राष्ट्रजागृतीचें उच्च काम तें करण्याचें आपलें ध्येय अखेरपर्यंत सोडलें नाहीं.

# रशियांतील बोल्शेव्हिजम् !

रशियन अराजकांचा इतिहास जरी अद्यापी विशेष स्पष्ट अस-कोणा विशद स्वरूपांत लिहिलेला नाहीं तरी त्या बाबतींत जी कांहीं माहिती प्रसिद्ध झाली आहे तीवरून—रशियन अराजकांचें ऐक्य फारच दृढमूल बनलें गेलें होतें असें म्हणायला हरकत दिसत नाहीं. त्या अराजकांच्या जितक्या वेगवेगळ्या ठिकाणीं संस्था स्थापन झाल्या होत्या त्या सर्वांची एकवाक्यता व सर्वैक्य असून त्यांचे मुख्य दोन उद्देश होते व त्या दोहोंचे सभासद निरनिराळे होते. एक क्रांतिकारक पुस्तकें व वृत्तपत्रें यांचा प्रसार करण्याच्या उद्देशाचे सभासद होते तर दुसऱ्या उद्देशाचे सभासद केवळ असंतोषाच्या वृत्तीला जेणें करून सर्व जनतेंत स्पष्ट स्वरूप प्राप्त होईल अशा तऱ्हेचीं व्याख्यानें देणारे सर्व देशभर फिरत होते. या दोहोंव्यतिरिक्त तिसरा एक पंथ तेथें निर्माण झाला होता. तो निरंकुश अधिकार चालवणाऱ्या अधिकाऱ्यांचे खून पाडण्यांत गढून गेला होता. अशा पंथाचे लोक आपलें जीवीत तृणवत् मानून देशहितार्थ खटपट करीत असल्यामुळें त्या निधड्या छातीच्या लोकांना बरेंच यश मिळालें. अशा लोकांनीं प्रधानमंत्र्यापासून तों थेट खालच्या पोलीस कॉन्स्टेबलापर्यंत जो तावडींत सांपडेल त्याला बॉम्बनें अथवा इतर हत्यारानीं ठार करण्याचा सपाटा सुरू केला ! त्यानीं **झार** व **युवराज** यांचेही प्राण घेण्याचा प्रयत्न करण्याची खटपट करण्यास माघार घेतली नाहीं !

रशियामध्यें अराजकता उत्पन्न होण्यास मुख्यत्वें तीन कारणें झालीं. (१) सार्वजनिक असन्तोष व राज्यशासन सुधारण्याची निराशा. (२) मोठ्या मोठ्या विद्वानांनींही रशियन राज्यकारभाराची परिस्थिति अवलोकन करून अराजकांना सर्वश्रेष्ठ मानण्यास आपली संमति देण्याची दिलेली कबुलि व (३) सर्व युरोपभर प्रजासत्ताक राज्यकारभाराची नौबत झडून राहिली असतां, आपल्या प्रजेला गुलामांच्या स्थितींतच खिचपत ठेवण्याची झारची उत्कट वासना—हीं तीन मुख्य कारणें होत. रशियात हें जें अराजकतेचें बंड प्रबळ होत चाललें होतें त्याला त्याच्या सभोंवारच्या देशांनीं स्वार्थासाठीं कां होईना पण—योग्य व आवश्यक अशी उत्तम मदत केली होती यांत तिळमात्र संशय नाहीं.

**क्रांति साहाय्यक कारण—**

क्रांतिकारक पक्ष आस्ते आस्तेच निर्माण होत असतो. त्याची रचना सपाट्यासरशीं तत्क्षणीं होत नसते. पुरी तयारी झाल्यावर मात्र मग तत्क्षणिक कारण तिचा स्फोट होण्यास पुरेसें होतें. तत्क्षणिक व निरंतरची अशीं दोन्हीं तऱ्हाचीं कारणें क्रांन्तीत संम्मीलित झालेलीं असतात. रशियाच्या जनतेनें सुमारें पन्नास वर्षें राज्यक्रांतीच्या रचनेंत आपले हात गुंतविले होते. घोर असंतोष व अत्याचारी कायदे यांच्या दुथडीवर मोठ्या खबीरपणानें क्रांतीच्या इमारतीची उभारणी झालेली होती.

या गोष्टीची अधिकारी मंडळाला चाहूल लागलेली होती व तें मंडळ कोठें कांहीं तटा भांडण होण्याच्या संधीची वाट पाहत बसलें होतें. अशी संधी मिळतांच सर्व देशभर एकदम लष्करी कायदा पुकारून क्रांतीकारकांचीं पाळें मुळें खणून काढण्याची त्यांनीं अगदीं जय्यत तयारी ठेविली होती. असें केलें असतां सार्वजनिक उत्साह व सहानुभूति यांचा नायनाट होईल व आपलें साम्राज्य अबाधित चालविण्यास आपणांस कशाचीच हरकत राहणार नाहीं अशी त्यांची समजूत होती !

आपलें काम जर आपण कच्च्या पायावर सुरू केलें, तर शत्रूचें फावेल व आपला सर्व नाश होईल या गोष्टीचें क्रांतिकारकांना पूर्ण ज्ञान झालेलें होतें आणि म्हणूनच तेही योग्य संधीचीच वाट पाहत राहिले होते. सर्व देश क्रांतिकारक बनण्याचा अवसर प्राप्त होण्याच्या प्रसंगापर्यंत खोळंबून राहणेंच त्याना त्यावेळीं त्यांच्या हिताचें व देशकल्याणाचें होतें. युद्ध जरी सुरू झालें होतें तरी त्याच्या प्रगतीनें क्रांतिकारकांचें फारसें साहाय्य केलें नाहीं दुसऱ्याच कांहीं कारणानीं क्रान्तीचा स्फोट झाला व तीं कारणें एकामागून एक अशीं रशियन जनतेपुढें आलीं.

वार्सा शहरांतील शाळा, कॉलेज्यांचे प्रोफेसर्स व विद्यार्थी यांनीं १९०५ मध्यें जी नागरिक क्रान्ती केली होती त्यावेळींच सर्व राज्यक्रान्तीचा स्फोट होण्याचा संभव होता, परंतु त्यावेळीं सरकारी अधिकारी मंडळानें मोठ्या क्रूर उपायांनीं यशःप्राप्ती करून घेतली व त्यामुळें झारनें राज्ययंत्र सुधारणेचा नवीन कायदा जनतेला देण्याचें नाका-

रिलें. त्यावेळीं एका रशियन अज्ञात पुरुषानें इंग्रजी **नॅशनल रिव्ह्यू** नामक पत्रात जो मजकूर प्रसिद्ध केला होता त्यांतलें तात्पर्य असें होतें कीं, **"रशियन जनता क्रान्तीच्या मार्गांत बरीच पुढें गेली असून तिचें असें दृश्य स्वरूप प्रगट करूं लागली आहे कीं, निरंकुश अशा रशियन राज्यकारभाराचा निर्वाण समय आतां अगदीं समीप येऊन ठेपला आहे. आतां कांहीं केलें तरी क्रान्ती टाळणें असंभवनीय आहे."**

यावरून हें स्पष्ट दिसतें कीं, रशियन जनता परिस्थिति सुधारण्याच्या खटपटींत न पडतां राज्यक्रान्तीच घडवून आणण्याच्या कामीं अत्यंत जोराची खटपट करून राहिली होती व त्याची तयारीही परिपक्क होऊन चुकली होती. याबद्दलची हकीगत तेव्हांच्या **हिंदुस्तान रिव्ह्यूच्या** अंकांत **मि. एन्. गुप्त** यांनीं प्रसिद्ध केली आहे ती वाचली असतां वाचकांच्या मनावर अधिक प्रकाश पडेल.

**मास्को** शहरांत त्यावेळीं डॉक्टर लोकांनीं एक सुधारणेचा कायदा मागण्यासाठीं कांग्रेस भरविण्याचें ठरविलें. अधिकारी लोकांनीं तावडतोब सभाबंदीचा हुकूम काढला पण तिकडे लक्ष न देतां या हुकुमाची यत्किंचितही पर्वा न करितां कांग्रेस भरवून कायदा मागण्याची सूचना पास करून घेण्यांत आली! खास राजधानींतील वकील बॅरिस्टरादि कायदेज्ञांनींही निर्भयपणें सभा भरवून सुधारणेच्या कायद्याच्या आवश्यकतेची जरूर प्रगट केली.

# रशियांतील बोल्शेव्हिजम् !

क्रान्तीचें सहाय्यक असें जरी हें युद्ध प्रथमतः होतें तरी त्याला दुसऱ्याही एका गोष्टीची जोड होती. कित्येक वर्षांपासून जर्मनीच्या गुप्त कारस्थानाचा प्रभाव पडत चालला होता. **झरीना** ही एक जर्मन राज-पुत्री असल्याकारणानें तीही आपल्याकडून जर्मनीच्या कल्याणार्थ खटपट करण्यांत गुप्तपणें झटत होती ! युद्धाच्या पूर्वीपासून रशियाची शक्ति क्षीण करण्याच्या बाबतींत **कैसरचे** सारखे प्रयत्न सुरूच होते ! त्यानें कांहीं मंत्र्यांना लांचाच्या मोठाल्या रकमा देऊन वश करून ठेविले होते. या सर्व गोष्टींचा परिणाम जनतेवर असा झाला कीं, रशियन नोकरशाही दिवसानुदिवस अधिक अत्याचारी होत गेली. युद्ध जेव्हां सुरू झालें त्यावेळीं रशियाची वास्तविक स्थिति युद्धाला तोंड देण्याच्या तयारीची नव्हती व तीच स्थिति लक्ष्यांत आणून जर्मनीनें युद्ध पुकारलें अस-ल्यामुळें रशियाची जी तिरपिट उडाली त्याच संधीचा **कैसरनें** फायदा घेतला. मित्रराष्ट्रांना सोडून जर्मनीशीं तह करण्याची सल्ला **झारला** देण्याची जर्मन पाताळयंत्रानें जी खटपट चालविली होती त्या खटपटीच्या वेळींच रशियन युद्धमंत्री **सुखोम्लिनोफ** यानें गॅलेशियाच्या युद्ध—क्षेत्राचे नकाशे **कैसरना** भारी रक्कम घेऊन विकत दिले.

अशा स्थितींत पूर्वीचा प्रधानमंत्री काढून टाकून ती जागा **झारनें स्टर्मरला** दिल्यामुळें तर **कैसरचें** अधिकच फावलें. **स्टर्मर** यानें मोठ्या चातुर्यानें जुन्या मंत्र्यांना राजीनामे द्यावयाला लावून त्यांच्या जागीं हलके हलके **झरीना**, झारचा उजवा हात होऊन बस-

लेला असा एक अशिक्षित **रासपुतीन*** नावाचा माणूस व अशींच आणखीं माणसें कीं जीं आंतून **कैसर**च्या पक्षाचीं होतीं, त्याच्या नेमणुका बेअकल **झार**कडून करविल्या. अंतरराष्ट्रीय प्रधान **प्रोटो-पोपाफ** हा मोठा धूर्त व कारस्थानी माणूस होता. **कैसर**ची इच्छा पूर्ण करण्यासाठीं यानें आपल्या बुद्धिबळानें प्रजेंत क्रांतिकारक असें एक पाताळयंत्र निर्माण केलें. तें यंत्र निर्माण केलेलें पाहून **झार**ला असें वाटलें कीं, युद्धकालांत प्रजेवर आपला दाब राहण्यासाठीं ही **प्रोटो-पोपाफ**नें योजिलेली युक्ति अगदीं सयुक्तिक आहे. अशा स्थितींत त्या उपायाचा उपयोग—**प्रोटोपोपाफ** जनतेंत क्रांतीकारकांचा फैलाव करण्याच्या बाबतींत करून घेत होता.

इ. सन १९१६ मध्यें भरलेल्या **ड्यूमा** सभेच्या एका बैठकींत प्रसिद्ध देशभक्त वीर **मिलियोकोफ** यानें जर्मनीच्या पाताळ यंत्रावर सश्राव्य आणि महत्वपूर्ण असें जोरदार भाषण केलें होतें. त्यावेळीं **झार** बराच शुद्धीवर आल्यासारखा जरी दिसला, तरी तो फारच लवकर पुन्हा बेशुद्धावस्थेंत दुर्दैवानें निमग्न झाला.

प्रधानमंत्री **स्टर्मर**ला पदभ्रष्ट करून त्याच्या जागीं **ट्रिपॉफ**ची नेमणूक झाल्यानें जनतेला आनंद होऊन आतां आपल्याला बरे दिवस खास येणार अशी तिची समजूत होते आहे नाहीं तोंच जर्मनीच्या

---

* **रशियाचा राहू** हें आमचें ऐतिहासिक चरित्र वाचा.

# रशियांतील बोल्शेव्हिजम् !

घातकयंत्रानें आपली अंमलबजावणी पुरी केल्यामुळें **ट्रीपॉफची** बड तर्फी झाली व त्याच्या जागीं **गुलिस्टनची** स्थापना झालेली पाहून त्याच एका कारणामुळें **रशियन** जनतेचा क्षोभ सीमेच्या बाहेर गेला. यातली महत्वाची गोष्ट इतकीच होती कीं, **प्रो॰ प्रोपॉपाफच्या** अकले-पुढें कोणच्याही प्रधानमंत्र्याची बुद्धि त्यावेळीं राजकारणांत काम करूं शकत नव्हती. तो मध्येंच जनतेच्या दंग्याधोप्याच्या भीतीनें **झारला** त्रस्त करून सोडी तर मध्येंच जनतेच्या क्षोभानें सरहद्दीवरील सैन्याला युद्धजय मिळण्याच्या सशयितपणानें त्याला व्याकुळ करी आणि क्रांतीच्या स्फोट होण्याच्या चिन्हांचें प्रदर्शन त्याच्यापुढें मांडी. अशा स्थितींतच तो **रशियन** राज्यकारभारांत अनेक भानगडी मोठ्या युक्तीनें उत्पन्न करी. देशांत सर्वत्र अशांतता माजली असल्याकारणानें रणक्षेत्रांत युद्धोपयोगी दारूगोळा वगैरे सामान धाडण्याची खटपट केली असतां मध्येंच लूटफाट होण्याच्या भीतीचें ढोंग दाखवून त्यानें राजधानीच्या जवळच शस्त्रास्त्राचा साठा मोठ्या बंदोबस्तानें करून ठेवला होता. त्यामुळें लढवय्यापाशीं लढाऊ सामानाची रणक्षेत्रावर तूट पडली. रणक्षे-त्रावर रशियन सैनिकांना एकामागून एक पराजय मिळून त्यांनी एक-सारखी पीछेहाट चालवली होती; तरी त्यांना लढाऊ सामान कां मिळत नाहीं याचें कारण समजत नव्हतें. रशियानें युद्ध सुरू करण्यापूर्वी अन्न-सामुग्रीचा फार मोठा सांठा करून ठेवला असताही रशियन जनता भुकेनें व्याकुळ झालेली पाहून तिच्या पोटाची त्यानें कांहींच व्यवस्था नकरतां

# काण्ड सहावें.

धान्याची जी कोठारें भरून ठेवली होतीं त्यांतल्या कांहीं गाड्या भरून बाजारांत सुकर भावानें विक्रीकरतां धाडण्यासाठीं बाजारपेठेंतून उगीच फिरवून आणण्याच्या नाटकाची तालीम रोज सुरू ठेविली होती! विक्री मुळींच केली जात नसे व गाड्या परत स्वस्थळीं येऊन नेमक्या वेळीं थडकत! अशा प्रकारें गरीब लोकांना पोटाला खायला न देण्यानें त्यांचा क्षोभ वाढवून क्रांतीला उत्तेजन देण्याचें कार्य तो मोठ्या चातुर्यानें करून राहिला होता व त्यांत त्याला अखेरीस जयप्राप्तीही झाली.

रशियन राज्यक्रांती होण्यास आधि—एक ड्यूक व एक लष्करी अधिकारी या दोघांकडून **रासपुतीन** हा ठार मारविण्यांत आलें व त्याचा सूड म्हणून झारनें आपल्या प्रजेवर अत्यन्त अमानुषीय अत्याचार केले. भुकेच्या तापानें क्षुब्ध झालेली जनता उसळून जाऊन तिनें प्रथम एका घराच्या खिडकीवर हल्ला करून ती मोडली व आपला आंत प्रवेश करून घेतला. एक दार मोडून पडलें, दुसरें मोडलें, तिसऱ्याची तीच अवस्था झाली! याप्रमाणें जो पहिली खिडकी मोडण्याचा दंगा सुरू होऊन अनेक घरें त्यांत भग पावलीं त्यांतच ह्या जनतेच्या पराधीनतेच्याही भगाची सुरुवात झाली व शेवटीं स्वातंत्र्याचा ध्वज त्यांच्या हातीं त्यामुळेंच आला!

# काण्ड सातवें.

## रशियाचा झार निकोलस.

झार निकोलसची हकीकत देण्याच्या आगोदर येथें एक इ. सन १८८१ मध्यें घडलेला प्रकार सांगणें आवश्य आहे. १८८१ पासून १९०६ पर्यंतच्या पचवीस वर्षांच्या काळात **निहिलिस्ट** म्हणजे अराजकांनीं जें कार्य राशियांत केलें तें इतिहासात प्रविष्ट होणें इष्ट असल्यामुळें त्यांचा इतिहास थोडक्यात देतो.

इ. सन १८८० मध्य **निहिलिस्टांच्या** कार्याची लाट फारच उन्नतावस्थेंत जाऊन पोचर्ली होती. राज्यसुधारणांचा कायदा मागण्याच्या कामीं सर्व देश एकमतानें कण्ठरव करून राहिला होता, तरी ही गोष्ट त्यावेळीं अशिक्षित वर्गापेक्षां सुशिक्षिताताच जोरानें वावरत होती. अशा स्थितींत रशियन सरकारनें प्रजेची ही मागणी फेटाळून देण्याच्या कामी क्रूर साधनांचा उपयोग केला तशीं साधनें जगात कोणच्याही देशांत पूर्वीं कधींच उपयोगात आणल्याचा इतिहास वाचायला व ऐकायला सांपडत नाहीं. त्या प्रसंगीं आत्याचारांना सीमाच उरली नव्हती! हिजारों लोक पकडून न्यायान्याय न पाहतां तुरुगांत टाकण्यात आले, शेंकडों फांसांवरून लटकले गेले व कित्येकांना पाण्यांत बुडवून

ठार मारण्यात आल्यावर त आपोआप बुडून मेल्याच्या अफवा प्रसिद्ध करण्यात आल्या ! त्या अत्याचाराच्या कहाण्या सर्व युरोपभर त्या वेळीं मोठ्या मनोरंजक भाषेंत सांगितल्या जाऊन छापल्या व लिहील्या जात होत्या, पण इकडे राशियात मानवी देहांतील रक्तमांसाच्या गाऱ्यांत देशभक्ताच्या हाडांच्या विटा रचून त्यावर राष्ट्रभुवनाची इमारत रचली जात होती ! दुसरा **अलेक्झँडर** यानें आपल्या उत्तर कारकीर्दींत राज्यसुधारणेच्या कायद्याची जरी थोडीशी प्रस्तावना केली होती, तरी ती बरीच उशीरा झाल्यामुळें अधिकारी मंडळींनीं जे अत्याचार केले त्याचें प्रायश्चित्त प्रजेकडून त्याला भोगावें लागलें. **निहिलिस्टांनीं** त्याचा व त्याच्या राणीचा खून करून अत्याचारांचा सूड उगविला.

त्याच्या नंतर तिसरा **अलेक्झँडर** सिंहासनाधीश झाला. त्याच्या कारकीर्दींत **निहिलिस्टांचें** कार्य मोठ्या त्वेषानें सर्वत्र बघण्यांत येऊं लागलें व अनेक स्थळीं त्याचा निःपात करण्याचे उपाय योजण्यांत आले, पण वास्तविक गोष्ट अशी होती की, जनता अद्यापि क्रांती करण्याच्या लायकीची तयार झालेली नव्हती. सुधारणा मागणें जरी अत्यावश्यक होतें तरी राजहत्या व प्रजासत्ताक राज्याची स्थापना यांच्याकडे जनतेचें फारसें लक्ष्य नव्हतें. तिसऱ्या **अलेक्झँडर**च्या कारकीर्दींत दडपशाही व अत्याचार या गोष्टी कळसास जाऊन पोंचल्या होत्या व सर्व देशभर एक प्रकारच्या निराशेची छाया पसरलेली होती. अशा त्या काळीं **निहिलिस्ट** लोकांनीं आपल्या अंगीकृत कार्याचा त्याग

केलेला होता. सुशिक्षित अशा हजारों स्त्रीपुरुषानीं व विद्यार्थ्यांनी आपले जीव धोक्यांत पडण्याची फिकीर न बाळगता अंगीकृत कार्यारंभ मोठ्या उमेदीनें व उत्साहानें सुरू केला. डिबेटिंग क्लब्ज् स्थापिले गेले, पुस्तकें प्रकाशित झाली व वृत्तपत्रें जन्मास आली. अनेक फिरते व्याख्याते व्याख्यानें देत सचार करू लागून. त्यांनीं रशियन जनतेची मनें क्रांतिकारक बनविलीं. त्याचें फळ असें निश्चय झालें की १८९४ मध्यें तिसऱ्या अलेक्झँडरला पदच्युत व्हावें लागलें. त्याच्या मागून त्याच्या गादीवर रशियाचा अखेरचा झार निकोलस आपल्या वयाच्या सव्वीसाव्या वर्षी बसला. त्या निकोलस बादशाहाच्या मदतीनें आपण राज्यघटनेची सुव्यवस्था करूं अशी प्रजेला फार उमेद होती याचें कारण तो सर्व युरोपखंड फिरून तेथील राज्यव्यवस्थाचें सूक्ष्म निरक्षिण करून आलेला असून त्यानें हिंदुस्थानचीही राज्यपद्धती आपल्या प्रवासात अवलोकन केलेली होती. शिवाय तो ऐन तारुण्यात असल्यामुळें नव्या मन्वतराचें स्वरूप लक्षात आणून राज्यव्यवस्थेची नव्या सुधारणेच्या पायावर इमारत उभारील अशी जनतेला पुष्कळ खात्री होती, परतु ती त्याचा अशा निराशेच्या अभ्रपटलांत लुप्त झाली ! तो जव्हां प्रांतिक 'जेम्स्टोव्ह' म्हणजे पंचायतीला भेट धावयास प्रथमच राज्यावर बसल्यावर गेला तेव्हां त्यानें त्या पंचायतीला आपली भेट म्हणून एक अभिवचनपत्रक अर्पण केलें व उत्तरादाखल तो आपल्या पूर्वपरंपरेला अनुसरून पुढील प्रमाणें बोलला:—

## काण्ड सातवें.

"मी आपणां सर्वांना असें विदित करतों कीं, मी यथाशक्ति प्रजेचें कल्याण करण्याचा प्रयत्न करण्यांत कसूर करणार नाहीं व त्याबरोबरच सर्व राजकीय शक्ति मी आपल्या हातांतच ठेवीन." झालें. हे शब्द ऐकतांच अधिकारी वर्गाची कर्तबगारी पुन्हां पूर्ववत् संचारूं लागली. प्रेस ॲक्ट बराच कडक झाला; सेन्सॉरशिपचें बंधन कडक झालें व शाळा आणि कॉलेजें यातील मास्तर व प्रोफेसर यांस त्यांच्या छात्रवर्गासह राजकीय गोष्टींचा वादविवाद करण्याची बंदी करण्यांत आली. शेंकडों पुस्तकें सरकारजमा करण्यांत आलीं. नवीं पुस्तकें व वर्तमानपत्रें यांच्या प्रसिद्धी करणारास आळा घालण्यात आला. हर्बर्ट स्पेन्सर सारख्याचीं पुस्तकें देशांत येऊं देण्याची बंदी झाली. राजकीय गुन्ह्याचे हजारों खटले स्पेशल कोर्टांत चालविले जाऊन अनेकांना हद्दपारीच्या व सैबेरियांतील काळ्या पाण्याच्या शिक्षा ठोठावण्यांत आल्या! अशा प्रकारें पूर्वपरिचित अशा झारशाहीच्या अमलाच्या नव्या कारवाईचा पुन्हां एकवार डंका वाजूं लागला! झारनें फिन्लंडशीं जें अमानुषी कृत्य केलें त्याची सर्व जमाकडून निंदा होऊं लागली.

अशा तऱ्हेच्या झारशाहीच्या अत्याचारांनीं प्रजेंतील असंतोष दबला न जातां आगींत तेल ओतल्याप्रमाणें तो अधिक जोरानें भडकूं लागून त्याच्या ज्वाला अशा उठूं लागल्या कीं, लहानापासून थोरापर्यंत सर्व जनता प्रकोपित झाली आणि रशियाच्या राज्याची इमारत त्यामुळें उलथून कोसळण्याचा प्रसंग प्राप्त झाला!

# रशियांतील बोल्शेव्हिझम् !

सर्वसाधारण सत्ताधार्‍यांनी मजूरवर्गाची मनें आपणांकडे उघड उघड उपायांनीं आकर्षून घेतलीं. उदार मतवादी लोक व अनुदार मतवादी लोकही आपापसांत सुधारणा करूं लागले. याप्रमाणें रशियाच्या नूतन राज्यघटनेंत नवजीवनाची महत्वपूर्ण जागृति होऊन रशिया नवयुगांत शिरूं लागला.

रुसो जपानी युद्धामुळें अराजकतेची एक नवीनच लाट येऊन थडकली. कोरिया व मॅन्चूरिया या देशांत जपानचेंच राज्य असावें असें जनता उघड उघड बोलू लागली.

जगप्रसिद्ध तत्ववेत्ता **कौन्ट टॉलस्टॉय** यानेंही झारला अनावृत्त पत्रें लिहून या सर्व गोष्टींची त्याच्या मनांत जागृति उत्पन्न करण्याचे प्रयत्न जरी केले तरी ते सर्व निष्फल झाले. या जगांत असहकारिता व निःशस्त्रप्रतिकार यांच्या ज्या चळवळी जेथें जेथें दिसून येत आहेत त्यांचा आद्यजनक हाच **कौन्ट टॉलस्टॉय** होता. युरोपांतील सर्वसाधारण सत्तावादी याला फारच श्रेष्ठ मानतात. यानें जीं तत्वें जगापुढें मांडलीं त्यांतूनच सध्यांच्या **बोल्शेव्हिझमचा** जन्म झालेला आहे ! युद्धांत रशियाचा पराजय झाल्यामुळें राज्यघटना सुधारणावाद्यांना संतोष वाटला. त्यावेळच्या दडपशाहीचा जो मुख्य आधारस्तंभ झारचा अर्थसचिव **व्हॉन प्लीव्ह** म्हणून होता त्याला बॉम्बनें १९०४ मध्यें ठार करण्यांत आलें.

# काण्ड सातवें.

क्रांतिकारकांचें असें म्हणणें होतें कीं, 'जोंपर्यंत या देशांतील निरंकुश राजसत्ता आम्हांला आमच्या नैसर्गिक स्वातंत्र्यांत—बोलूं, बसूं, उठूं, निजूं, व आमचीं कार्यें करूं देण्याचे हक्क देणार नाहीं तोंपर्यंत त्या अत्याचारी निरंकुश सत्तेची क्रांति घडवून आणण्याचे आम्ही अनेक उपाय करून तिला नेस्तनाबूद करण्याचा प्रयत्न करणें हा आमचा जन्मसिद्ध हक्कच आहे.' निहिलिस्ट लोकांनीं नव्या पद्धतीचें अंगीकृत कार्य याच सिद्धांतावर पार पाडण्याचे पराकाष्ठेचे प्रयत्न सुरू केले होते व सर्व देशांतील मोठमोठ्या शक्ति त्यांना साह्य करीत होत्या.

इ. सन १९०५ सालीं झार जरासा बंगलेला दिसला. त्यानें पंचायतीच्या मागणीप्रमाणें सुधारणेचा कायदा तिला बहाल केला व प्रेस ऍक्ट आणि वर्तमानपत्रें यांचीं बंधनें जरी शिथिल केलीं तरी त्यावेळीं दुसरीच एक चमत्कारिक गोष्ट घडून आली. रुस्सोजपानी युद्धांत दगलबाज लष्करी अधिकाऱ्यांनीं कोट्यावधि रुपयांचा चुराडा उडविल्यामुळे सरकारी खजीना रिकामा पडून देशांतील सामान्य जनता भुकेनें मरूं लागली होती. अशा प्रसंगी कोणच्याना कोणच्या तरी उपायांनीं गरीब निराश्रितांचे प्राण वाचविण्याचा अटोकाट प्रयत्न करणें हें अधिकारीवर्गाचें कर्तव्यकर्म असतांही त्यांनीं तिकडे मुळींच लक्ष्य दिलें नाहीं व त्यामुळें प्रजा हैराण व बेजार झाली. तशा स्थितींत प्रजेची

# रशियांतील बोल्शेव्हिझम् !

हैराणगत नष्ट करण्यासाठीं जनतेच्या धुरीणांनीं एकमतानें एक विनंतीपत्र लिहून तें झारला देण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें विनंतीपत्र तयार करून तें त्यानीं ता. २२ जानेवारी १९०५ रोजीं झारला देण्यासाठीं त्याच्या वाड्याकडे गमन केलें. विनंतीपत्राचा निर्णय काय होतो तो ऐकण्या-साठीं लाखों स्त्रीपुरुषें राजवाड्याच्या सभोंवारच्या मैदानीं पटांगणांत गोळा झाली होतीं. ती स्थिति पाहून झारचा संताप अनावर झाला व त्यानें आपल्या खास लष्कराला हुकूम देऊन त्या जमलेल्या स्त्रीपुरुषां-पैकीं हजारों लोकांची कत्तल करवून पेट्रोग्रॉडमधील आपल्या राज-वाड्याच्या सभोंवारचें मैदान स्वजनहत्येच्या रक्तानें लालभडक करून सोडलें ! ख्रिश्चन लोकानीं रविवार हा शुभ दिन मानिलेला असतांही झारनें त्याची पर्वा न करितां त्याला अशा तऱ्हेच्या रक्तांजुलीनीं अपवित्र करून टाकला. त्या रविवारीं दोनप्रहरीं ती प्रजेची निष्कारण कत्तल करण्यांत आली म्हणून त्या दिवसाची अखंड स्मृति राहण्यासाठीं त्या दिवसापासून तो रविवारचा दिवस '**रेड सन्डे**' म्हणजे '**रक्त रवि-वार**' अथवा '**लाल रविवार**' या नांवानें प्रसिद्ध झाला आहे. पेट्रोग्रॉडमध्यें ही जी हजारों गोरगरीबांची कत्तल झाली तिच्यामुळें तेथील सुशिक्षितवर्ग अत्यंत क्षुब्ध झाला व त्यानें त्या बाबतींत अकां-ण्डतांडव करण्याची फार जोरानें सुरवात केली. त्या सुशिक्षित जनतेनें आपल्या देशबांधवासाठीं पुढील प्रमाणें एक आज्ञापत्र तावडतोब प्रसिद्ध करण्यांत आलेः—

## काण्ड सातवें.

"रशियाच्या सर्व साधारण जनतेनें आतां इतउत्तर हें पक्कें लक्षांत ठेवावें कीं, रशियन सरकारनें आपल्याच प्रजेशीं युद्ध पुकारिलें आहे यांत आतां संदेह मानण्याचें कारण नाहीं. जे सरकार निःशस्त्र प्रजेशीं संभाषणही न करतां तिची बेगुमानपणानें व निर्दयतेनें विनाकारण कत्तल करण्यास उद्युक्त होतें अशा सरकारला धिःकार असो! या हस्तपत्रकाच्या द्वारें समस्त रशियन प्रजेला मोरग-रीबांच्या साह्यार्थ निमंत्रण करण्यांत येतें आहे. सर्व-साधारण ध्येय नजरेपुढें ठेवून आतां युद्धारंभ करण्यांत येतो आहे. या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या युद्धांत सामील न होतां जे अन्यायी सरकाराशीं लांगूलचालन करीत राहतील त्यांना धिःकारपूर्वक देशद्रोही गणले जातील असें खात्रीनें समजावें."

या हस्तपत्रकाचा परिणाम अत्यंत कटुतर झाला. अनेक प्रसिद्ध लेखक व राजनीतिनिपुण लोक कैद केले गेले, त्यांना अघोर शिक्षा फर्माविण्यांत आल्या व झारशाहीच्या अत्याचारांची बेहद झाली. या सर्व कृत्यांचा परिणाम जनतेवर चांगल्याच प्रकारचा घडून आला. लोक निधड्या छातीचे बनून त्यांनीं सर्व युरोपभर राजनीतीच्या तत्वाची मागणी केली व झारशाहीच्या अत्याचारांचें उच्चाटन करण्याच्या आकांक्षाचा त्यांनीं सर्वत्र मोठ्या जोरानें प्रसार करून देशभक्तांनीं आपल्या प्राणांचा मोह सोडला!

# रशियांतील बोल्शेव्हिझम् !

अखेरीस १९०५ च्या ऑगस्टांत झारनें कांहीं विचार करून सुधारणांचें वचन दिलें व ड्यूमासभा भरविली. त्या सभेंत समस्त रशियन जातीच्या संघाचे प्रतिनिधि बोलावण्यात येऊन त्यास जनतेची व्यवस्था करण्याचे अधिकार देण्यांत जरी आले, तरी त्या अधिकारांची योग्य बजावणी करण्याची सूत्रें सरकारी बड्या अधिकाऱ्यांच्याच हातांत ठेवीली गेली असल्यामुळें सर्वत्र असंतोषाचें साम्राज्य पसरून मजूरवर्गानें कोणचेही काम करण्याचें साफ नाकारलें ! मजूर वर्ग, प्रोफेसर्स, शाळामास्तर, डॉक्टरांचें संघ व रेल्वे नोकर यांचें एकदम संप होऊन व्यापार बंद पडला. शेवटीं ड्यूमा सभा बोलावली जाऊन असें प्रसिद्ध करण्यांत आलें कीं, '**सभाबंदी, प्रेस ॲक्ट वगैरे सर्व कायद्यांची अंमलबजावणी बंद करण्यांत आली असून, प्रजाप्रतिनिधींच्या सम्मतीवांचून यापुढें कोणचाही कायदा केला जाणार नाहीं.**'

यानंतर झारनें तीन वेळां ड्यूमा बोलावली व तिन्ही वेळां ती मोडून टाकली. १९१६ मध्यें झारच्या कांहीं मंत्र्यांनीं वरून चांगल्या दिसणाऱ्या जर्मनीच्या भपकेबाज पाताळ यंत्राला भुलून जाऊन प्रजेंत असंतोषाच्या बीजाची पेरणी कशी केली तें वाचकांनीं मागें वाचलेंच आहे, यास्तव त्याबद्दल आतां पुन्हां येथें अधिक विस्तार करण्याचें कारण नाहीं.

# काण्ड सातवें.

युद्धारंभापासून राज्यक्रांती होण्यापर्यंतच्या अवधींत **रशियन** राज्यघटनेंत चार पांच प्रकारचें बदल झाले. एकामागून एक असे निरनिराळे प्रधान मंत्री नेमले गेले. **स्टर्मर** व **गुलिस्टन** यांनी जर्मनीला फितूर होऊन काय काय करस्थानें केली व युद्धमंत्र्यानें **ग्यॉलीशियाच्या** रणक्षेत्राचे नकाशे **कैसरला** विकून रशियाच्या पदरांत कसा पराजय टाकला यांची माहिती मागें दिलीच आहे. **मॉ. प्रॉटोपॉपॉफनें** अन्नधान्याचा मुद्दाम तुटवडा पाडून रशियन सरकारला कसें पेंचांत पाडलें व त्याचा परिणाम राजसत्तेवर कसा घडवून आणला यांची माहिती वाचकांस आतां या पुढें वाचायला सांपडेल.

# काण्ड आठवें.

## रशियांतील राज्यक्रांतीचा प्रारंभ.

गुरुवार ता. ८ मार्च सन १९१७ चा दिवस उजाडला. अशा पवित्र तिथी आशंकांच्या काळ्याकुट्ट मेघडंबरांत कशा छापून बसलेल्या असतात व स्वातंत्र्य रवीचा उज्ज्वल प्रकाश केव्हां व कसा त्या पाडू शकतात याचें नक्की ज्ञान मानवी ज्ञातीस त्या दिवसाच्या पवित्र प्रकाशकिरणांच्या मूर्त स्वरूपांचें दृश्य दृष्टीस पडल्यानंतरच होत असतें! स्वयं प्रकाशित होणाऱ्या पवित्र अशा स्वातंत्र्यरवीनें आज-पर्यंत पारतन्त्र्यातिमिराचा पुरा नाश केलेला आहे. जगांतील कोणचेंही राष्ट्र अथवा कोणचीही मानवी जात केव्हां ही दुसऱ्या राष्ट्राच्या, जातीच्या अथवा व्यक्तीच्या हातीं चिरकाल राहण्यासाठीं म्हणून कधींच विकलीं जात नसून त्यांची ती पराधीनता केव्हां ना केव्हां तरी पराक्रमी हातांकडून नष्ट केली जाते यांत संशय नाहीं. याच न्यायानें रशियन जनतेच्या पारतंत्र्याच्या शृंखला तटातट तुटण्याचा महाका-लदिन आतां प्राप्त झाला होता!

भुकेनें ग्रस्त झालेली जनता जिवावर उदार होऊन अन्नासाठीं लुटालूट करूं लागली. दुकानें लुटलीं गेलीं. पोटांत अन्न नसल्यामुळें

## काण्ड आठवें.

कामकरी कामावर जाण्याचें थांबले. गिरण्या, फ्यॉक्टऱ्या, कारखाने वगैरे सर्व गोष्टींचे व्यवहार बंद पडून सर्वत्र एकच हाहाकार उडून गेला! असंतोषाचें साम्राज्य विद्युल्लतागतीनें देशांत पसरूं लागलें. प्रजापक्षीय 'वॉर्स गॅझेट' व रस्याक वोल्या' हीं वर्तमानपत्रें बंद पडली! प्रसिद्ध देशभक्त **मिल्युकॅप** यानें आपल्या 'रेच नामक वर्तमान पत्राचें प्रकाशन तशा ही आणीबाणीच्या वेळीं पांच चार दिवस सुरू ठेविलें होतें. त्यानें त्यावेळच्या स्थितीसंबंधानें जें एक स्फुट आपल्या वृत्तपत्रांत प्रसिद्ध केलें होतें तें येणें प्रमाणें:—

**" ... ... ... सर्व देशबांधवांचें या वेळीं ऐक्य झालें पाहिजे. सर्वांनीं या वेळीं हें लक्षांत बाळगलें पाहिजे. कीं, सध्यांच्या अति नाजुकप्रसंगीं जनतेच्या दुःखी स्थितीला दहपार करण्याचे प्रत्येक उपाय अमलांत आणणेंच आतां इष्ट आहे. या आमच्या लिहिण्यावर विश्वास ठेवून जनतेनें आपलें वर्तन योग्यप्रकारें बजावल्यास त्यांना लवकरच भाग्याचा दिवस उजाडलेला दिसणार आहे! ऐक्यावांचून सर्व गोष्टी निष्फल होऊन सर्व कारवाई मातींत मिळून जाईल हें ध्यानांत ठेवावें!"**

पेट्रोग्रॅड शहरांत एकच धुमाकूळ उडून राहिली. इतक्यांत झारच्या विश्वासांतल्या **कोसॅक** स्वारांच्या पलटणी तेथें येऊन धडकल्या त्यामुळें शहराचें स्वरूप अधीकच उग्र आणि भयानक झालें!

# रशियांतील बोल्शेव्हिजम् !

**रशिया**च्या त्या दिवसापर्यंतच्या इतिहासांत त्या पलटणींच्या **कोसॅक** स्वारांनीं प्रजेला छळल्याचेंच लिहिलेलें आहे. त्यामुळें त्यांना पहातांच जनतेंत एकदम हलकल्लोळ उडून गेला. प्रजेच्या असंतोषाची परिसमाप्ति वेळोवेळीं याच स्वारांकडून जशी करण्यांत येत असे तद्वतच **झारच्या प्रीतींतल्या पोलीस खात्यानेंही** प्रजेवर वेळोवेळीं अत्याचार करून बदनामाची कीर्ति मिळविलेली होती, पण या प्रसंगीं फारच मोठा चमत्कार घडून आला. **रशियाचा** पूर्वेतिहास बदलण्याचा तो काळ असल्यामुळें **कोसॅक** स्वार जरी तेथें आले होते, तरी त्यांनीं आपलें पूर्वींचें भीषण—भयानक स्वरूप त्यावेळीं प्रगट न करतां आपले घोडे जनतेच्या संमर्दातून बाजूला वळवून नेऊन उभे केले.

त्या प्रसंगीं तेथील जनसंमर्दातून एक अत्यंत जोराची अशी वाणी ऐकूं आली कीं, '**मित्रहो ........**' कोसॅकनी मधुर वाणीनें सांगितलें "**आम्हीही तुमच्या सारखींच माणसं आहोंत.**" ज्या एका ठिकाणी जोराची मारामारी चालली होते तेथील दंगा मोड-ण्यासाठीं हे स्वार धांवून गेले असतां तेथील एका स्त्रीनें आपले बाहू पसरून करुण स्वरानें त्यांस म्हटलें "**बंधूनो, आम्ही भुकेलीं माणसें आहोंत**"

त्यावर "**आमची ही स्थिती तीव्र आहे.**" असें त्या स्वारांनीं तिला उत्तर दिलें.

## कांण्ड आठवें.

कालमहिमा खरोखर विचित्र आहे. गरीब व निःशस्त्र प्रजेच्या पाठीवर ज्या **कोसॅकांच्या** चाबकांचे तडाके पूर्वी बसत असत तेच त्यांचे कोरडे यावेळीं त्यांच्या हातात आळशासारखे झुकल्या धेनान दिसत होते. ज्या **कोसॅकनीं** एके प्रसंगी विद्यार्थ्यांना आपल्या बंदुकांची व संगिनींची निशाणें बनविलीं होतीं त्याच विद्यार्थी वर्गाचें व **कोसॅकांचें** त्या वेळीं प्रेमळ संभाषण सुरू झालें होतें. **कोसॅकनी** मोठ्या गुप्तपणें त्यांना आपल्या संभाषणांत असें ही आश्वासन दिलें कीं, "**आम्हांला आमच्या अधिकाऱ्याचा हुकूम झाला तरी आम्ही आतां या पुढें जनतेवर कधींच गोळ्या झाडणार नाहीं** "

पहिल्या दिवसा प्रमाणें पहिली रात्र व दुसरा दिवस आणि दुसरी [illegible] दुसऱ्या रात्री एक विशेष गोष्ट घडून आली. त्या दिवसापर्यंत पोलीसनें जनतेची जी नानाप्रकारें छळ णूक केली होती तिचा सूड त्याच दिवशीं उगवून घेण्याची जनतेची मनीषा असल्याकारणानें लोकांनी कांहीं पोलीस ठाण्यांवर विटा व दगड यांचा जोरानें मारा केला. पोलीसनें चौथा इसमांस पकडून जेव्हां कैद करून नेल्याची बातमी पसरली तेव्हां तर सर्व राजधानीतलीं माणसें धांवून आलीं. सर्व जनता पोलीसवर तुटून पडण्याचा व पोलीसशीं दोन चांगलेच हात करण्याचा संभव होता, पण पोलीसनें एकदम गोळ्या झाडण्यास सुरुवात करण्यासाठीं जों बंदुका हातीं धरल्या तोंच कोसॅस

स्वाराचें घोडदळ तेथें दौडत आलें व त्यानें चौघां कैद केलेल्याची सुटका करून त्यास जनतेच्या हवालीं केल्यामुळें रक्तपात वाचला !

इतकें झालें तरी क्रान्तीचें खरें स्वरूप प्रगट झालें नव्हतें. जनतेच्या वर्तणुकीवरून इतकें स्पष्ट होत होतें कीं, पुढें काय घडून येणार आहे त्याची ती वाट पाहत होती ! या वेळेपर्यंत फक्त पोलिसशींच कायती त्यांची मारामारी झाली होती, पण या स्थितीचें फारच जलदीनें परिवर्तन झालें. कोर्सेकच्या भाषणावरून व वर्तनावरून मजूरवर्ग उत्साहित होऊन क्रांतिकारक पक्षास जाऊन मिळाला ! **नेवस्की** नांवाच्या सडकेच्या शेजारच्या अफाट मैदानांत असलेल्या क्रांतीकारक मजूरवर्गापैकीं एकजण पुढें येऊन मोठ्या जोरदार आवाजानें म्हणाला "**आतां आम्हांला--स्टर्मर, गुलिस्टन व प्रोटोपॉपाफ यांच्यापासून आमची सुटका करून घेतली पाहिजे.**"

लगेच दुसरा आवाज ऐकूं आला कीं, "**युद्धसमाप्ति ताबडतोब झाली पाहिजे !**"

"**नाहीं ! नाहीं ! अगदीं घनघोर युद्ध झालें पाहिजे. आजपर्यंत सांडलेले आमच्या बांधवांचें रक्त व्यर्थ जातां उपयोगी नाहीं. फक्त रशियन सरकारच्या तावडींतून आम्हांला आतां मुक्त व्हावयाचें आहे !**" अशा तऱ्हेचा तिसरा आवाज ऐकूं आला.

## काण्ड आठवें.

अशा तऱ्हेचा त्या जमावातून आवाज निघत असतां, कोसॅक स्वार आपल्या घोड्यांवरून त्या जनतेच्या घोळक्यात चाललेलीं लहान लहान वक्तृत्वें मोठ्या शांततेनें व प्रेमानें ऐकत जागच्याजागीं स्वस्थ होते. त्यांनीं कोणच्याही तऱ्हेची गडबड न करतां हत्यारांचा ही उपयोग केला नाहीं.

शुक्रवारची रात्र ही एक प्रकारें क्रांतीची जननीच होती. कारण कीं त्या रात्रीं जागोजागीं मजूर वर्गांतील लोक टोळ्याटोळ्यांनीं निर्णय-कारक सभांतील भाषणें ऐकत हिंडत होते. शनिवारची दहा तारीख उजाडतांच भुकेकंगाल मजूर लोक राजधानींत निरनिराळ्या ठिकाणीं एकत्र जमूं लागले. आजचा दिवस सरकारपक्षीयांशीं उघड सामना देण्याचा होता! रशियाची कंगाल, निःशस्त्र व निःसाहाय्य प्रजा आपल्या प्राणांचें बलिदान करून लोकसत्तेच्या पवित्र मंदिरांत प्रवेश कर-ण्यासाठीं कमरा बांधून तयार झाली होती! संरक्षणाच्या भावनेनें पूर्ण प्रेरित होऊन ते लोक एकाच ऐक्याच्या निशाणाखालीं जमले होते. अशा स्थितींत ही कोसॅक स्वारांची त्या जनतेबद्दलची सहानुभूति ढळली नाहीं.

हा जनतेचा प्रकार पाहून अधिकारी वर्गानें आपलीही कारवाई सुरू केली. कोसॅक स्वारांच्या बरोबर पोलिसांना त्या जमलेल्या अफाट जनतेंत प्रवेश करण्याचा हुकूम देण्यात आला. पोलीसनें लोकांस रस्ते व मैदान यांतून निघून जाण्यास सांगितलें, पण त्याकडे कोणीही लक्ष्य

दिलें नाहीं. त्यामुळें चिडून पोलीसनें एक गोळी सोडली. ती गोळी 'बँग बँग' असा आवाज करीत एका मजूराच्या देहातून पार झाली! स्वातंत्र्यप्राप्तीचें मातृभूमीला हेंच पहिलें बलिदान झालें असें म्हणण्यास कोणाचीच हरकत नाहीं!

ही गोष्ट सर्व राजधानीभर हां हां म्हणतां पसरली. या वेळपर्यंत फक्त कंगाल मजूर लोकांचेच तांडे सर्व शहरभर सारखें भटकत होते, पण आतां मात्र त्यांच्या मदतीला सर्व दर्जाची माणसे धावून आलीं! 'क्रांति' हाच शब्द सर्वतोमुखीं घुसून त्याच्या प्रतिध्वनींनीं आकाश व्याप्त होऊन गेलें! अशस्त्र जनता सशस्त्र पोलीसांवर प्राण तृणवत् मानून निधड्या छातीनें तुटून पडली. बंदुकांच्या फैरी झाडण्यास पोलीसनें सुरुवात केली. गरीब मजुरांना शान्त करण्याचा उपाय सरकारच्या हातीं नव्हता असें नाहीं, परंतु ज्या पवित्र भावनेनें प्रेरित होऊन स्वातंत्र्य आणि मनुष्यपणा यांच्या विजयश्रीसाठीं आपल्या प्राणांचें समर्पण करण्यास जे लोक तत्पर झाले होते त्यांना त्यापासून परावृत्त करून संतुष्ट करण्याचा उपाय मात्र आतां रशियन सरकारापाशीं शिल्लक राहिलेला नव्हता. भीतीनें गडबडून जाऊन प्राणाच्या मोहानें पाठ दाखविण्यांत महत्पाप असून स्वातंत्र्यासाठीं प्राण खर्ची घालण्यांत पुण्य आहे अशीच त्या लोकांची पूर्ण भावना झालेली होती. रक्ताचे वाहणारे पाट पुढील गोष्टींची मंगलमय प्रस्तावनाच आहे असा त्यांचा समज झालेला होता व गोळ्यांची वृष्टी ही संजीवनामृताचीच वृष्टी ते मानूं

लागले होते. नवे जन्मलेलें स्वातंत्र्य नावाचें मुग्ध बालक इकडे तिकडे दुडु दुडु पळत होतें व पारतंत्र्यातून मुक्त होण्याचा हाच एक मार्ग आहे अशी विधात्यानें त्याची त्या मुग्धावस्थेंतच खात्री केली होती.

आशंकेप्रमाणेंच सर्व गोष्टी यथोचित घडून आल्या. अधिकाऱ्यानीं हुकूम सोडताच कोसॅकींच्या बंदुकांची तोंडें आकाशाकडे प्रथम होऊन नंतर भूपृष्ठाकडे वळलीं! बंदुकांतून गोळ्या सुटल्या पण त्यानीं कोणाचा प्राणनाश मात्र केला नाहीं हें पाहून एका अधिकाऱ्यानें एका स्वाराची बंदूक हिसकावून घेऊन त्याच्यावरच झाडली व त्याचा प्राण घेतला, हें पाहून जनतेची आशा दृढ झाली व तिला असें वाटलें कीं, आतां मात्र सैन्य आपल्या मदतीला खास येऊन मिळणार! अशा त्या अगदीं ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं क्रांती आपलें भीषण स्वरूप आतां लवकरच प्रगट करणार असा पूर्ण भास होऊं लागला!

तिसऱ्या प्रहराच्या सुमारास काहीं पोलिस शिपायांनी कोसॅक स्वाराचे पेहेराव करून नंतर कोसॅकांच्यामध्यें जाऊन जनतेवर गोळ्या झाडल्या, तेव्हां [illegible] समज झाला कीं, कोसॅकनींच त्या गोळ्या झाडल्या असाव्या; पण मागाहून जेव्हां खरी गोष्ट फुटली तेव्हां तो पोलिसच्या चलाखीचाच खेळ होता असें निदर्शनास आलें. कोसॅकच्या विरुद्ध जनता करण्यासाठीं पोलीसनें हा डाव खेळला होता, पण व्यर्थ झाला.

# रशियांतील बोल्शेव्हिझम् !

सायंकाळीं जिकडे तिकडे स्वस्थता होती. नाटकगृहें व सीनेमाचीं थिएटरें यांमधून व इतर अनेक स्थळीं दिवसा घडलेल्या हकीकतींसंबंधीनें विचार व वादविवाद करीत असलेले लोक दिसत होते. ट्रामगाड्या व इतर वाहतुकींचीं साधनें बंद पडलीं होतीं.

ड्यूमा स्वस्थ बसलेली होती. मजूरवर्ग, विद्यार्थी, शाळामास्तर प्रोफेसर वगैरे सर्व लोकांच्या सभा भरून स्वातंत्र्याचें शिंग फुंकलें जात होतें सर्व राज्यभर काळजी आणि क्रान्ती यांनीं वातावरण आच्छादून टाकिलें होतें. सर्व पेट्रोग्रॅड राजधानी अशा अवस्थेंत व्याप्त होऊन ती त्या दिवसाची रात्र अति शांततेंत पार पडली. उद्या काय होणार आहे याचा पत्ता कोणासही त्यावेळीं लागला नाहीं.

त्या रात्रीं रशियन गव्हर्मेंटही कांहीं स्वस्थ आराम करीत बसलें नव्हतें. जनस्थितींत कोणच्या प्रकारची बदलली आहे त्याचें पूर्ण ज्ञान सरकारला झालें होतें. उसळलेल्या लाटेला सपशेल जिरवून टाकण्याचा त्यांनीं निश्चय केला. पुढीलप्रमाणें मजकूर छापून तो लष्करी गव्हर्नराच्या सहीनें शहरांतील मुख्य मुख्य ठिकाणच्या भिंतीवरून प्रातःकाळीं सर्वत्र चिकटविण्यांत आला.

**“ मजूर लोक जर आपापल्या कामांवरून एकदम रुजू न होतील, तर त्यांना पकडून नेऊन रणभूमीवर सोडले जातील इतर सर्व लोकांना या जाहिरनाम्याच्या**

द्वारें असें बजावण्यांत येतें कीं, कोणींही रस्त्यांत गर्दी करतां कामा नये. जर कोणी ह्या हुकुमाविरुद्ध वागेल, तर लष्करी कायदा एकदम पुकारला जाईल."

या जाहिरनाम्याची जनतेनें काडीचीही किंमत मानिली नाहीं. सर्व राजधानीभर सैनिक व पोलिस यांचे कडक पहारे बसविण्यांत आले होतें. सैनिकांत एकही कोसॅक स्वार नव्हता, त्यामुळें सर्वत्र फारच गडबड उडून गेली होती. तरी पण तशा स्थितीतही जनता बिलकुल भेदरून गेली नाहीं. जनतेचा आवेश वाढत जाऊन तिनें आपल्या मातृभूमीच्या उद्धारार्थ आपल्या रक्ताचे पाट वाहविण्याचा निश्चय केला. सरकारनें मना केलेल्या जागीं जनतेची गर्दी उसळूं लागली! मनाई केलेल्या जागांतून व रस्त्यांतून गर्दी मोडून टाकण्याचा पोलिसला हुकूम झालेला होता, त्याप्रमाणें पोलिसनें गोळीबार सुरू करून गर्दी हटविण्याचा जरी प्रयत्न करण्यांत आला, तरी तसा प्रयत्न सर्व जागीं करण्यांत आला नाहीं. गोळीबारानें दोनशावर स्त्रीपुरुषांचे मुडदे एका तासांत धूळ फांकीत पाडण्यांत आले! नंतर सर्व शहरभर गोळीबार सुरू झालेला पाहून जनतेचे नेत्र कोपानें ज्वालाग्राहीप्रमाणें लालभडक होत चाललेले दिसूं लागले! जनतेंत पुनरुज्जीवनाचा आवेश जोमानें चढला!

त्याच वेळीं ड्यूमाची एक अत्यंत महत्त्वपूर्ण बैठक झाली सभापति रोडजिन्को हा मोठा जबरदस्त व निर्भय छातीचा अस्सल देशभक्त होता. त्यानें झारला पुढीलप्रमाणें निर्भयपणें तारेचा संदेश धाडला.

# रशियांतील बोल्शेव्हिजम् !

" स्थिति फार नाजुक झाली आहे. राजधानीला अराजकतेनें ग्रासून सोडल्यामुळें गव्हर्मेंट किंकर्तव्यमूढ झालें आहे. अन्नसामुग्रीचा अगदीं तुटवडा पडला असून रेल्वे व तारखातें हीं बंद पडलीं आहेत. रस्त्यांतून गोळी-बार सुरू आहेत. सैनिक सैनिकांवर हत्यारें चालवीत आहेत. अशीं वेळ कोणचीही सबब सांगून गोष्ट लांब-णीवर टाकण्यास काळ उरला नसल्यामुळें कोणातरी विश्वासू माणसावर राज्यकारभार सोंपवून घडी दुरुस्त करणें अत्यावश्यक आहे जसजसा वेळ जाईल तसतशी अवस्था अधिक भयानक होत जाईल. झारवर कोणचाही वांकडा तिकडा प्रसंग न गुदरण्याबद्दल मी देवाची प्रार्थना करतों ! "

या तारेच्या कांहीं प्रति रणक्षेत्रावर असलेल्या कमान्डरांकडेही त्याना वस्तुस्थिति समजण्यासाठीं धाडण्यात आल्या होत्या. या एकंदर वस्तुस्थितीच्या परिस्थितीतून अखेरीस एक वीर पुरुष प्राधान्येंकरून रशि-याच्या रंगभूमीवर चमकूं लागला !

वरील तारेचे **झार**कडून उत्तर येण्याच्या आधींच रशियन सर-कारनें आपण आंखलेल्या राजनीतीबरहुकुम काम करून घेतलें. त्या वेळीं **ड्यूमा** सभेचा उच्छेद केला पाहिजे असें जाणून मुख्य प्रधान **गुलिस्टन** यानें **ड्यूमा** सभा बरखास्त केली. सरकारच्या नजरेनें

## काण्ड आठवें

**ड्यूमा** सभा जरी उधळून गेल्या सारखी दिसत होती, तरी **ड्यूमा** सभेची राखरांगोळी करण्याची ताकत आता रशियन सरकारांत उरलेली नव्हती. **रोंडजिन्को** यानें स्वकर्तव्यपालन करण्यासाठीं **ड्यूमा** सभा मोडून टाकण्याचें सरकारी आज्ञापत्र आपल्या हातांत घेऊन मोठ्या मेघगर्जनेसारख्या गडगडाटाच्या आवाजानें तो म्हणाला, " **या सरकारी आज्ञापत्रकाप्रमाणें रशियन सरकारानें जरी ड्यूमा उधळून लावली आहे, तरी ती आतां उधळून जाण्याच्या लायकीची राहिलेली नाहीं ! माझे सहकारी सहयोगी मित्रहो, माझ्याबरोबर उभे राहून आलेल्या प्रसंगाला तोंड द्यायला तयार व्हा ! आजपासून ड्यूमा हीच सरकारी राज्यचालक शक्ति उत्पन्न झाली आहे !** "

**रोडजिन्कोनें** कित्येक वेळा जरी मृत्यूशीं झुंझ केली होती, तरी त्यानें आज जाणून बुजून मृत्यूला आव्हान केलें होतें तशा प्रसंगीं तो एकटा नव्हता. त्याच्या भीमसदृश देहातून राष्ट्रीय क्रोधाच्या ज्वाला बाहेर उफाळून पडत होत्या. त्याचें क्रोधसंतप्त मुखमंडल राज्यक्रांतीच्या ज्वालामुखीचा स्फोट करीत होतें. तशावेळीं लोकांनाही एका वीर नेत्याची आवश्यकता असल्या कारणानें त्याच्याचकडे क्रांतीचे संपूर्ण नेतृत्व पूर्णपणें आलें.

**रोडजिन्को** हा क्रांतीचा मुख्य स्तंभ झाला व क्रांतीचे उपासक मोठ्या श्रद्धेनें त्याच्या भोंवतीं जमले त्या दिवसापासून प्रजातंत्रीय

राज्याची घटना अमलांत येणाऱ्या दिवसापर्यंत ड्यूमा सभेची भव्य पिवळी इमारत ही क्रांतिकारकाचें उपदेश मंदीर बनली ! ड्यूमाच्या सभागृहांतच याप्रमाणें स्वातंत्र्याचा जन्म झाला !

रविवारच्या रात्रीनें नुसत्या पेट्रोग्राडलाच नव्हे तर अखिल रशियाला दोन महाघ्यक पैदा करून दिले ! एक ड्यूमा व दुसरें ज्यानें निःशस्त्र प्रजेवर गोळ्या झाडण्याच्या ऐवजीं आपल्या बंदुकांचीं तोंडें अस्मानाकडे वळविली तें सैन्य. पेट्रोग्रॅडच्या संरक्षणासाठीं असलेल्या सैन्यानें उद्यापासून आपण व जनता हीं एकच आहोंत असा त्या रात्रीं—ठाम निश्चय केला.

तमाच्छादित व अशान्त अशा त्या रात्रीनें पेट्रोगॅडमध्यें राज्यक्रान्तीचा आपला आरक्त ध्वज उभारला व तेंच रशियाच्या स्वातंत्र्याचें पवित्र चिन्ह बनलें गेलें.

## क्रान्ती-साफल्य—

ता. १२ मार्चचा सोमवार रशियाच्या स्वातंत्र्यरवीनें प्रकाशित झालेला उजाडला होता. सर्व नगरभर जिकडे तिकडे आरक्त ध्वज केव्हां व कसे आणि कोणीं फडकावीत ठेवले होते याचा पत्ता लागला नाहीं. जागोंजागीं रशियाच्या स्वातंत्र्याच्या राष्ट्रीय गीतांचे आलाप ऐकू येत होते. दुःशंका व चिन्ता यानीं जी रविवारची रात्र प्रलय कालीन

# काण्ड आठवें.

मेघमंडलाप्रमाणें व्यापून टाकली होती तिच्या पुढें उगवलेला सोमवारचा प्रातःकाल—स्वातंत्र्यापूर्ण भावनेनें—निरंकुश आणि अत्याचारी रशियन राजकारभाराला धुळीला मिळविण्यास उत्तेजित व उल्हसित झालेला दिसत होता. जनतेच्या मुखश्रीवरून तिचा निश्चय ठाम झालेला असून ती आपलें ध्येय साध्य करून घेण्यासाठीं एकेक पाऊल पुढें टाकीत चालली आहे असें स्पष्ट दिसत होतें.

प्रातःकाळीं नऊ वाजतां पेट्रोग्रेडचे सर्व रस्ते प्रजाजनमहासागरानें तुडुंब भरून गेले! भावी स्थितीबद्दल सर्व जनाचे नेत्र चहूंकडे टकमक बघत होते सर्व शहरभर जागोंजाग सैनिकांचीं पथकें जरी उभीं होतीं, तरी त्यांनीं जो स्वतःच्या भावी घटनेचा फैसला स्वतःच करण्याचें ठरवून ज्यावर पुढें सर्व रशियाच्या स्वातंत्र्याचा फैसला होणार होता ती गोष्ट जनतेच्या लक्षांत येण्यास मुळींच वेळ लागला नाहीं. मोठया सडकावरून इतर सैनिकांबरोबर कॉसॅकचे घोडेस्वारही हजर होते इतकेंच नव्हे तर पेट्रोग्रॅडमध्यें जेवढे म्हणून खास व सरकारी गार्ड होते त्या सर्वांना शहरभर फैलावून टाकण्यात आले होते. पण आजच्या व्यवस्थेची स्थिति फार निराळी होती. ही व्यवस्था कांहीं तासांनीं निराळ्याच व्यवस्थेत रूपांतर पावली गेली.

जी गोष्ट खरोखरच अशक्य कोटींतली होती अशी एक चमत्कारिक गोष्ट अकाल्पितपणें घडून आली. ' **प्रियॉब्रिजेन्स्कीज** ' नांवाचे जे सैनिक गार्ड होते त्याना त्यांच्या अधिकाऱ्यांनीं जनतेवर बन्दुका

झाडण्याचा हुकुम देताक्षणींच त्यांनीं जनतेवर त्या न झाडतां आपल्या अधिकाऱ्यावरच झाडून त्यांना ठार केले व क्रान्तिकारकाना अशा तऱ्हेनें उत्तेजन देऊन ते सैरावैरा इकडे तिकडे धांवूं लागले हीच स्थिती 'वॅलन्स्कीज' 'पॅल्गोनस्कीज' गार्डांची झाली. त्यांनीं ही आपल्या अधिकाऱ्याना ठार मारून क्रान्तिकारकांचा पक्ष स्वीकारला. सैन्यभरतीचे लष्करी लोक आतां जनतेचे दोस्त बनले. ही सर्व गोष्ट अवघ्या पंधरा मिनिटात घडून आली व तितक्याच अवकाशांत तिचा सर्वत्र गवगवा झाला. त्यांनीं लूटमारही केली नाहीं व दारू पिऊन हुल्लडही उठवली नाहीं. शाळा सुटल्यानतर जशीं मुलें सर्वत्र फांकतात तसे ते गार्ड सर्व जनतेत फाकून गेले ! ते प्रसन्न चित्ताच्या आनंदानें किलकिलाट करीत सर्वत्र फिरत असता त्याचे वदनेन्दु प्रजाजनाना आपल्या अल्हादकारक दर्शनानें शुभ विजयाचा सन्देश देत होते थोड्याच अवकाशात त्या सैनिकानीं बादशाही तोफखान्याचा कब्जा पटकावला ! सर्वांत मोठें असें पेट्रोग्रॅडचे शस्त्रागार आता जनतेच्या ताब्यांत आलें होते व त्यामुळें सर्व जनता आता सशस्त्र झाली होती. जे पोलिस-दळ अद्यापी सरकारी हुकमतींत होतें व अखेरपर्यंत तसेंच राहिलें त्याचा व जनतेचा आतां मुकाबला गोळागोळींच्याच द्वारें सुरू झाला. क्रान्तीकारकांचा मोड करण्यासाठीं हलके हलके जितकें सैन्य रवाना करण्यांत आलें होतें तें सर्व मोठ्या खुल्या दिलानें प्रेमपूर्वक अखिल जनतेला जाऊन क्रान्तिकरितां मिळालें.

# काण्ड आठवें.

क्रांती होण्याच्या पूर्वी पेट्रोग्रॅडची जरी अशी स्थिति होती तरी तेथें अशी एक आश्चर्यकारक गोष्ट होती कीं, क्रांतिकारकांना खरा पुढारी असा अद्यापी कोणीच मिळालेला नव्हता. सैनिक, विद्यार्थी, मजूरदार लोक व इतर स्त्रीपुरुष यांनीं शहराच्या सर्व सडका फुलून गेल्या होत्या ! तुरुंगांचे दरवाजे फोडून कैद्यांची मुक्तता केली गेल्या-मुळें, शहरच्या पोलिसांवर ते तुटून पडले. रशियन जनतेच्या नेहमींच्या स्वाभाविक व्यवहारात पोलीसचे लोक हे काट्याप्रमाणें त्रासदायक होऊन राहिले असल्यामुळें, जनतेच्या अगांत जें स्वातंत्र्याचें वारें खेळूं लागलें होतें त्यायोगानें रशियन जनतेनें पोलिसच्या लोकांना अतिशय निर्दयपणें छळून पशुतुल्य सूड उगविला. हेड पोलिस स्टेशन व इतर कांहीं चौक्या यांना आगी लावण्यांत येऊन शिपायांवर गोळ्या झाडण्यांत आल्या व आद्यापीही जनतेच्या स्वातंत्र्याला पारतंत्र्याच्या शृंखलांनीं बद्ध करूं पाहणाऱ्या कांहीं विशिष्ट राहिलेल्या हवेल्या आणि शिक्षागृहें यांनाही अग्नि-नारायणाच्या रक्तवर्ण ज्वालांत विलीन व्हावें लागलें. यापेक्षांही अधिक महत्वाची अशी एक गोष्ट क्रांतिकारकांनीं घडवून आणिली कीं, गुप्त पोलिसांचें सर्व दप्तर सोधून काढून त्याचें अग्निदेवाला समर्पण करण्यांत आलें. हें दप्तर म्हणजे रशियांतील दडपेशाहीचें केंद्र व जर्मन-राजनीतिचक्राचा दांडा असें समजलें जात होतें. रशियन प्रजाजन त्याला निंदाव्यंजक दृष्टीनें बघत असल्याकारणानें ती त्या गुप्त पोलि-सच्या दप्तराची जंगी इमारत जेव्हां जळू लागली तेव्हां असा देखावा

दृष्टीस पडला कीं, जणू काय रशियानें एका प्रचंड पर्वतावर आपल्या स्वातंत्र्याच्या नांवाचें पवित्र यज्ञकुंड प्रज्वलित केलें आहे! फ्रान्सच्या राजक्रांतीच्या वेळीं बॅस्टिल संबंधानें जनतेचा जो समज झाला होता तोच समज या प्रसंगीं गुप्त पोलिसचें दफ्तर जाळतांना रशियन जनतेचा झाला होता.

इकडे अशा प्रकारें रशियन पारतन्त्र्याचें चिताभस्म होत असतां दुसरीकडे थोडक्यांत विरोधानें सेन्ट पीटर व सेन्ट पॉल हे दोन्ही किल्ले जनतेच्या हातीं लागल्यामुळें सरकारी अधिकारी वर्गाला आपला बचाव करून राहण्यास योग्य व सुरक्षित अशा स्थानाचा पूर्ण अभाव झाला.

पेट्रोग्रॅडमध्यें अशा तऱ्हेची क्रांती झाली तरी झारकडून कांहीं उत्तर आलें नाहीं. रशियन सरकार स्वतःला भयंकर शक्तीचें समजत असताही पेट्रोग्रॅडमध्यें हां हां म्हणता क्रांती होऊन त्या सरकारच्या नाड्या ढील्या पडल्या असें पाहून ड्यूमाचा जो सभापति रोडजिन्को त्यानें झारला पुन्हा पुढील प्रमाणें एक संदेश धाडला.

**" स्थिति फारच विकट व भयंकर होत चालली आहे. तावडतोब जर कांहीं इलाज करण्यांत आला नाहीं, तर उद्यां हातची जिन्नस गमावून बसावें लागेल. ही वेळ अखेरची आहे. राजकुटुंब आणि देशाचें राज्य यांच्या दुर्दैवाची घटना या अखेरच्या वेळेत गुरफटून राहिली आहे. "**

## काण्ड आठवें.

ह्या तारेचा संदेश वाचून झारच्या नेत्रांवरची भ्रम-निद्रा साफ उडाली व त्यानें पेट्रोग्रॅडच्या सैन्यावरच्या गव्हर्नराला पुढील प्रमाणें तार पाठविली—



" मी सरहद्दीवरून सैन्य धाडीत आहें. तिच्या हातून जर प्रजेचा उपद्रव मोडला गेला नाहीं तर मी स्वतः येतों. हवे तेवढे कठोर उपाय योजून जनतेला जागच्याजागीं दाबून बंडावा मोडून टाकावा."

प्रजेनें ठार मारिलेला रशियाचा झार निकोलस.

झारनें अशी आज्ञा धाडली खरी परंतु तशी आज्ञा धाडण्याच्या त्याच्या अधिकाराचा त्यावेळीं लोप झालेला होता याची त्याला कल्पना सुद्धां नव्हती.

# रशियांतील बोल्शेव्हिजम् !

झारची वरील आज्ञा ज्या वेळीं पेट्रोग्रॅममध्यें येऊन थडकली तीच वेळ जनतेच्या ऐक्याच्या भक्कम पायावर नवीन राजधानीची इमारत उभी करण्यास प्रारंभ करण्याची होती. राजधानीचा चारपचमांश भाग क्रांतिकारकांनीं त्या वेळीं आपल्या पूर्ण ताब्यांत घेतला होता शेंकडों मोटारी, सायकली, गाड्या, घोडी वगैरेवर त्याचा ताबा सुरू होऊन तीं सर्व वाहतुकीचीं साधनें सशस्त्र जनतेनें सुसज्ज झालीं होतीं. त्या वाहनांना चालविणाऱ्या सारथ्यांच्या शिरस्त्राणांत लहान लहान तांबड्या रंगाच्या पताका खोंचण्यांत आल्या होत्या. ते लोक त्या आपल्या शीर्षस्थ पताकी फडकावीत मोठ्या बेपर्वाईच्या मुद्रेनें उद्धतावस्थेत सर्व नगरभर आपापल्या वाहनांसह सर्वत्र मोठ्या झोंकानें संचार करीत होते.

पेट्रोग्रॅडमधले सर्व सैनिक यावेळीं जनतेला मिळाले होते. अंतर राष्ट्रीय मंत्री **प्रोटोपोपाफ** यानें सरकारी पोलिसांना खाद्य वस्तूंचें आमिष दाखविल्यामुळ ते मात्र अद्यापी जनतेला सामील झाले नव्हते. सशस्त्र जनतेनें धुडाळून काढून पोलीसांना ठार मारण्याचा सपाटा जारीनें सुरू केला. उंदराचीं बिळें खणून त्यांना जसे ठार मारावे तशी पोलीसांची स्थिति झाली ! याप्रमाणें पोलीसच्या जबरदस्त अधिकाराचा नाश करण्याची सुरुवात झाली ! तसला देखावा फ्रान्सच्या राज्यक्रांतीच्या वेळींच नव्हे तर आजपर्यंतच्या कोणच्याही ऐतिहासिक प्रसंगीं दिसलेला ऐकिवांत व वाचण्यांत नाहीं.

## काण्ड आठवें.

खरें म्हटलें तर तो समय रशियाच्या राष्ट्रीय अभिमानाचा द्योतक असाच होता. निरंकुश व अत्याचारी पोलीसचा याप्रमाणें निःपात करण्याच्या कामीं रशियन जनता गुतली असतां, त्याच वेळीं एक अल्पशीच कां होईना परंतु रशियानें गर्वाभिमान दाखविण्या-सारखी जी गोष्ट घडवून आणिली तिचा येथें उल्लेख केल्यावांचून राहवत नाहीं.

एक अवघ्या दहा वर्षांचा बालवीर आपल्या हातांत भरलेलें पिस्तुल घेऊन रशियन कोसॅक स्वारांच्या पथकाडे धांवत येऊन म्हणाला, "**तुमच्या तरवारी उपसून माझ्याबरोबर चला पोली-सचे लोक लपून बसलेली जागा मी तुम्हांला दाखवितों.**"

त्या बालवीराचें तें भाषण ऐकून कांहीं स्वार त्याच्या नेतृत्वा-खालीं त्याच्या पाठोपाठ गेले व त्यांनीं दडून बसलेल्या पोलीसांना ठार करून टाकिलें.

रशियन साम्राज्याच्या राजधानींत रशियन जनतेनें हा जो विजय संपादन केला होता त्यात त्या जनतेला सर्व साधारण औदार्याचेंही शिक्षण अनायासेंच प्राप्त झालें होतें. तशा त्या धालमेलीच्या प्रसंगीं दंगे, मारामाऱ्या, रक्तपात, लुटालुट वगैरे गोष्टी होण्याचे प्रसंग साह-जिकपणेंच उद्भवयाचे, परंतु रशियन जनतेला औदार्याचा धडा मिळाला असल्यामुळें, तिनें तसें कोणचेंही कृत्य केलें नाहीं. या प्रमाणे त्या दिवशींचें जनतेचें कृत्य पाहून डयूमाच्या रोडजिन्को सभापतीनें

पोलीसची जमवाजमव करण्याचा बेत केला. त्यानें एका सार्वजनिक व्याख्यानांत असें बोलून दाखविलें कीं, "**मला जरी माझें ध्येय धरूनच पुढें वर्तन करायचें आहे, तरी नगराचा बंदोबस्त यथासांग तऱ्हेनें राखणें इष्ट आहे. प्रथमतः मी सार्वजनिक संरक्षणाची व्यवस्था लावणार आहे** "

लहानमोठ्या सर्व विद्यार्थ्यांचीं सशस्त्र पलटणें बनविण्यांत आली. त्यांनीं कित्येक महिनेपर्यंत पट्रोग्रॅडच्या नागरिक पोलिसचें काम योग्य प्रकारें केलें. त्यांनीं आपली कामगिरी मोठ्या शांतपणें पार पाडली. बाजारपेठेंत जरी थोडीशी लूटमार झाली, तरी त्या कृत्याला लूट हा शब्द लावणें म्हणजे रशियन राज्यक्रांतीला कलंक लावण्यासारखें आहे. कारण कीं, भुकेनें उपाशीं मरू पाहणाऱ्या लोकांनीं दुकानांत शिरून पोटाला लागणाऱ्या अत्यावश्यक वस्तु तेवढ्याच बलात्कारानें दुकानदारा पासून हिसकावून घेऊन त्याची आपसांत सामायिक वांटणी करून क्षुधा-निवारण केलें होतें. गरीबाना छळून पैसे उकळण्यात प्रसिद्ध असलेल्या व्यापाऱ्याच्या दुकानाचीच मात्र तेवढी तशी स्थिति जनतेनें केली होती. इतर गरीब व सालस व्यापाऱ्याच्या कोणाही वाटेस गेलें नाहीं. त्यामुळें तें कर्म अनुचित असें कोणीच मानिलें नाहीं.

तशा त्या प्रसंगीं काहीं पोलिसांनीं ऍस्टारियन हॉटेलाच्या आडचा-वरून गुप्तावस्थेंत जनतेवर गोळ्या झाडल्याचें दृष्टोत्पत्तीस येतांच क्रांति-कारक सैनिकांनीं त्या हॉटेलवर छापा घातला. त्या हॉटेलांत सरकारी

अधिकारी राहत असत. युद्धारंभीं मद्य विक्रीची सरकारी फर्मानानें जरी बंदी झालेली होती तरी ह्या उपहार गृहांत सरकारी अधिकाऱ्यांना दारू विकत मिळत असे. सैनिकांनीं ताबडतोब त्या हॉटेलाचा ताबा घेऊन दारूचीं पिंपें गटारांत ओतून टाकलीं व जनतेकडून वाहवा मिळविली. हॉटेलांत दडून बसलेल्या अधिकाऱ्यांना कैदी करण्यांत आलें.

ड्यूमा सभेच्या बैठकी व्यवस्थितपणें वरच्यावर होऊं लागल्या. **रोडजिन्को** व त्याचे अनुयायी चालूप्रकार मोठ्या बारकाईनें अवलोकन करीत होते. त्यावेळीं **ड्यूमा** सभा म्हणजे एक न्यायगृह, लष्करी कचेरी व राज्यघटनाकारक संस्था होऊन राहिली होती. सर्व क्रांतिकारक सैन्यानें **ड्यूमाचे** हुकूम मान्य करण्याचें कबूल केलें. प्रियोब्रिजेन्कीज नांवाच्या गार्डानींही **ड्यूमाचें** आधिपत्य स्वीकारण्याचें जेव्हां कबूल केलें तेव्हांचा तो देखावा मोठ्या बहारीचा झाला त्या सैन्यांतले गार्ड उंचेपुरे जवान होते. सभापति **रोडजिन्को** येत आहे असें त्यांनी पाहिलें त्यावेळीं त्या सैन्यांतल्या मुख्यानें एकदम "**प्रियोब्रिजेन्स्की, सावधान**" अशी मोठ्यानें ललकारी मारली त्याबरोबर सर्व सैनिकांनी लवून मुजरे केले. **रोडजिन्कोनें** तो देखावा पाहून त्या सैनिकांना उद्देशून म्हटलें "**मला पाहतांच तुम्ही सर्वांनीं मोठ्या सभ्यपणाने व आदबीनें जे मुजरे केले ते राज्यसंरक्षक ड्यूमा सभेलाच केले असें मी मानतों. तुमच इतर देशबांधव यावेळीं रणक्षेत्रांवर रशियाच्या संरक्षणार्थ लढताआहेत. मला**

मोठा अभिमान वाटतो की, माझा मुलगाही यावेळीं त्या सैनिकांबरोबर रशियाच्या संरक्षणासाठीं रणभूमीवर लढतो आहे. सध्यां तुम्ही आपल्या पुढें जें ध्येय धारण केलें आहे त्याच्या सिध्यर्थ तुम्ही सर्वांनीं सुसंघटित रूप धारण करणें अत्यावश्यक असून तुमच्यावर नेमलेल्या अधिकाऱ्यांच्या आज्ञेंत वागणें तुम्हांला श्रेयस्कर होणार आहे. अधिकाऱ्यांवाचून सैनिक कांहींच करूं शकणार नाहींत याचें माझ्याप्रमाणेंच तुम्हांलाही ज्ञान आहे. वास्तव, मी तुम्हांला अशी आज्ञा करतों कीं, मी जसा तुमच्या अधिकाऱ्यांवर विश्वास टाकला आहे तद्वतच तुम्हीही टाकून त्यांच्या आज्ञेंत वागण्याचा निश्चय करा. आतां तुम्ही आपल्या कॅम्पात जा तुम्हांला हुकूम झाल्याबरोबर सर्वांच्या आधीं येऊन हजर व्हा."

सभापतीच्या या व्याख्यानाला सैनिकांनीं जे उत्तर दिलें तें— "आम्ही सर्व सैनिक सेवातत्पर असून आपल्या आज्ञेंत वागण्यास तयार आहोंत." असें त्यांनीं सांगितलें त्यावर रोडजिन्को म्हणाला, "रशियाचें जुने राज्याधिकारी राज्य चालविण्यास असमर्थ आहेत. नव्या अधिकाऱ्यांची योग्य योजना व्यवस्थितपणें लवकरच करण्यांत येईल

व त्यावर सर्व जनतेचा पूर्ण विश्वास राहील. तुम्हीही त्या नव्या सरकारावर विश्वास ठेवा."

याप्रमाणेंच इतर सैनिकांनाही रोडजिन्कोनें सांगितलें.

त्याच दिवशीं सैनिकांत आणखी एक उपयुक्त असें कार्य करण्यांत आलें. मिल्यूकॉफनें सैनिकांच्या निरनिराळ्या कॅम्पांतून जाऊन नव्या स्थापन होणाऱ्या सरकारावर विश्वास धरण्याचा उपदेश केला. स्कॉलिवस्की कॉलेजांत जाऊन केरेन्स्कीनेंही तशींच नव्या सरकारावर विश्वासण्याबद्दलचीं व्याख्यानें दिलीं. त्याच दिवशीं एका लष्करी डेप्युटेशनच्या पुढें ड्यूमाच्या सभापतिनें पुढीलप्रमाणें भाषण केलें:—

" .. सध्यांच्या अत्यंत नाजूक व बिकट प्रसंगीं जुन्या अधिकाऱ्यांच्या हातून राज्यसत्ता जाऊन नव्या मंत्रिमंडळाच्या हातीं ती आलेली आहे. या कामाच्या पूर्ततेसाठीं ड्यूमा सभेनें पूर्ण अंगीकार केलेला आहे. यास्तव, जनतेंत पूर्ण शान्ती राहणें अत्यंतावश्यक आहे."

त्यावेळीं प्रत्येक राष्ट्रीय नेत्याच्या तोंडून सार्वजनिक रक्षण आणि शान्तीचे उद्गार निघत होते व त्यामुळेंच त्यावेळीं ड्यूमा सभेंत आज्ञांचें परिपालन करणेंच इष्ट आहे अशी सार्वजनिक समजूत होऊन गेली होती. शांतता राखण्यासाठींच लूटमारीचा व्यवसाय जनतेंत होण्याचें आपोआपच बंद झालें होतें. मियोब्रिजेन्स्की गार्डांनीं ड्युमा सभेचें संरक्षण करण्याचें काम आपल्याकडे घेतलें होतें.

# रशियांतील बोल्शेव्हिझम् ?

क्रांतीचें काम जरी शान्ततेंत चाललें होतें, तरी तशा प्रसंगीं तात्पुरत्या मंत्रिमंडळाची स्थापना होणें इष्ट होतें. यास्तव, ड्यूमा सभेनें आपल्या एका बैठकींत नव्या मंत्रिमंडळाच्या स्थापनेचा कायदा पास करून घेतला. केवळ अन्तिम स्वीकृतीसाठीच मत ( Vob ) देणें राहिलें होतें. यास्तव मेरी प्यॅलेस मधील जुन्या मंत्रिमंडळापुढें रोडझिन्को निर्भयपणें जाऊन उभा राहिला.

सर्व नगराचे रक्षण आपल्या हातीं स्वीकारून रोडझिन्को ज्या वेळीं जुन्या **झारशाही**च्या मंत्रीमंडळापुढें जाऊन उभा राहिला त्यावेळीं तेथें **झारचा** भाऊ **ग्रँड ड्यूक मिकाइल** हाही हजर होता. **रोडझिन्कोन** त्या जमलेल्या सर्व जुन्या मंत्रिमंडळाला असें निर्भयपणें सांगितलें कीं, " **सर्व जनतेच्या इच्छेप्रमाणें ड्यूमा सभा नवें मंत्रिमंडळ स्थापन करून राज्यकारभार नव्या धर्तीवर चालविण्याचा अधिकार आपल्या हातीं घेत आहे. कारण, सध्यांच्या बिकट प्रसंगीं जर तात्पुरतें मंत्रिमंडळ स्थापन करून नव्या शिस्तीचा राज्यकारभार सुरू करण्यांत आला नाहीं, तर शांततेचा भंग होऊन राज्यरक्षणाचें काम धोक्याचें होणार आहे!** "

हें ऐकून अर्धे अधिक मंत्रि नव्या राज्यकारणांत काम करण्यास तयार झाले, पण त्याच म्हणणें असें होतें कीं, " **नव्या तात्पुरत्या मंत्रिमंडळाचें अध्यक्षपद ग्रँड ड्यूक मिकाइल यांस द्यावें.** "

## काण्ड आठवें.

युद्धमंत्री जनरल ब्रेलियक हा असें म्हणाला कीं, "मी शपथप्रमाण केलें असल्यामुळें झारची आज्ञा आल्या वांचून कोणाचाही हुकूम मी मानणार नाहीं."

या बाबतींत बराच वादविवाद झाला; पण कांहींच निष्पन्न न झाल्यामुळें रोडझिन्को परत आला. ड्यूमानें तात्पुरतें मन्त्रिमंडळ स्वमतानेंच स्थापन करून राज्यकारभाराचा ताबा घेतला व जुन्या मंत्र्यांना कैद करण्याचा ठराव पास करून घेतला. मेरी प्यॅलेसमध्यें जुन्या मंत्रीमंळास कैद करण्यासाठी सैनिक जाऊन पोंचल्यावर अशी बातमी लागली कीं, सर्व जुनें मंत्री प्रेफेक्ट प्यॅलेसमध्यें जाऊन दडून भिऊन बसले आहेत.

यानंतर जे शंभर सैनिक अधिकारी अद्यापीही झारचीच आज्ञा मानणारे होते त्यांचीं मनें पालटून तेही नव्या मंत्रिमंडळाला येऊन मिळाले. त्यांना ड्यूमा सभेनें सेनाधिकारी नेमून टाकलें. ड्यूमा सभेचें संरक्षण करणाऱ्या सैन्याचें अधिपत्य कोस्यॅक स्वारांचा जो मुख्य अधिकारी कौंट कॅरोलाफ त्यानें स्वीकारलें. कर्नल इंगलहर्टला पेट्रोग्रॅडच्या संरक्षक सेनेचें सेनापत्य देण्यांत आलें. या दोन्ही व्यक्ति आपापलीं कामें चोख बजावण्याच्या कामीं अत्यंत योग्य व अनुभवी होत्या यांत शंका नाहीं.

१०५८

इतकी व्यवस्था केल्यावर रोडझिन्कोनें तावडतोब नव्या मंत्री मंडळाची निवड करून नव्या पद्धतीचा राज्यकारभार चालविण्याची योजना केली. डयूमा सभेच्या मंत्रिमंडळांत कांहीं थोड्याशा हुशार मंत्र्यांची एक कार्यकारी कमेटी नेमण्यांत आली व तिला तात्पुरत्या नव्या राजमंडळाचें स्वरूप देण्यात आलें. त्या मंडळांत—रोडझिन्को, प्रिन्स ल्वॉफ, केरेन्स्की, मिल्यूकॉफ, नेकरासॉफ, कोनोवलॉफ, डिमिट्रुकॉफ, चेझ, शल्गिन, शिड्लोवस्की, कॅरोलाफ व रिझवस्की असे एकंदर बारा सभासद होते

या कार्यकारी मंडळानें जें एक तावडतोब पत्रक प्रसिद्ध केलें तें येणेंप्रमाणें:—

" जुन्या पुराण्या शासनपद्धतीनें जो सांप्रतचा प्रसंग उत्पन्न केला आहे त्याची जाणीव या डयूमाच्या कार्यकारी मंडळाला पूर्णपणें असल्यामुळें सार्वजनिक संरक्षण आणि योग्य व यथोचित राज्यकारभार चालवण्याच्या दृष्टीनें या मंडळानें राज्यकारभार चालविण्याचें ओझें आपल्या मस्तकावर धारण करण्याचें योजिलें आहे."

" सर्वसाधारण स्थिति लक्षांत आणून हें नवें मंडळ सर्व सैनिकांना अशी विनंति करतें आहे कीं, सध्यांच्या नाजुक व बिकट प्रसंगीं सर्व सैनिक उदारपणानें स्वातंत्र्य

रक्षणार्थ व नव्या तऱ्हेच्या राज्यस्थापनेस पूर्णपणें मदत करून या नव्या मंत्रिमंडळाचा जनतेला विश्वास वाट-ण्याच्या बाबतींत साथ करतील अशी आशा आहे "

यानतर पुन्हां दुसरें जें एक पत्रक प्रसिद्ध करण्यात आलें तें येणेंप्रमाणें:—

" ड्यूमाची कार्यकारी कमेटी पेट्रोग्रॅडच्या रहिवा-शांस अशी विनंति करीत आहे कीं, सार्वजनिक उपयो-गाच्या अशा ज्या सरकारी संस्था—उदाहरणार्थ—तारखातें, पाणीपुरवठाखातें, ट्रामवे, सरकारी रेकार्ड वगैरे—यांचें योग्य रक्षण करणें जरूर आहे. याचप्रमाणें या कमेटीची अशी प्रार्थना आहे कीं, कारखाने, गिरण्या, फॅक्टऱ्या यांचेंही जनहितार्थ रक्षण होणें आवश्य आहे. अशा लोको-पयोगी गोष्टींचा नाश झाल्यास जनतेचें अत्यन्त नुकसान होणार आहे. यास्तव त्यांचें संरक्षण करण्याच्या कामीं जनतेनें या कमेटीला मदत करावी. "

" या बरोबरच असेंही सुचविण्यांत येतें आहे कीं, कोणाचाही घातपात झाल्यास तें कृत्य बेकायदेशीर मान-ण्यांत येईल. विनाकारण रक्तपात करून दुसऱ्याचा माल लुटणाऱ्या संबंधानं आपसांतील मनःशांती बिघडून अस्व-

स्थता उत्पन्न होण्यानें पावित्र्याला काळीमा लागेल हें ध्यानांत ठेवावें. यास्तव तसें वर्तन करण्यापासून अलिप्त रहावें हेंच योग्य आहे. ”

याचा जनतेवर फार चांगला प्रकाश पडून परिणामही उत्तम झाला व त्यामुळें यादवीच्या रक्तपातावांचून अचानकपणें क्रांती घडून आली. त्या रात्रीं बारा वाजतां मलीन कपडे धारण केलेली एक भव्य व्यक्ति ड्यूमाच्या दरवाज्यापुढें येऊन उभी राहिली व तिनें सेनाधिकाऱ्याला विचारिलें, “ आपण सेनाधिकारी आहांत काय ? ”

“ होय. ” असें त्यानें सांगितलें.

“ तर मग मला ड्यूमाच्या कार्यकारी कमेटीकडे घेऊन चला. मी जुन्या मंत्रिमंडळांतला अंतरराष्ट्रीय मंत्री प्रोटोपोपाफ आहे. मी नव्या मंत्रिमंडळाला मिळण्या-साठीं आलें आहें. ” ती अपरिचित व्यक्ती बोलली.

त्या लष्करी अधिकाऱ्याच्या मनांत आलें असतें तर तें नांव ऐकतांच त्यानें त्याचे तत्क्षणीं शतशः तुकडेच उडवले असते व राष्ट्रीय ऋणांतून तो मुक्त झाला असतां; पण त्यानें तसें न करतां, त्याला कमेटीकडे आरदली बरोबर धाडून दिलें.

याप्रमाणें ता. १२ मार्चचा सोमवार जाऊन मंगळवारच्या प्रभात रवीनें आपला प्रकाश नेवस्की इमारतीवर पाडला व रशियाच्या पूर्ण स्वातंत्र्याचा दिवस येऊन ठेपला असें जाहीर केलें.

---

# काण्ड नववें.

## रशियाच्या स्वातंत्र्याची जन्मतिथि !

झारनें धाडलेलें सैन्य पेट्रोग्रॅडमध्यें येऊन प्रजाजनांशीं युद्ध करील अशी जी जनतेची कल्पना होती ती साफ खोटी ठरली. कारण, तें झारकडून आलेलें सैन्य युद्ध सुरू करण्याच्या ऐवजीं क्रांतिकारांनाच सामील झालें व अशा तऱ्हेनें पेट्रोग्रॅड राजधानीनें स्वातंत्र्याचा लाल-भडक झेंडा मोठ्या दिमाखानें फडकावला !

सर्व रशियाला ता. १२ मार्चचा हा दिवस स्वातंत्र्य देणारा ठरला. तशा त्या आनंदाच्या दिवशीं जें कांहीं छपून बसलेले पोलीस मधून मधून प्रजनांवर बंदुका झाडीत होते, त्यांचा बंदोबस्त करून त्यांना कैदी करण्यासाठीं ज्या दोन तीन हजार सैनिकांची नेमणूक करण्यांत आली होती, त्यानीं पोलीसांना उंदरांप्रमाणें हुडकून काढून कैदी केलें व न्यायासाठीं ड्यूमा पुढें धाडून दिलें. इतर जनताही पोलीसांना धुडाळून काढून तुरुंगांत रवाना करीत होती. कांहीं पोलीस लोक वेषांतर करून पळूनही गेले !

रशियाच्या स्वातंत्र्य जन्मतिथीच्या उत्साहासाठीं सैनिकांनीं ता १२ मार्च रोजीं मोठ्या पल्लेदार तोफा प्रातःकाळीच मैदानांत आणून सर्व

सरकारी इमारतींवर रोखून ठेविल्या होत्या ! क्रांतिकारक व जुने सरकारी अधिकारी यांच्यांत संबंध एक दिवस व एक रात्र गोळागोळी सुरूं होती. शेवटीं मंगळवार ता. १३ मार्च रोजीं प्रातःकाळीं नवा युद्धमंत्री जनरल निमोविच यानें पत्र धाडून असें कळविलें कीं, सैनिक विभागाची सरकारी इमारत जर तावडतोब नव्या सैनिकांच्या ताब्यांत देण्यात आली नाहीं तर तोफा डागून अर्ध्या तासाच्या आंत सर्व इमारत जमीनदोस्त केली जाईल ! जुनें राष्ट्रीय दप्तर नष्ट होऊं देण्यापेक्षा इमारतीचा ताबा देणें बरें अशी शहाणपणाची समजूत करून इमारतीचा ताबा क्रांतिकारकांना तावडतोब देण्यांत आला. याप्रमाणें सर्व पट्रोग्रॅडचा ताबा ड्यूमाच्या हातीं आला.

ड्यूमानें पुढें लिहिल्याप्रमाणें इमारतीच्या दारावर पुढील ओळीचा एक बोर्ड लगेच चिकटविलें —

"ड्यूमाच्या संरक्षणाखालीं."

स्वातंत्र्यप्राप्ती झाली खरी; पण ती क्षुधेचें थोडेंच निवारण करूं शकणार होती ! वास्तव खाण्याचे पदार्थ एकत्रित करण्यासाठीं एक कमेटी नेमण्यांत आली. सर्व देशांतील निरनिराळ्या गांवोगांवीं तारा पाठवून अन्नसामुग्री धाडण्याची व्यवस्था करण्यांत आली. चोवीस तासांच्या आंत पेट्रोग्रॅडच्या रहिवाशांना पुरेशी अन्नसामुग्रीही येऊन धडकली. प्रोटोपोपाफनें छपवून ठेविलेली धान्यसामुग्रीही हस्तगत करण्यांत येऊन विक्रीसाठीं ती बाजारात धाडण्यात आली.

## काण्ड नववें.

सर्व शहरांतली हॉटेलें तीन दिवसपर्यंत बंद असल्याकारणानें गरीबापासून अमीरापर्यंत सर्वच क्षुधेनें व्याप्त झाले होते. गरीब दुकानदारांना विक्रीसाठीं अन्न मिळताच त्यांनीं थोड्या नफ्यावर मालाची विक्री सुरू केली. पोलीस गुंडांचा त्रास त्या वेळीं बंद झाला असल्यामुळें व्यापार खुल्या दिलानें सुरू झाला. कांहीं उदार दुकानदारांनीं गरीबानां फुकट चहापाणी पाजण्याची व्यवस्था ठेविली. एका श्रीमंत दुकानदारानें तर आपल्या दुकानावर पुढील प्रमाणें लिहिलेली पाटी लटकाविली होती.

**" प्रिय नागरिकांनो, स्वातंत्र्याची पुण्यतिथि उपभोगण्यासाठीं दुकानांत या आणि इच्छेनुसार यथेच्छ खानपान करून तृप्त व्हा. "**

ह्या दुकानदारानें ह्या स्वातंत्र्याच्या पवित्र दिवसासाठीं ह्या दिवशीं आपला सबद पोषाख रक्तवर्णाच्या कपड्यानीं शोभिवंत केला होता व येतील त्या नागरिकांचें स्वतः स्वागत करून तो सर्वांना खाण्यापिण्याच्या वस्तूंनी तृप्त करून निरोप देत होता.

जुन्या प्रधानमंत्र्यांना ता. १२ रोजी इंग्लिश क्लबांत गिरफदार करून ड्युमाकडे धाडण्यांत आले. **पिट्रिम, कर्लोफ, गॉर्म्योकिन, उब्रोविन** व विश्वासघातकी **सुखोम्लिनॉफ** यांनाही, कैद करण्यांत आलें. या विश्वासघातक्यांचा प्राण घेण्यासाठीं शेंकडों लोक धांवून जात असलेले पाहून **केरेन्स्कीनें** मोठ्या गंभीरपणानें पुढें होऊन त्या

चवताळलेल्या लोकांस असें म्हटलें कीं, "खऱ्या न्यायाला अनुसरून आतां यापुढें रशियांत प्रत्येक इसमाशीं वागण्याचें ठरलें आहे. मी स्वतः सुखोम्लीनॉफच्या बाबतींत उत्तर द्यायला तयार आहे. त्याला ठार मारण्याचाच जर तुम्हां सर्वांचा निश्चय झाला असेल तर प्रथम मला ठार मारून टाका."

क्रान्ती नंतरचा न्याय व शिक्षा या गोष्टींच्या प्रारंभाचा तोच पहिला दिवस होता. सुखोम्लिनॉफच्या अंगावरील सरकारी पोषाख व अधिकारांची चिन्हें उतरण्यांत आली व त्याला तुरुंगांत पोंचविलें.

पेट्रोग्रॅडमध्यें रोज ज्या ज्या नव्या गोष्टी घडून येत होत्या त्यांनी क्रान्तीचें महत्व वाढत चाललें होतें. आज हें सैन्य क्रान्तीकारकांना येऊन मिळालें तर दुसऱ्या दिवशीं अमुक सैनिकांनी ड्यूमाचा अधिकार मान्य केला. अशा गोष्टी प्रत्यही घडत होत्या. ता. १२ रोजींच ग्रँड ड्यूक आपल्या ताब्यांतल्या सैन्यासह ड्यूमापुढें हजर होऊन रोडझिन्कोला म्हणाला—

"मी आजची संधी साधून आपली आज्ञा मान्य करण्यासाठीं येथें ससैन्य हजर झालों आहे. रशियाच्या माझ्या इतर जनतेबरोबर भावी उत्कर्षाची मी इच्छा करणारा एक बनलों आहें. आज सकाळीं मी आपल्या सैनिकांना एकत्र जमवून त्यांना वर्तमानकालीन घट-

नेचें महत्व समजावून सांगून त्यांचीं मनें सध्यांच्या स्थितीकडे वळविलीं. सर्वांनी ड्यूमाचा अधिकार स्पष्ट-पणें मानण्याचं अभिवचन दिलं आहे." हे बोलणे ऐकून ड्यूमाच्या सभासदांनीं आनंदाचा करतलध्वनी केला. त्यावेळीं रोडझिन्को म्हणाला—

"ग्रँड ड्यूकच्या भाषणानें मला मोठा सन्तोष झाला आहे. इतर सैनिकांप्रमाणेंच ग्रँड ड्यूक आपल्या सैन्यासह ड्यूमाच्या शत्रूंचें निर्दालन करण्यास मदत करतील असा मला भरवंसा आहे."

रोडझिन्कोचें हें भाषण ऐकून ग्रँड ड्यूक आपल्या सैनिकांसह सम्मति दर्शक सलामी देऊन आपल्या ठाण्यावर चालता झाला.

त्यानंतर थोड्याच वेळानें कॉलेज्यांतल्या सैनिक मंडळानेंही ड्यूमाचा अधिकार स्वीकारला. त्या मंडळांत २५० लष्करी अधिकारी होते. कोसॅक पलटणींनीं एकमुखानें ज्याप्रमाणें ड्यूमाचें वर्चस्व कबूल केलें. त्याचप्रमाणें देशांतल्या इतर सैनिकांच्या पथकांनीही याच सरकारचा आश्रय केला.

बाहेरचे सर्व झगडे जरी लयाला गेले होते तरी ड्यूमांत एक नवाच झगडा सुरू झाला होता. नव्या सरकारी मंत्री मंडळांत एक प्रखर मतभेद उत्पन्न झाला होता. क्रान्तीच्या पहिल्याच दिवशी ज्या कौन्सिलर ऑफ लेबरचा जन्म झाला होता त्यानें यावेळीं विराट रूप धारण केलें होतें. त्या कौन्सिलांत सैनिक प्रतिनिधींचेही संमिश्रण

झालें असल्यामुळें त्याचें नांव " **कौन्सिल ऑफ वर्कमेन ॲन्ड सोल्जर्स डेलिगेट्स** " असें आतां पडलें होतें. याच संस्थेचें खऱ्या क्रान्तीस जन्म दिला होता. व त्यात जनसत्तावादी आणि साम्यवादी असे दोन प्रकारचे प्रतिनिधि होते साम्यवादी प्रतिनिधींनीं प्रजासत्ताक राज्यस्थापनेची मागणी नेटानें सुरू केली.

**रोडझिन्को, प्रिन्स लॉफ व मिल्युकोफ** यांच्या पक्षाच्या लोकांना प्रातिनिधिक राज्यपद्धति पाहिजे होती व चेझ आणि केरेन्स्की यांनीं तद्विरुद्ध झगड्याची सुरुवात केली. मजूरपक्षीय व सैनिकपक्षीय यांची शक्ति दिवसें दिवस वाढत चालली होती त्यामुळें साम्यकवादी व ड्यूमाची कार्यकारी कमेटी यामध्यें तंटा उपस्थित झाला. दोन्ही पक्षांनीं आपापल्या तर्फेची आज्ञापत्रें काढण्याची सुरुवात केली ड्यूमाच्या विज्ञप्त्या शांत व गंभीर होत्या, पण मजूर व सैनिक यांच्या पक्षाच्या अत्यंत तीव्र व खळबळीच्या होत्या. मासल्यासाठीं कौन्सिलची एक सुचना पुढें लिहिल्याप्रमाणें होती—

**" सैनिकहो, आजच्या स्वातंत्र्यासाठीं तुम्ही जी क्रांती घडवून आणलीत त्याबद्दल रशियन जनता तुम्हांला धन्यवाद देते आहे. क्रांतिकारकांशीं संगनमतानें वागणारे हा अद्यापी कांहीं लोक तुमच्या मध्यें नाहींत पण विचार करा कीं, जुनें सरकार तुम्हांला जुलुमानें कारखान्यांतून जे वेठीला लावीत असे ती वेळ आतां गेली आहे. म्हणून**

क्रांतिकारकांना येऊन मिळण्यास अद्यापी ज्यांची छाती होत नाहीं त्यानीं निर्भय चित्तानें सहकार्य करण्यास तयार व्हावें यांतच त्यांचें व त्यांच्या घराण्याचें हित आहे. सैनिकहो, तुम्हांला तुमच्या कॅम्पांतून हुसकावून दिले असतील तर आपलीं दुःखें सांगण्यासाठी ड्यूमाकडे या व सुखी व्हां. वाह्यातपणानें गोळीबार करणें बंद करा. जे पोलीस लोक पकडाल त्यांना समोर उभे करून गोळ्या घालून ठार मारा. आतां जगच्छांतीची स्थापना करा. आपलें सैन्य व्यवस्थितपणाच्या शिस्तींत ठेवा व जेणे-करून तुमच्या शत्रूंचा फन्ना उडेल असा उद्योग करा. लुच्चे लबाड लोक लूटफाट करतील तर त्यांचें निवारण करा. प्रत्येक गोष्टीचा सरळ सल्ला ड्यूमाला विचारा. स्वातंत्र्यासाठीं जगूं अथवा मरूं असा दृढ निश्चय करा, शत्रूकडून जिंकले जाण्यापेक्षां मृत्य आलेला पुरवला. स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं तुम्ही आपले देह जरी धारातीर्थीं ठेविलेत, तरी रशिया तुमच्या देशसेवेला कधींही विसरणार नाहीं. स्वातंत्र्य चिरायु असो."

सैनिक व मजूर यांच्या कौन्सिलाची शक्ति जसजशी वाढत चालली होति तसतसे त्यांचे विचार अराजकतेनेंच व्याप्त होत चालले होते. साम्यवादक प्रजातंत्राची इच्छा करणाऱ्यांचा पक्ष म्हणजे कांहीं

कमकुवत होता असें नाहीं. त्या पक्षानेंही लोकसत्तेची जागृति उत्पन्न करण्याचे प्रयत्न चालविले होते. मासल्यासाठीं त्याच्याही एका पत्रकाचें दिग्दर्शन करूंया:—

"(१) ड्यूमा कमेटीच्या सर्व आज्ञांचें यथायोग्य परिपालन झालें पाहिजे. ड्यूमाच्या कौन्सिलची हुकूम-बजावणी न करणारांस बंडखोर समजण्यात येईल.

(२) खाजगी वेळीं सैनिकांनीं आपल्या अधिकाऱ्यास मुजरा केलाच पाहिजे अशी सक्ति नाहीं. याबरोबरच अधिकारीवर्गाला त्यांच्या पदव्या उच्चारून सलाम करण्याचा सैनिकांचा नियम रद्द करण्यांत आला आहे. अधिकाऱ्याला फक्त गोस्पोडिन जनरल असें म्हणण्याऐवजीं मि. जनरल असें यापुढें संबोधित जावें.

(३) सैनिकापैकीं कोणालाही एकेरी नांवानें हांक मारून त्याच्याशी कमी दर्जाचें वर्तन ठेवण्याची सक्त मनाई करण्यांत आली आहे. अधिकाऱ्याशीं कोणा सैनिकाचा मदभेद झाल्यास त्यानें आपल्या कंपनीच्या कमेटीकडे अर्ज करून स्वतंत्रपणें आपली दाद लावून घेण्याची मोकळीक ठेवण्यांत आली आहे."

याप्रमाणें कौन्सिल व ड्यूमा यांच्यात मतभेदाचें वादळ उठलें होतें. सैनिकांत जी भीतीची शिस्त होती ती मोडून ते आपल्या अधिकाऱ्यांना मुळींच विचारीतनासे झाले. याप्रमाणें सैनिक स्वैर वर्तनी बनून त्यांच्यांतली पूर्वीची आदबिची शिस्त नाहींशी झाली.

शेवटीं ड्यूमाच्या कार्यकारिणी कमेटीनें पुढीलप्रमाणें आठ तत्वाचें एक पत्रक प्रसिद्ध केलें:—

" नागरिक जनहो,—

स्थानिक अधिकारी व सैनिकगण यांच्या साह्यानें कार्यकारी कमेटीनें जुन्या राजसत्ताक सत्तेला मोडून टाकिलें आहे. आतां नव्या पद्धतीच्या राज्यघटनेची स्थापना करणें जरूर आहे. याच उद्देशानें कमेटीनें राष्ट्रीय मंत्रिमंडळाची निवड करण्याचें काम आपल्या हातीं घेतलें आहे. निवडून येणारे मंत्रिमंडळ पुढील सिद्धांतांना अनुसरून आपला कारभार चालवील.

( १ ) सर्व राजनैतिक सैनिक व शेतकरी यांना अपराधांची एकदम माफी देण्यांत येईल,

( २ ) व्याख्यानें देणें, छापखाने काढणें, वर्तमानपत्रांचें स्वातंत्र्य कायम राखणें, सभा–समित्या - संस्था वगैरे स्थापना करणें, मजूर वर्गाचें ऐक्य घडवून आणणें व

त्यांच्या अधिकारी वर्गापासून त्यांना कोणत्याही प्रकारें त्रास होणार नाहीं अशी व्यवस्था करण इत्यादि पूर्ण स्वातंत्र्योपभोगी गोष्टी सर्वांना पूर्णपणे देण्यांत येतील.

( ३ ) सर्व प्रकारचे सामाजिक, धार्मिक व राष्ट्रीय प्रतिबन्ध दूर केले जातील.

( ४ ) राज्यशासन व राष्ट्रैक्य घडवून आणणारी जी मध्यवर्ती मुख्य संस्था स्थापिली जाईल ती सर्व प्रजे-च्या मतानुरोधानेच स्थापण्यांत येईल.

( ५ ) पोलीसच्या जागीं राष्ट्रीय सैन्याची नेमणूक केली जाऊन त्या खात्याचा संबंध स्वयं-शासक संस्था म्हणजे म्युनिसिपालिटीशीं राहील त्या दलाचरचे अधि-कारी अशिक्षित जनतेच्या मताधिक्यानें नेमण्यांत येतील.

( ६ ) प्रातिनिधिक पद्धतीनें जातवार प्रतिनिधि व संस्थागत प्रतिनिधि निवडण्यांत येतील.

( ७ ) ज्या सैनिकांनीं क्रांती घडवून आणण्याच्या कामीं भाग घेतला आहे त्यांचीं हत्यारें काढून घेण्यांत न येतां ते पेट्रोग्रॅडमध्यें सुखानें राहूं शकतील.

(८) आज्ञापालनांत जरी सैनिकांना पूर्ण आज्ञाधारक राहावें लागलें तरी त्यांच्या सामाजिक उपभोगाचें स्वातंत्र्य कायम ठेवण्यांत येईल ... ... "

**तार खातें** व **टपाल खातें** हीं दोन्हीं खातीं जुन्या राजमंडळानें एकदम बंद केल्यामुळें वरील नियमाची माहिती सर्व देशभर बराच वेळ लोकांना समजली नव्हती व त्यामुळें **पेट्रोग्रॅड**मध्यें घडत असलेल्या हकीकतींचें सर्वत्र अज्ञान असणें साहजिक होतें.

यानंतर **मॉस्को** शहरानें आपण स्वतंत्र झाल्याचें पुकारून **पेट्रोग्रॅड**मधल्या **ड्यूमा** सभेचें अंकित असल्याचें जाहीर करण्यासाठीं **मॉस्को** मधील सैन्य जरी **पेट्रोग्रॅड**ला आलें, तरी **मॉस्को** च्या पोलिसांनीं आपलें जाळें क्रांतिकारकांच्या विरुद्ध पसरण्याचें कमी केलें नव्हतें. सैनिकांनीं तो प्रकार पाहून त्या जाळ्याचे तावडतोब तुकडे तुकडे करून टाकले.

रणक्षेत्रातून शुभवर्तमान येण्याची सुरुवात झाली. जनरल **रस्की** व **ब्रुसिलॉफ** यानीं आपल्या सेना नव्या सरकारच्या हुकूमतींत दिल्याचें जाहीर केलें. या प्रमाणें क्रान्तीचें रूप हलके हलके उत्तम प्रकारचें होऊं लागून, त्यानें असें सिद्ध केलें कीं, सत्य व साहस यांच्या जोरावर जनता पूर्णपणें पुढें पाऊल टाकण्यास समर्थ झाली आहे. अशा तऱ्हेच्या शान्तीकारक स्वराज्याची जरी स्थापना होत होती तरी तशा

त्या स्थितींत अशान्ति व कुशंका यांचे वादळ उत्पन्न व्हावयाचें राहिलें नव्हतें. **ड्यूमा** आणि मजूरवर्गीय लोकांचें कौन्सिल यांच्यांतला विरोध विशेष बळावत चालला होता. कौन्सिलनें प्रजासत्तेची मागणी जोरानें सुरू करून **पेट्रोग्रॅड**मध्यें अराजकतेचा जोरानें प्रसार चालविला होता.

**ड्यूमा**ची इच्छा परिमित राजसत्ता स्थापन करण्याची होती. **कौन्सिल** ऑफ **एम्पायरनें झारला** जी तार केली होती तीमध्यें पुढील आशयाचा मजकूर होता—

**" जुन्या राज्यपद्धतीनेंच पुढें राज्यशकट हांकणें आतां सर्वस्वी धोक्याच झालें आहे. कायदे व शान्ती यांचा त्या राज्यव्यवस्थेनें पूर्ण भंग होणार आहे. तीच पद्धत अमलांत ठेविली तर रणभूमीवर अपयश येऊन झारचा राजवंश सफाई नष्ट होण्याची वेळ प्राप्त झाली आहे यास्तव जुनी राज्यरीति एकदम बदलणेंच इष्ट आहे ताबडतोब एका प्रातिनिधिक संस्थेची स्थापना करून ज्याच्यावर सर्व जनतेचा विश्वास बसेल अशा एखाद्या मुख्य मंत्र्याची योजना करणें उचित आहे. ... "**

दिवसानुदिवस स्थिति भराभर बदलत चालली होती. क्रन्तीनें एका नव्याच क्रान्तीची उत्पत्ति केली, **जहाल व मवाळ** यांच्यातला मतभेद फारच जोरावला व नव्या राज्यव्यवस्थेंत सुधारणा घडवून आणण्याच्या बाबतींत तो स्पष्ट दिसू लागला.

## काण्ड नववें.

**केरेन्स्की** हा साम्यवादी असतांही त्यानें तशा त्या बिकट परिस्थितींतही मतभेद विसरून जाण्यासारखी गोष्ट घडवून आणिली व कांहीं कालपर्यंत यादवीला ऐक्याचें स्वरूप दिलें. मजूरवर्ग व सैनिक यांच्या कौन्सिलाचा झगडा थांबवला जाऊन त्यांच्याच मतानें नव्या मंत्रिमंडळाची संस्थापना करण्यांत आली. झारची निरंकुश सत्ता व संपत्तीमान् मजूर लोक यांच्याबद्दलचाच काय तो तंटा असल्यामुळें प्रजासत्तेच्या मागणीला जोर आलेला होता. कारण प्रजासत्ताक राज्य-पद्धति स्थापन करण्याची इच्छा धरणाऱ्यांमध्यें झारच्या वंशवृक्षाला समूळ उपटून टाकण्याची लालसा धरणारेही लोक होते !

# काण्ड दहावें.

## रशियाच्या झारचा सिंहासनत्याग !

**परिमित राजसत्ता व प्रजासत्ता** यांबद्दलचा **ड्यूमासभेंत** वादविवाद सुरू असतां रशियाचा इतिहास रशियन जनता नव्या स्वरूपांत प्रगट करीत होती. हा इतिहासाचा भाग फारच महत्वपूर्ण होणार असल्याबद्दलची कोणासही शंका नव्हती. हा इतिहासाचा भाग **झार**शाहीच्या अखेरीनें परिप्लुत झालेला होता. **झारनें** आपल्या निरंकुश अधिकारानें जी अत्याचारांची शासनपद्धति अमलांत आणिली होती त्याच्या प्रतिफळाचा तो इतिहास मोठा मनोरंजक आहे.

ज्यावेळीं **पेट्रोग्रॅड** अशा जनतेचें माहेरघर बनलें होतें त्यावेळीं पाताळयंत्री मुत्सद्याच्या मुत्सद्देगिरीला **झारला** बळी पाडून रणमैदानावरील स्वसेनेचें अवलोकन करण्यासाठीं **झारची** रवानगी करण्यांत आली होती. **जर्मनीच्या** पाताळयंत्राचें जाळें कसें बिकट होतें हें मागील काण्डाच्या वाचनानें वाचकांस पूर्ण समजून आलेंच असेल. **जर्मनीच्या** पाताळयंत्राचा एवढाच उद्देश होता कीं, रशियन जनतेची राजसत्तेविरुद्ध उठावणी करून उत्पन्न होणाऱ्या अशान्ततेनें रशियानें युद्ध करणें एकदम थांबवावें, पण **झार** कमअक्कल असल्यामुळें त्याला ही गोष्ट जाणता आली नाहीं हें त्याचें दुर्दैव !

## काण्ड दहावें.

रोडझिन्कोनें जी पहिली तार धाडली तिचा जबाब धाडण्याची झारनें उपेक्षा केल्यामुळें त्यानें आपल्या हातानें स्वतःचा राजमुगुट उतरून ठेवण्याचा प्रसंग स्वतःवर ओढवून आणला होता. पहिली तारेची सूचना मिळाल्याबरोबर जर त्यानें शहाणपणानें योग्य व्यवस्था केली असती, तर त्यानें आपल्या सिंहासनावरील आधिष्ठानाची बळकटी करून जनतेच्या हृदयसिंहासनावरही तो प्रेमानें आरूढ त्याला होता आले असते व त्याचें राशयावरच प्रभुत्व इतक्या लवकर लयाला गेलें नसतें झारनें आपल्या नेहमीच्या तावट, चिडखोर व बेमहखोरीच्या स्वभावाला सोडण्याचें नाकारिलें म्हणूनच त्याच्या हातून त्याचा नाश निर्माण झाला हें त्याला समजलें नाही.

दैव फिरलें म्हणजे सर्वच फिरतें अशी जरी म्हण आहे तरी दैव फिरायला ज्याची त्याची वर्तणूकच कारण होत असते. इ. सन १९०५ साली झारनें प्रजेला जें अभिवचन दिलें होतें तें जर त्यानें अमलांत आणिलें असतें तर त्याचा नाश न होतां रशियन प्रजेचें नेतृत्व त्याच्याच हातांत राहाण्याची उत्तम संधि होती, पण त्याचा भाग्यरवि अस्तास चालवण्याची त्याची त्यानेंच आपल्या कृतीनें त्वरित संधी आणली त्याला कोण काय करणार ! त्या क्रांतीच्या वेळचा इतिहास त्याच्या नावाची सारखी जपमाळ जपून राहिला होता. झार बेपर्वाईपणानें आपल्याच अकलेच्या घमेंडानें वागत असल्यामुळें जनतेचा विश्वास संपादन करण्याची त्यानें केव्हांच अपेक्षा बाळगली नाही. नव्या नव्या

क्रूर उपायांनीं जनतेला दाबून टाकण्याचा जो मार्ग झारनें स्वीकारला होता त्या मार्गातून त्याला परावृत्त न होऊ देतां पुढें पुढें आण्याचाच सल्ला त्याचे फितुरी मंत्री त्याला देत होते. त्यानें जनतेला खोटीं आश्वासनें देऊन फसविल्यामुळेंच त्याची सत्ता जनतेनें खोटी मानून झुगारून दिली. शेवटीं त्याचीच कृती त्याच्या फळास येऊन अखेरीस त्याला कोणीही साहाय्यक न होतां सर्व नामानिराळे राहिले.

**रोडझिन्को**च्या दुसऱ्या तारेचें त्यानें जें उत्तर धाडलें तें त्याच्या मूर्खपणाच्या अकलेचें धानकी प्रदर्शनच होतें. पेट्रोग्रॅडच्या जनतेला दाबून टाकण्यासाठीं सैन्य धाडण्याचें त्यानें जें उत्तर दिलें होतें तें व स्वतः तेथें जाण्यासंबधाची त्यांतच जी पुस्तिजा एका वाक्याची भर घातली होती तेंच त्याच्या अखेरीस नाशास कारण झालें.

**पेट्रोग्रॅड**मध्यें प्रजेनें बडाचा झेंडा उभारल्याबद्दलची खात्री झाल्यावर रणक्षेत्रातून **पेट्रोग्रॅड**च्या बाहेरच्या '**झार सेलो**' नांवाच्या राजशाही परगण्यांत ससैन्य जाण्यासाठी **झार** रेल्वे स्टेशनावर तावडतोब आला व गाडीही चालू झाली. पण रस्त्यांत ती त्याची गाडी एकदम थांबविण्यांत आली. क्रांतिकारकांनीं रेल्वेचे रूळ उपटून टाकले होते. **झार**च्या मार्गातला हाच जनतेचा पहिला प्रतिरोध होय. तशा स्थितींत **झार जनरल रस्कीच्या पस्कॉफ** मधील हेड क्वॉर्टर्समध्यें परत गेला व तावडतोब जनरलला येऊन भेटण्याची त्यानें आज्ञा सोडली.

काण्ड दहावें.

•

जनरल रस्कीनें येऊन झारला असें सांगितलें कीं, "पेट्रोग्रॅड-मध्ये क्रांतिकारकांनीं कहर उसळून दिला आहे." हें ऐकून झार गप्प बसला व आपल्या सरकारी ट्रेनमध्यें जाऊन त्यानें ट्रेन चालविण्याचा हुकूम सोडला, पण गाडी चालण्यास रूळच नव्हते.

दुसऱ्या दिवशीं त्यानें पुन्हा जनरलला आपल्याकडे बोलावून घेऊन म्हटलें "सध्यांच्या स्थितींत माझें असें म्हणणें आहे कीं, पेट्रोग्रॅडमधल्या अशान्ततेचें दमन करण्याचे कोणचेच उपाय न योजतां एकदम प्रजेच्या मतानें नवें मंत्रिमंडळ स्थापन करावें असा हुकूम सोडावा. तुमचें यावर काय मत आहे?" यांतली खरी गोष्ट अशी होती कीं, जनरलला हा आपला विचार कळविण्याच्या पूर्वींच तशा अर्थाचें एक पत्र स्वतःच्या सहीशिक्यानिशीं झारनें ड्यूमाला धाडण्यासाठीं तयार करून ठेवलें होतें. झारनें विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर जनरल रस्कीनें मोठ्या गंभीरपणानें व धैर्यानें असें दिलें कीं, "ज्याअर्थीं आपण या बाबतींत माझें स्वतंत्र मत विचारीत आहांत त्या अर्थीं मी आपणांस स्पष्टपणें आतां असें सांगतों कीं, आपल्या इच्छेची सफलता होण्याची वेळ टळून गेली आहे. यास्तव ड्यूमाच्या रोडझिन्को सभापतीचाच आतां या गोष्टींत विचार घेणें इष्ट आहे."

हा जबाब ऐकून झारच्या अंगाचा तीळपापड झाला व तो संतापानें आपल्या निजण्याच्या खोलीत निघून गेला. त्यानंतर जनरल रस्की व रोडझिन्को यांच्यामध्यें टेलिफोनमधून दोन तास भाषण चाललें होतें. त्या सभाषणांत रोडाझिन्कोला जनरल रस्कीनें कळविलें कीं, "पेट्रोग्रॅड शहर आतां पूर्ववत् सरकारी पोलीसच्या रक्षणाखालचें राहिलें नसून तें एका स्वतंत्र स्थानिक सरकारच्या ( म्युनिसिपॉलिटी ) अमलांत गेलें आहे." याशिवाय आणखी त्यानें असें कळकळविलें कीं, "झारचें प्राणरक्षण व्हावें अशी इच्छा असल्यास झारनें इतउत्तर सिंहासनत्याग करण्यावांचून दुसरा इलाजच राहिला नाहीं." ही बातमी झारला सांगण्यासाठीं जेव्हां जनल रस्की त्याच्या खोलीत गेला त्यावेळी झार आपल्या बिछान्यावर अत्यंत शोकावस्थेंत धडपडत पडलेला होता.

जनरल रस्कीनें जेव्हां हा वृत्तांत झारला कळविला तेव्हा तो एकदम भग्नहृदय झालेला झार—आशा व निराशा यांच्या वादळांत जरी बेहोष झाला होता, तरी त्याला जो थोडासा आशातन्तु वाटत होता त्याच्या जोरावर तो शान्तपणानें म्हणाला, "काय माझ्या इतर जनरलांना ही हकीगत समजली आहे ?"

"होय, समजली आहे !" जनरल रस्की म्हणाला, त्या सर्वांना ही बातमी समजली असून यांतून प्राण वाचण्यासाठीं आपण सिंहासनत्याग करावा असेंच त्यांनीं आपलें मत प्रगट केलें आहे."

"तर मग रोडझिन्कोला बोलावून घ्या" इतकें बोलून झारनें आपल्या सभोंवार एकवार शुष्क नजरेनें पाहिलें व सिंहासनत्यागाचा मसुदा कसा लिहावा या विचारांत तो मग्न झाला.

झारच्या इच्छेप्रमाणें रोडझिन्कोला टेलिफोनमधून बातमी देण्यांत आली; परंतु तशा त्या बिकट प्रसंगीं ड्यूमा सोडून जाणें त्याला इष्ट नसल्यामुळें त्यानें गचकॉफ व कार्यकारी सभेचा एक सभासद शल्गिन अशा दोघांस झारकडे रवाना केलें. त्यांची ट्रेन थोड्याच वेळानें हेड क्वार्टर्सपाशीं येऊन थडकली. जो झार वीस कोटी प्रजेचा मालक होता तो त्या वेळीं त्या दोघांच्या आगमनाची वाट मोठ्या उत्सुकतेनें पाहात होता. याचेंच नांव दैवदुर्विपाक.

त्या दोघां प्रतिनिधींना झारकडे नेण्यांत आलें, त्यावेळीं झार चिंताव्यग्रतेंत गुंग झालेला असून त्याच्याजवळ काउन्ट फ्रेडरिक्स हा एक त्याचा बगलबच्चा होता. आलेल्या दोघां प्रतिनिधींस पाहून झार म्हणाला "सर्व गोष्टी खुलासेवार व स्पष्ट सांगा!"

गचकॉफ म्हणाला, "पेट्रोग्रॅडमधील सर्व सैन्य आम्हांला मिळालें आहे. आतां इथून अधिक सैन्य धाडण्यांत अर्थ नाहीं. धाडल्यास तेंही सर्व आम्हांलाच येऊन मिळेल."

झारनें जरा कुर्यानेंच म्हटलें, “ तें सर्व माझ्या लक्ष्यांत आलें आहे बोला तर मग मीं आतां काय करावें अशी तुमची इच्छा आहे ! ”

गचकॉफ निश्चयी आवाजानें म्हणाला—“ आपल्याला सिंहासनत्यागावांचून आतां दुसरें गत्यंतर नाहीं. युवराजाच्या नांवानें राज्यसिंहासन लिहून द्या. ते वयांत येईपर्यंत ग्रॅन्ड ड्यूक मिकायल अलेक्झॅन्डरोविच यांना रीजेन्टी द्यावी अशी नव्या सरकारची इच्छा आहे. त्या नव्या सरकारची घटना प्रिन्स लॉफच्या अधिपत्याखालीं करण्यांत आली आहे. ”

हें ऐकून झारनें आपला हात झाडीत म्हटले “ माझ्या पुत्राला मी आपल्यापासून दूर करूं इच्छित नाहीं. ” इतके बोलून झारनें आपल्या सभोंवार एकदां निराशेचा दृष्टिप्रक्षेप केला व म्हटलें, “ आपल्यापाशीं एखादा साधा कोरा कागद आहे काय ! ”

झारच्या इच्छेप्रमाणें लगेच त्याच्यापुढें एक कोरा कागद व एक फाउन्टन पेन ठेवण्यांत आलें व जगांतील कोणच्याही इतर बादशहापेक्षांही आपल्या प्रजेवर जो झार निरंकुश अंमल गाजवीत होता त्यानें पुढीलप्रमाणें अधिकारपत्र स्वहस्तें लिहून दिलें.

काण्ड दहावें.

" रशियन जनतेला मी असें अधिकार-पत्र लिहून देतों कीं, ईश्वराच्या बलवत्तर इच्छेनें मी रशियाचा सम्राट पोलंडचा झार व फिन्लंडचा ड्यूक आपल्या प्रजेला असें कळवितों कीं:—



" गेलीं तीन वर्षें आमचा शत्रु आमच्यावर विजय मिळवून आम्हांला पारतंत्र्यांत टाकण्यासाठीं हर प्रयत्न करीत असतां अशा त्या भीषण प्रसंगीं मला माझ्यापुढें येऊन उभ्या राहिलेल्या राक्षसी अशा एका नव्याच प्रसंगांतून पार पडावें लागतें आहे. अशा भीषण युद्धप्रसंगींच राज्यांत माजलेली अशांतता सध्यांच्या काळाचें स्वरूप अधिक उग्र करून

राहिली आहे रशियाचें भाग्य, त्याच्या वीर्यशाली सेनेचें संरक्षण, जनतेचा भलेपणा व माझ्या प्रिय देशाचें भावी सौभाग्य या चार गोष्टींच्या संगोपनार्थ जें युद्ध लढलें जाईल त्याची अखेर विजयश्रींत होणेंच इष्ट असल्यामुळें तें तसेंच लढलें जावें. अत्याचारी शत्रु जरी आपल्या अखेरच्या प्रयत्नांना लागला आहे, तरी मित्र राष्ट्रांच्या सैन्याच्या खांद्याशीं खांदा भिडवून लढणारें आमचें सैन्य अंतीं यशःप्राप्ति करून घेतल्यावांचून राहाणार नाहीं व ती वेळ आतां जवळ येऊन ठेपली आहे. सध्यांच्या अणीबाणीच्या व निकराच्या प्रसंगीं सर्व शक्ति ऐक्यांत राहतील तरच शत्रुचा निःपात होणार आहे, म्हणून मित्र राष्ट्रांच्या शक्तींतून आमची शक्ति फुटून अलग होणें बेफायद्याचें होणार आहे. यास्तव ड्यूमाच्या इच्छेनुसार मी रशियाच्या सिंहासनाचा त्याग करून माझे सर्व अधिकार मी तीच्या ताब्यांत देतों आहें. माझ्या पुत्रानें माझ्यापासून दूर राहूं नये अशी माझी इच्छा असल्यामुळें मी माझा भाऊ ग्रँड ड्यूक मिकायल अलेक्झॅन्डरोविच यास सिंहासनाचा वारस नेमितों आहे. त्याची ही नेमणूक भावी काळाला लाभप्रद होवो. राष्ट्रीय व्यवस्थापक संस्थांशीं एकोप्यानें वागून देशाचें राज्य यथान्याय

चालविण्याच्या घेण्याच्या शपथेच्या आवश्यकतेवर मी आपल्या भावाची देशकल्याणार्थ सिंहासनावर नेमणूक केली आहे. मातृभूमीच्या पुत्रांना आमंत्रण देऊन त्यांना असें सांगण्याची माझी इच्छा आहे कीं, झारच्या आज्ञांचें परिपालन करून देशहित व आपलें पवित्र कर्तव्य त्यांनीं योग्य तऱ्हेनें बजवावें आणि त्याबरोबरच कठिण प्रसंगीं त्यांनीं आपल्या प्रतिनिधींसह झारला सदोदीत अशी मदत करावी कीं, ज्या योगें देशाचें राज्यशासन व सुख-समृद्धि यांचा उत्कर्षच होईल ... ... . ... .

परमात्मा राशियाचें संरक्षण करो. ”

# काण्ड अकरावें.

## रशियाच्या स्वातंत्र्याचा सूर्योदय !

पेट्रोग्रॅडचे लोक स्वातंत्र्याच्या सूर्योदयाच्या नूतन प्रकाशाचा सुखोपभोग घेण्याच्या नादात गुंग झाल्यामुळें, झारनें केलेल्या सिंहासनत्यागाची त्यांना चोवीस तासपर्यंत बातमी ऐकण्यास सवड झाली नाहीं. गव्हर्मेन्टच्या रचनेसंबधानें खडाजंगी वाद चालला होता. कोणी नियन्त्रित राजसत्तेवर व कोणी प्रजासत्ताक राज्यपद्धतीवर व्याख्यानें झोडण्यांत दंग होऊन गेले होते, परंतु बदललेल्या स्थितीचें मुख्य कारण कोणचें याचा दोन्ही पक्षांना पत्ता नव्हता. झाररवि तर यावेळीं आपल्या अस्तोन्मुख अशा अखेरच्या किरणांसह अस्तगिरीच्या गव्हरांत जाऊन पडला होता.

जणूं काय आजच राज्यक्रांति झाली असून आजच नव्या राज्यशासन पद्धतीचा निर्णय करायचा आहे या भावनेनें प्रेरित झाल्याप्रमाणें रशियाच्या क्रूर झारशाहीचा अन्त होऊन एक आठवडा होऊन गेला होता, तरी नव्या राज्यघटनेवरचे वादविवाद दररोज निरनिराळ्या स्वरूपात प्रगट होत होते. जहाल व मवाळ यांच्या मतांतील विरोध इतका कटुतर होऊन गेला होता कीं, त्याला प्राप्त झालेलें विषादपूर्ण स्वरूप

पाहून जरी एखादा विदेशी माणूस निराशेनें व्याप्त झाला असता, तरी रशियन जनता ताजा उत्साह व नवा जोम यांनीं फुलून गेली असल्या- मुळेंच तिच्या अंतःकरणांत निराशेचें अभ्रपटल आलेलें नव्हतें.

अखेरीस गुरूवारचा दिवस एकदांचा उजाडला. त्या दिवशीं पेट्रोग्रॅड शांततेंत व गंभीरावस्थेंत दिसूं लागलें. अशांततेची चळवळ शांततेंत लीन होऊन कांहीं दुकानेंही उघडलेलीं दिसत होतीं अनेक स्त्रीपुरुषांचे थवे रक्तवर्ण पताका धारण करून फिरतांना दिसूं लागले व हलके हलके ट्राम गाड्याही रस्त्यांतून लाल पताका फडकावीत धावूं लागल्या भयाण स्वरूप सोडून एका प्रकारच्या नव्या युगांत पेट्रोग्रॅड शिरत असलेलें दिसत होतें. सर्व जनता दोन विभागात वांटली गेली होती जी जनता नियंत्रित राजसत्ता पक्षाची असून ड्यूमाच्या बाजूची होती तिचें असें म्हणणें होतें कीं, ग्रॅन्ड ड्यूक मिकायलच्या अधिकाराखालीं नियंत्रित राजसत्तेची स्थापना व्हावी व दुसऱ्या पक्षीयांचें असें मत होतें कीं, एकदम प्रजा- सत्ताक राज्याची स्थापना केली जावी. मजूरवर्ग व सैनिक या दुसऱ्या प्रकारच्या राजसत्तेची मागणी जोरानें करीत होते व त्यांचा पक्षही जोर- दबस बनलेला होता. मजूरवर्ग अराजकतेच्या सामुग्रीसह सर्व नगरभर संचार करून राहिला होता व रोज ड्यूमा नवीं सर्क्युलरें काढून जनतेनें आपल्या पक्षाला मिळावें म्हणून नेटानें प्रयत्न करीत होती प्राणघात व रक्तपात यांवाचून जी स्वातंत्र्यप्राप्ति झाली होती ती सर्व नगरभर फुट- बॉल प्रमाणें ठोकरली जात होती. सम्जुन पडण्याच्या प्रश्नांची असं-

भवता दिसत होती. अशा भयंकर जनतेच्या तुफानांतून क्रांतीचे नेते स्वराज्यनौकेचें सुकाणूं स्वबुद्धिबळाच्या चातुर्यावर वल्हवून तिला परतिरीला नेण्याचा नेटानें प्रयत्न करीत होते. **प्रिन्स लॉफ** व **गचकॉफ** यांनीं हुकूमाचा भार आपल्या शिरावर धारण केला होता, व त्यांच्या सहचर मित्रांनीं नव्या मन्त्रिमंळाच्या निवडणुकीची शिकस्त जोरानें चालविली होती

शेवटा गुरुवारीं दोनप्रहरच्या सुमारास **मिल्युकॉफनें** नव्या मंत्रिमंडळाच्या निवडणुकीचें जाहीरपत्रक प्रसिद्ध केलें. त्यानें आपल्या प्रसिद्ध वक्तृत्वशक्तीच्या जोरावर पुढें दिल्याप्रमाणें नव्या मन्त्रिमंडळाची यादी पुकारली ती येणेंप्रमाणें:—

| | | |
|---|---|---|
| ( १ ) **प्रिन्स जॉर्ज लॉफ** | ... ... | प्रधान व अंतरराष्ट्रीय मंत्री. |
| ( २ ) **मिल्यूकॉफ** | .. | परराष्ट्रीय सचीव. |
| ( ३ ) **गचकॉफ** | ... ... ... | युद्धमंत्री. |
| ( ४ ) **केरेन्स्की** | ... ... ... | न्यायमंत्री. |
| ( ५ ) **मिकायल टरचेन्को** | ... ... | अर्थसचिव. |
| ( ६ ) **शिंगरॉफ** | ... ... ... | कृषिमंत्री. |
| ( ७ ) **कॉनॉवलॉफ** | ... ... | औद्योगिकमंत्री. |
| ( ८ ) **निकारालॉफ** | ... ... ... | मार्ग व डाक-विभागमंत्री. |
| ( ९ ) **मॉनिलॉफ** | ... ... ... | शिक्षण-मंत्री. |
| ( १० ) **रॉडनॉफ** | ... ... ... | शासन-मंत्री. |

(११) व्लॉडमीरलॉफ ...... धार्मिक-मंत्री.
(१२) थियोडोर रोडीचॉफ ... फिन्लंडीय-मंत्री.

ही **बारा मंत्र्यांची नामावळी** प्रसिद्ध केल्यानंतर **मिल्यूकॉफ** आपल्या वक्तृत्वपूर्ण अशा उच्च स्वरानें म्हणाला:—

" नव्या मंत्रिमंडळाची निवड कोणी केली ? असा प्रश्न विचारण्यांत येतो आहे असें माझ्या कानांवर आलें आहे. मी कोणाचीहीं, जातीनें स्वत: निवड केलेली नाहीं. सध्यां निवडलेल्या मंत्रीमंडळाची निवडणूक जर करण्यात आली नसती, तर आम्हांला शत्रूचा पराभव करणें असंभवनीय होऊन शत्रूपक्ष जोरकस झाला असता व त्यानें आमचा चक्काचूर केला असता. आमची निवड प्रत्यक्ष रशियन राज्यक्रांतीनें केली आहे. या निवडणुकीला उशीर लागला असता, तर देशनाशाचा संभव होता. ज्या पुढाऱ्यांनीं क्रांती घडवून आणली अशा त्या जुन्या राज्यपद्धतीला हद्दपार करणाऱ्या राजनैतिक, कार्यकारी आणि जनतेच्या अगदीं विश्वासपात्र पुढाऱ्यांचीच मंत्रीमंडळांत निवड झालेली असून, सध्याच्या नाजुक वेळीं त्याच्याच साह्याच्या जोरावर आम्ही प्रजाप्रतिनिधींच्या पुढें उत्तर देण्यास तयार झालों आहोंत.

प्रजाप्रतिनिधींचें जर असें म्हणणें असेल कीं, सध्यांच्या निवडून आलेल्या मंत्रिमंडळापेक्षा अधिक विश्वासपात्र अशा नव्या निवडीच्या मंत्रिमंडळाला निवडण्याची आमची इच्छा आहे, तर आम्ही त्याच्या इच्छे-

विरुद्ध एक क्षणभरही ड्यूमा सभेत राहाणार नाहीं. सज्जनहो, माझ्या-वर विश्वास ठेवा. नवें मंत्रिमंडळ सत्ता व शक्ति यांच्या उपार्जनाचा प्रयत्न करणार नाहीं. स्वतःच्या खुषीनें सत्ताधारी कधींच बनतां यायचें नाहीं व तें कोणच्याही पुरस्काराचें लक्षण नसून, खरी खुषी स्वार्थत्याग व आदर यातच असते. आम्ही पतकरलेल्या जनसेवेची जनतेला ज्या वेळीं आवश्यकता वाटणार नाहीं, त्यावेळीं आम्ही कृतज्ञतापूर्वक ताबड-तोब स्वस्थानत्याग करण्यास माघार घेणार नाहीं. वास्तव, ज्या आमच्या जनसेवापरायणतेवरच जनतेचें स्वास्थ्य व कल्याण अवलंबून आहे त्या सेवेची बळकटी आम्ही सोडणार नाहीं. या प्रसंगीं जर आम्ही यत्किं-चित ढिलाईचें वर्तन केलें तर सर्व शक्ति शत्रूच्या हस्तगत होण्याचा पूर्ण संभव आहे. ज्या शक्तीच्या जोरावर रशिया नाशाच्या अगदीं सरहद्दीवर जाऊन पोंचला आहे त्या शक्तीला स्वेच्छेनें अथवा बलपूर्वक सिंहासनत्याग करण्यास लावण्याची अत्यन्त आवश्यकता आहे. शासना-धिकार रीजन्टच्या ताब्यांत दिला जाऊन तें स्थान **ग्रॅन्ड ड्यूक मिका-यल अलेक्झॅन्डरोविच** यास दिलें जाईल व युवराज **अलिक्स** यास राजसिंहासनाधिकारी करण्यांत येईल."

**ड्यूमा**मध्यें हें संभाषण होत होतें त्याच्या आधीं बारा तास **झार**नें आपल्या सिंहासनत्यागाचें पत्र स्वहस्तें लिहिलें होतें. त्यानंतर चोवीस घटेपर्यंत जरी ती बातमी जनतेला समजली नव्हती, तरी वरील वक्तृ-त्वांत नव्या राज्यसंघटनेचा जो उल्लेख करण्यात आला तो ऐकून जन-

तेंत पुन्हां खळबळ उडून गेली. मजूरवर्ग आणि सैनिक यांच्या प्रजासत्तावादी कौन्सिलनें जनतेंत प्रजासत्ताक राज्यस्थापनेची अशी भयंकर आग पेटवून दिली होती कीं, त्यामुळें जनतेनें एकदम प्रजासत्ताक राज्यस्थापनेचीच ड्यूमाकडे जोराची मागणी केली. ड्यूमा सभेनें ठरविलल्या रीजन्सीच्या तंत्रानें राज्यकारभार चालवण्यानें स्वातंत्र्याचा गळेचेपी होईल असें त्या कौन्सिलचें मत होतें व त्यामुळें कौन्सिलनें स्पष्ट शब्दांत ड्यूमाला असें सांगितलें कीं, " आम्हाला जें प्रजासत्ताक राज्य हवें आहे तेंच आम्हाला दिलें जावें. "

तो राज्यक्रांतीचा भयानक प्रसंग असल्यामुळें क्षणात काय होईल त्याचा अंदाज करणें कठिण झालें होतें; पण केरेन्स्कीनें पुन्हां एकवार प्रसंग साधला. आपल्या मधुर आवाजानें त्यानें ड्यूमा सभेत आपल्या मोहनीय अशा वक्तृत्वाचा [illegible]

" माझे प्रिय देशबांधवहो, मला न्यायविभागमंत्री नेमण्यांत आलें आहे. या नव्या सरकारशीं मी सहकारितेनें आपलें काम प्रजेच्या मतानेंच करणार आहे. माझा माझ्यावर जितका विश्वास आहे तितकाच माझ्या देशबांधवांवरही खरोखर आहे. "

" आमचा तुमच्यावर विश्वास आहे. " अशी ड्यूमेंत एकच आरोळी उठली.

यावर केरेन्स्की पुन्हां म्हणाला, " जनतेच्या संमतीशिवाय मी क्षणभरही जिवंत राहाण्याचें पतकरणार नाहीं.

आपला माझ्यासंबंधानें काडीभर जरी अविश्वास झाला तरी मला तावडतोब गोळी घालून ठार मारून टाका. नव्या मंत्रिमंडळाला मी स्पष्टपणें असें सांगतों कीं, मी लोकसत्ताक प्रतिनिधि आहे. जनतेच्या प्रतिनिधिस्वरूपानें प्रगट करणारी माझीं मतें ड्यूमानें मानिलीं पाहिजेत. कारण, जुन्या शासनपद्धतीचा नाश जनतेच्याच प्रयत्नानें झालेला आहे. देशबांधवहो, काळ कशाचीही वाट पाहात नसतो. माझी तुम्हांला आतां अशी प्रार्थना आहे कीं, पुढील उद्योग तुम्हांला मोठ्या दक्षतेनें व काळजीपूर्वक केला पाहिजे. यासाठीं एकमताचे व्हा. आम्ही लोक तुमचे प्रतिनिधि आहोंत व तुमच्या सुखासाठीं मरून जाणें ही आम्हांला मुळींच भयप्रद वाटत नाहीं. आपण सर्वांनीं मिळून आम्हांला मदत करणें आपलें कर्तव्य आहे. ”

याप्रमाणें उद्भवलेलें संकट पुन्हां एकवार टळलें व प्रजाशर्दांनींही युद्धसमाप्तीपर्यंत नव्या मंत्रिमंडळाची व्यवस्था केरेन्स्कीच्या म्हणण्याप्रमाणें कबूल केली.

मजूर–वर्ग आणि सैनिक यांची शक्ति फारच वाढल्यामुळें त्यांच्या कौन्सिलनें प्रजासत्ताक राज्याच्या मागणीचा ड्यूमाकडे फारच नेट लावला. झारशाहीच्या यत्किंचित तत्त्वाचाही राज्यकारभारात समावेश होतां उपयोगी नाहीं असें त्यानीं स्पष्ट सांगितलें व त्यामुळें ड्यूमानेंही अखेरीस त्यांच्या मागणीचा अवलंब करण्याचें निश्चित केलें. प्रधानमंत्री

## काण्ड अकरावें.

प्रिन्स लॉफ आणि न्यायमंत्री केरेन्स्की अशा दोघांना ग्रँड ड्यूककडे ड्यूमानें धाडिलें. त्यांची भेट होईपर्यंत ग्रॅन्ड ड्यूक स्वतःला राज्यसंरक्षक रीजन्ट असेंच समजत होता. भेटीनंतर केरेन्स्की ड्यूकला म्हणाला—

"आम्ही प्रजामतवादी लोक असून प्रजेचें म्हणणें आपणांस कळवायला आलों आहोंत."

ड्यूक म्हणाला "प्रजेचें काय म्हणणें आहे?"

केरेन्स्की बोलू लागला, "इतउत्तर रीजन्सीचा सर्व अधिकार नव्या स्थापन झालेल्या सरकाच्या हातीं देणें जरूरीचें झालें आहे. संपूर्ण लोकमताच्या अधारावर प्रतिनिधि सभा निवडून त्या सभेकडून राज्ययंत्र चालवावें अशी प्रजेची इच्छा आहे."

हें भाषण ऐकून ड्यूक स्तब्ध झाला. त्याची दृष्टी निराशेनें व्याप्त झाली. राजसत्तेच्या मृत्यूच्या अखेरीचें हें वृत्त ऐकून त्याच्या हृदयावर वज्राघाताचा धक्का बसला! त्यानें शेवटीं झारप्रमाणेंच प्रजेच्यापुढें आपलें मस्तक नमावलें.

प्रिन्स लॉफनें लिहून देण्यास सांगितल्याप्रमाणें जें पत्र ड्यूकनें मोठ्या धैर्यानें लिहून दिलें तें येणेंप्रमाणें:—

अभूतपूर्व युद्ध सुरू असतां प्रजेंत जो असंतोष उत्पन्न झाला होता तो शमविण्यासाठीं माझ्या भावानें

आपलें सिंहासन मला पूर्णाधिकारानें दिलें त्याचें संरक्षण मी प्रजानुमतें आतांपर्यंत केलें. आतां प्रजेची इच्छा सर्व देश व राष्ट्र यांच्या हितार्थ प्रजासत्तक राज्य असावें अशी असल्यामुळे मी ती मान्य करतों व नव्या स्थापन झालेल्या मंत्रिमंडळाच्या स्वाधीन मी राज्याधिकाराचीं सर्व सूत्रें या पत्रानें देतों. प्रजाप्रतिनिधिमंडळाची कायमची निवडणूक होऊन त्यांच्या हातून राष्ट्रहित होवो. परमेश्वराच्या आशीर्वादार्थ प्रार्थना करून मी जनतेलाही प्रार्थनापूर्वक विनति करतों कीं, तिनें देशकल्याणार्थ प्रातिनिधिक राज्यतंत्रानें वागण्यास इतउत्तर माघार न घेतां देशकल्याण झटून करावें. परमेश्वर रशियाच्या स्वतंत्र राजासत्तक राज्याचें रक्षण व कल्याण करो!"

येणेंप्रमाणें मजकूर लिहिणें झाल्यावर ड्यूकनें मोठ्या गंभीरपणानें त्याच्या खालीं आपली सही केली व ती सहीची शाई वाळतांच रशियाच्या राजसत्ताक राज्याचा वृक्षही वठून जमीनदोस्त झाला!

हें पत्र हातीं पडताच नव्या मंत्रिमंडळानें जनतेला उद्देशून जें पत्रक प्रसिद्ध केलें तें पुढीलप्रमाणें—

" नागरिकहो,

फार मोठें कार्य आतां उरकलें आहे. एकाच जबरदस्त धक्यासरसें रशियन जनतेचें जुनें राजयंत्र उखडून

फेंकून दिलें असल्यामुळें रशियाला नवा जन्म प्राप्त झाला. १९०५ सालीं सुधारणांचें आश्वासन देण्यांत आलें होतें, परंतु त्याची पूर्तता करण्यांत आली नाहीं. ड्यूमेचीं दोन अधिवेशनें अधिकाराच्या जोरांत मोडून टाकण्यांत आलीं होतीं. १९०७ मध्यें प्रजेचे बरेच हक्क जरी काढून घेण्यांत आले होते तरी प्रजामताला चिरडून टाकणें अशक्य होतें. गेल्या दहा वर्षांत जुन्या सरकारनें एकामागून एक जनतेचे सर्व अधिकार छिनवून घेतले होते व जनतेवर निरंकुश राजसत्तेचा अंमल सुरू होता. न्यायाचा नायनाट करून जगद्व्यापी युद्धांत जुन्या सरकारनें भाग घेतल्या-मुळें प्रजेच्या मताविरुद्ध रशियन झारशाही आपल्या प्रजेचें रणयज्ञांत व्यर्थ बलिदान करीत असल्याचें सिद्ध होऊन त्यायोगें राष्ट्राचें नैतिक पतन झालें आहे. सैन्याचें वीर्य आणि प्रजेचें ऐक्य यांचा अपमान केला जाऊन त्या दोन्ही गोष्टींचा झारशाहीनें पूर्ण दुरुपयोग केला. अशा तऱ्हेनें क्रूर झारशाही रशियाच्या सर्व नाशाच्या सीमेवर जाऊन पोंचली असतां, जनतेनें त्या शाहीला नष्ट करून राज्यतंत्र आपल्या ताब्यांत घेतलें. देशव्यापी क्रांती होऊन ड्यूमानें राज्याधिकारसूत्रें प्रजाजनांच्या अनुशासना प्रमाणें आपल्या हातीं घेतलीं. तात्पुरतें मंत्रिमंडळ स्थापन

करण्यांत आलें. सार्वजनिक मतानुसार आपलें काम चाल-विणें हेंच पवित्र कर्तव्य कर्म आहे असें ड्यूमा मानते आहे. सर्व नागरिकांच्या मतानुसार राज्यशकट हांकण्याची योजना ड्यूमानें योजिली असून तेंच ती आपलें कर्तव्य समजते आहे व त्यायोगेंच रशियन जनतेची उन्नति होणार आहे. स्वदेशहितार्थ जे सैनिक स्वदेशावास त्यानें अद्यापी शत्रूशीं झुंजताहेत त्यांनींच जुनी राज्यपद्धति मोडून टाकण्यास मदत केली असल्यामुळें त्यांना युद्धांत विजयश्री माळ घातल्यावांचून राहाणार नाहीं. युद्धांत विजय मिळविण्यास लागणाऱ्या सर्व सामुग्रीचा पुरवठा करण्यास नवें मन्त्रिमंडळ तयार आहे. रणभूमीवर शत्रूशीं लढत असलेल्या सैनिकांचीं मतें प्रजासत्ताक राज्यपद्धतींत घेण्याची योजना करण्यांत आली आहे. आतां फारच लौकर प्रजाप्रातिनिधिक मंडळाची निवड करण्यांत येऊन व्यक्तिस्वातंत्र्याच्या मतानुरोधें देशरक्षक कायदे करण्यांत येतील. रशियन प्रजेंतील प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिस्वातंत्र्याचें रक्षण करूनच देशाचा राज्य कारभार चालवला जाईल. ड्यूमा सभा देशांतील सर्व कारागीर, मजूर, शेतकरी वगैरे लोकांचा प्रसन्नतेनें आदर करून जे लोक बिनाकारण हद्दपारी भोगीत आहेत व

जे तुरुंगांत खिचपत पडले आहेत. त्यांना मुक्त करण्यांत येणार आहे. रशियन जनता एकमतानें ड्यूमाला साह्य करील असा मंत्रिमंडळाला पूर्ण विश्वास आहे."

ड्यूमा व जनता एक झाली नसती तर झारशाहीनें जनतेला पार चिरडून टाकली असती; पण तसा योग आणणें परमेश्वराला आवडत नव्हतें असें म्हणण्यावांचून गत्यंतर नाहीं. ड्यूमानें आपलें नांव जगाद्धितिहासाच्या पृष्ठावर चिरस्मरणीय करून ठेवून आततायी व क्रूर झारशाहीचा नाश केल्यानेंच रशियाला स्वातंत्र्याचा नवा सूर्योदय दिसला यात शंका नाहीं!

ड्यूमाचें अधिवेशन जरी बंद झालें होतें, तरी मजूर पक्ष व सैनिक पक्ष यांच्या कौन्सिलाच्या बैठकी ठराविक वेळीं भरतच होत्या. कौन्सिलाची कारवाई नित्य नव्या गोष्टींना जन्म देत होती. खरें पाहिलें असतां नव्या रशियाचा जन्म याच कौन्सिलाच्या साहाय्यानें झाला होता यांत संशय मानण्याचें कारण नाहीं.

नव्या मंत्रिमंडळाच्या हातीं सर्व कारभार गेल्यावर क्रांतीची अखेर झाली व सर्व कारभार सुयंत्रित चालण्याची सुरुवात झाली. राजनीतिनिपुणाना आपली व्यावहारिक योग्यता स्पष्ट करण्याचा पूर्ण सुयोग प्राप्त झाला. टीरशचेन्को कॉनोलॉफ व पंचायतीचा पूर्वीचा मुख्य मिल्स लॉफ वगैरे रशियाच्या राज्यनितिज्ञानीं रशियाचा राज्यकारभार उच्च तत्वांवर प्रचालित करण्यांत आपलें बुद्धिसर्वस्व खर्च करण्याची सुरु-

वात केली. **प्रिन्स लॉफ** हा प्रधानमंत्री व अंतरराष्ट्रीयमंत्री असल्यामुळें त्यानें आपल्या बुद्धिमत्तेची सर्व राज्यसुधारणांचा बाबतींत शिकस्त करण्यास आरंभ केला.

**गचकॉफला** रणांगणावर लढत असलेल्या सैनिकाकडे धाडण्यांत आलें. त्यानें सैनिकांत नव्या सरकाराबद्दल विश्वास उत्पन्न करण्यासारखीं परिणामकारक अशीं उत्तम व्याख्यानें दिलीं. त्यावेळीं सेनाध्यक्ष जनरल **अलेक्झीफ** हा होता. त्याची नेमणूक नव्या मंत्रिमंडळानेच केली होती.

याप्रमाणें नव्या राजसत्तेनें मोठ्या जलदीनें इतर शासन-विभागाचीही व्यवस्था करण्याची सुरुवात केली. औद्योगिक व्यवस्था **कॉन्वलॉफच्या** हातीं देण्यात आली. त्यानें त्या खात्याची पुनर्घटना इतक्या उत्तम तऱ्हेनें केली कीं, जुने जे तद्विषयक अधिकारी घरोघर स्वस्थ बसविण्यांत आले होते त्यानीं तोंडांत बोटेंच घातलीं ! एका अमेरिकन कंपनीला कंत्राट देण्यात येऊन तिच्याकडून विद्युत्यंत्रांच्या सामानाचा व रेल्वे वगैरे बाबींच्या सामानाचा पुरवठा करण्यांत आला आणि सर्व कारभार सुसंघटित व सुव्यवस्थित चालू होईल अशी त्वरित योजना करण्यांत आली.

**प्रजातंत्र—**

राज्यक्रांतीच्या प्रारंभीच्या दिवसात पेट्रोग्रॅड नगरीला जरी रणक्षे-त्राचें स्वरूप प्राप्त झालें होतें, तरी क्रांतीच्या सुरुवातीनंतर त्या नगरीनें उत्साहस्तंभाचें स्वरूप प्रगट केलें होतें. जी स्वातंत्र्यदेवी एके काळीं त्या स्तंभाच्या पायथ्याशीं खिचपत पडली होती तीच आज त्या उत्साहस्तंभावर मोठ्या आनंदानें विराजमान झालेली दिसत होती.

# काण्ड अकरावें.

एका अत्यन्त तिमिराच्छादित रात्रीनंतर उगवलेल्या सुप्रभाताच्या रश्मिजालांत रशियाच्या नवजीवनाचा प्रारंभ झाला होता. त्या स्वातन्त्र्य-रवीच्या आनंदमय प्रकाशांत रशियन जनता कैदमुक्त झालेल्या लोकांच्या चकित नेत्रांसह विहार करतांना दिसत होती. ज्या स्थलीं १९०५ मध्यें नव्या सुधारणा मागणारांच्या रक्ताचे सडे ज्या क्रूर झारशाहीनें शिंपडले होते त्याच ठिकाणीं त्या प्रातःकाळीं त्या अत्याचारी झारशाहीचा नायनाट करणारी रशियन जनता व्यक्तिस्वातंत्र्याबरोबर प्रजाप्रातिनिधिक स्वराज्यस्वातंत्र्याचा उपभोग घेण्यांत दंग झालेली दिसत होती. पारतन्त्र्याच्या शृंखला खाडकन तोडून स्वातन्त्र्योपभोग घेऊं लागलेली रशियन जनता गर्वोद्धत न होता त्यांची मस्तकें नैतिक आचरणानें नम्र झालेलीं दिसत होतीं. तीं मस्तकें त्यावेळीं स्वातन्त्र्य देवीच्या पायांवर वाहिलेल्या प्रफुल्ल रक्तकमलांप्रमाणें प्रसन्न दिसत होती. रशियन जनता जगांतल्या इतर सभ्यजनतेच्या पंक्तीला बसून आपली छाती वर काढून असें सांगू लागली होती कीं, " **स्वातंत्र्याच्या मंदिरावर कोणीही आपली पक्की मोहोर करूं शकत नाहीं व मोल देऊन कुलीनपणा विकत मिळत नाहीं !** "

सैबेरियामधून कैदमुक्त झालेले देशभक्त रोज पेट्रोग्रॅडमध्यें येऊं लागले होते व त्यांची देशसेवा बिनमोल असल्यामुळें तेथें त्यांचें आदरपूर्वक स्वागत करण्यात येत होतें. व्यक्तिगत स्वातंत्र्य व समानता यांची भावना सर्वांच्या हृदयांत पुरी ठसल्यामुळें उच्चनीचपणाच्या आसल्या

झालेल्या कल्पित सीमेची रेषा लुप्त होणें अगदीं साहाजिक होतें. रशियन झारशाहीनें बरेच दिवस ज्यूलोकांना अस्पृश्य व नीच मानिलें होतें, पण सांप्रतच्या स्थितीनें त्यांची गुलामगिरी नष्ट करून समानतेच्या तत्वावर त्यांनाही जनतेचें सौख्य प्राप्त झालें.

बुइन्टर पॅलेसवर ( राजवाडा ) क्रांतीचा रक्तवर्ण ध्वज मोठ्या ऐटीनें फडकत होता व राजवाड्याच्या अग्र दरवाजावरील दोहों बाजूंच्या गरुड पक्ष्याच्या मूर्तीवर रक्तवर्ण वस्त्राचें आच्छादन घालण्यात आलें होतें. पारतंत्र्याच्या एका दीर्घ कालीन युगानंतर स्वातंत्र्याच्या ह्या युगाचा जो प्रकाश पडला होता त्यांत घडून येणाऱ्या प्रत्येक नव्या गोष्टीबद्दल जनतेंत आश्चर्यजनक भावाचा आनंद वेळोंवेळीं पसरत होता. प्रत्येकाच्या भाषणात स्वातंत्र्याची चर्चा ऐकू येत असून प्रत्येकाच्या डोक्यांत निरनिराळी कल्पना काम करीत होती सर्व जनता आपल्या स्वतंत्र विचारांत गुंग झाली होती. प्राप्त झालेलें स्वातंत्र्य हें एक स्वप्न तर नाहींना ! किंवा अरेबियन नाइट मधला हा एक हवेंतला बंगला तर दिसत नसेलना ! असेही प्रश्न कित्येकांच्या मनांत उत्पन्न होते. त्यावेळीं सर्व रशिया देश हा एक निरनिराळ्या चर्चेचें कथाल-यच बनून गेला होता. त्यावेळी एक परदेशचा प्रवासी रशियाची तत्कालीन स्थिति अवलोकन करीत हिंडत असतां भीति व शंका यांनीं त्याचे डोळे भरून गेल्यामुळें त्यानें असे उद्गार काढलेले प्रसिद्ध झाले आहेत की, " रशियाची ही शान्ततांविहीन स्थिति किती विषम

टिकणार तें सांगतां येणें कठीण आहे." पण खरी गोष्ट तशी नव्हती. लोकांची मुस्कटदाबी उठल्यामुळेंच जनता मनमोकळेपणानें पोटांत सांचलेले पारतंत्र्यांतले विचार स्पष्टपणें स्वातंत्र्यांत बोलत होती. याबाबतींत **केरेन्सकीनें** एका अमेरिकन वृत्तपत्रांत जें पत्र प्रसिद्ध केलें होतें त्याचा आशय असा होता कीं, "**रशियन जनतेला सध्यां इतकेंच ज्ञान प्राप्त झालें आहे कीं, आपली मुस्कटदाबी रसातळाला जाऊन आपण आपले मनोगत विचार स्पष्टपणें बोलून दाखविण्याच्या वातावरणांत शिरलो आहोत, आणि त्याचमुळें ज्याला जे वाटेल तें तो मोकळ्या मनानें बोलूं लागला आहे. पण आपल्यास सदैव यापुढें असेंच बोलतां येणें आतां शक्य आहे असे जेव्हां जनतेला ज्ञान प्राप्त होईल तेव्हां तिची ती उच्छृंखलतेची बडबड आपोआपच बंद होईल हें खास.**"

**क्रांतीचे महत्व—**

पराधीनतेपेक्षा मृत्यु बरा. कारण, तिच्यापासून अत्यंत क्लेश व त्रास यांनी जीवाला यातना होतात. कोणचेंही राष्ट्र मृत आहे असें म्हणणं म्हणजे त्याचा अर्थ त्या राष्ट्राचा पुनर्जन्म होणार नाहीं असा होत नाहीं. कारण, राष्ट्राचा मृत्यु हें एक असें मुमुक्षु युग आहे कीं, मृत राष्ट्राच्या अस्थींवरच तें नूतन गृह निमार्ण करीत असतें. सुप्तावस्थेला मृतावस्था असें म्हणतात. जेव्हां एखादी वस्तु, एखादी जात अथवा एखादा जीव

# रशियांतील बोल्शेव्हिझम् !

यांचा विकास होणें बंद होतें तेव्हांच त्याच्या मृत्युयुगाचा आरंभ होत असतो; पण हा मृत्यु देहान्तर्गत धमन्यातील जीव नष्ट करून टाकणारा नसतो. मृत्यु हा जन्माला जन्म देतो. अशा तऱ्हेच्या मृत्यूनें जगातील सर्व राष्ट्रांवर झडपा मारून त्यांना वेळोवेळीं जरी सुप्तावस्थेंत नेऊन सोडलीं, तरी त्यांचें पुनर्जननहीं तो त्याच्या सन्निध ठेवीतच असतो. याच न्यायानें मृत मानलें गेलेलें जगांतलें कोणचेंही राष्ट्र पुनर्जन्माच्याच तयारींत असतें. तें निश्चयानेंच एके दिवशीं पुनर्जन्म पावून जगाला नवाच सन्देश सांगतें ! हीच गोष्ट आज रशियानें पुनर्जन्म पावून केली आहे. त्यानें जगाला जी बातमी सांगितली आहे त्यानें जगांतल्या सजीव व निर्जीव अशा दोन्ही प्रकारच्या राष्ट्रांतून खळबळ उडवून दिली आहे. तो सन्देश कशानेंही व कोणाच्यानेंही लपवला गेला नाहीं. याचें प्रत्यंतर जगाच्या सद्यःस्थितीवरून वाचकांस येईलच. अत्यंत पीडेनें त्रस्त झालेल्या व अत्याचारांनीं दडपेगिरीच्या शस्त्रानें गुलामगिरींत गाडल्या गेलेल्या जगातल्या एका राष्ट्रानें आज जगापुढें जो सिद्धान्तादर्श मांडला आहे त्याचा रशियन जनतेमध्यें विकास कोणच्या तऱ्हेनें झाला त्याच्या इतिहासाचा संबंध रशियन राज्यक्रांतीशीं अगदी निकटपणाचा आहे. आजपर्यंत युरोपीय साम्यवाद्यांच्या प्रवक्तृत्वांत जी कृत्रिपणाचीं व्याख्यानें ऐकूं येत होतीं अथवा जीं वाक्यें केवळ कागद व शाई याच्याच स्वरूपांत दिसत होतीं त्यांना रशियन जनतेनें कशा तऱ्हेचें व्यावहारिक परिणतेचें स्वरूप दिलें तें आतां पुढें दिसेल.

## काण्ड अकरावें.

रशियाची कायापालट फक्त एकाच सप्तकांत पूर्णपणें घडून आली! ज्या बुइन्टर राजवाड्यांत एखाद्या साधारण व्यक्तीला प्रवेश करणें म्हणजे एका आठवड्यापूर्वी मृत्यूच्या दारांत पाय टाकण्याप्रमाणें वाटत होतें त्याच राजवाड्यांत आतां रशियन जनता स्वच्छंदानें विहार करते आहे! पांच हजार मनुष्यांच्या बलिदानानें वीस कोटी रशियनांनी मिळविलेलें स्वातंत्र्य त्यांना फारच स्वस्ताईच्या भावानें मिळालें नाहीं असें कोण म्हणेल? याचसाठीं रशियनक्रांतीचें नांव रक्तपाताबरोबर उच्चारलें जात नाहीं. रशियन जनता राज्यक्रांतीसाठीं तयार झाली होती, तिची तयारी प्रत्येक रशियनाच्या हृदयांत होऊन राहिली होती, वेळ प्राप्त झाली आणि क्षणांत क्रांतीचें स्वरूप प्रगट झालें! सर्व राष्ट्राच्या भावनेचें बळ प्रबल गतीनें पुढें सरसावलें. अशा परिस्थितींत रशियन जनतेला स्वतंत्रता देवीच्या मन्दिरापर्यंत जाऊन पोंचूं न देण्याइतकी कोणची प्रबल शक्ति असणार?

फ्रान्सच्या राजक्रांतीनें अर्धशतक पर्यंत फक्त युरोपलाच कंपायमान करून सोडिलें होतें पण रशियन राज्यक्रांतीनें तर अखिल भूमंडळ हादरून सोडलें आहे! याचें कारण घटनेचें महत्व नसून सिद्धांताची उच्चता हें आहे. आज जे सर्व जगाचे डोळे मोठ्या उत्सुकतेनें रशियाकडे लागले आहेत तेंच याची साक्ष पटवीत आहेत.

यावरून एवढेंच स्वातंत्र्येच्छून लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, अत्यंत बिकट अशा गोष्टीतून पार पडल्यावांचून उत्तम गोष्ट दिसत नसते. ज्या

उत्तम गोष्टीची प्राप्ति आज रशियानें करून घेतली आहे ती प्राप्त करून घेण्यासाठीं त्याला केवढाल्या भयंकर गोष्टींशीं सामना द्यावा लागून स्वराष्ट्राच्या स्वातंत्र्यप्राप्त्यर्थ कसें बलिदान करावें लागलें ही विचार करण्यासारखी गोष्ट नाहीं असें कोण म्हणेल ?

**राज्यक्रान्तीचा प्रभाव—**

रशियन राज्यक्रांतीचा प्रभाव अखिल भूमंडळावर आज पडलेला आहे. विशेषत त्याचा प्रभाव एक प्रकारे टाळण्यास अशक्य व धोक्याचा असा स्पष्टपणें अखिल युरोपखंडावर पडला आहे याचें कारण आज वीस कोटी प्रजेच्या एका देशानें स्वातंत्र्यप्राप्ति करून घेतली आहे हें होय. **झारशाहीच्या** पतनाबरोबर युरोपांतल्या प्रत्येक निरंकुश राजसत्तेच्या नाड्या तुटण्याची वेळ समीप येऊन तिला पाय-बंद लागले गेले आहेत **इंग्लंड** व **जर्मनी** यांवर रशियन क्रांतीचा प्रभाव फारच प्रखरतेनें पडला आहे. त्यांतल्या त्यांत **इंग्लंडवर** तर इतका चमत्कारिक प्रभाव पडला आहे की जे लोक, इंग्लंडच्या राज्य घटनेचा व राज्यकारभाराचा गर्व वाहत असत तेच सध्यां असें म्हणूं लागले आहेत की, '**रशिया हा प्रजाप्रातिनिधिक प्रजासत्ताक राज्यस्थापनेनें आम्हांला आदर्शभूत होणार की काय ?**' पण वास्तविक खरी स्थिति अशी आहे की, रशियानें घडवून आणलेल्या राज्यक्रांतीनें एका विशिष्ट प्रकारच्या प्रजाप्रातिनिधिक राज्यसत्तेला जन्म दिला आहे हें कोणालाही नाकबूल करतां यायचें नाहीं. **जर्मनी**तही ज

## काण्ड अकरावें.

लोक कैसरच्या राज्यपद्धतीची वाखाणणी करीत होते त्यांचीही मनें या क्रांतीनें आकर्षित होऊन तेही असें म्हणूं लागले आहेत कीं, '**आमचीही राज्यशासनपद्धती रशियासारखी होणें इष्ट आहे.**'

मि वेसफोर्ड आपल्या एका लेखांत असें वाक्य लिहितो कीं, '**झारच्या पतनानें जगांतल्या स्वेच्छाचारी शास्त्यांचा अन्त समीप ओढून आणिला असून आतां या पुढें दंडूकेबाजीची दडपेशाही व स्वेच्छाचाराची राज्यनिति या दोन्ही गोष्टी जगांत फार दिवस टिकणें अत्यंत दुर्घट आहे!**'

युरोपांत ज्या फ्रेंच-राज्यक्रांतीनें पाया घातला त्यावरच **रशियानें** स्वातंत्र्याची इमारत उभारली असल्यामुळें सर्व युरोपभर लोकसत्तेची प्रचंड लाट येऊन आदळली आहे व तिचा प्रतिकार युरोपांत कोणी करू शकेल अशी एकही प्रचंड शक्ति सध्यां अस्तित्वांत नसून, त्या लाटेला पुष्टि देणारी जनता मात्र तेथें धिटाईनें अस्तन्या सारून पुढें सरसावली आहे. व्यक्तिगत जीवनाच्या पर्यंगाला स्वतंत्र बनविण्याचा रशियानें जो अभूतपूर्व प्रयत्न केला आहे त्याकडेच युरोपची जनता वेगानें धांव मारते आहे. युरोपांतल्या ज्या राष्ट्रांनीं जगांतल्या इतर अनेक राष्ट्रांचें स्वातंत्र्य हरण करून आपल्या साम्राज्यांच्या स्थापना केल्या आहेत त्यांचे तुकडे उडण्याचा काळ अगदीं समीप आला असून, पारतंत्र्यांत रखडत पडलेले देशही स्वातंत्र्यांत मग्न होऊन त्यांचे लोकसत्ताक समूह बनण्याचा आणि आज जें युरोपखंड अखिल भूमंडळाला पारतंत्र्यांत

## रशियांतील बोल्शेविझम् !

गुरफटून टाकण्याच्या मतलबानें खोट्या लोकसत्तेच्या थापांचे धडे शिकवू पाहात आहे त्यांच्या ऐवजीं खऱ्या स्वातंत्र्याच्या शिक्षणाच्या शाळा सर्वत्र लवकरच उघडल्या जाण्याचीही वेळ नजीकच येऊन ठेपली आहे यांत संशय नाहीं !

ह्या राशियन राज्यक्रांतीचा परिणाम आर्थीक जगावरही पडलेला दिसतो आहे. आजपर्यंत संपत्तीच्या बळावर धनिक लोक गरीबांच्या रक्ताचें पाणी करून त्यावर अर्थोत्पत्तीकारक मालाची उभारणी करीत होते आणि त्या मालाच्या विक्रीच्या प्रचंड रकमावर ज्या चैनींचा उपभोग घेत होते त्यांच्या त्या चैनी इतउत्तर दुधांत पडलेल्या माशी प्रमाणेंच भ्रष्ट होणार आहेत. सर्व संपत्तीवर राष्ट्राची मालकी स्थापन करण्याचा प्रयत्न युरोपात सुरू झाला असून, जनता प्रजासत्ताक राष्ट्रीय सरकारची स्थापना करण्याचा विचार करण्यांत गुंग झाली आहे. स्वेच्छाचारी राजसत्ताचे किल्ले जरी सर करण्यास वेळ लागला तरी ते आतां सर होणार यात आतां संदेह नाहीं. भ्रममग्न झालेली जनता जागृत होऊन आतां वास्तविक गोष्टी न्याहाळून पाहूं लागली आहे व त्याचा स्वातंत्र्यपूर्ण दृष्टीनें उपयोग करण्याचें ज्ञान प्राप्त करून घेत आहे. जगाचे कान राशियानेंच या सन्देशानें पवित्र केले असून, या होणाऱ्या नव्या चळवळींत त्यानेंच आद्य गुरूचें पद पटकाविलें आहे यात संशय नाहीं.

# काण्ड बारावें.

## रशियांतील मंत्रिमंडळाचा पुनर्घटना.

स्वातंत्र्य जरी सहज प्राप्त करून घेता आलें, तरी तें कायमचें टिकवणें कठिण असतें. पारतंत्र्याच्या शृंखला खडाखड तोडून बंधमुक्त होणाऱ्या अनेक कैद्यांचा प्रतिकार करणें तुरुंगाच्या दरवाजाला जसें शक्य होत नाहीं तद्वतच, अनेक वर्षें पारतंत्र्यांत गढलेल्या जनतेनें स्वपराक्रमानें स्वातंत्र्यप्राप्ति करून घेतली असतां, तिच्या मार्गांत अभेद्य पहाड आणून उभा करण्याचें काम करणें अशक्य असतें. स्वातंत्र्याची धार पारतंत्र्याच्या बेड्या खाडकन् तोडून अशा प्रबल वेगानें धांवते कीं, तिला तिच्या मदान्ध दृष्टीपुढें सुमार्गकुमार्गांची तिळभरही पर्वा राहात नाहीं. हीच गोष्ट रशियन जनतेची झाली होती. सैनिक व मजूर यांच्या मार्गांत ज्या सर्वांपेक्षां अधिक अडचणी होत्या—त्या त्यांनीं स्वातंत्र्य प्राप्ती होतांच जशा कस्पटाप्रमाणें चिरडून टाकल्या तशीच स्वाभाविक बन्धनेंही तोडून टाकण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. सैनिकांच्या हातीं प्रचंड बल असल्यामुळें त्यांनीं शासनपद्धतीवरही आपला दाब पाडलेलें पाहातांच मजूर वर्गांतही अशीच लालसा उत्पन्न झाली. कारखाने व कलाकुशलतेच्या संस्था यांचें राष्ट्रीयकरण करण्याची जबरदस्त

चळवळ त्यांनी सुरू केली. या सर्व गोष्टींचें केन्द्रस्थान सैनिक व मजूर यांचें कौन्सिल हें होतें. तीं संस्था जरी अद्यापी सरकारी बनली नव्हती तरी तिचें बळ प्रत्यहीं वाढत होतें. कौन्सिलनें मागणी केलेल्या राजशासन-पद्धतीच्या बाबतींत नित्य नवीं खेंकटीं उत्पन्न करण्यांत येत होतीं. जें युद्ध करून आपण स्वातंत्र्यप्राप्ति करून घेतली त्याचें योग्य रक्षण करायला काय केलें पाहिजे इकडे लोकांचें दुर्लक्ष्य झालें होतें.

जनता स्वातंत्र्यमदानें अन्ध झाली होती व तसें होणें त्यावेळीं अपरिहार्य होतें. सैनिक व मजूर यांचें कौन्सिल नित्य नवीं हस्तपत्रकें काढून युद्ध बंद करण्याच्या मताकडे जनतेला आपल्या बाजूला खेंचण्याचा प्रयत्न करीत होतें. पुन्हा एक वेळ असंतोषाची लाट उसळली !- अराजक लोकही त्या युद्ध बंद करण्याच्या मतवाद्यांना जाऊन मिळाले.- त्यांचा धुरीण **लेनिन** हा साम्यवादी होता म्हणूनच त्याला झारशाहीनें हद्दपारीची शिक्षा दिलेली होती. क्रांतीनतर सर्व राजकीय कैद्यांची जेव्हां सुटका करण्यांत आली तेव्हां **लेनिन** हा स्वित्सर्लंडमध्यें होता. तेथून तो परत रशियांत आला. **लेनिन** स्वदेशीं येताच जी एक नवी लाट देशांत उसळली तिचें शमन प्रजाप्रतिनिधींनाही करता आलें नाहीं.

**लेनिन** व **ट्रॉट्स्की** हे दोघे **जर्मनीला** सामील असल्यामुळेच त्वरित युद्ध बंद करून **रशिया जर्मनीशीं** स्वतन्त्र तह करणार अशी **इंग्लंड**च्या कांहीं वर्तमानपत्रांनी त्या वेळीं बातमी प्रसिद्ध केली होती.

याचें कारण काय तर जर्मनीनें लेनिनला आपल्या देशांतून रशियांत जाण्यास मार्ग दिला होता! यावरून हेंही सिद्ध होऊं शकतें कीं, लेनिनवर जर थोडीशी दया केली तर तो स्वप्रयत्नानें लवकरच युद्धसमाप्ति करूं शकेल असें कैसरला वाटलें असावें; पण यांतली खरी गोष्ट अशी होती कीं, लेनिन व ट्रॉट्स्की या व्यक्ति अशा होत्या कीं, त्यांना जर्मनीच्या सर्व डावपेचांचें पुरें ज्ञान झालेलें होतें. मजूरवर्गावर कॅरेन्स्कीपेक्षां-लेनिनचें वजन अधिक पडल्यामुळें त्यांनीं जी साम्यवादी प्रजातंत्राची मागणी जोरानें चालवली होती तिला लेनिनच्या आगमनानें जबरदस्त उठावणी मिळून ती मजूर वर्गाला हितकर व नव्या सरकारला बाधक झाली.

लेनिनलाही आरंभीं याचें तस यश न आल्यामुळें कित्येक वेळीं त्याला हार खावी लागली. शिवाय जहाल पक्षही त्याच्या हातचा सुटला होता. कॅरेन्स्कीच्या एकाच व्याख्यानानें लेनिनच्या सर्व प्रयत्नांवर पाणी पडलें असतें, पण मजूर वर्गाची जी इच्छा होती कीं, युद्धांत देशाची शक्ति खर्च न करतां तिचा उपयोग देशांतल्या राजनैतिक बाबतींत करून घ्यावा, ती इच्छा त्यावेळीं रशियाला अहितकारक होती यांत तिळमात्र शंका नाहीं.

मजूर-सैनिक-कौन्सिलचें असें म्हणणें होतें कीं, " रशियाला युद्धांत जय मिळवून काय करावयाचें आहे? लोकसत्तेची मागणी कांहीं दुसऱ्या राष्ट्राची संपत्ती हरण करण्याचा

उपदेश करीत नाहीं." फ्रान्सचें उदाहरण देऊन कौन्सिलांत नित्य अशीं भाषणें होत होती कीं, "फ्रान्सला तरी या युद्धांत काय लाभ झाला आहे? लाखों लोकांची प्राणहानी होऊन विस्तृत जमीन मात्र शत्रूच्या हातीं गेली. अशा तऱ्हेचें युद्ध सुरू ठेवून रशियाला कोणचा लाभ मिळणार?"

कौन्सिल, जरी अशीं भाषणें करूनच स्वस्थ बसलें असतें तरी रशियाची जी बिकट परिस्थिति झाली ती झाली नसती. तात्पुरतें नवें मंत्रिमंडळ युद्ध सुरू ठेवण्याच्या पक्षाचें आहे असें पाहतांच कौन्सिलनें आपले लोक रणभूमीवरील सैन्यांत धाडून त्यांस त्यानीं असें कळवलें कीं, "युद्ध समाप्तीकरितां सैनिकांनीच परस्पर जर्मनींशीं तह करून व्यर्थ होणारा रक्तपात बंद करावा" याचा परिणाम इतका भयंकर झाला कीं, रणक्षेत्रांतल्या सर्व सैनिकांनीं तहाचीं पांढरीं निशाणें सर्वत्र उभारून आपलीं हत्यारें खालीं ठेविली. याप्रमाणें रशियाचीं सर्व रणक्षेत्रें एकदम शिथिल पडलीं याशिवाय कौन्सिलनें असाही मंत्रिमंडळाला धाक घातला कीं, "मित्रराष्ट्रांशीं जे पूर्वी करार झाले आहेत ते आम्ही प्रसिद्ध करूं, नाहीतर आमचें म्हणणें मान्य करा." असला वेडेपणा करण्यांत साम्यवाद्यांच्या हें ध्यानांत आलें नाहीं कीं, त्यांनीं जर गुप्त करार प्रसिद्ध केले असते तर शत्रूचा त्यापासून फार फायदा झाला असता!

परराष्ट्रसचिव मिल्यूकॉफ या गोष्टीच्या अगदीं विरुद्ध होता. त्यानें गुप्त करार प्रसिद्ध करण्याच्या बाबतींत जोराचा विरोध करून कॉन्स्टॅन्टिनोपल व डार्डानेलिस हीं रशियाच्या ताब्यांत

# काण्ड बारावें

आणण्याच्या गोष्टीवर जोर दिला खरा, पण साम्यवादी नेते संधी करण्याच्या पक्षाचे असल्यामुळें पुन्हां एक वेळ देशावर संकटावस्थेचें वावटळ उठलें. परिस्थिति इतकी बदलली कीं, अखेरीस रशियाच्या नव्या मंत्रिमंडळाला एक जाहिरनामा पुढीलप्रमाणें प्रसिद्ध करणें भाग पडलें.

" नागरिकहो,

स्वदेशहित साधण्यास तत्पर असलेलें सध्यांचें सरकार—युद्ध व सेना या दोन बाबतींत कांहीं खऱ्या गोष्टी आपल्या नजरेपुढें आणण्याची इच्छा करीत आहे. जुन्या सरकारानें देशरक्षणाचें काम नाजुक स्थितींत आणून सोडलें होतें व राष्ट्रीय खजिना रिकामा केला होता, त्यामुळें प्रजेला खाद्य वस्तूंच्या अभावी उपासमार करावी लागली. सैन्याच्या अव्यवस्थेनें सैनिक हैराण झाले होते. यायोगें देश गांजल्यामुळें रशिया आर्थिक दृष्टीनें अगदीं कंगाल बनून गेला आहे. नवीन सरकार जनतेच्या मदतीनें जरी या सर्व उणीवा भरून काढण्याचा प्रयत्न जारीनें करीत आहे, तरी काळ कोणाचीच वाट पाहात नसतो. महायुद्धाच्या रणवेदीवर जरी रशियाचे लाखों पुत्र चढलेले आहेत, तरी सध्यां रशियावर शत्रु–राहूनें आपली विकाळ छाया पसरली असून भयंकर स्थिति

-ोढवली आहे. यास्तव शत्रूचा निःपात करून नवीन मिळवलेल्या स्वातंत्र्याचें रक्षण करणे हें सैनिकांचें पाहिलें कर्तव्य आहे. युद्धनिर्णय जनतेच्या संमतीवर टाकून आणि मित्रराष्ट्रांच्या संगतींत राहून आपले युद्ध विषयकविचार प्रगट करणें हें आपलें काम आहे असें रशियन सरकार समजतें परक्यांची संपत्ती अथवा देश लुबाडण्याची सरकारची इच्छा नसून, सर्व युद्धमान राष्ट्रांच्या बरोबर आपल्या उचित सीमेंत शांतता करण्याची इच्छा करतें आहे युद्ध खेळून विजयप्राप्ति करून घेण्यानें कोणच्याही जातीला पराधीन करायची अथवा स्वार्थानें कोणच्याही देशाला घशाखालीं उतरावयाचें नसल्यामुळें उच्चन्यायबुद्धीच्या प्रेरणेनेच पोलंडला स्वातंत्र्य देण्यांत आलें आहे. हीच आपली अंतरराष्ट्रीय नीती आहे असें सरकार मानीत असल्यामुळेंच मित्रराष्ट्रांशीं सख्यत्वानें राहून आपल्या उद्देशांत सिद्धि मिळविण्याची त्याची इच्छा आहे. जनतेपासून कोणचीही गोष्ट दडवून ठेवण्याचा रशियन सरकारला हक्क नाहीं. देशाची वास्तविक स्थिति दुर्घट झाली असल्यामुळे देशरक्षणाचे उपाय योजणे हें सरकारचें कर्तव्य आहे यास्तव, आमची हिम्मत खचवून आम्हांला अपमानित करण्याचें कृत्य जनता करणार नाहीं अशी

आशा आहे. सर्व राष्ट्रानें उत्साह व धैर्य धरून जर आम्हांला मदत केली, तर आमची शक्ति वाढणार आहे. सध्यांच्या कठिण प्रसंगीं सर्व रशियन प्रजेनें रशियाचें स्वातंत्र्य-बल वृद्धिंगत करण्यास मदत करावी. त्याच मदतीच्या जोरावर रशियाचें रक्षण करण्याची नवें सरकार शपथ घेतें आहे. सध्यांच्या कठिण प्रसंगांतून जनतेच्याच साह्या-वर खात्रीनें देशाला पार पडतां येणार आहे . ... ,,

या जाहीरनाम्याचा इतर रशियन जनतेवर जरी चांगला परि-णाम झाला, तरी मजूर—सैनिक कौन्सिलवर कांहींच परिणाम न होतां तें उलटें उद्दीपित मात्र झालें रणक्षेत्रावर उपयोगी पडणारे नकाशे जनते-पुढें मांडण्याची कौन्सिलनें मागणी केल्यामुळें ह्या अनुचित गोष्टीबद्दल परराष्ट्रीय मंत्रि मिल्यूकॉफ यानें राजीनामा दिला.

रशियाच्या ज्या पार्लमेंटच्या पहिल्या बैठकीला ड्यूमाचें पहिलें अधिवेशन मानण्यांत येतें. त्यांत युद्धमंत्री गच्कॉफ यानें साम्य-वादींच्यावर ज्या शब्दांत आरोप केला ते शब्द येणेंप्रमाणें:—

“ ... ... ... ... चालू परिस्थितीशीं आतां मला मोकळेपणानें तंटा करावा लागेल. कारण, देशांत असा एक विषारी रोग पसरला आहे कीं, ज्याच्या योगानें आमच्या सैनिक शक्तीचा ऱ्हास होत चालला आहे. दुहातीं राज्यकारभार राहिल्यास नाश होतो. फैलावत

असलेला रोग राष्ट्रविविघातक असल्यामुळें, त्याला जर मोकळा सोडला तर तो असाध्य होऊन बसेल. ज्यांनीं सर्व प्रकारें तह करण्याची हकाटी केली आहे ते देश-सीमांवरील युद्ध बंद करून देशांत यादवीची सुरवात करण्याची इच्छा करीत असले पाहिजेत. ”

कौन्सिलची शक्ति नव्या सरकारच्या शक्तीबाहेर गेलेली होती. कोणच्याही उपायांनीं युद्ध बंद करण्याकडे कौन्सिलची प्रवृत्ति झालेली असल्यामुळें त्याच्या मार्गांत नव्या सरकारचा जो अडथळा होत होता त्यानेंच त्या दोन पक्षांत विरोध उत्पन्न होऊन आपसांतल्या द्वंद्वाची सुरवात झाली. शेवटीं युद्धमंत्री गचकॉफ यानें पुढील शब्दांत राजीनामा देऊन आपली जागा सोडली.

“ ... ... ... रशियन सरकारची सत्ता व युद्ध-खातें सध्यां ज्या स्थितींत पडलीं आहेत ती स्थिति राष्ट्र-रक्षणाच्या दृष्टीनें अत्यन्त नाजुक असून माझ्या शक्तीबाहेरची असल्यामुळें, तशा परिस्थितींत माझ्या हातून कोणचीही सुधारणा अथवा परिवर्तन होणें शक्य नाहीं. वास्तव, मी युद्ध-खात्याचें मंत्रित्व क्षणभरही संभाळूं शकत नाहीं व जें पाप देशाच्या माथ्यावर मारलें जाणार आहे असें तें पाप करण्याचा समभागीही मी होऊं इच्छित नाहीं हें सर्वांनीं लक्ष्यांत ठेवावें. ”

## काण्ड बारावें.

**मिल्यूकॉफ** व **गचकॉफ** यांच्यासारख्या योग्य राजकारणी पुरुषांनीं मंत्रिमंडळाला आपले राजीनामे सादर केल्यामुळें मंत्रिमंडळाचा डोलहारा डळमळूं लागला. पेट्रोग्रॅडमध्यें अशी स्थिति झाली असतां रणक्षेत्रांवरील **ब्रुसिलॉफ, रस्की** व **गर्को** या तिघा जनरलांनीही आपले राजीनामे दिल्याची बातमी आली. घरांत व घराबाहेर अशा प्रकारची स्थिति झाल्यामुळें 'आता पुढें कसें काय होईल?' अशीही शंका कित्येकांच्या मनांत उद्भवली.

जनता साशंकित केव्हा होते याचीच कौन्सिलच्या तर्फेचे लोक वाट पाहात होते. **शालेसबर्ग** नावाचें जें शहर युद्धोपयोगी सामुग्रीच्या वखारींनीं भरलेलें होतें त्याचा चटकन ताबा त्या लोकांनीं घेतला. हा गाव **पेट्रोग्रॅड**पासून थोड्या मैलाच्या अंतरावर होता. याप्रमाणें लढाईचीच सामुग्री अडकली गेल्यामुळें युद्धमार्ग स्तंभित झाला. यावरून असें दृष्टोत्पत्तीस आलें कीं, घडून आलेल्या क्रांतींतून अन्तर्गत क्रांती बाहेर पडणार. ही स्थिति पाहून स्वतः **केरेन्स्की** घाबरला व म्हणाला,

'**स्वतंत्र रशिया क्रांतिकारक गुलामाचा अड्डा आहे काय!**'

ही स्थिति सुधारण्याचा आता रशियन सरकारच्या हातीं कोणचाच उपाय राहिला नव्हता व मोह तर अशा थराला जाऊन पोंचली होती कीं, जराशा इशाऱ्यानेंच राज्यशासनसत्ता साम्यवाद्यांच्या हातीं जाऊन पडण्यासारखी झाली होती. कारण, सर्व सैनिक—लोकमत त्यांच्याच बाजूचें झालें असून, युद्धकालांतील सैनिक बल ही एक महत्व

पूर्ण गोष्ट होती. अशा स्थितीलाही सुधारणारा एक पुरुष पुढें आला व तिनें नाटकाच्या पडद्याप्रमाणें त्यानें परिवर्तन केलें. करेन्स्कीनें देशाच्या वतीनें जोरदार भाषेत सैनिक व मजूर यांच्या कौन्सिलाकडे अपील केलें. करेन्स्की हा प्रथमपासूनच साम्यवादी आणि सैनिक व मजूर यांचा प्रतापशाली पुरस्कर्ता होता ही गोष्ट वाचकांना माहीत आहेच. त्याच्या कर्तृत्वाचा प्रभाव पुन्हां आपलें काम बजावूं लागला. साम्यवाद्यांनी एकेचाळीस मताधिक्यानें रशियन सरकार बनविण्याची मान्यता दिली व पुन्हां एकदा त्या दोन विरोधी पक्षांत ऐक्याची स्थापना झाली ! पण या पारस्परिक समजुतींत शासनपद्धतीसंबंधानें रशियन सरकारला ज्या महत्वपूर्ण अटी कौन्सिलानें मान्य करायला लावल्या त्या येणेंप्रमाणें:—

"( १ ) जयापजयाची पर्वा न करतां जेणेंकरून त्वरित तह होईल अशा रीतीनें, रशिया आपली बिघडलेली घडी स्वतः नीट घालण्याची व्यवस्था करीत आहे असें मित्रराष्ट्रांना कळवून, अंतरराष्ट्रीय नीतीची सुधारणा करणें. ( २ ) राज्याच्या सरहद्दींवरील सैन्याची व्यवस्था इतकी चोख ठेवली जावी कीं, त्याच्याकडून योग्य असें राज्यरक्षण केलें जाऊन, सैनिकांतही लोकसत्तात्मक राज्यस्थापनेची प्रसिद्धि व्हावी. ( ३ ) अन्तर्देशीय शान्तीच्या स्थापनेसाठीं खाद्यवस्तूंची सर्वत्र नीट व्यवस्था राखण्यांत यावी. ( ४ ) सर्व भूमीचे धनि शेतकरी लोक

असतील अशा तऱ्हेची शेतकऱ्यांबद्दलची व्यवस्था व्हावी. (५) आर्थिक नीतीची व्यवस्था अशी ठेवण्यांत यावी कीं, कर देणारे लोक फक्त धनिक तेवढेच असावेत. (६) सार्वजनिक प्रतिनिधि-सभेची स्थापना त्वरित केली जावी. (७) साम्यवादी मंत्रिगणाला रशियन सरकारापुढें जबाब देण्याची आवश्यकता नसून त्यांनीं मजूर-सैनिक कौन्सिलापुढें उत्तरदायी व्हावें अशी योजना करावी. ''

या नव्या योजनेत साम्यवाद्यांच्या हातीं कांहीं फारसें न राहतां त्यांच्याकडे कोणत्याही तऱ्हेचा विशेषसा अधिकारही जरी उरला नव्हता तरी हें सर्व एवढ्याचसाठीं घडवून आणणें प्राप्त झालें होतें कीं, रशिया अराजकतेच्या कक्षेंतून अलिप्त राहावा. दोघांच्या झगड्यांत अराजकतेची कमान वर चढून देशघात होण्याचा त्या वेळीं पूर्ण संभव होता. साम्यवाद्यांच्या सहा प्रतिनिधींना याचसाठीं मंत्रिमंडळांत जागा देण्यांत आल्या होत्या. मंत्रिमंडळ पुढीलप्रमाणें पुन्हां निवडलें गेलें:—

(१) प्रिन्स लॉफ ... ... मुख्य प्रधान व अंतरराष्ट्रीय मंत्री.
(२) टरश्चांको ... ... परराष्ट्रीय मंत्री.
(३) केरेन्स्की ... ... युद्धमंत्री.
(४) शिंगरॉफ ... ... अर्थसचीव.
(५) निकरॉफ ... ... रेल्वे-मंत्री.

(६) कॉनॉवलॉफ ... ... उद्यममंत्री.
(७) गावनेफ ... ... शासनव्यवस्थापक मंत्री.
(८) मॅनिलॉफ ... ... शिक्षण-मंत्री.
(९) ल्वॅवमीरलॉफ ... ... धार्मिक मंत्री.
(१०) पार्विजेफ ... ... न्यायमंत्री.
(११) स्कॉवेलॉफ ... ... मजूर-मंत्री.
(१२) शर्नाफ ... ... कृषिमंत्री.
(१३) मरटेली ... ... डाक व तार या खात्याचा मंत्री.
(१४) शेकोवस्की ... ... सार्वजनिक साहाय्यक मंत्री.
(१५) प्रिम ... ... मतविभागमंत्री.

साम्यवाद्यांना या नव्या मंत्रिमंडळाच्या रचनेनें संतोष झाला. कारण त्यांच्या कौन्सिलातीलही कांहीं जोरकस प्रतिनिधिही या मंत्रिमंडळांत सामील केले गेले होते.

अशा तऱ्हेच्या स्थापन झालेल्या मंत्रिमंडळाची बातमी जेव्हां रणक्षेत्रात उडून पोंचली तेव्हां ज्यांनी राजीनामे दिलें होते त्यांनी ते परत घेतले. यानंतर सैनिक प्रतिनिधि व सरकारी अधिकारी यांची एक कॉन्फरन्स पेट्रोग्रॅडमध्यें अशासाठीं भरविण्यांत आली होती कीं, युद्धात ज्या कोणच्या तऱ्हेनें साफल्य मिळेल अशा उपायांची योजना तींत मुख्यत्वें व्हायची होती.

ही सर्व कारवाई केरेन्स्कीची होती. युद्धानेंच रशियाचें हित होणारें आहे अशी साम्यवाद्यांची समजूत त्यानेंच पाडिली व तशी ठाम समजूत करून घेऊनच मजूर—सैनिक—कौन्सिलनें जें प्रसिद्धीपत्रक प्रसिद्ध केलें तें येणेंप्रमाणें:—

" रशियन शेतकरीवर्ग व मजूर लोकहो,

तह जरी थोडा उशीरा झाला तरी हरकत नाहीं पण तो फुटाफूट न होतां सबंद राष्ट्राच्या ऐक्याचा होणेंच देशहिताच्या दृष्टीनें आवश्यक आहे. सबंद राष्ट्राचा निश्चित स्वरूपाचा संधी जसा लाभदायक होईल तसा पृथक संधी होणें जगद्घटनेला अपायकारक होणार आहे. पश्चिम रणभूमीवर जर्मनी मित्रराष्ट्रांना धुळीला मिळवून आमच्यावर तुटून पडेल व आमच्या देशाची धूळधाण करील. यास्तव जर्मनीची गुलामगिरी टाळण्यासाठीं सर्व राष्ट्रीय असा एकच टिकाऊ तह करणें या प्रसंगीं जरूर आहे. यासाठीं प्रत्येक रशियनानें युद्धांत साफल्य मिळविण्यासाठीं मदत करणें हें त्याचें कर्तव्य आहे. "

न्यायमंत्र्याच्या जागेवरून केरेन्स्कीला युद्ध मंत्री करण्यांत आलें होतें. ही वेळ युद्धमंत्र्याच्या खऱ्या चातुर्याची होती. तो साम्यवादी असतांही त्यानें त्या पदाचा स्वीकार केला होता. खरें पाहिलें तर केरेन्स्कीनें जें युद्धमंत्र्याचें पद स्वीकारलें होतें तें त्याला साजेसेंच होतें.

कारण, तो त्यांत पूर्ण वाकबगार होता. त्यानें सैन्यरचनेंत उत्तम सुधारणा घडवून आणिली. तो युद्धमंत्री असतांही त्या दिवसात पेट्रोग्रॅड-मध्यें जी शेतकऱ्यांची सभा भरली होती तिमध्यें जाऊन तेथें त्यानें सरकार व जनता यांच्या कर्तव्यासंबंधानें एक अत्यन्त मार्मिक असें व्याख्यान दिलें व त्यानंतर जुन्या व नव्या सैनिकांना पाचारण करून त्यानें त्यांस असें समजावुन सांगितलें की, यावेळीं रशियाचें रक्षण शौर्यानें लढण्यानेंच होणारें आहे. केरेन्स्की स्वतः सरहद्दीवर जाऊन सैनिकांशी भाषणें केली व सैनिकासाठीच एक पुढीलप्रमाणें जाहीर-पत्रक प्रसिद्ध केलें'—

"रशियन राष्ट्र सध्यां आपत्तिग्रस्त झालेलें आहे. यास्तव, तुम्हांपैकीं प्रत्येकानें आपलें शक्तिसर्वस्व खर्चून ही आपत्ति दूर केली पाहिजे. आपलें काम सोडून रजेवर जाण्यासाठीं केलेल्या विनती-अर्जांचा मी स्वीकार करणार नाहीं. कारण, सध्यांच्या नाजुक प्रसंगीं तशी विनंती मान्य करणें गैर आहे. पळून गेलेले सैनिक पुन्हां एकत्र जमत आहेत व नवी सैन्यभरती केली जाऊन त्यांना लष्करी शिक्षण देण्याचीही व्यवस्था झाली आहे. जो कोणी या नियमांचें उल्लंघन करील तो दंडास पात्र होईल. क्रांति व देशरक्षण या नांवाखालीं तुम्ही आपलें पाऊल पुढें टाका व शत्रूचा निःपात करा. स्वातंत्र्य हें बलवर्धक

असून निर्बलत्व देणारें नाहीं असें स्वकृतीनें जगाच्या निदर्शनास आणा! वीरहो, आज्ञापालनाच्या नियमाला उराशीं घट्ट धरून पुढें या देशाच्या ऐक्याचें वीर्य जगाला पटवा! ध्यानांत ठेवा! जो कोणी कच खाऊन पीछेहाट करील तो सर्वस्वाला मुकेल. स्वदेश, स्वातंत्र्य व स्वजाती यांना विसरून जाऊन भयानें जो आपलें तोंड लपवतो तो जगाच्या उपहासाला पात्र होतो, हें विसरूं नका. देशाचा राज्यकारभार प्रजेच्या मतानें यापुढें चालणार आहे यास्तव महत्वपूर्ण कार्यांत तुम्हांला आमंत्रण देण्यासाठींच मुद्दाम मी येथें आलों आहें."

याप्रमाणें केरेन्स्कीनें सैन्याला प्रोत्साहन देऊन युद्धोन्मुख केल्यामुळें देशांतील अंतर्व्यवस्थेंतही शांतता पसरली. ज्या सैनिक–मजूर-कौन्सिलामुळें रशियन सरकारला उखाड बसणार होती तें कौन्सिल यायोगें संतुष्ट होऊन, रशियाची शक्ति प्रतिदिनी वाढत चालली व सरकारी कारवाई दृढमूलक होऊं लागली.

# काण्ड तेरावें.

## रशियांतील राज्यक्रांतीचे पुरस्कर्ते.

रशिया अत्यंत संकटावस्थेंत असतां त्या अवस्थेला हद्दपार करण्यासाठीं तेथें जितकीं मानवी बहुमूल्य रत्नें पुढें आलीं तितकीं इतर कोठें क्वचितच उत्पन्न झाली असतील असें जें एका अमेरिकन गृहस्थानें म्हटलें आहे तें जरी सर्वस्वी खरें नसलें, तरी त्यांत सत्याचा अधिकांश आहे यांत शंका नाहीं. क्रांतीचा आरंभ होताच जितके नेते पुढे आले तितके सर्व स्वदेशाचे अनन्य सेवक असून, ते मोठे स्वार्थत्यागी होते. त्यांनीं क्रांतींत जो विजय संपादन केला त्यांत त्यांची पूर्वपुण्याईसुद्धां त्यांना मदतनीस झाली होती यांत शंका नाहीं. त्या धुरीणांत सर्व प्रकारचे लोक होते. कोणी लष्करी होते तर कोणी योग्य रस्ता दाखवणारे होते. कोणी प्रोफेसर होते तर कोणी वर्तमान पत्रांचे संपादक होते. कोणी—साम्यवादी प्रजातन्त्र—स्थापक होते तर कोणी परिमित राजसत्तेसह लोकसत्ता स्थापन करण्याच्या मताचे होते. मंत्रिमंडळाची सांखळी अशाच लोकांची बनलेली होती. ते एकापेक्षां एक स्वार्थत्यागी असून तन्मयतेनें काम करणार होते. राष्ट्ररक्षण व स्वातंत्र्य हेंच त्या सर्वांचें ध्येय होतें. त्यापैकीं कोणीही कीर्तिलालसेनें पुढें येण्याची जिगीषा बाळगणारे नसून, स्वार्थी व नीच प्रवृत्तीचेही त्यांत कोणी नव्हते.

# काण्ड तेरावें.

ज्याप्रमाणें सेनापति उत्तम असल्यावांचून सैन्याला विजयप्राप्ति करून घेतां येत नाहीं, त्याचप्रमाणें चतुर धुरीण असल्यावांचून क्रांती फलद्रूप होत नाहीं. यास्तव, रशियन क्रांतींत ज्यांनीं मोठ्या चातुर्यानें विजय संपादन केला त्यांच्याबद्दल थोडीशी माहिती देणें आवश्य आहे. राष्ट्रसेवा करण्यास कशा तऱ्हेचे नेते लागतात त्याची माहिती संक्षेपतः देण्यासाठीं त्या धुरीणांचीं थोडक्यांत चरित्रें कळणेंही वांचकांना जरूर आहे. थोरांचीं चरित्रें स्वदेशप्रेमानें कशीं रंगलेलीं असतात व ते कसे निस्वार्थी असून देशाच्या भाग्यानें देशाला ते कसे लाभतात हें त्यांच्या चरित्रांत आम्ही वाचकांना थोडक्यांत दाखविणार आहोंत. असे नेते पारतंत्र्यांत पडलेल्या ज्या राष्ट्रांना मिळतात तीं राष्ट्रें खरोखरीच सुदैवी होत असें स्पष्ट म्हणायला हरकत नाहीं.

रशियाच्या सुदैवानें **रशियन** राज्यक्रांतीला परमेश्वरी संकेतानें जो कारणीभूत झाला व ज्यानें सर्व **रशियाची** नीतिमत्ता रसातळाला पोंचविली त्या **रासपुतीनचें** चरित्र येथें प्रथम थोडक्यांत देऊन, त्यानंतर राज्यक्रांतीकारक अशा थोर पुरुषांचीं चरित्रें पुढें दिलीं आहेत.

**रासपुतीन—**

सध्यां **युरोपखंडांत** व **एशिया** खंडाच्या पश्चिम भागांत जी एक **बोल्शेविझम** या नांवाची लाट उसळली आहे व जिची गति सर्व जग व्यापते की काय अशी शंका उत्पन्न झाली आहे तिची उत्पत्ति

# रशियांतील बोल्शेव्हिजम् !

जेथें झाली त्या **रशिया** देशाकडे सध्यां सर्व जगाचे डोळे लागून राहिले आहेत. राजक्रांतीनें रशियाचें पूर्वस्वरूप सध्यां पार बदलून टाकलें आहे. दोन तीन वर्षांपूर्वी रशियाचें राजसिंहासन हें स्वेच्छाचाराचें केन्द्र बनल्यामुळें तेथील जनता कोणच्याना कोणच्या तरी तऱ्हेनें जीव घेऊन देशत्याग करण्यांत गुंतलेली होती. तेथील राजसिंहासनाच्या स्वेच्छाचारविलसित वेदीवर जेव्हां हजारो मानवी प्राण्याचें बलिदान प्रत्यही होऊं लागलें, सुहृदाला निष्ठुरतेनें जिंकून ती जेव्हां निरंकुश झाली व तिच्या कर्मांचें शिखर जेव्हां सूर्यमंडळाला भेदून जाण्याइतकें उन्नत झालें तेव्हां कालचक्राची गति एकदम बदलून त्या नैडुर्याचें अत्युन्नत सिंहासन एकदम धाडकन ढांसळून जमीनदोस्त झालें व त्याबरोबरच सिंहासनाधीशही आपल्या सर्व कुटुंबासह कालवश होऊन रसातळाला जाऊन पोंचला !

जेथें कल्पनातीत पाप वहात असतें तेथें त्याच्याच अंतर्गत पुण्याच्या उद्धाराचें तेज छपून राहिलेलें असतें. **कंसानें वसुदेवाचीं** सात मुलें ठार केल्यानंतर आठव्या पुत्रानें म्हणजे **भगवान् गोपाल कृष्णानेंच** त्याला ठार केलें. गुलामांची अत्यंत स्वस्ताईनें विक्री होण्याची नोबत येऊं लागताच ती चाल बंद पाडणारे महात्मे पुढे सरसावले. राजादि सरदार **फ्रान्सच्या** प्रजेच्या द्रव्यावर यथेच्छ चैन करूं लागतांच, करांच्या ओझ्यानें प्रजा पीडिली गेल्यामुळें तेथें राज्यक्रांती होऊन राजसत्तेचें जुनाट खोड समूळ नाश पावलें. हीच स्थिति **रशियाची**

## कांड तेरावें.

झालेली होती. तेथील प्रजेची सर्व सुखदुःखें एकाच माणसाच्या स्वेच्छाचारी मर्जीवर सर्वतोपरी अवलंबून राहिल्यामुळें सर्व प्रजा अत्यंत हैराण झाली होती. तिच्या मनोभूमींत धुमसणाऱ्या आगीनें अखेरीस एकदम पेट घेऊन त्यांत जें **झार**सह त्याच्या अत्याचारांचें बलिदान **रशियन** लोकांनी दिलें तो **झार** ज्या एका स्वार्थी व दुराचारी व्यक्तिच्या हातांतली करपुतळी बनला होता ती व्यक्ति म्हणजेच **रासपुतीन** ही होय.

**रासपुतीन**ला लिहिणें किंवा वाचणें ह्याची मुळींच ओळख नव्हती. प्रपंच म्हणजे काय याची त्याला अगदी माहिती नव्हती. त्यानें जन्माला येऊन जगाचें निसतान करण्याचाच विडा उचलला होता असें म्हणण्यास हरकत नाही. **रशिया**चा राजा व राणी म्हणजे **झार** व **झरीना** यांना आपल्या मोहात गुरफटून टाकून त्यांच्याशीं तो जो डाव खेळला व तो खेळण्यात त्याला ईश्वरी सूत्राची जी मदत झाली तीतच **झार**शाहीचा नाश दडून राहिलेला होता! त्यानें **झार** व **झरीना** आणि इतर सरदार व यांच्या बायका यांना मोठ्या खुबीनें ज्या धार्मिक



**स्वातंत्र्यप्राप्त्यर्थ दिलेला पहिला बळि रासपुतीन.**

ढोंगाच्या तमाशांत खेळविलें त्यांतला त्याचा मुख्य मंत्र ' **मोक्षासाठीं पाप करा !** ' असा चमत्कारीक होता. त्या त्याच्या तमाशाच्या शेवटीं असें लक्षित झालें कीं, तो स्वतःच मारला जाऊन स्वेच्छाचाराचा केन्दू बाहेर पडला व त्यासरसें रशियाचें शेंकडों वर्षांचें जुनाट व निरंकुश सत्ताधारी राजघराणेंही नामशेष झालें. अशा प्रकारें रशियात क्रांती घडून येण्यास कारणीभूत होणारी जी **रासपुतीन** नांवाची विलक्षण व्यक्ति ती अट्टल दारूबाज व जबरदस्त चोर अशी जरी होती तरी, ती मोठी सुंदर व धर्मावडंबरी होती. तो मोठा तीक्ष्णबुद्धीचा धूर्त होता. त्याचे आम्ही स्वतन्त्र चरित्र लिहिलें आहे तें एकवार वाचून त्यांतील रहस्य समजावून घ्यावें

## पॉल मिल्यूकॉफ—

हा एक प्रसिद्ध असा रशियाचा स्वदेशभक्त आहे. त्यानें पचवीस वर्षे मोठ्या धैर्यानें स्वजनसेवा केली आहे. त्यानें आपलें विश्वविद्यालयांतलें शिक्षण १८८६ मध्यें संपुर्ण करून घेऊनस्वतःला स्वदेशसेवेत आजन्म वाहून घेतलें. त्यानें **मॉस्को** युनिव्हर्सिटींत ऐतिहासिक चर्चेच्या वेळीं छात्रवर्गापुढें व्याख्यानें देऊन त्यांच्या मनांत स्वदेशप्रेमाच्या बीजाची जी पेरणी केली ती असमान्य होती. त्यावेळच्या **झारशाहीं**तल्या अधिकाऱ्याना तें असहनीय झाल्यामुळें त्याला देशत्याग करावा लागला. तो १८८८ मध्यें **ऑस्ट्रियांत** जाऊन **सोफिया** एथें एका प्रोफेसरच्या जागेवर रुजू झाला. तेथेंही तो इतिहासावरच व्याख्यानें देऊं लागला. १८८९ मध्यें त्याला स्वदेशीं परत येण्याची

परवानगी मिळाली. परत गेल्यावर त्यानें राजनीति व साहित्य या विषयांच्या चर्चेला प्रारंभ केला. त्यानें 'गॉड्स वर्ल्ड' (ईश्वरी विश्व.) या नांवाचें एक मासिक सुरु करून देशसेवेला प्रारंभ केला.

खऱ्या स्वदेशभक्ताचा जीव नेहमींच धोक्यांत असायचा या




पॉल मिल्यूकॉफ–परराष्ट्रीय सचीव.

न्यायानेंच मिल्यूकॉफला अति त्रास भोगावा लागला. एके रात्रीं तो

विद्यार्थिवर्गाच्या सभेचा अध्यक्ष झाला असता तेथें राजद्रोही गोष्टीची चर्चा सुरू नसतांही, पोलीसनें त्याला एकदम कैद करून सहा महिने पर्यंत तुरुंगांत नेऊन ठेविलें.

१९०२ मध्यें तो अमेरिकेच्या प्रवासाला गेला. त्यानें तेथें शिकागोच्या विश्वविद्यालयांत ' रशिया या विषयावर एक महत्वपूर्ण अशी व्याख्यानमाला दिली. त्याच्या वक्तृत्वपूर्ण व महत्वपूर्ण व्याख्यानांनीं तेथें त्याचा मोठा गौरव झाला. तो इंग्लंडांत १९०४ व पाच मध्यें होता. त्याच्या दर्शनासाठीं रशियन जनता व्याकूळ होऊन गेली होती व स्वातंत्र्याचा डंका त्याच्या कानांशीं झडत होता, यास्तव त्याला परदेशीं दीर्घकाळ राहणें अशक्य होतें. तो स्वदेशी परत आल्यावर पेट्रोग्रॅडच्या तर्फे ड्यूमाचा सभासद म्हणून निवडला गेला. पण झारशाही त्याचा द्वेष करीत असल्यामुळें ड्यूमांत त्याचा प्रवेश झाला नाहीं. तो पुढें ' कॅरेट ' नांवाच्या नागरिक सभेचा अध्यक्ष झाला. त्या पदावर राहूनच त्यानें जनतेंत स्वातन्त्र्याची जागृति उत्पन्न करण्याचें काम मोठ्या नेटानें सुरू केलें.

मॉस्को नगरच्या विद्यार्थ्यांनी क्रांतिकारक चळवळ सुरू केली असतां तेथील विद्यालयातें सरकारनें एकदम बंद पाडल्यावेळीं मिल्युकॉफनें एका इंग्रज गृहस्थाला जें पत्र लिहिलें होतें तें येणेंप्रमाणें:—

" झारशाहीच्या बंदुकेगिरीची दडपेशाही आतां फार दिवस टिकणें अशक्य आहे. मॉस्कोंतील विद्यार्थ्यांचा दंगा अनिष्ट होता हें खरें; पण तो मोडला गेला तेव्हां

मला असा भ्रम होता कीं, लोक निराशेनें गप्प बसतील; पण नाहीं. सरकारी जुलुमानें जनतेला योग्य स्थळीं नेऊन बसविलें आहे. जनता समजून चुकली आहे कीं, क्रांतिकारकांमुळें आपल्याला त्रास होत नसून निरंकुश झारशाहीनेंच पीडा होते आहे. दंडुकेगिरीच्या दडपेशाहीचा अत्याचार आतां संपुष्टांत आला असेंच आपण समजावें. तें युग संपून आतां नव्या युगाचा प्रारंभ झाला आहे असें मानण्यास हरकत नाहीं."

यानंतर त्यानें 'रेंच' नावाचें एक दैनिक पत्र काढलें. त्याची भाषा फार जोरदार होती. झारशाहीच्या अत्याचारांविरुद्ध कडक भाषेंत लेख लिहिण्याची त्याची हिंमत वाखाणण्यासारखी होती. तो आपल्या लेखांत सरकारावर सरळ मार्गानें सडेतोड भाषेंत निर्भयपणें टीका प्रसिद्ध करीत असे. शेवटीं त्यानें ड्यूमामध्यें एक जोरदार भाषण करून जर्मनीला फितूर झालेल्या मंत्र्याचा भोपळा फोडला. प्रधान मंत्री स्टर्मरला त्याचमुळें पदस्थानत्याग करावा लागला. क्रांतीमध्यें मिल्यूकाफ यानें देशसेवा उच्च प्रकारची केली. आत्मविश्वास व भावी आशा यांवर त्याचा जबरदस्त विश्वास असल्यामुळें तो कधींही बेहिम्मत झाला नाहीं. त्यानें शेवटीं स्वातंत्र्यरक्षणासाठीं राष्ट्रसचिवपदाचाही त्याग केला. तो लोकसत्तावादी या नात्यानें प्रसिद्ध असून आगामी रशियाच्या इतिहासांत त्याचें नांव मोठ्या श्रद्धेनें कर्मवीरांच्या पक्तींत वाचलें जाईल.

**मायकेल रोडझिन्को—**

मागील काण्डांतून यां देशभक्ताची बरीचशी कृती वाचकांनीं वाचलीच आहे. हा प्राणी देहानें हत्तीसारखा स्थूल असून त्याचा



रोडझिन्को–ड्यूमाचा सभापति.

आवाज तर एवढा मोठा होता कीं, ज्या दिवाणखान्यांत तो व्याख्यान देई तो दिवाणखाना दणाणून जाई. हा पुरुष लष्करी बाण्याचा असून

त्याचा जन्म स्वदेशसेवेसाठीं लष्करी पद्धतीनेंच गेला. तो ' मॉसम जातीचा असून त्यानें झारची पहिली इम्पीरियल हॉर्स गार्डच्या रूपानें सेवा केली होती. हा १८८६ पासून १८८९ पर्यंत सरकारी नेमणुकीनें नेवोमॉस्कोवस्काच्या मार्शलच्या जागेचें काम करीत होता. त्या जागेवर असतांना त्यानें आगामी क्षेत्रांत काम करण्याची पात्रता आपल्या अंगीं उत्पन्न करून घेतली. १९०२ मध्यें त्यानें सार्वजनिक सेवेंत भाग घेण्यास आरंभ केला. सुधारणाकांक्षी जनतेबरोबर हा अखेरपर्यंत टिकला. ड्यूमाच्या स्थापनेच्या वेळीं जनतेनें याचा आदर करून अखेरीस, त्यानें जी स्वार्थत्यागपूर्वक देशसेवा केली त्याचें चीज म्हणून जनतेनें त्याला ड्यूमाचा सभापती केलें.

देशाच्या भविष्यावर याचा पूर्ण विश्वास असे. युद्धारंभाच्या वेळीं विरोधी लोकांच्या बरोबर यानें राहून असें स्पष्टपणें बजावलें कीं, " **मतभेद व पारस्परिक विरोध यांचें रशियन जनता हें केंद्र आहे असें जर तुम्ही समजत असाल तर ती तुमची साफ चुकी आहे. आपत्तीच्या प्रसंगीं सर्व रशियन जनता एक असून तिचें ऐक्य विभागणारी शक्ति कोठेंच सांपडणें शक्य नाहीं !** "

**रशियाला** नवा जन्म देण्याच्या कामीं **रोडझिन्को** हा मूलाधार होता. **ड्यूमाच्या** सभापतीपेक्षांही **रशियानें** त्याला उच्चपद दिलें आहे. तो स्तंभरूपानें **रशियाच्या** इतिहासात अढळपद पावला असून, नेता या नात्यानें **रशियन** जनता त्याच्याबद्दल अभिमान बाळगते.

गचकॉफ—

यानें आपले शिक्षण पुरें केल्यावर हा व्यापारांत शिरला. त्या मार्गाला लागण्याचें कारण तो प्रतिनिधि सभेंत शिरून व्यापारविषयक गोष्टींत वादविवाद करण्याची जिगिषा बाळगणारा होता त्याची ती इच्छा लवकरच तृप्त झाली. तो मॉस्कोच्या म्युनिसिपालिटीचा सभासद् झाला व कांहीं सरकारी कमिशनांमध्यें त्यानें कामें केलीं. त्यानें पूर्ण स्वार्थत्यागपूर्वक १८९१ मध्यें जनसेवा केली.



गचकॉफ–प्रजासत्तेचा युद्धमंत्री.

आर्मेनियाच्या कत्तलीच्या वेळीं जे बरेच रशियन लोक देशसेवेप्रीत्यर्थ सैन्यांत गेले त्यांत गचकॉफ हाही एक होता. आर्मेनियाच्या

युद्धानंतर **मँच्यूरिया** रेल्वेवर मुख्याच्या जागीं त्याची नेणूमक झाली. त्यानतर त्यानें **तिबेटचा** प्रवास केला. आफ्रिकेंत **बोअर** युद्धाच्या वेळीं हा इंग्रजांविरुद्ध लढला. तथें तो जखमी झाल्यावर परत स्वदेशीं येऊन बरा झाला व पुन्हा व्यापारविषयक कार्य त्यानें सुरु केलें. **म्यॅसिडोनियाच्या** क्रांतींत यानें बरेंच काम केलें. **रुस्सोजपानी** युद्धांत तर याची 'रेड क्रॉस'च्या डायरेक्टरच्या जागीं नेमणूक करण्यांत आली होती; पण **जपानी** लोकांनीं याला कैद करून नेऊन युद्ध संपल्यावर सोडून दिलें. १९०५ मध्यें स्वदेशांत क्रांतीची लाट पसरलेली पाहतांच हा तींत सामील झाला.

ता. **१७ ऑक्टोबरची, युनियन**' या नांवाच्या सभेचा हा अध्यक्ष झाला होता. **ड्यूमाच्या** संघटणेनंतर यानें भिन्न भिन्न संघांच्या तर्फेनें कामगिऱ्या केल्या, तरी तो पहिल्या किंवा दुसऱ्या ड्यूमेंतहि सभासद म्हणून निवडून आला नाहीं. त्यानें त्या अवकाशांत **व्हॉईस ऑफ मॉस्को** नांवाचें एक वर्तमानपत्र काढण्याची सुरवात केली. १९०७ मध्यें तो मजूरांच्या तर्फे **ऑक्टोबरिस्ट** या नात्यानें तो **ड्यूमाचा** सभासद म्हणून निवडून आला. तो मजूर वर्गाचा नेता बनला. १९१० मध्यें **खोमाखोफनें** राजीनामा दिला तेव्हां हा त्याच्या जागीं सभापति म्हणून निवडला गेला. त्या वर्षी त्यानें **उवारोफ** नांवाच्या माणसाशीं द्वंद्वयुद्ध केल्यामुळें त्याला कैदेची शिक्षा भोगावी

लागली. तो कैदमुक्त होऊन आल्यावर त्याच्या पक्षपातीयांनीं त्याला पुन्हां आपला सभापति म्हणून निवडून दिलें. १९११ मध्यें त्यानें त्या पदाचा मुद्दाम त्याग केला.

गचकॉफनें अनेक निरनिराळ्या देशाच्या सैन्यांमधून नौकऱ्या केल्या असल्यामुळें त्याला त्याच्या देशी सैन्याच्या शिक्षणाबद्दल मोठी काळजी वाटत असे. महायुद्ध सुरू झालें तेव्हां रशियाचें सैन्य कमी दर्जाच्या लष्करी शिक्षणाचें असल्यामुळें त्याकडून देशरक्षण कसें होईल याची त्याला भीति वाटत होती. क्रांतीनंतर युद्धमंत्र्याच्या जागीं नेमणूक करण्याच्या लायकीचा तोच कायतो नांव घेण्यासारखा एक होता, पण साम्यवादीयांच्या मतभेदामुळें त्याला त्या पदाचा त्याग करणें भाग पडलें.

**अलेक्झॅन्डर केरेन्स्की—**

रशियाची राज्यक्रान्ती घडवून आणण्याच्या धुरीणांत सर्वांत आश्चर्यजनक असें व्यक्तित्व **अलेक्झॅन्डर केरेन्स्की** यांचें आहे. क्रांतीच्या पूर्वी एक आठवड्यापर्यंत या गुप्त महात्म्याची माहिती फारच थोड्या लोकांना होती. यानें राजनैतिक क्षेत्रांत मोठ्या झपाट्यानें जी आपली उन्नति करून घेतली ती फारच आश्चर्यजनक व प्रतिभापूर्ण होती. त्यावेळीं त्याचें वय पस्तीस वर्षांचें असून, शरीर दुबळें व पिवळट पडलेलें होतें. त्याचें डोळे जरी खोल गेलेले होते, तरी तोच एकटा खरा रशियाच्या स्वातंत्र्याचा खरा रक्षक होता.

## काण्ड तेरावें.

तो विद्यार्थी–दशेपासूनच व्याख्याता या नात्यानें प्रसिद्धीस आलेला होता. तो वकीलीची परीक्षा पास झाल्यावर त्या विद्येंत इतका निष्णात झाला कीं, एका प्रसिद्ध अमेरिकनानें त्याची प्रे. रूझवेल्टशीं तुलना करण्यास शंका धरली नाहीं त्यानें पेट्रोग्रॅडमध्यें वकिली सुरू करतांच सरकारविरुद्ध असलेले मुकद्दमे कचेरींत चालविण्याचा धंदा सुरू केला. तो आपल्या अशीलाच्या बाजूनें उभा असतां त्यानें सरकारच्या राजनीतिवर अशी टीका करावी कीं, तिच्यामुळें झारशाहीला संताप येऊन त्याची कैदखान्यांत रवानगी होते कीं काय असेंच



केरेन्स्की–प्रजाप्रातिनिधिक सभेचा मुख्य प्रधान.

जनतेला वाटावें. चौथ्या ड्यूमेमध्यें ह्याला मजूर पक्षाकडून प्रतिनिधी निवडून दिला होता. अशी कोणचीही ड्यूमाची बैठक झाली नाहीं कीं, जींत ह्याचें वक्तृत्वपूर्ण असें जोरदार व आवेशयुक्त भाषण झालें नाहीं. तो प्रारंभापासूनच मजूर—वर्गाचा पक्षपाती असून लोकशाहीची स्थापना व्हावी असा त्याचा उद्देश होता. १९१७ च्या प्रारंभीं पेट्रोग्रॅडमध्यें क्रांतिकारकांच्या चळवळीला जोराचें स्वरूप प्राप्त झालें असतां हा जहाल पक्षाला मिळाला होता व त्याचमुळें त्याला क्रांतीच्या चळवळीच्या स्वरूपाचें पूर्ण ज्ञान प्राप्त झालें होतें.

क्रांतीनंतर जेव्हां तात्पुरत्या सरकारची स्थापना करण्यात आली तेव्हांची ती वेळ मोठ्या धोक्याची होती. कारण, साम्यवादी-मजूर-सैनिक-कौन्सिल त्याला आपल्या पक्षाकडे खेंचूं पाहात होतें व ड्यूमाचे मवाळ पक्षपातीही त्याला आपल्याकडे ओढीत होते. अशा त्या बिकट क्रांतीच्या परिस्थितींत त्यानें आपल्या बुद्धिबलाच्या जोरावर दोन्ही पक्षांच्या मध्यें राहून त्यांच्यांत लढा न होऊं देतां कांहीं काळ रशियाला प्राप्त झालेल्या नव्या स्वातंत्र्याचें रक्षण केलें. इंग्लंडचे प्रसिद्ध मुत्सद्दी व प्रधान मंत्री लॉइड जॉर्ज यांच्यामध्यें जितके गुण आहेत तितके सर्व जरी केरेन्स्कीच्या अंगीं आहेत तरी त्याच्या वक्तृत्वाच्या सामन्याला लॉईड जॉर्ज तोंड देऊं शकत नाहीत इतका तो जबरदस्त मोहिनी वाग्धरेनें मंडित झालेला आहे. त्यानें मोठाले बिकट प्रसंग आपल्या वाग्जालानें मृदु करून सोडले. त्यानें देशाच्या अनेक नाजुक

प्रसंगीं आपली वाक्शक्ति प्रगट करून स्वातन्त्र्यरक्षण केलें. तो न्याय-मंत्र्याच्या जागेवरून जेव्हां युद्धमंत्र्याच्या जागीं गेला त्या वेळीं त्याच्यावर मोठीच आणीबाणीची वेळ आली होती. कारण, तो ज्या मजूर—सैनिक पक्षाचा अध्वर्यु होता तो पक्ष युद्ध थांबवण्याची मागणी जोरानें करीत होता; परंतु **केरेन्स्कीनें** मोठ्या चातुर्यानें त्याचें शांतवन केलें. त्यानंतर त्याला मुख्य प्रधानाच्या जागीं नेमण्यांत आलें. त्या जागेवर राहून त्यानें कशा चातुर्यानें राज्यनौका चालविली हें पुढील त्याच्या चरित्रावरून समजून येईल. युद्ध थांबवण्याची त्याची जी युक्ति होती ती मजूर—सैनिक पक्षाला पसंत न पडल्याकारणानें त्याला प्रधान-मंत्र्याची जागा सोडणें भाग पडलें. सध्यां तो **इंग्लंडांत** जाऊन राहिला असून, तेथून ध्यानपूर्वक **रशियाची** स्थिति बारकाईनें अव-लोकन करीत आहे.

**केरेन्स्कीची** प्रधानमंत्र्याच्या जागी नेमणूक झाल्यावर इतर मंत्र्यांच्या जागीं साम्यवादी मंत्र्यांच्या नेमणुका करण्यांत आल्या. अशा-तऱ्हेच्या मंत्रिमंडळाच्या रचनेच्या प्रसंगीं एक अशी वाईट गोष्ट झाली कीं, रणक्षेत्रातील सैनिकांत पुन्हां मोठी गडबड उडून गेली. याचें कारण असें होतें कीं, साम्यवादी लोक त्यांच्यांत अशीं व्याख्यानें देत हिंडत होते कीं, '**सेनापतीच्या हुकमतींत न राहतां सैनिकांनीं आपापल्या कमेट्या नेमून त्यांच्या आज्ञांप्रमाणें वागणेंच सध्यांच्या प्रसंगीं इष्ट आहे.**" ग्यॅलेशियांत रशियाचा जो दांडगा

पराभव झाला तो याच नव्या रोगाचें बीज होय. **कॉर्निलॉफला** मुख्य सेनापतीची जागा देण्यांत आली होती पण त्यानेंही निराळेंच ढंग सुरू केले. आपणास जर सेनेचे संपूर्ण अधिकार मिळतील तरच सर्व गाडे यथास्थित चालतील, नाहीं तर सेनेकडून यथोचित काम येणें अशक्य आहे असे तो म्हणूं लागला होता.

**रशियन** राज्यक्रांतीनंतर रणक्षेत्रातील सैनिकांची स्थिति खालावतच चालली होती, पण त्याला इलाज नव्हता. **जर्मनीनें रशियाची** आघाडी जिंकून पन्नास साठ मैलांच्या आंतला प्रदेशही काबीज केला होता. **ड्वीना** नदीच्या किनाऱ्यावरील, **जेकब स्टेड** व **फ्रेडरिक स्टेड** हीं **रशियाचीं** दोन मुख्य ठाणींही **जर्मनीनें** काबीज केलीं होतीं. दोन वर्षांच्या सक्त युद्धाच्या मेहतीनें जीं स्थलें **रशियन** सेनेनें आपल्या ताब्यांत ठेवली होतीं तीं सुद्धां तिला सोडून पीछेहाट करावी लागली.

अशा तऱ्हेनें **जर्मनीनें ड्वीना** नदीवरील मुख्य केन्द्र जिंकून एकदम जे युद्ध बंद केलें त्यात त्याचा मतलब असा होता कीं, लोकसत्तात्मक सरकार युध्द थांबवून तह करण्याची मागणी खास करील. कारण, साम्यवादी पक्षाची **कैसरला** पुरी माहिती मिळालेली होती आणि मन्त्रिमंडळ साम्यवाद्यांच्या हातीं गेल्यावर तर काय **कैसरला** पूर्ण आशा उत्पन्न झाली कीं, आतां तह झाल्यावांचून खास राहात नाहीं.

# काण्ड तेरावें.

इकडे राशियांत दोन पक्ष आपसांत तटत होते. मास्कोंतील धनाढ्यांनीं राज्यसूत्रें आपल्या हातीं बळकाविलीं होतीं. ते लोक युद्धाला साह्य करतील अशी फार आशा होती. मध्यम स्थितींतले लोक युद्धाला पुरें साह्य देत होते. त्यांनीं औषधोपचार व भोजनालयें यांची सैन्याला चांगलीच मदत देण्याचें काम सुरू ठेविलें होतें, त्यामुळें जर्मनीला चारी-मुंड्यां चीत करता येईल असा त्यांचा अदाज होता. पण साम्यवादी लोक कोणाचेंही ऐकणारे नव्हते. सेनेंत त्यानीं जो भाव उत्पन्न केला होता तो सहजीं मिटण्यासारखा नव्हता. आम्ही क्रांती घडवून आणिली आहे अशी त्याना घमेंड झालेली होती. सर्व माणसें एकाच दर्जाचीं असावीत. त्यांत श्रेष्ठ व कनिष्ठ असा फरक ठेवण्याची त्यांची इच्छा नव्हती.

मजूर-सैनिक-कौन्सिल हेच काय ते राज्यचालक बनल्यावर जिकडे तिकडे सर्व राशियाभर त्यांच्याच पक्षाच्या कमेट्या स्थापन झाल्या. रणक्षेत्रांतील सैनिकांनीही तोच मार्ग स्वीकारला. केरेन्स्कीनें स्वतःच्या बुद्धिचातुर्यानें सैनिकांना जर्मनीशी अखेरपर्यंत लढण्यास तत्पर केलें असल्यामुळें मध्यम वर्गांतले लोकही संतुष्ट झालेले होते. रण-भूमीवर आलेल्या पराजयामुळें सैन्यांत उच्छृंखलपणा उद्भवला होता. अशा त्या वेळीं केरेन्स्की मोठ्या पेंचांत सांपडला होता. सैन्याची व्यवस्था झाल्यावांचून त्या पेंचांतून त्याला सुटणें असंभवनीय असल्या कारणानें तो पेंच सोडवण्यासाठीं त्यानें मॉस्कोमध्यें एक पंचवीसशें प्रतिनिधींची कॉन्फरन्स भरविली. ते सर्व प्रतिनिधि-सैन्य, धनिक,

व्यापारी, सार्वजनिक संस्था व मजूरवर्ग यांच्या तर्फे बोलावलेले होते. त्या प्रतिनिधींच्या एकमतानें सेनापतीला सर्व अधिकार दिल्यावांचून सैन्यांतील गडबड बंद होणें अशक्य आहे असें ठरविण्यांत आलें. या अधिकारप्राप्तीनें सेनापती स्वतंत्रपणें वाटेल तें करू लागला सेनापतीला सर्वाअधिकार देण्यांत जी केरेन्स्कीची चूक झाली तिची दुरुस्ति करणें आतां अशक्य झालें होतें. सेनापति कॉर्निलॉफ व केरेन्स्की याच्यांत वितुष्ट असल्यामुळें तें यायोगें अधिकच वाढलें.

काहींचें म्हणणें असें आहे कीं, सैन्य आपली अवज्ञा कशी करतें हें दाखवण्यासाठींच कॉर्निलॉफनें मुद्दाम रीगाचें रक्षण केलें नाहीं व त्यामुळेंच जर्मनीला तें सर करतां आलें. केरेन्स्कीची सर्व हिंमत सैन्यबळावर होती व कॉर्निलॉफ सैन्याचे सर्व अधिकार बळकावू पाहात होता. त्याच्या संबंधानें जर सेना असंतुष्ट झाली असती, तर क्षणार्धांत मंत्रिमंडळ बदललें असतें. उदारमतवाद्यांच्या आश्रयानेंच इतक्या प्रबल मतभेदांच्या कातरींत केरेन्स्की काम करीत होता. रिगाच्या पतनानंतर कॉर्निलॉफनें केरेन्स्कीच्या विरुद्ध दंगल करून कॉसॅक घोडेस्वाराच्या मदतीनें पेट्रोग्रॅडचाही ताबा घेण्यापर्यंत मजल आणली होती, पण त्याला ताबडतोब केरेन्स्कीनें मुख्य सेनापतीच्या हुद्यावरून बडतर्फीचा हुकूम सोडला असतांही तो त्यानें अमान्य केला. केरेन्स्कीचें सैन्य व कॉर्निलॉफचें सैन्य याची पेट्रोग्रॅडपासून चाळीस पन्नास मैलांवर एक चकमकही झडली.

## काण्ड तेरावें.

**कॉर्निलॉफ**नें रणक्षेत्रांतलें सैन्य आपल्याला येऊन मिळावें म्हणून **पब्लिसिटि कार्यालयांत** एक विनंतीपत्र छापवून त्याच्या प्रती सैनिकांकडे रवाना केल्याची **केरेन्स्की**ला बातमी कळतांच त्यानेंही तारेनें आपलें एक विनतीपत्र त्याच छापखान्यांत छापवून सैनिकांकडे ताबडतोब रवाना केलें **केरेन्स्की**च्या विनंतीला मान मिळून सैनिक त्याच्याच पक्षाला राहिले व **कॉर्निलॉफ**ला एकही सैनिक वश झाला नाही. इकडे **कॉर्निलॉफ**च्या ताब्यांतील स्वारांमध्येंही साम्यवाद्यांनीं आपलीं मतें पसरून त्यांना **कॉर्निलॉफ**ची संगत सोडायला लावलें. शेवटीं **कॉर्निलॉफ**ला हार खावी लागल्यामुळेंच मध्यम प्रतींतल्या लोकांतली खळबळ एकदम थंड झाली.

इतकें सर्व झालें तरी **रशियन** सैन्यसुधारणा म्हणून मुळींच झाली नाहीं. **केरेन्स्की**नें तें काम केलें असतें, पण देशांत त्याला शत्रू फार उत्पन्न झाल्यामुळें त्याला आपली जागा कशी सोडावी लागली ते पुढें योग्य स्थळीं सांगितलें जाणार आहे.

### प्रिन्स लॉफ—मुख्य मंत्री—

क्रांतीच्या पूर्वीं बरींच वर्षें **प्रिन्स लॉफ** हा शेतकरी वर्गाचा केवळ जीव की प्राण होऊन राहिला होता. त्याचें जनन व शिक्षण हीं दोन्हीं **मॉस्को** शहरीच झालीं होतीं. तो तारुण्यांत अमेरिकेच्या सफरीत तेथील लोकसत्ताक राज्यपद्धति बघून आलेला असल्यामुळें तिच्या तत्त्वांनीं त्याचें मस्तक भरून गेलेलें होतें. **रशियांत** १८९१ मध्यें जो भयंकर दुष्काळ

पडला होता त्यावेळीं यानें फार मोठ्या स्वार्थ-त्यागानें जनसेवा केली होती. आपली सर्व संपत्ति व बळ हीं त्यानें खर्च करून अनेक गोरगरीबांचे जीव वांचविले होते. त्यावेळेपासून तो गरीबांना आपला जीव कीं प्राण वाटूं लागला होता.

प्रजापंचायतींत अग्रेसरत्व मिळवून कीर्तिलाभहि त्यानें प्राप्त करून घेतला होता. बिन सरकारी संस्थांत भाग घेऊन त्यानें प्रजाहिताचीं अनेक कामें केलीं होतीं. रूस्सो-जपानी युद्धांत जखमी झालेल्यांची त्यानें सेवा-शुश्रूषा उत्तम केली. १९०४ मध्यें राजनैतिक मतभेदांची वावटळ उठली असतां त्यानें ती मोठ्या चातुर्यानें नष्ट केली. राज्यसुधारणेच्या मागणीपत्रांत प्रजेच्या बाजूनें त्याची पहिली सही होती. ड्यूमा सभेच्या प्रथमाधिवेशनांत टूला प्रांताचा प्रतिनिधि या नात्यानें तो निवडला गेला होता. ड्यूमेंत प्रवेश झाल्यावर देशाचें खरें हित



प्रिन्स लॉफ-प्रजासत्ताक राज्याचा मुख्य मंत्री.

# काण्ड तेरावें.

साधणारा तो सत्पुत्र आहे असा मान त्यानें मिळविला. १९०७ मध्यें ड्यूमा मोडली गेल्यावर त्यानें प्रजापंचायतीकडे पुन्हा आपलें लक्ष दिलें. त्यानें तेथें इतकें परिश्रमपूर्वक काम केलें कीं, शेवटीं त्याला मास्को सरकारच्या कौन्सिलांत जनतेनें प्रजाप्रतिनिधि म्हणून निवडून दिला. त्यानंतर महायुद्धाचा प्रारंभ होतांच त्याला प्रजापंचायती सभेचा अधिपति करण्यांत आलें. त्यानंतर त्याची गणना उच्च प्रतीच्या स्वदेश-सेवकांत होऊं लागून आपण खरेच तसे आहोंत असें त्यानें स्वकृतीनें जनतेच्या नजरेस आणिलें. तो मोठा हुषार, स्थिरस्वभावाचा, शांत धोरणी, दयाळु, गंभीर व सद्वर्तनी असा होता. त्याच्या नेत्रांत एक प्रकारचें अलौकिक तेज चमकत असे त्याची स्वदेशप्रीतीची स्वदेशसेवा सर्वश्रेष्ठ होती म्हणूनच त्याला मुख्य मंत्र्याची जागा देण्यांत आली होती.

**नूतन सैन्यरचना —**

हद्दपार केले गेलेले **रशियन** पुढारी परत स्वदेशीं येतांच त्यांच्या पक्षाला कांहीं सैनिक येऊन मिळाले. पूर्वी ज्या सैनिकाच्या दोन शाखा देशांत होत्या त्यांच्याच पुढें ज्या सहा शाखा बनल्या त्या पढील प्रमाणें:—

( १ ) **मॅकसिमिलिस्ट**—लोक जहाल पक्षाचे असून पूर्ण प्रजा सत्तावादी होते.

( २ ) **मिनिमलिस्ट**—हे लोक पूर्ण शांततावादी असून युद्ध बंद करून लोकसत्तात्मक म्हणजे प्रजाप्रतिनिधिक शासनपद्धतीची स्थापना करूं पाहणारे होते.

# रशियांतील बोल्शेव्हिजम् !

( ३ ) **बोल्शेव्हिक**—लोक अशी इच्छा करणारे होते कीं, देशांत जोंपर्यंत प्रजापतिनिधि निवडले जाणार नाहींत तोंपर्यंत सैनिक व शेत करी यांच्या बहुमतावरच राज्यचक्र चालवून, गिरण्या, कारखाने, खाणी व जमीन या गोष्टी राष्ट्रीय मालकीच्या कराव्या.

( ४ ) **मॅन्शेव्हिक**—या लोकांची अशी इच्छा होती कीं, थोड्याशा हुशार लोकांच्या मतानं प्रथम राज्य चालू करून शांततेची स्थापना केल्यावर प्रजाप्रतिनिधींची निवड करावी व मग सुरळीत राज्य-कारभार सुरू करावा.

( ५ ) **लेनिनिस्ट**—हे साम्यवाद्यांचे पक्षपाती असून, तावडतोब युद्ध बंद करणाराच्या पक्षाचा जो **लेनिन** त्याचा **केरेन्स्कीच्या** शासनपद्धतीशीं पक्का विरोध होता.

( ६ ) **केरेन्स्कीस्ट**—हे जरी **केरेन्स्कीचे** पक्षपाती होते तरी ते साम्यवादी असताही युद्धांत चातुर्याच्या युक्तीनें विजय मिळवून देश-रक्षण करावें असें म्हणणारे होते. यांचा सैनिकांवर चांगला पगडा असे पण पुढें सैन्य शांततावाद्यांना मिळाल्यामुळें या पक्षाचें पतन झालें.

यावरून वाचकांना असें आढळून येईल कीं, क्रांतीनंतरच्या नाजुक प्रसंगीं **रशिया** हा अनेक पक्षीयांचा एक आखाडाच बनून राहिला होता. अनेक पक्ष असले तरी त्यांपासून हानी होते नाहीं हें जरी खरें असलें, तरी पण या पक्षामध्यें सुरळीत चाललेली राज्यव्यवस्था जेव्हा उलथून पाडण्याचे गुप्त कट सुरू होतात तेव्हां राष्ट्राची त्यापासून अत्यंत हानी झाल्यावाचून मात्र राहात नाहीं.

## काण्ड तेरावें.

**लेनिन** रशियांत जाऊन पोंचण्याच्या पूर्वीच रशियांत **बोल्शे-विझ्मचा** प्रचार सुरू झाला होता हें वाचकांनीं लक्ष्यात ठेवावें. त्या प्रचाराचा मुख्य धुरीण **ट्रॉटस्की** हा होता. ही गोष्ट जरी खरी आहे तरी **लेनिन** व **ट्रॉटस्की** यांचे सिद्धांत एकच होते. कारण, **लेनिन** हा **ट्रॉटस्की**चा गुरू होता. **लेनिन**नें प्रथम **ट्रॉटस्कीला** अराजक साम्य-वादीयांच्या आखाड्यांत प्रविष्ट केलें. असल्यामुळें **लेनिन** व **ट्रॉटस्की** यांचे अनुयायी एकजुटीनें काम करूं लागले. त्यांनीं जें कार्य अंगीकृत केलें होतें त्या कार्यांतला त्यांचा अनुभव चांगला परिपक्व झालेला असल्यामुळें त्यांनी हलके हलके सैनिक व मजूर यांच्यात फूट पाडून त्यांना आपल्या पक्षास सामील करून घेण्याचें काम मोठ्या युक्तीनें चालविलें. त्यांनीं हें कार्यचक्र फिरविण्याचें काम ज्या वेळीं सुरू केलें, त्यावेळीं **केरेन्स्की** फारच आजारी पडलेला होता सबंद रशियाची राज्यव्यवस्था नव्या पध्दतीनें चालविणें, नवीन सैनिकांची उत्तम व्यव-स्था लावणें व इतर राज्यघटनेबद्दलची योग्य तरतूद करणें या सर्व गोष्टींचें ओझें त्याच्या एकट्यावरच एकदम पडल्यामुळें तो आजारी पडला होता व त्याची पदच्युति होण्याचें तरी कारण हेंच होतें. तो आजारी झाला नसता तर मुख्य प्रधानाच्या जागेवरून त्याचें पतन होणें अशक्य होतें. कारण रशियांतले बहुतेक सर्व साम्यवादी त्याला अनुकूल होतें व त्यामुळें त्याचा पक्ष शिरजोर झालेला होता.



प्रिन्स क्रुपोट्किन-स्वतंत्र रशियाचा पितामह.

काण्ड तेरावें.



कॉन्वलॉफ-प्रजाप्रातिनिधिकसत्तेचा व्यापारी मंत्री.

# काण्ड चौदावें.

## लेनिन आणि ट्रॉट्स्की.

ज्यानें केरेन्स्कीला आपल्या जागेवरून उतरण्यास आपल्या प्रभावानें भाग पाडलें व बोल्शेव्हिझम् म्हणजे काय याचा परिचय जगाला करून दिला त्याचें अल्पसें पूर्वचरित्र वाचकांस अवगत असणें अगत्याचें आहे असें वाटल्यावरून तें थोडक्यांत पुढीलप्रमाणें देण्यांत येते आहे.

लेनिन हा रशियांतील एका जमीनदाराच्या घराण्यांत जन्माला आलेला होता. त्याचें संपूर्ण नांव युलियनोव व्लडिमीर लेनिन असें आहे. त्याचें शिक्षण संपल्यावर त्यानें आपल्या पुढें रशियन शेतकऱ्यांचा उद्धार करण्याचें ध्येय ठेविलें व मॉर्क्स याचे सिद्धांत पूर्णपणें ध्यानांत आणून स्वतःला लोकसत्ताक राज्यपद्धतीचा पुढारी म्हणून तो म्हणवूं घेऊं लागला. त्याचा भाऊ पूर्वीपासूनच अराजक म्हटला जात होता. झारच्या विरुद्ध त्यानें गुप्त कट केल्याच्या आरोपावरून त्याला एकदम प्राणदण्डाची शिक्षा करण्यांत आला होता.

# काण्ड चौदावें.

लेनिननें जें कार्य अंगीकृत केलें होतें त्यांत कांहीं तो लेचापेचा नसून तो पूर्ण धाकबगार होता. त्यालाही एका राजद्रोहाच्या खटल्यांत त्याच्या वयाच्या सवीसाव्या वर्षीं कैदेची शिक्षा झालेली होती. कैदमुक्त झाल्यावर तो स्वदेश सोडून स्वित्सर्लंडांत जाऊन राहिला होता. तेथें राहूनच त्यानें रशियांतील शेतकरीवर्गाच्या दुःस्थितीबद्दलचीं कांहीं पुस्तकें लिहून प्रसिद्ध केलीं. शेतकऱ्यांच्या हितचिंतनाचीं व त्यांच्या दुःखमुक्ततेच्या मार्गांचीं तशीं पुस्तकें इतर रशियन लेखकांचीं, क्वचितच लिहिलीं असतील. तीं पुस्तकें फारच प्रभावशाली होतीं. जगांतील सर्व साम्यवाद्याचे सिद्धांत समजावून घेणें व त्यांच्या भेटी घडवून आणणें या गोष्टी लेनिननें स्वित्सर्लंडमध्यें राहूनच केल्या व त्या सिद्धांता-



लेनिन—बोल्शेव्हिझमचा मुख्य मंत्री.

चर स्वदेशातील राजशासनपद्धति कशी बनवितां येईल याबद्दलचे विचार ठरविले.

कोणच्याही तऱ्हेचा राजद्रोही म्हटला कीं, त्याची देशांतून हकालपट्टी करण्याचेंच रशियन राजनीतीनें व्रत स्विकारलें असल्यामुळें त्याला अनुसरून **लेनिनला** राजद्रोही म्हणून स्वदेश सोडून क्रांतीहोई-पर्यंत स्वित्सर्लंडमध्यें जाऊन राहावें लागलें होतें. रशियांत क्रांती घडून येण्याच्या पूर्वी एक दोन वर्षें जर **लेनिन**ला रशियांत येण्याची परवानगी देण्यात आली असती, तर तोच क्रांतिकारकाचा अध्वर्यु झाला असता. रशियांत क्रांती घडून आल्यावर हद्दपार झालेल्या सर्व रशियनांस जेव्हां रशीयांत परत येण्याची परवानगी नव्या मंत्रि-मंडळानें प्रसिद्ध केली तेव्हां **जर्मनीनें** दयाभूत अंतःकरणानें परतु कांहीं गुप्त उद्देशानें, आपली एक स्पेशल ट्रेन ( आगगाडी ) तशा लोकांना रशियांत नेऊन सोडण्यास आपल्या राज्यांतून दिली म्हणूनच **लेनिन** स्वदेशीं जाऊन पोंचला. **लेनिन जर्मन** ट्रेनमध्यें बसून रशियात जाऊन पोंचल्याची खबर **युरोपीय** राष्ट्रांतून प्रसिद्ध झाल्यावर विशेषतः **इंग्लंड**मध्यें अशी अफवा प्रसिद्ध झाली कीं, **लेनिन** हा **जर्मनीला** मिळाफी झाला आहे.

**लेनिन** हा रशियात जाऊन पोंचल्यावर त्यानें तेथील सर्व शेत-कऱ्यांना आपल्या पक्षांत सामील करून घेतले व हलके हलके सैनिकही त्याला जाऊन मिळाले. यांतली मुख्य मुद्याची गोष्ट अशी होती कीं,

## काण्ड चौदावें.

जमीनदारांच्या हातून जमीन हिसकावून घेऊन तिची वांटणी शेतकरी लोकांत करून देण्याचें ध्येय त्यानें स्वीकारलें होतें. देशांत शेतकरी लोकांचीच लोकसंख्या अधिक असल्यामुळें **लेनिन**चा पक्ष बळावत गेला. **केरेन्स्की व लेनिन** यांच्यांत मुख्यतः तंट्याची गोष्ट अशी होती कीं, मध्यम प्रतीच्या वर्गाबद्दल **लेनिन** निष्काळजी असून शेतकऱ्यादि कनिष्ठ मानिल्या गेलेल्या लोकांचा तो आश्रयदाता होता व श्रीमंतांच्या पाजीपणामुळेंच महायुद्धासारखें अरिष्ट देशावर येऊन लाखों गरीबांचे प्राण धारातीर्थीं विनाकारण खर्ची घालण्यांत आले असें तो प्रतिपादन करणारा होता. **लेनिन** हा सर्व साधारण लोकसत्ताक राजशासनपद्धतीचा खरा पक्षपाती होता. **केरेन्स्की** हा तावडतोब युद्ध बंद करावें असें म्हणणाऱ्यांपैकीं नसून तसें म्हणणाऱ्यांची त्यानें कांहीं भरही पर्वा केली नाहीं! म्हणूनच भयंकर प्रसंग ओढवला व त्याची अखेर हानीकारक झाली. कोणच्याही देशानें दुसऱ्या कोणच्याही देशाची जमीन आक्रमूं नये व कोणीही परक्याचें चित्त स्वार्थासाठीं हरण करूं नये, असे **लेनिन**चे दोन मुख्य मुद्दे होते. इंग्लंड व फ्रान्स या दोन्ही राष्ट्रांना हे त्याचे दोन्ही सिद्धांत मान्य होऊन तीं राष्ट्रें **रशियाशीं** कायमचा टिकाऊ तह घडवून आणतील अशी **लेनिनची** खात्री होती.

आपलें सिद्धांत प्रचारांत प्रस्थापित करण्यासाठीं **लेनिननें** **रशियांत** गेल्यावर अत्यंत परिश्रम करून **केरेन्स्कीची** प्रभावळ रसातळाला नेऊन पोंचवली व पुढें ज्या मजूरवर्गाच्या कौन्सिलाला **सोव्हि-**

**एट** या नावाची प्रसिद्धि प्राप्त झाली, त्या कौन्सिलचा त्यानें वर चष्मा करून राज्यसूत्राचा कब्जाही त्याच कौन्सिलच्या ताब्यांत देण्यांत आला ! **सोव्हिएटा**वांचून राज्यकारभारांत काहीही हालत नाहींशी झाली आहे असें पाहून व त्या पक्षाचा पक्षपाती नसल्यामुळें **केरेन्स्कीला** आपल्या प्रधानपदाचीं वस्त्रें उतरून ठेवणें भाग पडलें. सोव्हिएटनी **लेनिन**ची मुख्य प्रधानाच्या जागी स्थापना केली.

**ट्रॉटस्की**—

मजूर व सैनिक यांच्या जुन्या कौन्सिलातील पुढाऱ्यांपैकीं **ट्रॉटस्की** हा असून सर्व साधारण लोकसत्ताक राजशासन पद्धति स्थापित करणें हा आपला जन्मसिद्ध हक्क आहे असें मानणाऱ्यांपैकीं जो एक आहे; तो १९०५ मध्यें **सोव्हिएटचा** सभापति असतांना त्याच्यावर जो राजद्रोहाचा खटला करण्यांत आला होता त्यांत त्याला **सैबेरियांत** काळ्यापाण्यावर धाडण्याची शिक्षा झाल्यामुळें तेथें जाणें त्याला प्राप्त झालें होतें. तो तेथून **पळून** पुन्हा गुप्तपणें **रशियांत** परत आला. त्यानें कांहीं काळ गुप्त वेषांत राहून रशियन अराजकांबरोबर काम केल्यावर तो **ऑस्ट्रियांत** निघून गेला. त्याची व **लेनिन**ची जुनी ओळखदेख होती. **व्हिएन्ना** नगरींतील एका वर्तमानपत्राच्या कार्यालयांत तो बरेच दिवस काम करीत होता. महायुद्धारंभीं त्यानें आपल्या एका रशियन मित्राला तार दिल्यामुळें त्याला **ऑस्ट्रियाही** सोडून जावें लागलें ! तो **स्वित्सर्लन्डां**तही कांहीं महिने जाऊन राहिला होता.

तो स्वित्सर्लंन्डांतून अमेरिकेंत निघून गेला. तेथें त्यानें




ट्रॉटस्की—लेनिनचा मंत्री.

नोवी मीर ' नावाच्या एका रशियन वर्तमानपत्राच्या संपादकांत

आपलें नांव गोंवून घेतलें. तेथे तो दोन वर्षेंपर्यंत **न्यूयॉर्क**मध्यें नोकरी करीत राहिला होता. युद्धारंभीं तो **कॅनेडांत** होता. तेथून तो रशियांत निघून गेला, पण तत्पूर्वीं त्याला **जर्मनी**चा हेर म्हणून कांहीं काळ **कॅनेडांत** तुरुंगवास भोगावा लागला होता! त्या स्थितींत त्यानें रशियाचा परराष्ट्रीय मंत्री **मिल्यूकॉफ** याला तार धाडल्यामुळें त्याची बंधमुक्तता झाली व नंतर तो स्वदेशीं जाऊन पोंचला.

**रशियांत** जाऊन पोंचल्यावर **ट्रॉटस्कीनें** पुन्हां आपलें क्षेत्र तयार केलें. सैनिक लोक आपल्या पक्ष्यास येऊन मिळण्यासाठीं त्यांच्यांत त्यानें **बोल्शेविझम**चा प्रसार केला व त्यांत तो विजयीही झाला. पेट्रोग्रॅड मधील सैनिक लवकर तह घडऊन आणण्याची इच्छा धरणाऱ्याचे पक्षपाति होते, त्यामुळें ते **ट्रॉटस्कीला** मिळाले व त्यायोगें **केरेन्स्कीचें** मंत्रिमंडळ छिन्न भिन्न झालें बोल्शेव्हिक पक्ष्याला जहाल लोक जसे सामिल झाले तसेच शेतकरी व अराजक ( निहिलिस्ट ) लोकही येऊन मिळाले. अशा तऱ्हेनें तो पक्ष बळावल्यामुळेंच त्यापुढें **केरेन्स्कीची** डाळ शिजेनाशी झाली. पुढें तर युद्ध त्वरित बन्द करावें असें सैनिकही म्हणूं लागले व त्याचमुळें **सोव्हिएट** पक्ष्याचे सर्व लोक त्वरित तह घडवून आणण्याचे पक्षपाती बनले गेले. अशी जरी स्थिति **रशियांत** उत्पन्न झाली होती, तरी जोंपर्यंत इंग्लंड व फ्रान्स हीं दोन राष्ट्रें आपला हेका सोडून **लेनिनच्या** सिद्धांताप्रमाणें

वागण्यास तयार होणार नाहींत तोपर्यंत सर्वव्यापी तह ( General Peace ) होणें व रशियाचा कांहीं शर्तीवर स्वतंत्र तह होणें असंभवनीय आहे ही गोष्ट कोणाच्याच ध्यानांत आली नव्हती ! पुढें याच असंभवनीय गोष्टीचें प्रत्यंतरही आलें !

कसेंही असलें तरी **ट्रॉटस्कीनें लेनिनला** कल्पनातीत साहाय्य केल्यामुळेंच तथ्यां **बोल्शेव्हिझमचा** होत असलेला बोलबाला ऐकू येत आहे यास्तव, **ट्रॉटस्कीला** त्यानें त्याच्या अंगीकृत कार्यांत जो मोठा बोजा उचलला त्याबद्दल धन्यता देणें आवश्य आहे.

# काण्ड पंधरावें.

## रशियांतील सन्ध्यान्दोलन!

सर्व जहाल पक्षाभिमानी जरी **लेनिनला** जाऊन मिळाले होते तरी मवाळपक्षाचे लोक अद्यापी **लेनिनला** वश झाले नव्हते. उदारमतवादी व रेल्वेकामगार त्यांच्याच पक्षाला चिकटून राहिले होते. रशियांत अशी जरी स्थिति होती तरी त्या दोन पक्षांत यादवी (Civil War) न होण्याचें जें एक मुख्य कारण होतें तें असें कीं, रेल्वेकामगारांनीं अन्नसामुग्री व सैन्य यांच्या वाहतुकीला बिलकुल अडथळा केला नव्हता व त्यामुळेंच रशियात आपापसांत बराच काळ यादवीच्या तरवारींच्या चमका दृष्टीस पडल्या नाहीत !

**लेनिननें** जरी रशियाची सर्व राज्यसूत्र आपल्या हातीं घेतलीं होतीं, तरी मवाळ पक्ष आपल्यास येऊन मिळेपर्यंत देशांत शांती पसरणार नाहीं याची त्याला कल्पना झालेली नव्हती. अखेरीस तसेंच झालें. **कोर्सेकनीं** आपली स्वतंत्र रियासत स्थापना केली ! **कीव** ते **ओडेसा** पर्यंतच्या टापूंत **उक्रेनियन** सत्ता स्थापन झाली. **कॉकेशस** व **सैबेरिया** अशीं दोन स्वतंत्र संस्थानें जन्माला आलीं व

पश्चिम रशियांतही अशाच तऱ्हेची गोष्ट घडून आली. या प्रमाणें रशियाची सर्वटित शक्ति वाटली गेल्यामुळें **लेनिन**च्या हातीं असलेला मध्यरशिया एकटाच अलग पडला.

आरंभीं आरंभीं तर सैनिकही **बोल्शेव्हिझम**ची पर्वा करीत नव्हते व मुल्की खात्यानें तर जवळ जवळ संपच केला होता ! अशा त्या संकटावस्थेंत **लेनिन**ला राज्यशकट हांकीत राहणें प्राप्त झालें होतें. तशा त्या बिकट परिस्थितींत योग्य प्रकारचें राज्यशासन करणें जसें एकप्रकारें **लेनिन**ला अति बिकट काम होऊन बसलें होतें. तसेंच **केरेन्स्की**च्या वेळेपासूनच सैन्यांत जी चळविचळ झालेली होती तिला व्यवस्थित स्वरूप देण्याचा प्रयत्न करणेंही **लेनिन**च्या शक्तीबाहेरचें काम होऊन बसलें होतें. अशा बिकट परिस्थितींतही **बोल्शेव्हिझम**च्या मंत्रिमंडळांत इतर कोणच्याही पक्षानें घुसूनये म्हणून **लेनिन**चा अटोकाट प्रयत्न चालला होता. मजूर वर्ग व शेतकरी लोक **लेनिन**वर जे अत्यन्त खूष होते त्याचें कारण असें होतें कीं, तो मुख्य प्रधान झाल्याबरोबर त्यानें सर्व जमीन शेतकऱ्यांच्या ताब्यांत देऊन टाकून कामगार लोकांना त्यानें कारखान्याचे मालक करून टाकलें होते ! राहिलें काय तें युद्धाला कंटाळलेलें सैन्य. त्या बाबतींतही त्वरित तह घडवून आणण्याचा मंत्रोपदेश त्यानें आरंभींच सर्वत्र करून सोडला होता. जयापजय किंवा लाभालाभ यांची पर्वा न करतां मी तह घडवून आणणार आहे असें त्यानें स्पष्टपणें प्रसिद्ध केलें होतें व तेवढ्याचसाठीं

त्यानें **स्टॉकहोम** नगरींत एक कॉन्फरन्स भरविण्याचाही आपला उद्देश प्रगट केला होता. त्या कॉन्फरन्सला युरोपांतील सर्व राष्ट्रांतील कामगार व साम्यवादी यांचे प्रतिनिधि बोलावण्यांत आले होते; पण लाभालाभावांचून संधी करण्यास **इंग्लंड** व **फ्रान्स** हीं दोन राष्ट्र प्रथम-पासूनच विरुद्ध असल्यामुळें व **इटालीला** काखेंत मारून टर्कीसंबंधाचें त्यांनी जे आपसांत स्वार्थाचे केलेले तह पुढें उघडकीस आले ते त्या वेळीं स्वार्थी तह मोडण्यास तीं राष्ट्रं तयार न झाल्यामुळें **लेनिननें** केलेल्या संध्यान्दोलनाची खटपट व्यर्थ गेली व **पॅरिसमध्यें बोनर लॉ** यानी युद्ध थांबवण्याच्या बाबतींत एक चकार शब्दही न उच्चारतां तें जोरांत चालू ठेवण्याचाच उपक्रम केल्यामुळे तह घडून येणें असंभवनीय होऊन बसलें. अशी गोष्ट घडतांच रशियाचाच फक्त स्वतन्त्र तह घडवून आणण्याची युक्ति **लेनिननें** अमलांत आणण्याचें योजिलें.

**लेनिन** व त्याचा मंत्री **ट्रॉटस्की** यांची अशी खात्री होती कीं, आपण जर स्वतंत्रपणें जर्मनीशीं तह केला तर रशियाची राज्यघटना लवकर सुयंत्रित करून सोडूं व याच आशेवर त्यांनी **जर्मनीशीं** तात्पुरता तीन महिन्याचा तह केला व हत्यारें खालीं ठेवलीं. त्या तीन महि-न्यांच्या अवसरात—**फ्रॉन्स, जर्मनी** व **इंग्लंड** या देशांत आपल्या मतप्रभावानें आपण लोकसत्ताक शांततेची संधि घडवून आणूं अशी **लेनिनला** फार आशा होती, पण त्या बाबतींत त्याला बिलकुल यश न येतां **जर्मनीनें**ही त्याला निराशेचाच मार्ग दाखविला.

## काण्ड पंधरावें.

### अन्तरराष्ट्रीय डांवपेंच—

इ. सन १९१७ चे शेवटचे दोन महिने व १९१८ चा पहिला जानेवारी महिना असे तीन महिने—युरोपांतील अंतराष्ट्रीय गोष्टींच्या—राजनीतिदृष्ट्या—पूर्ण महत्वाचे होते यांत संशय नाहीं. रशियाच्या नूतन स्थितीचा प्रभाव सर्व युरोपभर पडला होता व **लेनिननें** 'आत्मनिर्णय' या सिद्धांताची परिस्थिति अशा तऱ्हेची प्रमुख बनवून सोडली होती कीं **इंग्लंड** व **अमेरिका** यावर तिची विकाळ छाया पसरून लहान लहान राष्ट्रांच्या बाबतींत तर तो सिद्धांत त्यांना मान्य करणें भागच झालें! प्रे. **वुइलसन** यानें जरी जगप्रसिद्ध अशा न्यायी चौदा तत्वाचें आविष्करण केलें होतें व युरोपलाही तीं तत्वें जरी मान्य करणें उचित वाटत होतें, तरी त्यांचा अवलंब करण्यास युरोपीय राष्ट्रें संकोचच करीत होतीं. व तशा स्थितींतही रशियाच्या स्वतंत्र तह करण्याच्या मुद्यानें त्यांना बरींच जवळ खेंचून आणिलीं होतीं! **पोलंड, फिन्लंड, अरबस्तान, पॅलेस्टाइन** वगैरेंना स्वमतानें आपापले राज्यकारभार करूं लागण्याची रशियानें संमती देऊन टाकिली होती. **फ्रान्सचा** उत्तर भाग, **बेल्जम, अल्सेस** व **लॉरेन्स** हे दोन प्रांत इतकें सर्व त्या वेळीं **जर्मनीच्या** हातांत होतें.

शेवटीं **लाईड जार्जनें** अंतरराष्ट्रीय प्रश्नावर एक भाषण करून असें प्रतिपादन केलें कीं, " **उत्तर फ्रान्स, अल्सेस व लारेन्स हें सर्व स्वयंनिर्णयाच्या तत्वानुसार फ्रान्सला परत मिळून**

बेल्जमचा कोणचाही भाग जर्मनीला दाबून ठेवतां येणें अशक्य आहे. पोलंड, रुमानिया, सर्व्हिया, अर्बस्थान, पॅलेस्टाइन वगैरे प्रांतांना आत्मानिर्णयाचा अधिकार दिला जाऊन जर्मनीच्या वसाहतींनाहीं हेंच तत्व लागू केलें जावें. "

प्रे. वुल्सननें दुसरें एक समुद्राच्या बाबतीत असें तत्व प्रसिद्ध केलें होतें की, " **सर्व समुद्र सर्वांच्या मालकीचा असावा.** "

या बाबतींत—**लॉईड जार्ज**, प्रे. **वुइल्सन** आणि **जर्मनीचा** प्रधानमंत्री **काउन्ट हर्टलिंग** व **ऑस्ट्रियाचा** परराष्ट्र सचीव **काउन्ट झेरनिन** यांच्यामध्यें बराच खडाजंगीचा वादविवाद झाला. कारण मित्रराष्ट्रांवर त्यावेळीं शत्रुराष्ट्रांना विजय प्राप्ति करून घेतलेली होती.

ऑस्ट्रियाचा परराष्ट्रसचिव म्हणाला कीं, " **या महायुद्धाचें कारण असें आहे कीं, बाल्कन राष्ट्रें व तुर्कस्तान यांवर आपलें स्वामित्व गाजविण्याची जशी रशियाला लालसा होती तद्वतच अल्सेस व लॉरेन्स हे प्रांत जर्मनीकडून सोडवून परत घेण्याची फ्रान्सला जिगीषा उत्पन्न झाल्यामुळेंच तो रशियाला जर्मनीविरुद्ध उत्तेजित करीत होता व या बाबतींत इंग्लंडनें एवढ्यासाठीं भाग घेतला होता कीं, रशिया व फ्रान्स यांचा जर पराभव झाला तर**

जर्मनीचें स्वामित्व बाल्कन राष्ट्रें व तुर्कस्तान यावर स्थापित होऊन त्यामुळे हिंदुस्तान व इतर देश यांच्या बाबतींत इंग्लंडवर संकट येईल रुमानिया व इटाली एवढ्याचसाठीं या युद्धांत घुसलीं कीं, ऑस्ट्रियाचाही कांहीं प्रांत आपणांस खायला सांपडला तर प्रयत्न करून पाहावा; पण ज्याकारणान युद्ध सुरू झालें त्याचा निकाल युद्धानेंच स्वतः केलेला आहे ! " काउन्ट जेरनिनचा या बाबतीं असा अभिप्राय आहे कीं, " जर्मनीनें रुमानियाला जिंकला व इटलीचा व्हेनिस प्रांत ऑस्ट्रियाच्या ताब्यांत गेला; अर्थात इटली व रुमानिया यांच्या अभिलाषांचा चक्काचूर उडाला. राहिला काय तो फ्रान्स ! त्यालाही युद्ध करण्यापासून कडु फळें चाखण्यांस मिळालींच—त्याचा उत्तर भाग जर्मनीनें लढून आपल्या ताब्यांत घेतला व त्यायोगें अल्सेस व लॉरेन्स हे दोन प्रदेश परत मिळविण्याची लालसा धूळ फांकीत पडली ! " ऑस्ट्रियन परराष्ट्रीय सचिवानें आपल्या भाषणांत या व्यतिरिक्त अशी एक गोष्ट सांगितली आहे कीं, " सध्यां रशियाचे तर तुकडे तुकडे होऊन गेले आहेत ! आतां याउप्पर—तुर्कस्तानचें साम्राज्य बाल्कन राष्ट्रें या बाबतींत—जर्मनी व ऑस्ट्रिया जो निकाल देतील तोच निर्णयात्मक मानणें सर्वांस आवश्यक आहे यांत रतिमात्र संशय नाहीं. "

## रशियांतील बोल्शेव्हिझम् !

जर्मनीचा मुख्यमंत्री आपल्या भाषणांत असें स्पष्ट बोलला कीं, " ज्या अर्थीं आम्ही पोलंड देश जिंकला आहे, त्या अर्थीं तेथील राज्यव्यवस्था कशी करावी हें ठरवण्याचें काम आमचें आहे इतर बाबतींत तो इतकेंच बोलला कीं, आम्हीं जर फ्रान्सचा उत्तर भाग व बेल्जम देशहीं सोडून दिलीं तर आमच्या वसाहती आम्हांला परत मिळाल्या पाहिजेत. आम्हीं स्वतः त्यांच्या इच्छेनुसार त्यांची शासनपद्धति ठरवूं. "

रशियांकडून आलेल्या राज्यक्रांतीनें अतरराष्ट्रीय जनतावर जरी विलक्षण प्रभाव पाडला होता, तरी रशियांतील अतस्थ कलहामुळें त्याला अतरराष्ट्रीय राजनीतींत प्राधान्य मिळवितां आलें नाहीं. पोलंड, फिन्लंड, उक्रेनिया, कोरत्तन्ड, आर्सेक, लिवोनिया, एस्तोनिया, आस्ट्रारवान कॉकेशस वगैरे प्रांत जर ऐक्यानें सुसंघटित राहिले असतें तर त्यांचा मध्य युरोपच्या राजनीतीवर खात्रीनेंच विलक्षण प्रभाव पडला असता; पण तशी गोष्ट घडून आली नाहीं हेंच त्या देशाचें दुर्दैव !

अखेरीस लेनिन व ट्रॉटस्की यांनी जर्मनीशीं तह करण्याचें बोलणें सुरू केलें रशियाचा तह ही एक गूढतम अशी अंतरराष्ट्रीय इमारतीची पहिली पायरी कशी होती तें पाहा !

# काण्ड पंधरावें.

## रुस्सो-जर्मन तह—

**जर्मनी व ऑस्ट्रिया** यांनी राशियाला इ. सन १९१८ च्या फेब्रुवारी महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यांत आपल्या तहाच्या शर्ती कळविल्या. त्या शर्तींत कांहीं शर्ती स्वार्थपूर्ण असल्यामुळें **लेनिन** व **ट्रॉटस्की** यांनीं संधीपत्रावर जरी सह्या करणें नाकारिलें तरी त्याबरोबरच **जर्मनीशीं** लढण्याची आपली शक्ति नाहीं अशीही त्यांनीं आपली कबुली दिली. इतकेंच नव्हे तर यापुढें युद्ध चालू ठेवण्यास **राशिया** असमर्थ असल्यामुळें त्याची युद्धार्थ रणक्षेत्रावर जमविलेली सेनाही तो परत घेऊन जातो आहे असें त्याबरोबरच त्या दोघांनीं **जर्मनीला** कळविलें होतें. इतकें कळवून त्यानीं असेंही आणखी कळविलें होतें कीं, आम्ही युद्ध बंद करून तहाला जरी जुजबी संमत्ती देत आहोंत तरी फक्त तहनाम्यावर सध्यां सह्या मात्र करीं नाहीं.

याप्रमाणें **रशियन बोल्शेव्हिक** सरकारनें जर्मनीला कळविल्यावर **जर्मनी** व **ऑस्ट्रिया** यानीं **उक्रेनियाशीं** स्वतंत्र तह केला! त्या तहान्वयें **जर्मनीनें रशियनपोलंडचा** कांहीं भाग **उक्रेनियाला** देऊन त्याच्या बदली अन्नसामुग्री त्यानें आपणांस पुरवावी असा ठराव करून घेतला होता. या तहाप्रमाणें **उक्रेनियानें** आपलें स्वातंत्र्य प्रसिद्ध केलेलें पाहून **रशियन** सरकार चवताळलें व त्यानें **उक्रेनियाच्या** दाणागोठ्याच्या भांडारांची राखरागोळी करण्यास आपल्या सैन्याला हुकूम दिला. **रशिया** व **उक्रेनिया** याच्यांत या

प्रमाणें परिस्थिति उत्पन्न झाली. आपल्या राज्यांतील एक प्रान्त **उक्रेनियाला** जर्मनीनें दिल्यामुळें इकडे **पोलंडचें** सरकारही नाखूष झालें होतें. **पोलंडनें** नाराज व्हावें अशी **जर्मनीची** इच्छा नसल्यामुळें त्या बाबतींत **ऑस्ट्रियानें उक्रेनियाची** समजूत करून तो लढा मिटविला.

यानंतर **फिलंडचें** संरक्षण करणारें जे सफेत सैन्य होतें त्याच्याशी **राशियानें** युद्ध पुकारलें व **रीगा** नजीकच्या खाडीवरील **जर्मनीच्या** मुलखाचा ताबा घेण्यास सुरवात केल्यामुळें तहाच्या शर्तीवरून **जर्मनीला** कोणच्याच तऱ्हेचा लाभ होणें अशक्य झालें.

**रशियानें** आरंभिलेला हा डाव पाहून **जर्मनीनें** त्याच्याकडे निर्वाणीची म्हणून अशी एक सूचना पाठविली कीं, " **तुम्ही लढाई बंद केली असतांही आम्ही युद्ध थांबविण्यास तयार नाहीं. शिवाय तुम्ही तहनाम्यावर अद्यापी सही केली नसल्यामुळें यापुढें तहनामा रद्द आहे असें आम्ही समजतो व त्या योगें युद्ध बंद झालेलें नाहीं असें आम्ही मानतों. आम्ही आमच्या सैन्याला पुन्हां युद्ध सुरू करण्याचे हुकुम सोडले आहेत.** "

अशा तऱ्हेची सूचना धाडून **जर्मनीनें** पुन्हां **रशियावर** चाल करून जाण्यास आरंभ केला. तीनचार दिवसांतच **जर्मन** सैन्यानें **फिन्लंडच्या** खाडीच्या दक्षिणेकडच्या किनाऱ्यावरील प्रांत जिंकून

घेतला. रीगा व पेट्रोग्रॅड यांच्या दरम्यान असलेलें पिस्कॉफ शहरही जर्मनीच्या ताब्यात गेलें. तशा त्या स्थितींत रशियन सेनेनें कोण-त्याही प्रकारें जर्मन सेनेला विरोध केला नाही. पिस्कॉफ शहरांत असलेला बराच दारूगोळा जर्मनीच्या ताब्यांत गेला. आठ दहा दिव-सांत आतां पेटोग्रॅडही जर्मनीच्या ताब्यांत जाण्याचें चिन्ह दिसतें आहे असें लक्षात आणून रशियन सरकारन आपली मान जर्मनीपुढें वांकविली व " आपण ज्या शर्तींवर तह कराल त्या तह-नाम्याच्या कागदावर आम्ही सह्या करण्यास तयार आहात. " अशा विनंति जर्मनीकडे पाठविली. ता. ३ मार्च पर्यंत तह करण्यांत येईल असें जर्मनीनें रशियाला कळवून आपल्या सैनिकांस पुढें चाल करून न जाण्याचे हुकुम सोडले. त्याप्रमाणें ता. ३ मार्च रोजीं सायंकाळीं रशियन सरकारनें जर्मनीच्या इच्छेप्रमाणें तहाना-म्यावर सह्या केल्या.

या तहनाम्यान्वयें फिन्लंडचें पूर्ण स्वातंत्र्य रशियाला कबूल करणें भाग पडलें. त्याचबरोबर इस्थूनिया व लिवोनिया यातूनही रशियाला आपलें सैन्य काढून नेणें भाग झालें पिस्कॉफ व त्याच्या उत्तरेकडील दोन जिल्हे आणि ड्विन्क नगराच्या सीमेच्या पूर्व दक्षिण सीमांपर्यंतची हद्द इस्थूनिया व लिवोनिया यांची मुकरर करण्यांत आली. हे दोन्ही प्रांत स्वायत्ततेनें आपला राज्यकारभार योग्य करूं लागे-पर्यंत त्याच्यावर जर्मन पोलीस नेमण्यांत आलें. इतकेंच नव्हे तर,

## रशियांतील बोल्शेव्हिझम् !

**रीगा, पोलंड, ग्रोडनो, कॉवनो** वगैरे प्रांतही **जर्मन** साम्राज्यांत सामील करून घेण्यांत आले व **पोलंड, उक्रेनिया, कीव्ह, क्रिमिया** वगैरेंना स्वातंत्र्य देण्यांत आलें. या तहानें **तुर्की** साम्राज्यास **इडशाम, बाटूम** व **कार** नांवाचे लहान लहान प्रांत जोडले जाऊन **आर्मेनियाला तुर्की** साम्राज्य संरक्षणाखालीं स्वातंत्र्य देण्यांत आलें. **इराण** व **अफगाणिस्तान** यांच्याशीं व्यापारी दळण वळण करण्यास **जर्मनीला** रस्ता देणें **राशियाला** या तहानें भाग पाडलें. याशिवाय १९०४ च्या तहाप्रमाणें सर्व तऱ्हेच्या व्यापारी सवलतीही **जर्मनीला** देणें **राशियाला** प्राप्त झालें.

अशा प्रकारचा अत्यंत अपमानकारक तह करून **राशियानें** आपलें अंग युद्धांतून काढून घेतलें. **जर्मनीनें** याप्रमाणें राशियाचे तुकडे तुकडे करून **राशियन** सत्तेला निष्प्रभ करून टाकलें व पेट्रोग्रॅडची स्थिति अत्यंत भीतिग्रस्त करून सोडली. याप्रमाणें **जर्मनीची** सत्ता पश्चिम राशियापासून पूर्व राशियापर्यंत स्थापित होऊन **एशियाचा** रस्ताही त्यांच्या हातांत गेला. पश्चिम रणांगणावर मित्र राष्ट्रांनीं **जर्मनीचा** जर पराजय करून त्याला मान वांकवायला लावलें नसतें तर आज जर्मनीची सत्ता जगतांत एवढी प्रचंड वाढलेली दृष्टोत्पत्तीस आली असती कीं, आजपर्यंत जगाच्या इतिहासांत एवढी मोठी सत्ता कधींच कोणाला तत्पूर्वी मिळाल्याचा दाखला वाचायला सांपडला नसता !

## काण्डें पंधरावें.

**तहाचा परिणाम**—

हा तह जरी अत्यंत अपायकारक असा झाला होत, तरी त्यांतही **लेनिन** व **ट्रॉटस्की** यांनीं आपला एक गुप्त मतलब साधून घेण्याची आशा धरली होती. जर्मनी व ऑस्ट्रेलिया यादेशांत **सोशल रेव्होल्यूशन** म्हणजे साम्यवादक क्रांती घडवून आणण्याचा त्याचा जसा बेत होता तद्वतच इंग्लंड व फ्रान्स यामध्येंही त्याच्या उचाल सोडण्यासाठीं एका स्थानिक तहाची योजना करण्याची त्या दोघांनीं युक्ति योजिली होती व त्या प्रयत्नास तें नेटानें लागलें. त्यांच्या ह्या प्रयत्नानें जर्मनी व आस्ट्रिया यादेशांत जरी कामकरी लोकांत संघाची लाट मोठ्या जोरानें उसळली तरी सैन्यांत ती लाट न शिरण्याचें कारण असें होतें कीं, जर्मनींत सैनिकसत्ता ही स्वतन्त्र बाण्याच्या पद्धतीवर पूर्वींपासूनच रचली गेलेली असल्यामुळें तिचा दुर्गनाश करून त्यात प्रवेश करणें फार कठिण काम होतें. **लेनिन**च्या कार्यक्रमाप्रमाणें सर्व युरोपात अवघ्या तीन महिन्यांच्या अवधींतच त्याच्या मतांचा प्रसार उत्तम प्रमाणांत जरी प्रसृत व्हायचा होता तरी तसें घडून न येतां जर्मनींत व ऑस्ट्रियांत जरी त्यांचा थोडासा प्रभाव झालेला दिसून आला तरी त्याचें विशेषसें फळ दिसून आलें नाहीं.

मजूर कामगार लोकांत विशेषेंकरून पुढील तीन प्रकारची चळवळ सुरू झाली होती:—

( १ ) गिरण्यांवर सार्वजनिक सत्ता असावी.

( २ ) लोक सत्तात्मक राज्यपद्धति सुरू करावी.

( ३ ) प्रजाप्रातिनिधिक राजस्थापना व्हावी.

आपल्या प्रयत्नांना **जर्मनी** व **ऑस्ट्रिया** या देशांत विशेषसें यश येत नाहीं, असें पाहून **ट्रॉटस्कीनें**-कोरलन्ड, लिथ्वानिया, इस्थू-निया, उक्रेनिया, रीगा वगैरे प्रांतांतील शेतकरी लोक व कामकरी वर्ग यांत **बोल्शेव्हिझम**च्या मतांचा प्रसार केला. जर्मनी व रशिया यांचा तह झाला त्या वेळीं प्रारंभी रशियाकडून जर्मनीस अन्नाचा थोडा फार जरी पुरवठा झाला, तरी पुढें तो पुरवठा मिळण्याचें हळकें हळकें बंद झाल्यामुळें जर्मनींत धान्याचा तुटवडा पडून दुष्काळानें आपलें उग्र स्वरूप प्रगट करण्यास सुरवात केली.

**जर्मनींत** **बोल्शेव्हिझम**च्या मतांचा प्रसार करण्याच्या कामांत जे अत्यंत जोराचे प्रयत्न करण्यांत येत होते त्यांत जरी **लेनिन** व **ट्रॉटस्की** यांस थोडेफार यश आलें होतें, तरी त्यांना तें यश त्यांच्या कल्पनेप्रमाणें **जर्मनीशीं** तह करण्याच्या पूर्वी मिळालें नव्हतें. हंगेरींत **बोल्शेव्हिझम**चा पूर्ण उदय होऊन, महायुद्धाच्या समाप्तीबरोबरच तेथें प्रजासत्ताक राज्यकारभाराची संस्थापना झाली व तेथील सर्व तऱ्हेचा राज्यकारभार प्रजाप्रतिनिधींच्या हातांत गेला. हंगेरींत अशा तऱ्हेचा **बोल्शेव्हिझम**चा जयजयकार झालेला पाहून ऑस्ट्रियानेंही तोच पंथ स्वीकारल्यामुळें तेथें लहान मोठ्या क्रान्त्या अद्यापी होत असून, शान्ततेची प्राणप्रतिष्ठा अजूनही तेथें झालेली नाहीं !

## काण्ड पंधरावें.

**रुस्सो-जर्मन** तहाचा परिणाम याप्रमाणें मध्य युरोपांत बोल्शे-व्हिझमच्या रूपानें जन्माला आला व फ्रान्स कांहीं त्यापासून अलिप्त राहिला गेला असें म्हणण्यास जागा नाहीं. इतकेंच नव्हे तर या बोल्शे-व्हिझमच्या जाळ्याचा विस्तार इंग्लंड, अमेरिका, कॅनडा व ऑस्ट्रेलिया या देशांतूनही व्हायचा राहिला नाहीं! जर्मनीनें अत्यन्त अपमानकारक अशीं तहाचीं कलमें जर रशियावर लादलीं नसतीं तर बोल्शेव्हिझमचा प्रसार कदाचित रशियाच्या सीमेंतच राहिला असतां व रशियांतच यादवी माजून रक्तपातादि कृत्यें घडली असतीं; पण आतां तर काय बोल्शेव्हिझमनें जगद्व्यापी स्वरूप धारण केलें असून जागचा तो एक अध विषय होऊन बसला आहे!

# काण्ड सोळावें.

## शत्रुमित्रांचा तह व रशियाशीं युद्ध!

वस्तुस्थितीचा एकाएकीं विपर्यास होऊन परिस्थिति पार पालटून गेली व त्यामुळें मध्य **युरोपां**तील राष्ट्राचा नक्षा उतरून **पॅरिस** शहरीं शत्रुमित्राच्या तहाच्या तहजोडीस सुरवात झाली. प्रे. **वुइल्सन**च्या चौदा मुद्यावर जरी **जर्मनी** तह करण्यास तयार होऊन त्यानें आपलें हत्यार खालीं ठेविलें, तरी **व्हर्सोलिस** येथें जें कांहीं घडून आलें तें कोणापासूनही गुप्त राहिलें नाहीं हें मात्र खरें.

अशा त्या जगद्व्यापी महायुद्धाच्या अखेरीस सार्वत्रिक शांतीचा तह घडवून आणण्याच्या वेळीं **जर्मनी**ची काय स्थिति होती ती उघड करून सांगणें इष्ट आहे. युद्ध सुरू असतां जे कोणी वर्तमानपत्रें वाचीत असतील त्याना हें पक्कें माहीत असलें पाहिजे कीं, **रशिया**बद्दल **अमेरिके**ची पूर्ण सहानुभूति होती व त्यामुळेंच प्रे **वुइल्सन**च्या प्रभावानें जगच्छांततेच्या होणाऱ्या तहाच्या कॉन्फरन्समध्यें **रशि-यन** प्रतिनिधींना येण्याचें निमंत्रण देण्यांत आलें होतें.

**लॉईड जॉर्ज**चें असें म्हणणें होतें कीं, “ **विना रशियाला कॉन्फरन्समध्यें सम्मिलित करून घेतल्याशिवाय जग-च्छांततेचा खरा तह होणें अशक्य आहे.** ” आणि या कारणा-

नेंच **रशियन** प्रतिनिधींना आमंत्रण देण्याचें प्रे. **वुइल्सनचें** धोरण त्यानें स्वीकारलें होतें. शिवाय रशियात जी अशान्तता माजली होती तिलाही **लॉइड जॉर्ज** बराच भेदरून गेलेला होता, त्यामुळें प्रे. **वुइल्सनच्या** सुचनेचा त्यानें अवलंब केला होता. जर्मनी व ऑस्ट्रिया या देशांत **बोल्शेव्हिझमनें** जी कारवाई केली होती ती त्याच्या डोळ्यापुढें होती. या सर्व कारणामुळें **बोल्शेव्हिक** सरकार व रशियांतील इतर स्वतंत्र झालेले प्रांत यामध्यें कांहीं शर्तींवर शांतता घडवून आणण्याची त्याची पूर्ण इच्छा होती व त्या इच्छेला अनुसरूनच त्यानें **रशियन** प्रतिनिधींना, प्रे. **वुइल्सनच्या** इच्छेप्रमाणें कॉन्फरन्समध्यें निमंत्रित करण्याचें योजिलें होतें; पण **बोल्शेव्हिझमच्या** हवेला **फ्रान्स** इतका घाबरून गेलेला होता कीं, ही **सूचना** कॉन्फरन्सपुढें येतांच त्याच्या नाड्या एकदम मंदावल्या! त्याला भीति वाटली कीं, **रशियन** प्रतिनिधि येथें येताच ते **बोल्शेव्हिझमच्या** मतांची आग एकदम भडकाऊन सोडतील! **फ्रान्स** देश जरी प्रजासत्तावादी आहे तरी तो संपत्तिवादी बनलेला असल्यामुळें संपत्तिच्या लोभाला गुंतून त्यानें आपल्या देशाला **बोल्शेव्हिझमची** झुळुक न लागूं देण्याचेंच पसंत केलें! असो.

याप्रमाणें **फ्रान्सनें** आपलें मत विरुद्ध दिल्यामुळें मित्रराष्ट्रांच्या प्रतिनिधींनीं **रशियन** प्रतिनिधींना **प्रिन्कीपो** नांवाच्या **तुर्की** बेटांत भाऊन भेटण्याचें जरी ठरविलें तरी ती गोष्ट अपमानास्पद वाटून **रशि-यानें** आपले प्रतिनिधि तेथें धाडण्याचें साफ नाकारिलें. केवळ **बोल्शे-**

व्हिक सरकार जरी या गोष्टीला कबूल झालें होते, तरी इतर त्याविरुद्ध असल्यामुळें त्या प्रयत्नाचेंही ओफस् झालें.

यानंतर नॉर्वे देशाचे साम्यवादी धुरीण डॉ. नॉन्सन यांनीं मित्रराष्ट्रांकडे असा एक निरोप धाडला कीं, "**रशिया भुकेनें मरत असल्यामुळें त्याला खाद्य वस्तूंचा पुरवठा केल्यास बरें होईल.**" **वुइल्सन, लॉईड जॉर्ज, क्लेमेन्शॉ** व **आर्लँडो** या चौघांनीं त्या सूचनेला जरी अनुमति दिली तरी त्यांत अशी एक शर्त घातली कीं, **अन्नपुरवठा पाहिजे असल्यास रशियन सरकारनें आपसांतील युद्ध बंद केलें पाहिजे.**" बोल्शेव्हिक सरकाराशिवाय इतर सरकारांनीं जरी या शर्तीशीं विरोध केला तरी पण बोल्शेव्हिक सरकारला मदत करण्याच्या बाबतींत मित्रराष्ट्रांना आपले हात आखडण्याचें कारण काय झालें तें मात्र अद्यापी बाहेर आलें नाहीं.

महायुद्ध समाप्त होऊन शत्रुमित्रराष्ट्रांची लढ समाप्ति होण्याचाही वेळ आली असतां, त्याच वेळीं **ऑस्ट्रियांत** क्रांतीचा झेंडा उभारणाऱ्या **बेलाकुनला** बोल्शेव्हिझमची दीक्षा देण्यांत आली. **हंगेरींत** बोल्शेव्हिझमची स्थापना झाली. **ऑस्ट्रियाही** बोल्शेव्हिझमचा बराच प्रचार सुरू झाला. **जर्मनींतही** पुन्हां एकवार बोल्शेव्हिझमची लाट उत्पन्न होऊन त्या लाटेनें **कैसरला** सिंहासनत्यागाची धमकी दिली. **कीलच्या** कॅनॉल मधील नाविकांनींही क्रांती घडवून आणिली. अशा त्या बिकट परिस्थितीला भिऊन **कैसर** सहकुटुंब



जर्मनीच्या राज्यधिकाराचा त्याग करणारा कैसर—
विल्यम दुसरा, जर्मन राणी व राजकन्या.

हॉलन्डमध्यें निघून गेला. त्यानतर **जर्मनींत** प्रजासत्ताक प्रजाप्रति-निधिक राज्यसत्ता स्थापन झाली व त्या राजसत्तेनें जमेल तसें करून कोणीकडून तरी व कसातरी जो मित्रराष्ट्रांशी तह केला तो अद्यापी लुटुपुटीचा केलेला आहे असें जग म्हणतें आहे, कारण त्या तहाच्या प्रसिद्ध झालेल्या अटींपैकीं एकही अट अद्यापी **जर्मनींकडून** पाळली गेल्याचें बाहेर आलें नसल्यामुळें, तो तह त्यानें वेळ मारून नेण्यापुरतांच केला असें म्हणावें लागतें !

बोल्शेव्हिकांचे पुढारी मध्य **युरोपांत** अशा तऱ्हेचे खेळ खेळत असतां, मित्रराष्ट्रांनीं तशा स्थितींत अशी एक आश्चर्योत्पादक गोष्ट केली कीं, झारच्या वेळच्या **ॲडमिरल कोलचॉकला** सर्व रशियाचा संरक्षक व शास्ता नेमिलें. मित्रराष्ट्रांनीं व त्यातल्यात्यात मुख्यत्वें इंग्लंडनें युद्ध क्षेत्रांत जी शत्रुपक्षाकडील दारुगोळ्याची लूट मिळविली होती व शस्त्रांस्त्रांचीही मिळविलेली लूट **ॲडमिरल कोल-चॅककडे** धाडून देऊन त्याबद्दल त्याजपासून उधार खरेदीचिट्ट्या लिहून घेण्याचा सपाटा सुरू केला होता. या भानगडींत सेनामन्त्री **चार्चिलचें** विषेश अंग होतें. **रशियांत** अतस्थ कलह उत्पन्न करून बोल्शेव्हिझमची लाट इंग्लंडपर्यंत न येऊं देण्यासाठीं त्यांनेंही चम-त्कारिक कारवाई केली होती. या बाबतींत जगप्रसिद्ध विद्युत् संदेशक रूटरनें कांहीं काळपर्यंत जगाला मोठ्या चमत्कारिक भ्रमांत ठेवण्यासारखे जे संदेश देण्याचें काम सुरू ठेविलें होतें, त्याचे दोन चार मासले हवे असल्यास पुढील प्रमाणें वाचावे:—

## काण्ड सोळावें.

**" ॲडमिरल कोलचॅक जिंकीत जिंकीत पुढें जात आहे-**
**ॲडमिरल लवकरच मॉस्को सर करणार.**
**बोल्शेव्हिकांनीं पेट्रोग्रॅड खालीं केलें.**
**दक्षिण रशियांतील अस्ट्रखान जनरल डेनकिननें जिंकून घेतलें. "**

या गोष्टी त्यावेळीं कितपत सत्य होत्या किंवा असतील तें एका भगवंताला किंवा त्या वातावरणांत वावरणाऱ्यांनाच माहीत. कारण, जगाला त्याच्या सत्यासत्यतेबद्दलची कोणचीच वार्ता अद्यापी मिळा-लेली नाहीं. मात्र एवढी गोष्ट खरी कीं, मागून आलेल्या निर्णयात्मक बातमीवरून हें सत्य ठरलें कीं, बोल्शेव्हिकानी **ॲडमिरल कोल-चॅकला** एकशें वीस मैल मागें हटविला व शेवटीं त्याच्या सैन्यानेंही त्याचा आश्रय सोडून देऊन बोल्शेव्हिकाचा पक्ष स्वीकारला. त्या सैनिकांत **कोलचॅकचें** खाजगी सैन्य फारच थोडें असून बहुतेक सर्व मित्रराष्ट्रांचें होतें. ही चमत्कारिक बातमी प्रसिद्ध होतांच **इंग्लंडच्या मजूरकामगारवर्गानें** असें प्रसिद्ध केलें कीं, **" आमचे देशबांधव व सैनिक तावडतोब रशियांतून परत बोलावले जावे. रशिया जर इतर कोणाशींही लढूं इच्छित नाहीं, तर इंग्लंडनें काय म्हणून युद्ध सुरू ठेवावें ? व आमच्या देशबांधवांच्या प्राणांच्या आहुत्या रणयज्ञांत कां म्हणून व्यर्थ अर्पण कराव्या ? "**

# काण्ड सतरावें.

## रशियांतील बोल्शेव्हिझम्

इ. सनें १९०० पर्यंत रशियात सर्व साम्यवाद्यांची जी '**लोकसत्तावादी**' नांवाची एक संस्था होती तिचे त्या सालीं दोन तुकडे होऊन तिच्यातून जी दुसरी संस्था निघाली तिनें आपल्याला '**क्रांतीकारक लोकसत्तावादी**' असें नाव धारण केलें. या नव्या जन्मास आलेल्या संस्थेंत मजूर वर्गांतीलच बहुतेक लोकांचा भरणा असून त्यांचा उद्देश राज्यक्रांती घडवून आणून लोकसत्ताक राज्याची स्थापना करण्याचा होता. या नव्या संस्थेंत जरी बहुतेक मजूर वर्गांतीलच लोक होते, तरी पूर्वींच्या जुन्या आद्य संस्थेतीलही जे **लोकसत्तावादी** होते तेही तिला सामील झाले होते. मॉ. **प्लेखॉनॉव**, **जस्लिच्** व **अलेक्झॉन्डर** हे तिथे त्यांत मुख्य होते. **झारशाहीच्या** अधिकाऱ्यांची निरंकुश सत्ता व स्वेच्छाचारी जमीनदाराची हक्कबजावणी या दोन गोष्टी मोडून टाकून लोकसत्ताक राज्यशासन पद्धती कशीकाय व्यावहारिक होईल त्याचे प्रयोग करून पाहण्यास क्षेत्र तयार करण्याची या नव्या संस्थेत जिगीषा धारण केली होती.

जे लोक पूर्वींचीच मतें धरून '**रशियन साम्यवादी लोकसत्ताक**' पक्षाला चिटकून राहिले होते ते आता '**मॉलोडाय**' म्हणजे

'बालचसु' यानांवानें प्रसिद्धीस आले. त्यांचें कार्यक्षेत्र परिमित होतें. हे लोक आर्थिक क्षेत्रांत चळवळ करणार असून मजूरवर्गासाठीं सम्पत्तीवाल्यांची सहानुभुति बाळगीत असत; कारण **राशियन** मजूरवर्ग राजनैतिक कार्यक्षेत्रात काम करण्यास अयोग्य होता असें त्याचें ठाम मत होतें.

सुमारें तीन वर्षपर्यंत या दोन्ही पक्षांत जरी विशेषसा विरोध दिसून आला नाहीं, तरी १९०५ सालीं भरलेल्या कांग्रेसमध्यें तो गुप्त विरोध स्पष्टपणें प्रगट होऊन दोन पक्ष परस्पर विरोधी बनले व त्यांनीं आपापल्यापरी स्वतःच्या कार्य क्षेत्रांत स्वतः ठरविलेला कार्यें स्वातंत्र्यपणें करण्याची सुरवात केली. त्या कांग्रेस उर्फ राष्ट्रीय सभेचा मोठा पक्ष **लेनिनच्या** अध्यक्षते खालीं 'बोल्शेव्हिक' असें अपणांस म्हणवूं लागला व लहान पक्ष आपल्याला 'मॅनशेव्हिक' असें **मॉरटॉव्हच्या** नेतृत्वाखालीं म्हणवूं लागला.

त्या दोन्ही पक्षांत जो एक मुख्यत्वें करून मतभेद होता तो हा कीं, गरीब शेतकरी व कनिष्ट प्रतीचेलोक हे राशियांत लोकसत्ताक राज्य-पद्धति स्थापनाकरण्याची इच्छा करीत असून त्यांतच सार्वजनिक हित होणार आहे; असें त्यांचें मत होतें व त्या कार्यांत मध्यम व श्रेष्ट प्रतीच्या जनतेचा यत्किंचितही उपयोग होणार नाहीं असें ते म्हणत होते. याचें कारण असें होतें कीं, त्या दोन्ही वर्गाचें लोक **झारच्या** राज्यशासन पद्धतींतच उच्च दर्जा पावलेले असून, यांतूनच–डॉक्टर,

दरकदार व अधिकारी नेमलें गेलेले होते व त्यांनांच मानमरातब व पदव्या मिळालेल्या होत्या अशांतूनच ड्यूमा सभेचे प्रतिनिधि निवडले जात असत. कौन्सिल-ऑफ एम्पायर व जेम्सस्टोव्हस म्हणजे पंचायत यांतही त्याच वर्गांतील लोकांचा विशेष भरणा झालेला होता. म्युनिसिपालिट्या म्हणजे स्थानिक स्वराज्यांतही हेच लोक प्रामुख्यानें अधिकारारूढ झालेलें होते. गरीब जनतेवर जेव्हां अनियंत्रित कराचा बोजा पडे तेव्हां हेच लोक अत्याचारी अधिकाऱ्यांना सर्वस्वी मदत करीत असत. हेच गरीबांची कीव न करतां नेहमी मध्यमप्रतीच्या व श्रीमंत लोकांच्या तरफदारीनें भांडून कार्य साधून घेत असत. शास्ते गरीबांवर अत्याचार करूं लागले म्हणजे हेच लोक त्यांच्या त्या दुष्कृतीला पुष्टी देऊन द्रव्याचीही मदत करीत असत.

गरीब व श्रीमंत यांचें ऐक्य होऊन समसमान दर्जानें इच्छित कार्यसिद्धि करून घेणें सर्वस्वी असंभवनीय होतें आणि म्हणूनच बोल्शेव्हिक पक्षाच्या लोकांनीं संपत्तिवाल्याशीं आपला मिलाफकरून घेऊन कार्यक्षेत्रांत संचार करण्याचें साफ नाकारलें. मॉ. गचकॉफ, मिल्कॉफ, टेरचिन्को, वरिष्कन वगैरे जे लोक सम्पत्तीवाल्यांचें दोस्त भगत होते त्यांच्याशीं मिळून मिसळून वागण्याचें यामुळेंच बोल्शेव्हिकांनीं अंगाबाहेर टाकलें.

६. सन १९१७ मध्यें जी अखेरची ड्यूमा सभा भरली होती तींतही हीच गोष्ट सिद्ध झाली. गरीब मजूर वर्ग व शेतकरी लोक यांना बाजूला सारून श्रीमंत, धनिक व जमीनदार लोकच तिच्यांत घुसलें.

## काण्ड सतरावें.

श्रम करून उपजीविका करणाऱ्या लोकांना जेव्हां या गोष्टीची माहिती झाली तेव्हां त्यांनी हातांत हत्यारें घेऊन ड्यूमासभेचे दरवाजे रोखले व तेथें असें स्पष्ट शब्दांत सांगितलें कीं, " **प्रधान आपल्या घरांतील शत्रु जे झार व त्याचे साहय्यक सम्पत्तीवादी त्यांच्याशींच आधीं सामना करणें जरूर आहे. विदेशी शत्रूशीं नंतर लढतां येईल. कारण, ह्या संपत्ती वाद्यांनींच आपल्या स्वार्थासाठीं घनघोर रणसंग्रामाची उठावणी केलेली आहे.** "

संम्पतिवाद्याचा नेता जो **मिल्यूकॉफ** त्यानें याचें उत्तर दिलें. हे लोक आपल्याला ' **राष्ट्रीय स्वातंत्र्यवादी** ' असें जरी म्हणवीत होते तरी त्यांचा ओढा सर्वस्वी धनिकांकडेच होता. **मिल्यूकॉफ** व **प्रेखॉनॉव्ह** हे दोघेही एकमुखानें असें म्हणालें कीं, " **श्रमांवर उपजीविका करणाऱ्यांनीं शस्त्रास्त्रें ग्रहण करून ड्यूमाच्या कार्यक्षेत्रांत व्यर्थ बखेडा माजविला असल्यामुळेंच युद्धकार्य बिकट होऊन बसलें आहे.** "

**ड्यूमाच्या** धुरीणांच्या या वरील म्हणण्यावरून इतकें मात्र सिद्ध झालें कीं, ते लक्ष्मीचे खरे पुजारी बनलेले होते व कोणत्याही प्रकारें जनतेच्या सर्वसाधारण मनाचा अवलंब करणारें नव्हते. जनतेनें जी यःकश्चित मागणी केली होती तिला ' उत्पात ' व ' बाधा ' अशीं जी त्यांनीं नावें दिलीं होतीं त्यांवरून ते जनतेचे विपक्षि नव्हते

तर कोण होते म्हणावें ? रशियन भाषेत अशी एक म्हण आहे कीं, ' तलावांत जोंपर्यंत काटयांच्या* गळाचें अस्थित्व असेल तोंपर्यंत माशांनीं फार सावध राहिलें पाहिजे. " बोल्शेव्हिकांनीं याच म्हणीच्या न्यायानें मोठ्या धूर्ततेनें राजनैतिक व आर्थिक या दोन आखाड्यात आपलें अगंकित कार्य फार जपून केलें. भयंकरांतील भयकर प्रसंगीं ही त्यांनीं धनिक वर्गापासून आपला बचाव करून घेऊन त्यांच्या वाग्जालांत स्वतांला गुरफटून घेतलें नाही व त्याचमुळें त्याची फसगत झाली नाही. त्यांचा असा पक्का निश्चय झालेला होता कीं, कामगार लोक व शेतकरी वर्ग यांचीच सत्ता स्थापना करायची व तशी सत्ता स्थापन केली असतां सर्व रशियांतील गरीब मजूर लोक, सैनिक, शेतकरी व कोसॅक यांचेच प्रतिनिधि मंडळ बनवून राज्यनौका चालवायची.

परंतु मॅन्शेव्हिकांचें क्रांतिच्या बाबतींत असें म्हणणें होतें कीं, " धनिक लोकांना बरोबर घेऊन झारच्या विरुद्ध झगडा करण्यास प्रारंभ केला पाहिजे. असें केलें म्हणजेच पुढील कार्य करण्यास त्या धनिकांचे चांगलें साहाय प्राप्त होईल. सध्यां जी क्रांती घडवून आणायची आहे ती धनिकांच्या विरुद्ध नसल्यामुळें ते झारच्या विरुद्ध उठण्यास कोणचीच हरकत नाहींत याच भावनेनें ते झारच्या

विरुद्ध आम्हाला मदत करीत आहेत. ही राजनीति आहे व हिचा अंगिकार गरीब आणि श्रीमंत या दोघांनीं ही करून एकमतानें कार्य शेवटास नेलें पाहिजे. ”

या दोन्ही पक्ष्यांचें ऐक्य न झाल्यामुळें त्यांचे उपाय व त्यांचीं कार्यें हीं परस्पर भिन्न दिशाचीं झालीं होतीं हें सांगणें नकोच. सार्वजनिक संप व सशस्त्रक्रांती यावर बोल्शेव्हिकांचा दृढविश्वास असून क्रांतीकारका साम्यवाद्यांच्या सिद्धांताना त्यांनी हृदयाशीं घट्ट कवटाळिलें होतें; परंतु मॅन्शेव्हिक पक्ष्याचें म्हणणें असें होतें कीं, सार्वजानक संप व सशस्त्र क्रांती या गोष्टी नंतरच्या आहेत. त्या कामांत धनिकांचीही मदत घेणें इष्ट आहे. आमचें आद्यकर्तव्य हें आहे कीं, सर्व गोष्टींच्या आधीं आम्हीं झारच्या विरुद्ध उभें राहिले पाहिजे. या सुरुकरावयाच्या पहिल्याच सगळ्यांत मॅन्शेव्हिक पक्ष दुसऱ्या पक्ष्याचीही मदत घेऊं इच्छित होता

बोल्शेव्हिकांनीं ड्यूमावर सर्वस्वी बहिष्कार घातला. त्यांचें असें म्हणणें होतें कीं, १९०५ ची जी ड्यूमा गाडली गेली होती तिच्याच थडग्यावर प्रस्तुतच्या ड्यूमेची उभारणी केली गेली असून, धनिक व झार यांचीच ती पक्षपाती आहे. ड्यूमा सभेत निवडून जाणाऱ्या प्रतिनिधींच्या निवडणुकी संबंधानेंही बोल्शेव्हिकांनीं अशा आधारावर विरोध केला होता कीं, ड्यूमा सभेत निवडून जाणारे प्रति-

निधि हे केवळ धनिक लोकच असून झारच्या शासनपद्धतींतही आपल्या हातांत अधिकार ठवण्याच्या लोभापासून परावृत्त होत नाहीत.

सन १९०५ मधल्या क्रांतीच्या वेळीं तिचे साह्यकर्ते व कार्यकर्ते यांना पकडून क्रांतीची सफलता होऊ न देण्यास व तुरुंगांत टाकण्यास झारला डॉक्टर वगैरे लोकांनींच मदत केली असल्यामुळें ड्यूमा सभा ही एक प्रति झारशाहीची सावली आहे असें बोल्शेव्हिक समजत होते. कोणच्याही प्रकारें अशा त्या ड्यूमाच्या सत्तेचा स्वीकार करण्यास बोल्शेव्हिक लोक तयार झाले नाहींत. कारण, तिनें तरवारीच्या जोरावर जबरदस्तीनें जनतेला काबूत ठेविलें होतें व मॉस्को, क्रॉन्सर्क व क्रॉन्स्टाड येथील क्रांतीच्या वेळीं ती मोडून टाकण्याच्या कामीं ज्यांनीं झारला उत्तम तऱ्हेनें मदत केली होती असें गचकॉफ व मिल्यूकॉफ यांसारखे तिचे नकली नेते होते, तेव्हां तिच्यावर यांचा भरंवसा कसा बसावा ?

अशा स्थितींतही राजनीतीचा दृष्टीकोण बदलल्या बरोबर बोल्शेव्हिकांनीं ड्यूमावरचा बहिष्कार गुंडाळून ठेवून तिच्यांत निवडून जाणाऱ्या प्रतिनिधींत त्यानींही भाग घेण्याची सुरवात केली.

हें असें कृत्य बोल्शेव्हिकांनीं कां केलें असा एक येथें प्रश्न उद्भवतो. ड्यूमाच्या प्रतिनिधींत सामील होण्यासाठीं सर्व साधारण जनतेला त्यांनीं कां आमन्त्रित केलें ? झारच्या निरंकुश सत्तेचें ग्रहण करण्यासाठीं अथवा धनिकांच्या फायद्यासाठीं रचल्या जाणाऱ्या कायद्यांचा

फायदा घेण्यासाठीं ते त्यांत सामील झाले असावेत काय? नाहीं, बिलकुल नाहीं. त्यातलें रहस्य अगदींच निराळें आहे. " **लोकांनीं धनिक प्रतिनिधींच्या बाबतींत सावध राहून सार्वजनिक संप करावें व सशस्त्रतेनें क्रांती घडवून आणावी म्हणजेच झारशाहीच्या निरंकुश सत्तेला उखडून टाकतां येईल. त्यावांचून प्रजासत्ताक राज्याची प्राणप्रतिष्ठा होणें अशक्य आहे.** " असा उपदेश करण्यासाठीं ते ड्यूमांत शिरलें होते. हें तें त्यांतलें खरें रहस्य होय. या बाबतींत '**सामाजिक लोकसत्ता व प्रजाप्रतिनिधींची निवड**' या नांवाचें एक हस्तपत्रक **लेनिननें** १९०५ मध्ये जें प्रसिद्ध केलें होतें त्यांत याबद्दलची खुलासेवार हकीकत वाचायला सांपडते.

याच वरील उद्देशानें बोल्शेव्हिक प्रतिनिधि ड्यूमांत शिरले होते व त्यांनीं स्पष्टपणें असें जनतेला सांगितलें होतें कीं, " **जे कायदे नेहमी जनतेला पीडाकारकच होतील असे कायदे पास करून घेण्यासाठीं आम्हीं धनिक प्रतिनिधींच्या शेजारीं ड्यूमांत जाऊन बसण्यासाठीं तिच्यांत आपला प्रवेश करून घेत नसून त्या प्रतिनिधींशी आमची मुळींच सहकारिता राहाणार नाहीं. झारशाही व धनिकवर्ग यांच्या कार्यक्रमांवर केवळ नजर ठेवण्यासाठींच आम्ही ड्यूमांत जाऊन बसणार आहोत.** " दुसरी, तिसरी व चौथी **ड्यूमा**

जेव्हा अधिवेशित झाली त्यावेळीं याच उद्देशानें बोल्शेव्हिक पुढारी ड्यूमांत शिरले असून त्यांनी वेळोवेळी स्वार्थी जनाची चलाखी व झारशाहीची अनियंत्रितता जनतेंस प्रगटही केली. कम्यूनिटी लॉ, मजूर वर्गाच्या विम्याचा कायदा, प्रेस ऍक्ट, न्यायखातें व जेम्सटोव्ह म्हणजे पंचायत प्रकरण या बाबतींत त्यांनीं जीं वक्तृत्वपूर्ण भाषणें करून जनतेंत जागृती उत्पन्न केली तीच या गोष्टीची साक्ष पटवीत आहे व ते आपल्या निश्चयी धारणांत किती मजबूत होते याचेंही प्रत्यंतर यानेंच येते आहे.

ज्या ज्या वेळी सरकारी कार्जाचा प्रश्न ड्यूमापुढें आला त्या त्या वेळीं, जनतेचा पैका झारच्या नौकरशाहीच्या इच्छे-वर कदापी खर्च केला जाणार नाहीं, अशा शद्बांत विरोध करण्यास जसें त्यांनी कमी केलें नाहीं. तसच, जनतेच्या पैक्यावर चोर, लुटारू वगैरेंची संख्या वाढली जाऊन, पोलिस व गुप्त पोलिस यांचें पोषण केलें जातें, व त्याच पैशाच्या बळावर धनिकांच्या फायद्याचे कायदे रचले जातात; इत-केंच नव्हे तर त्याच जनतेच्या द्रव्यांवर सैन्यभरती व मारक शस्त्रास्त्रें यांचा संग्रह वाढविला जाऊन त्यामुळें धनिकांचा फायदा व जनतेची हानी होते, यास्तव तें सर्व बन्द करावें. असेंही रजावून सांगण्यास माघार घेतली नाहीं.

## काण्ड सतरावें.

**क्रांतीनंतर—**

**रशियाच्या** राज्यक्रांतीनंतर **बोल्शेव्हिक** व **मॅन्शेव्हिक** या दोन पक्षांत जो मतभेद उत्पन्न झाला त्याची मुख्यत्वे जीं तीन कारणें होतीं तीं येणेंप्रमाणें:—

**( १ ) जमीनीची वांटणी कोणच्या तऱ्हेची केली जावी ?**
**( २ ) युद्ध व तह यांचे प्रश्न कोणच्या तऱ्हेनें सोडवावेत ?**
**( ३ ) क्रांतीनंतर रशियाचे राज्यशासन कसें असावें**

या बाबतींत **बोल्शेव्हिकांचें** असें म्हणणें होतें कीं, ' **श्रम व साहस करून उपजीविका करणारे व शेतकरी यांच्यांत जमीनीची वांटणी करून जमीनदार लोकांना नामशेष करावत व ही जी वांटणी करायची तिला स्थानिक स्वरूप देऊन निश्चित असा त्या बाबतींत ठराव करावा.** '

**मॅन्शेव्हिक** व धनिक यांना जाऊन मिळणारे व **स्वत.ला साम्यवादी** म्हणविणारे लोक प्रथमतः जरी **बोल्शेव्हिकाच्या** पक्षाला चिकटून होते तरी, या प्रश्नाचें कार्य जेव्हा परिणत करण्याचा प्रसंग प्रत्यक्ष प्राप्त झाला तेव्हां ते व्यक्तिगत संपत्तिचा प्रश्न स्थापन करू लागले हा प्रश्न सोडवण्याच्या बाबतींत त्या दोन्ही पक्षात काहीं प्रसंगीं व काहीं स्थळीं शस्त्रास्त्रांच्याही चकमकी झडल्या. **मॅन्शेव्हिक** पक्ष नेहमींच असत्य वचनी व जनतेला नेहमीं खाड्यांत फेंकू पाहणारा होता. **रशि-**

**यांतील** क्रांतीनंतर तेथें जें प्रथम **तात्पुरतें सरकार** ( Provisional Government ) प्रजातंत्रानें स्थापन केलें गेलें होतें त्या सरकारनें तर या जमीनीच्या वांटणीच्या बाबतींत इतका कडक विरोध केला होता कीं, **टॉम्बव** नांवाच्या परगण्यात चळवळ करणाऱ्या शेतकऱ्यांची त्यानें सैन्य धाडून सरसहा कतल करण्यासही कमी केलें नाहीं.

**मॅन्शेव्हिक** व नवें **तात्पुरतें सरकार** यांनीं अशा प्रसंगीं शेतकऱ्यांना अशी एक थाप दिली कीं, प्रजाप्रतिनिधिमंडळाची ( Constituent Assembly ) स्थापना होईपर्यंत त्यांनीं थांबावें, म्हणजे त्यांच्या मताप्रमाणें नंतर योग्य ती व्यवस्था करण्यात येईल. दिवस लोटले, आठवडे गेले व महिनेही सपले, तरी शेतकऱ्यांना जमीन देण्यांत आली नाहीं. सावकाशपणें प्रजाप्रतिनिधींची निवड होऊन त्या मंडळाचें दृश्य स्वरूप बऱ्याच उशीरानें नजरेस आलें. त्या मंडळाच्या एकदर घटनेवरून जसें स्पष्ट दृग्गोचर झालें कीं, तें मंडळ फक्त धनिक व सावकार यांच्यांतूनच प्रतिनिधि निवडून बनविलेलें असून प्रजाप्रतिनिधि मंडळ हें त्याचें नांव अगदीं खोटें होतें. तशा त्या प्रधान मंडळाची संस्थापना करण्यासाठीं **केरेन्स्कीनें आपल्या मदतनीस मंड्याच्या मदतीनें सर्व राष्ट्रीय संस्था विलयाला नेऊन स्वातंत्र्य विचारांचीं स्वातंत्र्यप्रिय वर्तमानपत्रेंहीं नष्ट करून टाकलीं होतीं. केरेन्स्कीचें** सरकार, धनिक व सावकार यांचें पक्षपाती होतें. सरहद्दीवर लढत असलेल्या सैन्याला त्यानीं असे हुकुम धाडले

होते की, 'सैन्यानें लढतच राहिले पाहिजे. लढण्याचें जर कोणी नाकारील तर त्याला प्राणदंडाची शिक्षा फर्मा-वण्यांत येईल !' या नियमाला मोडणाऱ्या हजारों मजुरांना कैदेंत टाकण्यांत आलें. अशा स्थितींत तशात्या प्रतिनिधिमंडळात प्रजाप्रति-निधींचा प्रवेश कसा व्हावा ? कारण, तें मंडळ धनिकांचीच फक्त तर-फदारी करणारें असें सर्वस्वी बनलेलें होतें.

केरन्स्कीचें राजमंत्रिमंडळ व धनिक पक्षीयाना चिकटून राहि-लेले साम्यवादी लोक हे सर्व आपणांला अशा तऱ्हेचा धोका देत आहेत असें जेव्हां जनतेच्या दृष्टोत्पत्तीस आलें तेव्हां जनतेनें मोठ्या धैर्याच्या साहसानें 'नोव्हेंबरच्या क्रांतीची रचना केली, व त्या क्रांतीनेंच जन-तेच्या हातीं—शक्ति व संघटना यांना सुपूर्द केलें.' या अतरक्रांतीनेंच रशियांतील श्रमजीवी आणि शेतकरी यांना खरी सत्ता प्राप्त करून दिल्यामुळें त्यांनी पंचायतशासनाची स्थापना केली व त्या शास-नपद्धतीच्या द्वारें त्यांनीं जमीनी आपल्या कब्जांत घेऊन खरें स्वातंत्र्य प्राप्त करून घेतलें.

बोल्शेव्हिकांनीं प्रारंभापासून जमीनवांटणीच्या बाबतींत चळ-वळ करण्याची सुरवात केली होती. 'नोव्हेंबरची क्रान्ती' होण्या-च्या आधींच बोल्शेव्हिकांनीं शेतकऱ्यांना त्यांच्या तर्फेची पंचा-यत म्हणजेच सोव्हिएट संस्था स्थापना करण्यास व जमीनीवर आपल्या अधिकाराची अम्मल बजावणी करण्यास असें सांगितलें होतें, तसेंच

पुढें घडून आलें. शेतकऱ्यांनीं आपल्या जमीनींचा ताबा घेऊन देशाच्या उत्पन्नाची उन्नति केली, तत्पुरस्त्या **केरेन्स्कीच्या** सरकारशीं सश स्त्रावस्थेत सामना केला व देशाच्या हद्दींवर जे सैनिक भुकेनें मरत असतांहीं लढत होते त्यांच्या जीविनासाठीं धान्याचें संरक्षण केलें.

श्रमजीवी आणि शेतकरी यांच्या हवालीं राज्यसत्ता देण्यासाठीं शहरें व गांवें यांतील रहिवाशांत पारस्परिक संबंध स्थापित करणें बोल्शेव्हिकांना क्रांतिनंतर आवश्यक भासलें. अशा तऱ्हेचें जनतेंत ऐक्य घडवून आणल्यांवाचून श्रीमंत व सावकाराचा फजितवाडा होणार नाहीं अशी त्यांची खात्री झालेली होती. याशिवाय दुसऱ्या एका ज्या गोष्टीनें बोल्शेव्हिकांचें मेंदु व्यापिले होते, ती अशी होती कीं, श्रीमंतांच्या संपत्तीचा ताबा घेतल्यावांचून नुसत्या जमीनीच्या ताब्याचा फायदा होणें अशक्य होतें, कारण निर्धनावस्थेंत जमीन नांगरण्यास लागणारीं आउतें व जनावरें आणि पेरणी करण्यास अवश्यक जें बी तें कसें प्राप्त होणार ? ही अडचण काढून टाकण्यास—**जमीन, रेल्वे, बँका, गिरण्या, फॅक्टऱ्या, कारखानें** वगैरेंवर राष्ट्रीय ताबा असणें अत्यावश्यक आहे असें त्यानीं ठरविलें. हें कृत्य केल्यावांचून सार्वजनिक दारिद्र नष्ट होणें अशक्य आहे अशी त्यांची ठाम समजूत झालेली होती.

बोल्शेव्हिक सत्ता स्थापना झाल्याबरोबर तिनें वर निर्दिष्ट केलेल्या गोष्टी करण्यास प्रारंभ केला. देशांतली सर्व जमीन, गिरण्या,

बँका, फॅक्टरीज वगैरे सर्व त्यांनीं प्रथम सार्वजनिक राष्ट्रीय मालकीच्या केल्या. प्रजासत्ताक राजसत्तेच्या सिंहासनाची ही पहिली पायरी होती. याच पायरीवर उभे राहून बोल्शेव्हिकांनी सर्व जगाला असें कळविलें कीं, "**पाहा प्रजासत्ताक राज्याच्या सिंहासनाला आम्हीं अशा तऱ्हेनें निर्माण करून साम्यवादाचा जो वृक्ष उभा केला आहे त्याच्या छायेंत आतां श्रमजीवी लोक मोठ्या आनंदाने व सुखानें राहणारें आहेत.**"

श्रमजीवी व शेतकरी यांचीच सरकारें सर्व जगांत प्रस्थापित केलीं जाण्यासंबंधानें बोल्शेव्हिकांना नुसती आशाच नसून त्याची त्या बाबतींत तशी खटपटही सुरू असल्यामुळें त्यांना तसा पूर्ण भरंवसाहि वाटत आहे.

बोल्शेव्हिक व धनिक यांचे क्रांतीच्या पूर्वी जमिनीचें राष्ट्रीयकरण करण्याच्या बाबतींत तरी एकमत होतें, तरी पुढें धनिकांनीं अंतस्थ खटपट करून आपल्या प्रतिनिधींची संख्या प्रतिनिधिमंडळांत अधिक करविली व नंतर जमीनीच्या राष्ट्रीयकरणानें आपलें मत बहुसंख्यांक प्रतिनिधींच्या बळावर पालटवून व्यक्तिगत संपत्तीसंबंधाचें एक बिल पास करून घेतलें व त्यामुळेंच भूमीच्या वांटणीचा प्रश्न बाजूला राहिला. याप्रमाणें पुन्हां कांहीं काळ धनिकांच्या ताब्यांत जमीन गेली.

रशियांत बोल्शेव्हिकांनी श्रमजीवी आणि शेतकरी यांची सत्ता स्थापन करून केरेन्स्कीच्या सत्तेला जी उधळून लाविली त्याचें मुख्य कारण वर सांगितलेला धनिकांचा लपंडाव हेंच होतें.

## रशियांतील बोल्शेव्हिजम् !

फक्त धनिकांच्या फायद्यासाठींच युद्ध सुरू ठेवण्यांत आलें आहे अशी बोल्शेव्हिकांची ठाम समजूत झालेली होती. व्यापार आणि त्यासाठीं देशांत उत्पन्न होणारा कच्चा माल आणि त्यावर मिळणारा नफा याच्याच लालसेनें संपत्तिवाद्यांनीं युद्ध सुरू ठेविलें असून, त्यापासून श्रमजीवी लोकांना लाभ होण्याच्या ऐवजीं उलटा त्याचा दिवसें दिवस नाश होत चालला आहे अशी सर्वत्र दृढ समजूत झाल्यामुळेंच, बोल्शेव्हिकांनीं युद्ध बंद करण्यासाठीं एकस्वरानें भयंकर विरोध करण्याची सुरवात केली. याचसाठीं गुप्त तहांची त्यांनीं परिस्फुटता करून जगांतील स्वार्थी सम्पत्तिवाद्यांचीं नाकें चिरलीं. बोल्शेव्हिकांचें संपत्तिवाद्यांच्या बाबतींत असें ठाम मत ठरून गेलें होतें कीं, **“ धनिक लोक जगच्छांतीच्या निव्वळ स्वार्थासाठीं थापा मारीत असून वास्तविकपणें जगांत अशांततेचे मनोरे उभारूनच आपल्या तुंबड्या भरून घेत आहेत व यासाठींच केरेन्स्कीचें सरकार गुप्त अशा आपल्या व्यापारी व भौतिक शर्ती प्रगट करीत नाहीं. तुर्की साम्राज्य, अर्मेनिया व गॅलेशिया हें सर्व आपल्या भक्ष्यस्थानीं टाकण्यासाठीं झारनें इंग्लंड व फ्रान्स यांजबरोबर गुप्त तह केला होता व केरेन्स्की सरकारनेंही त्या गुप्त तहाचें स्पष्टपणें समर्थन केलें होतें; पण आतां राज्यशासनसत्ता शेतकरी व श्रमजीवी यांच्या हातांत गेली असल्यामुळें त्यांनीं आतां त्या स्वार्थी व आपमतलबी तहाचा जगापुढें स्फोट केला. ”**

बोल्शेव्हिकानीं याच आपल्या सिद्धांताच्या जोरावर **जर्मनी व ऑस्ट्रिया** यादेशांत जोराची चळवळ करून तो आपला सिद्धांत श्रमजीवीयांच्या हृत्पटलावर पुरा बिंबविला आहे. **ऑस्ट्रिया** व **जर्मनी** यांत जी क्रांती घडून आली ती याचेंच फळ होय; पण दुसरीकडे पाहिलें तर **मॅन्शेव्हिक** लोक हे—युद्ध बंद करणें अशक्य आहे व त्यांत स्वदेश व स्वराज्य यांचा नाश होणार आहे अशा सबबीवर युद्ध सुरू ठेवून स्वार्थासाठीं स्वदेशबांधवांचे गळे शत्रुकडून रणक्षेत्रांत व्यर्थ कांपवीत होते.

**रशियांत** नव्या स्थापन झालेल्या राज्यसत्तेंत जे सर्व तऱ्हांच्या मतांचें मानवी संघ एकून सामील झाले होते, त्यांत पूर्वी **झार-शाहीची** प्रशंसा करणारे उन्मत्त व स्वार्थी असे धनिक आणि शिरजोर जमीनदार यांचेही संघ होते, त्यांचा अंतस्थ उद्देश जरी पुन्हां **झारशा-हीचें** प्रस्थ माजविण्याचा होता तरी **रशियन** जनता निरंकुश राज-सत्तेला पुरी विटलेली असल्यामुळें ती तशी सत्ता पुन्हां स्थापन होऊं देण्याच्या मार्गांतील एक प्रचंड व अनुल्लंघनीय असा पर्वतप्राय बांधच होऊन राहिली होती. जे लोकमतानें उच्च दर्जावर आरूढ न होतां निरं-कुश शासक बनून संपत्तिवाल्यांच्या मतांचें समर्थन करूं शकतील असे अधिकारी न नेमले जातां—जे पोलीस, जी सेना व जो गार्डांचा समुदाय पूर्वीप्रमाणेंच जनतेला शत्रूरूप होऊन छळील अशांचीही योजना होऊं

ह्येणें नव्या स्थापन झालेल्या राज्यसत्तेच्या इच्छेविरूद्ध असल्यामुळेंच जनतेला जी प्रजातंत्रीय राज्यसत्ता सुखप्रद होईल अशीच स्थापन केली. हें जें नवें राज्यचालक यंत्र निमार्ण करण्यांत आलें त्यांतील अगदीं हलक्याप्रतिच्या अधिकाऱ्यापासून तों थेट अगदीं श्रेष्ठ पदाच्या अधिकाऱ्यापर्यंत जे जे अधिकारी नेमले गेले होते त्या सर्वांची निवड आशिक्षित जनतेच्या मताधिक्यावरच करण्यांत आली होती. अशी अशिक्षित प्रजा म्हणजे शेतकरी वर्ग आणि श्रमजीवी लोक ही होय. अशाच लोकांच्या हातांत इतउत्तर सत्ता राहिल्यानें राज्ययंत्र सुरळीत चालेल असें त्या नव्या राज्यघटनेंतील घटकावयवांचें मत झालेलं होतें व त्याच सिद्धांतावर ती घटना काम करूं लागली होती.

ज्यायोगें पुन्हां जुन्यापुराण्या सम्पतीवाल्यांची सत्ता स्थापिली जाणार नाहीं अशाच तऱ्हेच्या पायावर **श्रमवाद्यांच्या पंचायतीच्या राज्यकारभारदक्ष** मंत्र्याची योजना करण्यांत आली व त्याच रचनेला (Soviet) **सोव्हिएट** अथवा **पंचायतीचा राज्यकारभार** असें म्हणूं लागले. ही **सोव्हिएट**ची सत्ता सम्पत्तिवाद्यांचा नायनाट करून, मानवावर चालणारें स्वार्थी मानवी शासन नष्ट करणारी व मानवाशीं मानवानें गुण्यागोविंदानें वागून सुरळीत राज्य हांकण्यास शिकविणारी अशी एक राज्यपद्धती आहे.

## काण्ड सतरावें.

डॉ. लेनिननें बोल्शेव्हिक या शब्दाची जी व्याख्या केली ती येणेंप्रमाणें:—

" बोल्शेव्हिक म्हटला म्हणजे तो असा प्राणी असला पाहिजे कीं, जो निरंकुश सत्तेची क्रांति घडवून आपून जगांतल्या सर्व उत्तम वस्तूची प्राप्ती करून घेण्याची इच्छा करणारा असेल व जें काम आज होण्यासारखें आहे तें उद्यांसाठीं राखून ठेऊन आजचा काळ आळसांत कधींही कंठणार नाहीं. "

# काण्ड आठरावें.


## रशियातील बोल्शेव्हिकांचा रणसंग्राम !

वाचकांनीं आत्तापर्यंतचा जो इतिहास वाचला त्यावरून सध्या जगांत जी कोणची प्रचंड जादू आपलें अतर्क्य काम करून राहिली आहे ती काय असावी याचा अदाज वाचकांना अजून लागला असेल असें वाटत नाहीं. अशी जी ती अतर्क्य जादू आहे तिनेंच **रशियाला** सध्या आपल्या मोहिनी मंत्रानें वश केलें आहे. दक्षिण रशियात ज्यावेळीं **झोकोस्लोव्ह** आणि **फ्रेंच** यांच्या सेना युद्धासाठीं रवाना करण्यांत आल्या त्यावेळीं त्या दोन्ही सैन्यानीं **बोल्शेव्हिकाचे** सिद्धांत ऐकून व मनन करून युद्ध करण्याचें साफ नाकारिलें. पश्चिमोत्तर **रशियाच्या बाल्टिक** प्रांतांत जेव्हा **इंग्रजांनीं** स्वसंरक्षणार्थ सेनेची रवानगी केली, तेव्हां तिची ही स्थिति वरील सैन्याप्रमाणेंच झाली. **बोल्शेव्हिकांनी** स्वमत पुष्टीकारक अशीं लाखों हस्तपत्रकें छापवून **इंग्लिश** सैन्यांत वांटली व त्याचमुळें बहुतेक **इंग्लंडचें** मजूर भरतीचें सैन्य **रशियाच्या** विरुद्ध लढण्यास नाकबूल झालें असावें असें म्हणतात. अखेरीस ती स्थिति पाहून **इंग्लंडला** आपलें सैन्य माघारें बोलवावें लागलें ज्या **बाल्टिक** प्रांतानें **इस्थूनिया, लिवोनिया, कोरलंड, लेटलंड, फिन्लंड**

वगैरे स्वतंत्र संस्थानांची स्थापना करून त्यांनीं जी बोल्शेव्हिकांच्या विरुद्ध हत्यारें उपसून लढण्याची तयारी केली होती तीही सध्यां बोल्शेव्हिकांशी तहनामे लिहिण्यांत गुंतली असून, त्या संस्थानांपैकीं इस्थूनियानें तर आपला तहनामा मंजूरही करून टाकला आहे. या सर्व स्वतंत्र झालेल्या संस्थानांना कांहीं धाकदपटशा दाखवून व कांहीं गुळचट थापाही मारून मित्रराष्ट्रांनीं बोल्शेव्हिकांच्या विरुद्ध उभीं केलीं होता व त्यांची आणि बोल्शेविकांची लढाई सुद्धां झाली; पण अखेरीस मित्रराष्ट्रें तोंडघशी पडली त्या संस्थानांच्या पंचायतीनें निवडलेला सेनापति जनरल यूडनिच हा असताहि बोल्शेव्हिक मनांच्या जादूनें त्याच्या सैन्यावर आपली कमान चढवून त्याच्या आधिपत्याचा पाडाव केला. त्याच्या सैन्यानें क्रांती करून लबाडीनें रचलेल्या त्याच्या इमारतीला तिनें जमीनदोस्त करून टाकलें. जनरल यूडनिच सध्यां बोल्शेव्हिक सरकारच्या कैदेंत भाकरीचे तुकडे खात पडला आहे. इकडे दक्षिण रशियांत मित्रराष्ट्रांच्या मदतीच्या जोरावर जनरल डेनकिन नांवाच्या एका सेनापतीनें पुनरपि झार-शाही स्थापना करण्यासाठीं युद्धाचा झेंडा उभारला होता. त्या समयीं बोल्शेव्हिक सरकार सेनाबलानें कमजोर असल्यामुळें डेन-किननें ओडेसापासून कीव्हपर्यंतचा मुलूख जिंकून हस्तगत करून घेतला होता. त्या वेळीं मित्रराष्ट्रांनीं त्याला द्रव्य व युद्धो-पयोगी सामानाची मदत जरी उत्तम तऱ्हेनें केली होती, तरी ती अशा

शर्तीवर होती कीं, तें त्याचें साहाय्य ऋणप्राय घेतलें असून, ऋणा-प्रमाणेंच फेडलें पाहिजे. बोल्शेव्हिकांनी मोठ्या चातुर्यानें आपलें सैन्यबळ वाढवून शेवटीं १९१९ च्या नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यांत आणि १९२० च्या जानेवारींत ज. डेनाकिननें जिंकून घेतलेला प्रांत परत जिंकून आपल्या स्वाधीन करून घेतला. व ज. डेनकिनच्या सैन्याचा चक्काचूर उडाल्यामुळें शिलक बाकी सैन्य क्रिमियाकडे पळून गेलें याप्रमाणें दक्षिण रशियाही बोल्शेव्हिक सरकारच्या हातीं आला. पूर्व रशियांत म्हणजे सैबेरियांतही ज. डेनकिनच्या प्रमाणेंच ॲड-मिरल कोलचॉकनेंही युद्धाचें रणशिंग फुंकलें होतें. त्यालाही मित्र-राष्ट्रांनीं सर्व प्रकारची उत्तम मदत केली होती त्यानें कांहीं महिनेपर्यंत बऱ्याच चमत्कारिक माकडचेष्टा चालविल्या होत्या; पण दक्षिण रशि-यांत विजय प्राप्त झाल्यावर तेथील सेना त्याचा समाचार घेण्यास चाल-करून गेल्या, तरी लढण्याव्यतिरिक्त कें राज्यकारभार करण्याचें काम तें यथासांग करण्यास बोल्शेव्हिक सरकार विसरलें नाहीं व आपल्या सिद्धां-ताचा फैलाव करण्याच्या कामांतही त्यानें सुस्ती दाखविली नाहीं. त्यानें दक्षिण रशियांतील जनतेस जशी आपल्या मतांची दीक्षा देऊन आत्मीय करून सोडली तद्वतच सैबेरियांतील शेतकरी व श्रम-जीवी मजूरवर्ग यांच्यांतही आपल्या मतांचा प्रसार केल्यामुळें कोल-चॉकची सेना त्याच्यावर उलटून बोल्शेव्हिकाना जाऊन मिळाली व त्यामुळें मध्य सैबेरियांत प्रसिद्ध ठिकाण जें इर्कुटस्क तें बोल्शे-

व्हिकांच्या हातीं लागलें. अखेरीस कोलचॉकच्या सैन्यानें त्यालाच कैद करून बोल्शेव्हिकांच्या स्वाधीन केलें. इर्कुटस्कमध्य एका सामा-



मित्रराष्ट्रांना फितुर झालेला ॲ. कोलचॉक.

जिक क्रांतीला विजय प्राप्त झाला व त्या क्रांतिकारकांच्या म्होरक्यानें कोलचॅकला गोळी मारून ठार केलें. त्यावेळीं बोल्शेव्हिक सैन्यानें

## रशियांतील बोल्शेव्हिजम् !

**सैबेरीयाच्या** पूर्व किनाऱ्यावरील **व्लॉडिव्होस्टॉकला** वेढा देण्याचें काम चालविलें होतें. त्या ठिकाणीं त्या सैन्याशीं लढण्यासाठीं **जपानी** सैन्य येऊन उतरलें, पण तिकडून येणाऱ्या बातम्यांवरून असें समजलें कीं, **जपानी** सैन्यलाही बोल्शेव्हिकांनीं वेढली असून **कोरियाच्या** रहिवाशांनीं **बोल्शेव्हिकांना** मिळून **जपानच्या** विरुद्ध युद्धाचा डंका वाजवला. **बोल्शेव्हिकांनीं** त्यांस सर्व तऱ्हेच्या युद्धोपयोगी सामानाचा चांगला पुरवठा देऊन आपल्या पक्षाचे दृढ पक्षपाती करून घेतले असल्याचेंही समजतें. इकडे पूर्वदक्षिण दिशेकडील अफगाणिस्तान व इराण उत्तर प्रांतही **बोल्शेव्हिकांच्या** जादूनें भरला गेला असून, **कॉकेशस** प्रांतांत तर **बोल्शेव्हिकांची** सत्ता स्थापितही झाली आहे. **ताश-कन्दमध्यें** बोल्शेव्हिझमचें स्वागत झालें असून, रूटर एका तारेवरून असें समजतें कीं, अफगाणिस्तानचा **अमीर** व **बोल्शेव्हिक** सरकार यांच्यामध्यें डेप्युटेशनें येऊं जाऊं लागली आहेत. **ताशकन्दमध्यें** असें एक विद्यालय उघडण्यांत आलें आहे कीं, ज्यामध्यें शेकडों **रशि-यन, चीन, इराण,** अफगाणिस्तान व **हिंदुस्थान** यामध्यें **बोल्शेव्हिझमचा** प्रसार कसा करावा याबाबतींत शिक्षण देण्यांत येते आहे. याचसाठीं **ब्रिटिशांना** हिंदुस्तानच्या सीमेवर ब्रिटिश सैन्याची जमवाजमव करण्याचें काम जारीनें चालविलें असून इंग्लंडाहून तोफाचे गोळे फेंकणारे चालते पळते टँॉक नांवाचे दोन पोलादी किल्ले ही आणविलें आहेत. त्या टँॉकाकडून सरहद्दीचें संरक्षण करण्यांत येणार आहे. यावरून

## काण्ड आठरावें.

बोल्शेव्हिक सेनेची विषारी दृष्टी हिंदुस्थानाकडेही वळली आहे असें अनुमानण्यास हरकत नाहीं. पुढें काय होईल तें सांगणें म्हणजे भविष्यकथन करणें असल्यामुळें तें काम भविष्यवाद्यांवर सोंपवून, पुढें काय होईल तें दिसेलच इतकेंच या बाबतींत येथें आम्ही म्हणतो.

आतां युरोपीय उत्तर रशियाची स्थिति काय आहे ती पाहू. तेथें ,ही बोल्शेव्हिझमच्या विरुद्ध जरी अगदीं निर्वाणीचें असें भयंकर युद्ध पुकारलें गेलें आहे, तरी तेथील जनतेवरही बोल्शेव्हिझमची जादू आपल्या मतांच्या मंत्राचें पाणी शिंपडून त्यांना स्वपक्षपाती करून घेण्याचे दीर्घोद्योग करीत आहे.

सध्यां मित्रराष्ट्रांनीं बोल्शेव्हिझमच्या विरुद्ध आपल्या कमरा कसल्या आहेत. बोल्शेव्हिकांशीं युद्ध करण्यानें जय येणें अशक्य आहे असें जरी लॉईड जॉर्ज यानीं एक दोन भाषणांत म्हटलें तरी मित्रराष्ट्रांची लढाऊ जहाजें अद्यापी काळ्या समुद्रांत चका मारीत आहेतच. दक्षिण रशियांतील ओडेसा शहर जेव्हा बोल्शेव्हिकांनीं हस्तगत केलें तेव्हां त्या लढाऊजहाजांनीं त्यावर जबरदस्त अशी जरी अग्निवृष्टि केली तरी ती सर्व विफल झाली. हंगेरींत बोल्शेव्हिझमच्या वृक्षाचीं मुळें दिवसें दिवस खोलच जात आहेत. पोलंडवर बोल्शेव्हिक सैन्य चालकरून जाईल यास्तव आपल्या बचावासाठीं मित्रराष्ट्रांनीं आपलें सैन्य पोलंडच्या मदतीला धाडण्याचा विचार केला आहे अशी जी बातमी इकडे

समजते आहे तोंच बोल्शेव्हिक सरकारनें पोलंडचें स्वातंत्र्य कबूल करून त्याच्याशीं तह करण्याचें ठरविलें आहे अशी बातमी येऊन थडकली आहे. अशा तऱ्हेनें एकीकडे पोलंडशीं तह करण्याचीं कलमें ठरत आहेत व दुसरीकडे पोलंडच्या सैन्यांत बोल्शेव्हिझमच्या सिद्धांतांचा प्रसार करण्याचें काम सुरू आहे. १९१९ च्या फेब्रुवारीच्या प्रारंभीं अशी खबर आली होती कीं, पोलंडच्या सैन्यानें क्रांतीचा झेंडा उभारून आपल्यावरील कांहीं लष्करी अधिकाऱ्यांनाही त्यांनीं ठार मारून टाकिलें आहे. अलीकडे ह्या बाबतीत कोणत्याच तऱ्हेच्या बातम्या इकडे येत नाहींत; यावरून ब्रिटिश सरकारच्या हिंदीप्रजेनें या गोष्टीला प्रजावात्सल्य म्हणावें किंवा काय तें ज्याचें त्यानेंच ठरविण्याचा हा काळ असल्यामुळें हें प्रकारण येथेंच सर्पावणें भाग आहे.

# काण्ड एकोणसावें.

## रशियांतील बोल्शेव्हिझमचे सिद्धांत!

साक्षरता, साम्यता व सुबुद्धता यांच्या विकासाबरोबरच जगतांत जो एक दुर्धर रोग उत्पन्न झाला आहे; त्याला आम्ही व्यक्तिगत अथवा समूहगत स्वार्थ याच नांवानें संबोधितो. असभ्यता व अनाक्षरता या अवस्थेंत व्यक्तिगत श्रेष्ठत्व अथवा नीचत्व यांचें प्रमाण फारच अल्प असतें. तशी समता सुशिक्षित व सभ्य म्हणविणाऱ्यांत दृगोचर होत नाहीं. शिक्षण व मोठेपणा या गोष्टी व्यक्तीगत स्वार्थाकडे फारच जोरानें आकर्षण करीत असतात. तशा अवस्थेंत, मग स्वार्थाची परमावधि होते यांत आश्चर्य तें कसलें ? तशा अवस्थेंत स्वार्थसाधूपणाची अभिवृद्धि होत राहणें हीच त्या दुर्धर रोगाची असाध्य अवस्था होय! या आमच्या म्हणण्याचा अर्थ असा कोणीही समजू नये कीं, फक्त समानत्व कायम राखण्यासाठीं जगानें साक्षरता प्राप्त करून न घेता रानटी अवस्थेतच राहावें व तसें जगानें राहाणेंही अपरिहार्य व अशक्य आहे. श्रेष्ठता व ज्ञान यांचा विकास सहयोगच घडवून आणीत असतो. विकासाची प्रगति कधींच बंद पाडली जात नाहीं. यास्तव, सभ्यता व सज्ञानावस्था या अवस्थांतही मानवी व्यवहारांत समव्यवहार राहण्यास उपाय कोणता!

## रशियांतील बोल्शोव्हिझम् !

धनिक व नोकर अथवा गरीब लोक यांच्यामध्यें सतव्या शत-काच्या पूर्वी सध्यांइतकी विषमावस्था वास करीत नव्हती. सृष्टीच्या आरंभापासूनच जरी धनबलापासून उत्पन्न होणाऱ्या सत्तेच्या विषमतेची छाया जगावर पसरली असली तरी त्या छायेच्या असह्नीयता व कटुता-या दोन गुणांचा विकास गेल्या दोन शतकांत जसा झाला आहे तसा पूर्वी झालेला नव्हता. जगानें ज्यावेळीं औद्योगित प्रपंचांत यंत्रें व कार-खानें यांचें आस्तित्व निर्माण केलें त्याच वेळीं या कटुतर स्वार्थाचा जंन्म झाला. पूर्वी कोणाचीही गोष्ट जी मजूर वर्गाकडून त्यांच्या अंग-मेहनतीनें निर्माण होत असे तीच वस्तु सध्यां यांत्रिक कारखाने निष्पन्न करतात व त्यामुळें धनिक वर्ग हजारों नोकरांकडून नौकरी करून घेऊन स्वतःचा स्वार्थ दुसऱ्यांच्या श्रमांवर साधूं लागले आहेत. याच गोष्टी बरोबर—याच विषमावस्थेंत स्वार्थाची कटुता अधिक प्रमाणानें झपाट्यानें वाढूं लागली. कमी वेतनावर अधिक श्रम करून घेण्याची भावना लक्ष्मीपुत्रांत जोरानें वाढली. हस्तकौशल्याच्या युगाचा लोप झाल्या-कारणानें कारागीर लोक मजूर बनले व त्यांचें हस्तकौशल्य मालकाच्या यंत्रांच्या द्वारें मालकांच्या मालकीचें बनलें. मालक नाचवतील त्या-प्रमाणें कारागिरांचे मजूर बनलेल्याना नाचावें लागलें. व्यापारी दृष्टीनें जमीन खरेदी करणाऱ्या जमीनदारांनीही शेतकऱ्यांबरोबर अशाच प्रका-रचा व्यापारी व्यवहार करण्याची सुरवात केली. अशा तऱ्हेनें शेती व कारागिरी अखेरीस रसातळाला जाऊन पोंचल्यामुळें लोक आपलें उदर

## काण्ड एकोणीसावें.

निर्वाह कारखान्यांतून नोकऱ्या करून, करून घेऊं लागले. अखेरीस या विषम व्यवहाराचें असें फळ निष्पन्न झालें कीं, समाजांतील कांहीं व्यक्ती अत्यंत धनाढ्य बनल्या व बाकीची जनता अघोर दारिद्र्यरूप व्याघ्राची शिकार होऊन बसली. शेतकरी शरीरकष्ट करून अर्धपोटानें मालकाच्या पदरांत उत्पन्न टाकतां टाकतां भंणग भिकारी बनले व त्यांना तीनशें पासष्ट दिवसांच्या वर्षांतून एक दिवसही भरपेट पोटगी मिळणें अशक्य झालें. इतकेंच नव्हे तर गिरण्या, कारखानें, फ्याक्टऱ्या वगैरेंतून जरी तशा त्या लोकांनीं नोकऱ्या पतकरून तेथें चौदा चौदा घंटे नोकरी केली तरी त्यांना त्याबद्दल जो मुशाहिरा मिळे तोही त्यांची भरचक्का पोटभरणी करण्यास असमर्थ ठरला. याचमुळें श्रीमंत व गरीब या प्रश्नानें नेटाचा जोर धरला. श्रीमंत हे मालक ठरले व गरीब हे त्यांचे दास बनले. अशा त्यां दासांचें खाणेंपिणें व जगणेमरणें त्यांच्या मालकांच्या मर्जी-वर अवलंबून राहिलें. दारिद्र्यामुळें गरीबांना आपली मुलेंलेकरें व स्त्रिया यानांही आपल्याबरोबर मजूरीसाठीं कारखान्यांतून न्यावें लागलें. स्त्रिया व मुलें यांच्याकडूनही दहा दहा, बारा बारा घंटे काम घेण्यात येऊं लागलें. कामगार वर्गांत जर कोणी सुस्तीनें काम करूं लागला अथवा काम करण्यात कुचराई करतो आहे असा आदेशा आला तर त्याला वेळीं सरपूस चोपही देऊन अथवा त्याचें अंगावर कढत पाणी टाकून जबरदस्तीनें त्यांच्याकडून मजूरी करून घेण्यात येऊं लागली. इतकेंच नव्हे तर तशा संशयी मजूरांना पगारकडादि शिक्षाही होऊं लागल्या.

# रशियांतील बोल्शेव्हिजम् !

कामगारांपैकीं कोणी आजारी पडल्यास त्याला फाटक्या तुटक्या औज-राप्रमाणें कारखान्याच्या बाहेर फेंकून देण्यांत येई व त्याच्यावर दया-ळू होऊन त्याला औषधपाणी देण्याची अथवा त्याच्या जगण्यामर-ण्याची मुळींच कधींही काळजी घेण्यांत न येतां त्याच्या जागी नव्या नौकराची भरती करण्यात येऊं लागली. कामगाराच्याच जर जगण्या-मरण्याची चौकशी करण्यांत येत नसे; तर त्याच्या कुटुंबीय माणसांची तरी फिकीर कोण करणार ? त्यांचीं मुलें सज्ञान झाल्यास आपला हेवा मत्सर करतील या भीतीनें त्यानां शिक्षण देऊन सज्ञानी करण्याचें औदार्य दाखविण्याचा थोरपणा कोणीच प्राप्त करून घेतला नाहीं. या प्रमाणें हस्तकौशल्य रसातळाला जाऊन प्रजा अशिक्षित राहात गेल्यामु-ळेंच दरिद्री जनतेचीच निरंतर वृद्धि होत राहिली. गरीबांच्या श्रमांवर श्रीमंत बनलेले लक्षाधीश कोट्याधीश हे चैनींत गर्क होऊन गाड्याघोडीं व मोटारी उडवू लागले व अर्धपोटी राहून आंवाक्याबाहेर श्रम करणारे कामगार लोक जर्णित्वानें भुक्याकंगाल अवस्थेंस धरणीच्या आश्रय करूं लागले. सध्यां जो सामाजिक असंतोष पसरला आहे त्याला जन्माला घालणारी हीच स्थिति सर्वस्वी कारणीभूत झालेली आहे.

त्या असंतोषाचा परिणाम असा झाला कीं, गरीबानीं श्रीमंतांच्या विरुद्ध, मजूरांनी मालकांच्या विरुद्ध व अकुलीनांनी कुलीनांच्या विरुद्ध युद्धाचीं शिंगे मात्र जोरानें व त्वेषानें फुंकली !

## काण्ड एकोणीसावें.

अशा तऱ्हेचा हा रणसंग्राम सुरू झाला असतां. कारखानेवाले मालक हे सरकारच्या गळ्यांतले कंठमणी असल्यामुळें निरंतर विजयीच होत राहिले व मजूरवर्गानें आपलें डोकें वर काढू नये एतदर्थ नाना प्रकारचे अत्याचाराचे कायदेही करण्यांत आले. मजूरवर्गानें राजशासन पद्धतींत घुसूं नये म्हणून त्यांना मताधिकार न देतां तो अधिकार फक्त धनिकांनाच देण्यात आला. याप्रमाणें विषमभावनेच्या कटुत्वाचें प्राबल्य एकसारखें वाढतच चाललें. मजूर वर्गानेंहीं तें सर्व लक्षांत आणून ऐक्यानें आपली स्थिति सुधारण्याची योजना अमलांत आणण्याचा निश्चय केला व त्यामुळें कांहीं काळानें त्यांच्यांतही प्रतिकाराची ऐक्यशक्ति उत्पन्न झाली. समाजांतील सर्वच लोक कांहीं स्वार्थी व पाषाणहृदयी नव्हते. गरीबांचे जे कैवारी होते ते गरीबांची हीन स्थिति सुधारण्याचा प्रयत्न करू लागले. अखेरीस धनिक लोक कांहीं श्रम न करतां गरीबांच्या श्रमावर स्वतःच्या तिजोऱ्या भरून चैन करतांत असें समाजांतील विद्वान लोकही म्हणू लागलें व त्यांना होणाऱ्या फायद्यांतला कांहीं ठराविक हिस्सा त्यांनी कामगारवर्गाला देणें अवश्यक आहे असेंही त्यांनीं प्रतिपादन करण्यास सुरूवात केली. इतकेंच नव्हे तर—त्यांच्या मुलांबाळांना सुशिक्षितकरण्यासाठीं विद्यागृहें काढून त्यांच्या पथ्यापाण्याची व औषधोपचारांची ही व्यवस्था करण्यास त्यांच्या मालकांनीं हास्पितळें काढावींत व त्यांच्या राहण्याचीही तरतूद त्यांनीच केली पाहिजे असेंही त्यांनीं सिद्ध करून टाकिलें, पण

हें सर्व शब्दांत व भाषेंतच राहिलें. मालकांनीं त्याकडे यत्किंचितही जेथें लक्ष्य दिलें नाहीं, तेथें ते स्वार्थी मालक आपल्या नफ्यांतला हिस्सा तरी कामगार लोकांना काय देणार ?

बस्स ! याच वादानें—याच लक्ष्यानें—साम्यवादाला अखेरीस जन्म दिला. त्यांतही निरनिराळीं रूपें जन्म पावलीं. कांहीं म्हणू लागले कीं, सामाजिक व्यक्तीत एकरूपता उत्पन्न करण्यास सर्व देशांतील द्रव्याची सारखी वांटणी झाली पाहिजे. कांहीं म्हणू लागले कीं, गिरण्या, कार-खाने, खाणी, घरेंदारें वगैरे अनेक सार्वजनिक उपयोगाच्या वस्तूंवर राष्ट्रीय सत्ता स्थापन झाली पाहिजे. अशा वस्तु देशांतील प्रत्येक व्यक्तीला समान हक्कानेंच सुखसोयीसाठीं वापरतां येणेंच इष्ट आहे. अशा तऱ्हेचे जरी मोठाले सिद्धांत बाहेर आले तरी कामाला आरम्भ झाला नाहीं. तसली हवा अद्यापीही सर्व देशभर फैलावली असून तिचा विरो-धही सुरू आहे. प्रजासत्ताक राजनीतीला जन्म देऊन मजूर वर्गानें एक नवेंच धोरण आतां स्वीकारलें आहे. तें असें कीं, एखाद्या गिरणी काम-गारांनीं संप करून गिरणी बंद पाडल्यास आपणही त्यांच्या म्हणण्या-च्या समर्थनार्थ व त्यांच्या साह्यासाठीं हडताळ पाडायचा. संपांचा प्रभाव अधिकारी वर्ग व धनिक सावकार यांवर फारच तीव्रतेचा पडतो व त्या-मुळेंच युरोपांतील बहुतेक देशातून मजूरांच्या सत्तेचा स्वीकार करण्यांत येत असलेला दिसून येऊं लागलेला असून, प्रतिनिधिमंडळांतही त्यांचे प्रतिनिधि घेऊं लागले आहेत. पार्लमेन्टांत जरी त्यांचे प्रतिनिधि सभा-सिद्ध केले जात आहेत, तरी धनिकांची प्रतिष्ठा अद्यापी पूर्ववत् कायमच

आहे कच्चा माल आणविण्यांत व आपलीच बाजार पेठ बनविण्यांत अद्यापीही ते मोठ्या जोरानें गरीबांशीं संग्राम करीत आहेत. त्याचा हात धरणारा व त्यांच्या तोंडाला मुस्के घालणारा कोणी हरीचालाल पुढें सरसावलेला दिसत नाहीं. ते स्वतःच सरकार असून त्यांचींच सरकारें बनलेलीं आहेत. अशी जेथें स्थिति आहे तेथें गरीबांचें कोण ऐकणार !

रशियाच्या शासनपद्धतीनें या स्थितीला फारच कडुतर स्वरूप दिलें होतें. तेथील जमीनदारांच्या अघोरी अत्याचारांच्या वर्तनानें शेतकरी वर्गाला त्राहि भगवान् होऊन गेलें होतें. रशियांत प्रथम १८६४ मध्यें साम्यवादांच्या घटनेस सुरुवात झाली. याच कारणानें निहिलि-झमची उत्पति झाली. झारच्या अघोरी व अनर्थकारी वर्तनानें आणि निरंकुश शासनपद्धतीनें जरी साम्यवादाला जन्म दिला होता, तरी त्यांतूनच उत्पन्न झालेली जी प्रजासत्ताक राज्यशासनाची कट्यार तिनेंच पाषाणहृदयी झारच्या काळजांत घुसून त्याचा त्याच्या घरा-ण्यासह समूळ नाश केला व स्वतः राजरक्तांत नाहण्यानें स्वतःचा गौरव करून घेतला !

याबद्दलची सर्व यच्चयावत् हकीकत मागील काण्डांतून वेळों-वेळीं आपलेली वाचकांस स्मरत असेलच. झारनें प्रजाजनांवर कसकसे अत्याचार केले त्याचेंही वर्णन मागें येऊन गेलेंच आहे. अखेरीस झारला रावाचा रंक कसा बनविण्यांत आला व यःकश्चित् कैद्याप्रमाणें त्याला सैबेरियांत नेऊन कसा ठार मारून टाकला याचीही माहिती वाचकांना मिळालेलीच आहे.

# रशियांतील बोल्शेविझम !

आतां लेनिन व ट्रॉट्स्की यांनीं रशियाचीं राज्यसूत्रें आपल्या हातीं धरून साम्यवाद म्हणजे काय व त्याचें स्वरूप कसें असतें हें जगाला प्रथम ज्यावेळीं त्यांनीं दाखविलें त्यावेळची स्थिति कशी होती ती आतां आपण पाहूं.

साम्यवादाची समष्टीवाद ( Cmmunism ) म्हणून जी एक शाखा आहे तिचें असें मत आहे कीं, सध्यां ज्या पद्धतीचें सरकार रशियांत स्थापन झालें आहे व जी शासनपद्धति अमलांत आहे तिला कशाचीच आवश्यकता नसून, ठिकठिकाणीं संघांची स्थापना करून त्यांनीं परस्परांत कामांची वांटणी करून घेऊन एकमेकांनीं एकमेकांच्या अवश्यकतेची पूर्तता करावी. जमीनींची मालकी शेतकऱ्यांना देऊन कारखान्यांचें स्वामित्व कामगार वर्गाच्या हातीं द्यावें. राष्ट्रीय सरकारनें त्या सर्वांच्या खाण्यापिण्याची व लत्ताकपड्याची योग्य व्यवस्था ठेवावी. देशांतील सर्व धन, भूमी घरें, रेल्वे, तारायंत्रें, खाणी, व्यापार-उद्दीम उद्योग व परिश्रम या सर्वांवर राष्ट्रीय मालकी असावी.

बोल्शेव्हिक सरकारनें याच सिद्धांतांना शुद्ध व स्वच्छ असें व्यावहारिक स्वरूप दिलें आहे.

शेतकऱ्यांना जी जमीन वांटून देण्यांत आली, ती अशी कीं, एक शेतकरी जितकी जमीन स्वतःच्या श्रमांवर नांगरूं व पेरूं शकेल तेवढ्या जमीनीचा त्याला मालक बनविण्यात आलें व त्यामुळें जमीनदार व धान्याचे व्यापारी नामोहरण झाले. तीन शेतकरी आपली जमीन नांगरून

पेरणी करतात व तींत पैदा होणारें धान्य राष्ट्रीय मालकीचें ठरतें. यांतून सरकार शेतकऱ्यांचें सर्व तऱ्हेचें पालनपोषण करून इतर कामगारांचेंही पालनपोषण त्यांतूनच केलें जातें.

याचप्रमाणें गिरण्या व कारखानें यांचाही बन्दोबस्त करण्यात आला आहे. गेल्या वर्षाच्या फेब्रुवारी महिन्यात मॉस्को शहरीं जी '**बोल्शेव्हिक औद्योगिक कॉन्फरन्स**' भरली होती तींत **लेनिन** व ट्रॉटस्की यांनीं असें स्पष्टपणें सांगून टाकलें कीं, "**खाणी व कारखानें आतां कंपनी किंवा व्यक्ति यांच्या मालकीचे राहिले नसून, त्यावर राष्ट्रीय सरकारची मालकी स्थापित झाली आहे. मजूरवर्गाचें सैन्य तयार करण्यांत येईल. ज्याला जें काम करण्यांची इच्छा असेल त्याची रवानगी त्या कामावर करून राष्ट्रीय सरकार राष्ट्रासाठीं त्याच्या कडून काम करवून घेईल. मजूरवर्गाच्या श्रमांवर याउढें राष्ट्रांचा अधिकार मानण्यांत येईल व त्याच प्रमाणें जसें अन्नपाणी इतरांस देण्यांत येईल तसेंच मजूरवर्गालाही पावतें करण्यांत येईल. राष्ट्रांतील एका व्यक्तीच्या वांटणीला जें वेतन विभागानें येईल तेंच एका मजूरालाही दिलें जाईल. तात्पर्यार्थ इतकाच कीं, राष्ट्रांत खर्चवेंच वजा जातां जी शिल्लक राहील तिची सर्वांत सारख्या प्रमाणांची वांटणी करण्यांत येईल; म्हणजे काय कीं,**

देशांतलि एक व्यक्ति जर तूप चपाती खाईल तर सर्वांसही तशीच खाण्यांस मिळेल, अथवा एक व्यक्ति जर जरीचा कपडा वापरील तर सर्वांनाही तसेच कपडे वापरायला मिळतील. घरभाडें ज्याच्या त्याच्या मगदुराच्या ऐपतीवर ठरविण्यांत येऊन तें घेतलें जाईल. लहान बालकांसाठीं रोटया व दूध हीं सरकारांतून फुकट देण्यांत येतील. राष्ट्रांतील सर्व शिक्षणेच्छु व शिक्षण घेण्यास लायख अशा मुलांना प्राथमिक शिक्षणापासून अगदीं उच्च दर्जांच्या शिक्षणापर्यंत फुकट शिक्षण देण्यांत येईल. त्यांत शिफारस अथवा पक्षपात यांचा शिरकाव होणार नाहीं.

सैनिकांच्या रचनेंतही अशाच तऱ्हेची विशेष व्यवस्था केली आहे. त्यांचें वेतन त्यांच्या पदव्या, त्यांच्या बदल्या, त्यांच्या शिक्षा, त्यांच्या कार्याची परीक्षा वगैरे सर्व त्यांनींच नेमलेल्या कमेटयांवर सोंपविण्यांत आलेलें आहे. त्याच कमेटयांच्या मताधिक्यानें लष्करी अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या जातील. युद्धारंभ व युद्धस्तंभन या गोष्टीही त्यांच्याच मर्जीवर टाकल्या आहेत. याशिवाय त्यांतून निवडून आलेले मंत्री राज्यशासन मंडळांत प्रविष्ट करण्यांत आले आहेत.

## काण्ड एकोणीसावें.

याप्रमाणें देशाचा सर्व व्यापारही राष्ट्रीय सरकाराच्या ताब्यांत राहील व त्यावर मिळणारा नफा राष्ट्रहिताच्याच कामीं लावण्यांत येईल. व्यक्तिगत लाभहानीचा झगडा राहणार नाहीं. दुकानदारांचे परिश्रम आणि कार्यक्षमता यांवरही राष्ट्रीय सरकारची सत्ता असेल. तेही राष्ट्रीय व्यक्ति गणल्या जाऊन त्यांचा सर्व तन्हेचा प्रतिपाळ सरकारांतूनच करण्यांत येईल. राष्ट्रांतील एकही व्यक्ति निरुद्योगी न राहूं देतां त्यांचा सांभाळ राष्ट्रीय सरकारच करील. या व्यवस्थेनें सर्व राष्ट्र कामकरी बनून सर्व जनतेला कोणच्याही वस्तूची वाण राहणार नाहीं असें होणार आहे. सर्व जनतेला सर्व वस्तूंचा एकसारख्या हिस्सेरशीनें उपभोग घ्यायला या व्यवस्थेपेक्षां अन्यावस्था चांगलीशी जोंपर्यंत आढळली नाहीं तोंपर्यंत हीच व्यवस्था मुक्रर करण्यांत आली आहे. स्त्री व पुरुष यांतील समान दर्जांत भेदभाव न राखता, राष्ट्रीय संपत्तींत, राष्ट्रीय सरकारांत व राष्ट्रीय वस्तूंत दोघांनाही सारखाच वांटा मिळेल."

येणेंप्रमाणें संक्षेपत: बोल्शेव्हिकांचे हे सिद्धांत आहेत.

# काण्ड विसावें.

## रशियांतील पंचायती प्रजातंत्र.

सध्यां रशियांत जी राज्यपद्धति अमलांत आहे तिला सोव्हिएट राज्यपद्धति म्हणजे पंचायती प्रजातंत्र असें ह्मटलें जातें. या पंचायतीची रचना पूर्णपणें लोकसत्ताक असून त्याबद्दल रशियन लेखकांचें असें म्हणणें आहे कीं, " रशियानें जी राज्यव्यवस्था सध्यां अमलांत आणिली आहे तिची बरोबरी जगांतील कोणच्याही राष्ट्रांतील प्रजासत्ताक राज्यव्यवस्था करूं शकणार नाहीं. "

रशियामध्यें जी राज्यक्रान्ती घडून आली तिचीं मुख्य दोन कारणें होतीं-हें वाचकांना विदित झालेंच आहे. झारचें अत्याचाराचें निरंकुश वर्तन हें एक कारण व दुसरें जमीनदार आणि धनाढ्य व्यापारी यांची स्वार्थपूर्ण वागणूक, हीं मुख्य दोन कारणें होत. राज्यक्रान्ती नंतर तर झारच्या अस्तित्वाचा पूर्ण लोप होऊन गेला होता, पण क्रांतीचा एक उद्देश मात्र अपूर्णावस्थेतच राहिला होता. प्रजातंत्राचें जें तात्पुरतें सरकार ( Provisional Government' ) नेमण्यांत आलें होतें त्याच्या कारकीर्दींतही गरीबांच्या श्रमावर अनुचित असा फायदा करून

वेठ्याचें काम व गरीब शेतकऱ्यांच्या रक्ताचें पाणी करण्याची जमीन-दारांची वहिवाट या गोष्टी बंद पडल्या नव्हत्या. केरेन्स्कीच्या अध्यक्षतेखालील प्रजातंत्राला ठोकर मारून त्याच्या जागीं लेनिनच्या अध्यक्षतेखालीं प्रजेनें जें नवें सरकार स्थापन केलें; त्यांतलें बीज हेंच होय. जमीनदार व धनाढ्य यांचा क्रूर ताबा जर गरिब प्रजेला पिळीत राहिला, तर क्रान्ती घडून किंवा न घडून सारखीच. मग त्यात क्रान्ती-पासून फायदा तो कोणचा? लेनिनच्या सरकारनें ही गोष्ट मनांत आणून राज्यसूत्रें आपल्या हातीं घेतल्याबरोबर प्रजाजनांत अशी द्वाही प्रसिद्ध केली कीं, " शेतकऱ्यांनीं जमीनदारांच्या ताब्यां-तून जमीन हिसकावून घेऊन कामगार मजूरवर्गानें गिरण्या वगैरे कारखान्यांचे ताबे घ्यावे. " हें वर्तमान ऐकल्याबरोबर शेतकरी व कामगार मजूर यांच्या लहान मोठ्या सर्व संस्थांनीं आपलीं मस्तकें एकदम वर केलीं. त्यांना राष्ट्रीय संपत्ति व भूमी यांची हिस्सा-रशीनें समसमान वाटणी मिळाली व ते त्याबद्दल जबाबदार बनले गेले. शेतकऱ्यांच्या सभांतून व कामगार मजूरांच्या सभांतून जे शेतकरी व कामगार लोक प्रथम आपली कहाणी रडक्या आवाजांत जनतेपुढें मांड-ण्याचा प्रयत्न करीत असत तेच आतां स्वस्थानच्या पंचायतीचे ( Soviets ) प्रधान बनले गेले. रशियांत जें अशान्तीचें भयंकर वावटळ उठलें होतें त्या प्रसंगीं शत्रु व देशद्रोही यांपासून याच ग्राम-पंचायतींनी सर्व साधारण जनतेचें उत्तम रक्षण केलें. याच संस्थांनी

जमीनदारांपासून धान्य हिसकावून घेऊन जनतेच्या पोटापाण्याची तर सूद लावली. चारीं बाजूंनीं शत्रूनें घेरलें असतां बोल्शेव्हिक सरकारला जेव्हां तशा त्या भयंकर आपत्तीच्या प्रसंगाशीं तोंड द्यावें लागलें. त्या प्रसंगीं याच ग्रामपंचयतींनीं जनतेंत शांतता राखण्याची प्रशंसनीय कामगिरी केली आणि त्यामुळेंच त्या ग्रामपंचायतींच्या हातीं कांहीं थोडेसे राज्याधिकारही देण्यांत आले. त्या पंचायती एकंदर तीन प्रकारच्या बनविण्यांत आल्या होत्या. कामगार मजूरवर्गानें आपल्या पंचायती औद्योगिक नगरांत स्थापन केल्या, शेतकरी वर्गानें आपल्या पंचायती आपापल्या गांवीं स्थापिल्या व सैनिकांनीं आपल्या सैन्याच्या स्थळीं स्थापन केल्या.

कुटिल जमीनदार व स्वार्थी लक्ष्मीपुत्र यांना देशांतून नायनाट करण्याचेंच ब्रीद बोल्शेव्हिकांनीं पतकरल्यामुळें शेतकरी, कामगार, मजूर व इतर सर्व श्रमजीवी जनता यांचेंच प्रतिनिधि राजशासनपद्धतींत निवडून घेतलें गेलें. लक्ष्मीपुत्रांचा नायनाट करून त्यांच्या समर्थकांना जबरदस्तीनें श्रम करून पोट भरण्यास लावण्याचें काम या राजसत्तेनें अखेरीस केलें.

याच ग्रामपंचायतीच्या द्वारें देशांतील जिल्हे व प्रांत यांतील पंचायतींची रचना करण्याचें काम सुरू झालें व दर महिन्याच्या अखेरीस त्या सर्व पंचायतीच्या प्रतिनिधींची एक सभा (State Council) भरून सर्व रशियाच्या राज्यकारभाराचें ती कार्यकारिणी पंचायत-मति

निधींची सभा विचार करीत असते. कार्यकारिणी सभा अथवा हेंच मंडळ रशियन राज्यचालकांतील सर्वश्रेष्ठ असून त्यामंडळांत जे लोक सदिष्ट होतात ते सर्व रशियन जनतेच्या व्यक्तिगत मतानेंच निवडले गेलेले असतात. त्याचप्रमाणें शेतकीची सुधारणा करण्याकरितां उद्योग धंद्यांची सुव्यवस्था राखण्यासाठीं एका औद्योगिक पंचायतीची संस्थापन झालेली आहे. तें सर्व काम प्रजाप्रतिनिधींच्या द्वारेंच करण्यांत येते. याशिवाय देशाची व्यवस्था योग्य तऱ्हेनें करणाऱ्या एका मंडळाचीही योजनाकरण्यांत आली असून त्या मंडळाचें नांव 'पीपल्स कामिसरि' ( People's Commissory ) असें ठेवण्यांत आलें आहे. त्या मंडळाचा अधिपति मॉ. लेनिन यास नेमण्यांत आलें असून हेंच मंडळ कायदे व देशव्यवस्था हीं कामें करतें.

वर सांगितलेल्या पंचायतींची घटना पुढीलप्रमाणें करण्यांत आलेली आहे.

## अशिक्षितांची नियमावली.

**( १ ) अशिक्षितांच्या सभेच्या पहिल्या बैठकीसाठीं दोनतृतीयांश अशिक्षित सभासदांच्या बहुमतानें कोरम पुरे समजलें जावें. पहिल्या बैठकींत कोरम पुरें न झाल्यास दुसऱ्या बैठकींत एकतृतीयांशानें कोरम पुरें समजावें.**

(२) कार्य करण्याच्या पद्धतीची रचना अमुक तारखेस नेमणें किंवा ती तारीख मागें पुढे ढकलणें, उमेदवारांची यादी तयार करणें वगैरे कामें करण्याचा अधिकार श्रमजीवी समितीचा राहील.

## प्रतिनिधींची निवड करण्याचे नियम.

(१) ज्या संस्थेंत दोनशेंपासून पांचशेंपर्यंत नौकर असतील अशांतून एक प्रतिनिधि व पांचशेंच्या पेक्षां अधिक नौकर ज्या संस्थेंत असतील अशा दर पांचशें नौकरांनीं निवडलेला एक प्रतिनिधि ती संस्था धाडूं शकेल ज्या कारखान्यांत दोनशे पेक्षां कमी मजूर असतील अशा कारखान्यानें दुसऱ्या कारखान्यांतील नौकराच्या संगतमतानें आपापलें प्रतिनिधि निवडून धाडावेत

(२) मॉस्कोच्या व्यापारी सभेतील आपलें पांच प्रतिनिधि धाडण्याचा हक्क आहे.

(३) ज्या व्यापारी मंडळाचे दोन हजारपर्यंत सभासद असतील अशांतला एक, ज्यांत पांच हजारपर्यंत असतील अशांतलें दोन प्रतिनिधि व दरपांचशांतला एक प्रतिनिधि धाडतील तीं मंडळें लायक समजली जातील; असें आहे तरी कोणत्याही मंडळांतून दहा प्रतिनिधींपेक्षां अधिक प्रतिनिधि घेतले जाणार नाहींत.

( ४ ) जनतेच्या धुरीण मंडळासाठीं ( People's Commissory ) प्रत्येक राजनैतिक पक्ष आपले तीस पर्यंत प्रतिनिधि धाडूं शकेल. त्या पक्षांच्या अनुगामियांच्या संख्येप्रमाणें जरी प्रतिनिधींच्या जागा राखल्या जातील तरी त्यांत नोकरी व कारागीर यांचे चार प्रतिनिधि आवश्य निवडून आलेलेच असले पाहिजेत असा निर्बन्ध ठेवण्यांत आला आहे.

( ५ ) धुरीण समितीसाठीं अशिक्षित नेत्यांनीं आपले लक्ष्य पुढील सूचनेकडे आवश्य दिलें पाहिजे. अशिक्षित वर्गाच्या मंडळांतून तीं मंडळें नियमानुसार जरी आपले प्रतिनिधि धाडूं शकलीं, तरी त्या मंडळांच्या नेत्यांना अशी विनंती करण्यांत येत आहे कीं, ज्यांच्यापाशीं अशिक्षित वर्गाच्यां मंडळांच्या संपूर्ण माहितीची हकीगत लिहिलेली असेल अशांनीं प्रथम आपलीं नांवें मॉस्कोच्या व्यापारी समितींत नोंदून घ्यावींत.

( अ ) पोलिश साम्यवादी मंडळ.

( ब ) पोलिश ल्युथिवेनियन साम्यवादी मंडळ.

( क ) लेटिश साम्यवादी प्रजातंत्रवादी मंडळ.

( ड ) ज्यूइश साम्यवादक प्रजातंत्र–मंडळ.

( ६ ) जे रशियांनाशिवाय साम्यवादी असतील त्यांच्या दर मंडळांतून एक प्रतिनिधि पुढील प्रमाणें घेतला जाईल.

(७) वरील नियमानुसार ज्या संस्थांनात आपले प्रतिनिधि धाडण्याचा अधिकार प्राप्त झाला असेल; अशांना अशी विनंति करण्यांत येते आहे कीं, त्यांनीं आपल्या आशिक्षित प्रतिनिधींच्या बाबतींतील माहिती प्रथम पत्रानें कळवावी. ज्यांच्याकडून अशी माहिती लिहून आलेली नसेल अशांना सभासद होण्याचा अधिकार देण्यांत येणार नाहीं.

## मॉस्कोच्या प्रतिनिधींचें स्पष्टीकरण.

टियाजा ट्रामवे विभाग—ड्रायव्हर १, बोल्शेव्हिक २, स्टाफ १.

| | | |
|---|---|---|
| बारयूलिक कारखाना ... ... ... | १ | बोल्शेव्हिक |
| कॉलचेविस्की, डॉमिकोविस्की ... ... ... कार्यालय | १ | ,, |
| परलोय ... . .. ... .. | १ | ,, |
| बारानॉव्ह ... . . .... . . .. | १ | ,, |
| यॉजनियॉक ... . ... ... ... | १ | ,, |
| सेन्ट्रल मॅशार्कोव्हिकचे दुकान . . ... | १ | ,, |
| जॅकनियॉक ... ... ... ... ... | १ | ,, |
| इक्यान्ड्रिस्कीचें पवित्र स्थळ ... ... | १ | साम्यवादी. |
| शिंपी व्यापारी, पटांची दुकानें ... ... ... ... | १ | ,, |

## काण्ड विसावें.

गाड्यांचेकारखानदार ... ... ... २ ,,
गुत्तेवाले .. ... ... ... १ ,,
अध्यापक व पाठशाळासेवक ... १ मॅन्शेव्हिक.
सॅमोक वॉर्टस्की वॉर्ड .. ... १ ,,
जिल्ह्यांतील कारखाने .. ... . १ ,,
दक्षिण साम्यवादी क्रांतिसाहाय्यक ... १ ,,
बोल्शेव्हिक . . ... ३४ ,,
मॅन्शेव्हिक . . ... ... ... .... १० ,,
उ. साम्यवादक क्रांतीकारक . १ ,,
द. ,, ,, ... ... १ ,,
विद्युत इंजिनियरांची सभा ... ... १ ,,

### शहरांतील टपाल खातें.

बोल्शेव्हिक ... ... ... . . १६ ,,
उ. साम्यवादी क्रांतिसाहाय्यक ... . १ ,,

### चहांचीं दुकानें व खाणावळी.

बोल्शेव्हिक .. . .. ... ... १ ,,
उ. साम्यवादी क्रांतिसाहाय्यक... ... १ ,,

### मॉस्कोचें सोव्हिएट.

अशिक्षित सभाचे प्रतिनिधि धाडणाऱ्या कारखानदारांनीं व दुकानदारांनीं पुढील गोष्टींकडे लक्ष्य द्यावें:—

१—कारखाने व दुकानें यांना हें उचित आहे कीं, त्यांनीं सनदेशिवाय त्यांच्या सभांचें अध्यक्ष व कांहीं सभासद

यांच्या सह्यांनिशीं आपापल्या कार्याचें मोहरबंद केलेलें लखोटे धाडावे.

२–मोहरबंद लखोट्यांत जें विवरण लिहिलेलें असेल त्यांत खुलासेवार–पुरुष, स्त्री व बालक या तीन मथळ्याखालीं पृथकपणें कारखान्यांतील मजुरांची नांवनिशी लिहिलेली असली पाहिजे.

३–प्रत्येक उमेदवारासाठीं दिलेल्या मतांची संख्या नमूद करणें आवश्यक आहे.

४–अशिक्षित वर्गाच्या सभांचे निरक्षर सभासद किती आहेत त्यांची खरी संख्या लिहिलेली असावी

५–सर्वश्रेष्ठ अशा प्रजापंचायतीपुढें महत्कार्य व महत्वपूर्ण प्रश्न असल्यामुळें निरक्षर सभांचे विवरण खुलासेवार धाडणे व प्रतिनिधींसाठीं तिकिट मागावून घेणे ह्या गोष्टी तावडतोब केल्या पाहिजेत.

मॉस्कोच्या सोव्हिएटचें पाहिलें अधिवेशन ता. २३ एप्रिल १९१९मध्यें भरलें होतें. त्याच्या प्रसिद्ध झालेल्या हकीकतींवरून असें समजतें कीं, एकंदर ३९४ संस्थांतील ८०३ प्रतिनिधींपैकीं ७२३ जणांपाशींच तिकिटें असल्यामुळें त्यांचा प्रवेश झाला त्यांचे आंकडे पुढीलप्रमाणें:—

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बोल्शेव्हिक | ... | ... | ... | ... | ३५४ |
| साहाय्यक | ... | ... | ... | ... | ३३४ |
| मेन्शेव्हिक | ... | ... | ... | ... | ७३ |
| साहाय्यक | ... | ... | ... | ... | ९ |

काढ्ड विसावें.

| | |
|---|---|
| मध्य साम्य क्रांतिकारी ... ... ... | १९ |
| दक्षिण साम्य. " ... ... | ५ |
| उ. सा. क्रांतिकारक ... ... ... | ४० |
| साह्यक ... ... . . ... | ११ |
| संयुक्त समाजवादी प्रजातंत्रीय ... ... | ५ |
| स्वतंत्र ... ... ... ... | ७ |
| क्रांतिकारी ... . . ... | ५ |
| स्वतंत्र ... ... ... ... | १ |

## कामगार मजूरवर्गाचे प्रतिनिधि

सोव्हिएट प्रजातंत्राच्या नागरिकांच्या स्थितींतील निवडणु कांची जुनी पद्धत अनुपयुक्त होती. कारण कीं, त्या निवडणुकीच्या नियमांनुसारें, ज्या निवडीवर पंचायती प्रजातंत्राचा विश्वास असेल अशा तऱ्हेची प्रतिनिधींची निवड प्रचंड कामगार मजूरवर्गांतून केली जात नसे.

१—कामगार मजूर वर्गाला ज्या दिवशीं एकत्र जमण्याची फुरसद असते त्याच दिवशीं त्यांना प्रतिनिधींची निवड करतां येते. याचमुळें प्रतिनिधींची मोठी संख्या—कारखाने, दुकानें, रेल्वे व शिक्षणालयें यांतूनच येते. प्रजातंत्राच्या राज्यकारभाराची जागा मॉस्को येथें असल्यामुळें तेथील सरकारी नौकरांतूनही प्रतिनिधि येऊं शकतात.

२—सोव्हिएट सभा प्रत्येक आठवड्यास भरते. त्यांतले काम करणारे लोक वेतनावर आपलें काम करतात. नेत्यांची मोठी संख्या आपल्या साथीदारांसह कारखान्यांतून अधिक वेळपर्यंत काम करते. कामगार मजूर हे सदोदीत आपल्या नेत्यांबरोबर कारखाने, दुकान वगैरेंतून सहकारितेनें काम करतात व साप्ताहिक अथवा मासिक सभेंत प्रसिद्ध करण्याच्या आपल्या सूचना ते त्यांस तेथें देतात.

३—दिवसभर कामांत गुंतल्यामुळें जेथें श्रमजीवींयांना आपले प्रतिनिधि निवडण्याची फुरसत मिळत नाहीं; अशा ठिकाणीं कामगार मजूर लोक एक दिवश ठरवून आपली सार्वजनिक प्रचंड सभा भरवतात व तेथें आपल्या प्रतिनिधींची निवड करतात. चहापानाचीं दुकानें, धर्मशाळा, आश्रम, खाणावळी वगैरेंतून पसरलेल्या लोकांची ही स्थिति असते.

४—सोव्हिएट सरकार आपल्या—विशेषकरून औद्योगिक अर्थात् वस्तु बनवणाऱ्या व त्यांचे प्रयोग करणाऱ्यांच्या बाबतींत विशेष लक्ष्य पुरविते.

या मथळ्याखालीं—व्यापारी मंडळें व व्यापारी सभा येतात. याशिवाय सोव्हिएटच्या सभासदांकडून आर्थिक विभाग बनविण्यात येतात. या बाबीची शाखा प्रत्येक नगर, शहर व गांवांत ठेवलेली आहे.

त्या शाखांचा सरळ संबंध प्रजातंत्राशी जोडलेला आहे. जेथें आर्थिक नीतीवर सोव्हिएटचें शासन ठेवणें आवश्यक आहे, तेथें कामगार मजूर वर्गाच्या प्रतिनिधींच्या द्वारें श्रमजीवीयाचें आधिपत्य असणेंही अनिवार्य आहे. या राज्यशासनपद्धतीनें कित्येक वेळां स्वतःच्या अनाक्षरावस्थेच्या बिकट प्रसंगापेक्षाही त्यांना अधिक फायदा होतो व ते संतुष्ट राहतात हें उघडच आहे.

५—**सोव्हिएट** साम्यवाद्यांच्या स्थितींत म्हणजे राजनैतिकांच्या दृष्टीनें:—

सध्यां जरी **सोव्हिएट** संस्थेच्या कारभारामध्यें कामगार मजूर वर्गाच्या प्रतिनिधींच्या संस्थेपेक्षां राजनीतिनिपुणांच्या प्रतिनिधींची संख्या कमी आहे, तरी अशा प्रकारची राज्यक्रांति व अशा नव्या तऱ्हेच्या राज्याची मांडणी होत असतां तशा त्यावेळीं त्याची संख्या अशीच असणें संभवनीय आहे कारण, त्यापासून जनतेचीं अनेक कार्यें सुसंघटित घडवून आणण्याच्या बाबतीं त्यास आयतांच चांगला ज्ञानलाभ करून घेण्याची आयती संधी मिळते. याप्रमाणें **बोल्शेव्हिक** अथवा **सोव्हिएट** राज्ययंत्राची उभारणी झाली आहे. यापुढील हकीकत याच्या पुढच्या भागांत वाचायला मिळेल.

**भाग पहिला समाप्त.**



[library stamp]

REFBK-0001956